इचलकरंजी R.N.I. Regi. No. 63119/94 ■ पोस्टल रजि.नं. KLR/78/2024-2026 ■ अंक -१४६ ■ वर्ष - ४२




राष्ट्रीय विचाराचे एकमेव निर्भिड दैनिक

# महासत्ता

कोल्हापूर - सांगली - सातारा - बेळगांव

■ शुक्रवार,ता.२५ सप्टेंबर २०२६ ■ भाद्रपद शु.१४ ■ www.emahasatta.com ■ mahasatta@gmail.com ■ पाने १२+४=१६ ■ किंमत ५ रूपये

# पुढच्या वर्षी लवकर या...!

## इचलकरंजीत बाप्पाच्या विसर्जनासाठी जय्यत तयारी

■ इचलकरंजी,ता.२४–

**गेल्या अकरा दिवसांपासून पाहुणचार घेणाऱ्या लाडक्या गणरायाला निरोप देण्यासाठी अवघी वस्त्रनगरी सज्ज झाली आहे. विसर्जन मिरवणूक शांततेत पार पडावी यासाठी पोलिस बंदोबस्ताची विशेष तयारी करण्यात आली आहे. पारंपरिक विसर्जन मार्गासह शहापूर खण मार्गावर पोलिसांचा बंदोबस्त तैनात असणार आहे.**

दरम्यान, गणेश चतुर्थीच्या दहाव्या दिवशी म्हणजेच गुरूवारी शहर परिसरातील गणेशमूर्ती तसेच देखावे पाहण्यासाठी रात्री उशिरापर्यंत रस्ते अक्षरश: गर्दीने फुलून गेले होते.


इचलकरंजीत अखेरच्या दिवशी देखावे पहाण्यासाठी नागरिकांनी केलेली गर्दी.(छाया–मयूर चिंदे)


आज शुक्रवारी सकाळी १० वाजता श्री शिवतीर्थ शहर वाहतूक नियंत्रण शाखा येथून मान्यवरांच्या हस्ते मानाच्या बिरदेव गणेशोत्सव मंडळाच्या श्रींच्या पालखीचे पुजन करुन विसर्जन मिरवणूकीस प्रारंभ होणार आहे.

विसर्जन मिरवणुकीमध्ये कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून तगडा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. अप्पर पोलीस अधीक्षक, २ पोलीस उपाधीक्षक, ७ पोलिस निरिक्षक, १४ सहाय्यक निरिक्षक, ३० उपनिरिक्षक, २९९ पोलिस, २२५ होमगार्ड, दोन स्ट्रायकिंग र्स, १ दंगल काबू पथक आणि डॉल्बी विरोधी पथके असा बंदोबस्त असणार आहे. याशिवाय सीसीटीव्हीच्या माध्यमातून मिरवणूक मार्गावर तीक्ष्ण नजर असणार आहे. शहरातील छ. शाहू पुतळा, श्री शिवतीर्थ, श्री शंभुतीर्थ, म.गांधी पुतळा, मोठे तळे, झेंडा चौक ते नदीवेस नाका मार्गे पंचगंगा नदीघाट असा विर्सजन मिरवणूकीचा मार्ग असून या मुख्य मार्गाला जोडणारे सर्वच रस्ते बंद करण्यात आले (पान २ वर)

## ज्ञानेश कुमार यांच्याविरोधात कोल्हापूर खंडपीठात याचिका

■ कोल्हापूर,ता.२४ (प्रतिनिधी)–

**मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या नेतृत्वाखाली घेण्यात आलेल्या काही निर्णय आणि प्रशासकीय प्रक्रियांवर प्रश्न उपस्थित करत मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठात याचिका दाखल करण्यात आली आहे. प्रथमेश गवाणकर, गौरव नाखरेकर, आदेश भाटकर आणि स्मिताली नार्वेकर यांनी ॲड. असीम सरोदे यांच्या माध्यमातून ही याचिका दाखल केली आहे.**




केंद्रीय निवडणूक आयोग, मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार, निवडणूक आयुक्त सुखबीर सिंह संधू व विवेक जोशी तसेच राज्य निवडणूक आयोगाला याचिकेत प्रतिवादी करण्यात आले आहे. निवडणूक आयोगाचे दोन आयुक्त सुखबीर सिंह संधू आणि विवेक जोशी यांनी विविध निर्णय व प्रक्रियांबाबत किमान १४ वेळा आक्षेप नोंदविल्याचे 'इंडियन एक्स्प्रेस'मध्ये प्रसिद्ध झालेल्या वृत्ताचा आधार याचिकेत घेण्यात आला आहे. मतदार नोंदणी, मतदारांची नावे वगळणे व पुनर्स्थापित करणे (पान २ वर)

### खाद्यतेलांवरील आयात शुल्कात कपात

■ नवी दिल्ली,ता.२४–

**आंतरराष्ट्रीय खाद्यतेलाच्या किमतींमधल्या तीव्र वाढीतून निर्माण होणारा महागाईचा दबाव कमी करुन ग्राहकांना दिलासा दिला.**



देशांतर्गत खाद्यतेलाच्या किमती नियंत्रणात ठेवण्याच्या उद्देशाने भारत सरकारने आयात केलेल्या (पान २ वर)

### बसला आग ; नऊ प्रवासी जळून खाक

■ नोएडा,ता.२४–

**उत्तर प्रदेशमधील नोएडा येथे बुधवारी रात्री यमुना एक्स्प्रेस–वेवर स्लीपर एसी बसला आग लागल्याने ९ प्रवाशांचा मृत्यू झाला.**

यामध्ये ८ पुरुष आणि एका महिलेचा समावेश आहे. बसमध्ये ३५ प्रवासी होते. २० जणांना सुरक्षित बाहेर काढण्यात आले, तर काही प्रवासी खिडक्या फोडून बाहेर पडले. हा अपघात रात्री जेवर विमानतळापासून ५०० मीटर अंतरावर (पान २ वर)

### अजय जामवाल भाजप प्रदेश संघटन महामंत्रीपदी नियुक्त

■ मुंबई,ता.२४–

**भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र प्रदेशाला मिळाले नवीन संघटन महामंत्री अजय जामवाल यांची महाराष्ट्र प्रदेश भाजपाच्या संघटन महामंत्री पदी नियुक्ती करण्यात आली आहे.**

यापूर्वी ते मध्यप्रदेश आणि छत्तीसगड या दोन प्रदेशांचे संघटन मंत्री होते. आजपासून त्यांचे मुंबई हे केंद्र असणार असून बऱ्याच दिवसापासून (पान २ वर)

## दुष्काळग्रस्त भाग आज जाहीर होणार

■ मुंबई,ता.२४–

**राज्य सरकारकडून दुष्काळग्रस्त भाग जाहीर करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. दुष्काळ संहितेतील ट्रिगर–१ नुसार दुष्काळ जाहीर करण्याचा शासन निर्णय उद्या काढण्यात येईल, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. एखादा भाग या प्रक्रियेतून सुटला तर ट्रिगर–३ नुसार त्याचा समावेश केला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.**



अमरावती विभागातील परिस्थितीची पाहणी केल्यानंतर मुख्यमंत्री फडणवीस यांनी विमानतळावर प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. ते पुढे म्हणाले की, सध्या सर्वच पिकांवर संकट निर्माण झाले आहे. शेतकऱ्यांना कोणत्या प्रकारे दिलासा देता येईल, यासाठी

### दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना मदत

दौरा करण्यात आला. दुष्काळग्रस्त भागात चारा व पाणीटंचाई दूर करण्याबरोबरच अन्नधान्याची उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी शासनाकडून उपाययोजना केल्या जातील. शेतकऱ्यांना थेट हेक्टरी मदत देण्याची कार्यवाहीही केली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

शेतकऱ्यांच्या मुलांच्या शिक्षणात खंड पडू नये, यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात येतील. (पान २ वर)

### ठाकरेंच्या टीकेला फडणवीसांचे प्रत्युत्तर

**जे या संदर्भात बोलत आहेत, त्यांनी भूतकाळातही पाहिले पाहिजे. त्यांच्या काळात कोणते निर्णय घेतले गेले, त्याला किती वेळ लागला आणि शेतकऱ्यांना कशा पद्धतीने मदत केली, हेही त्यांनी सांगितले पाहिजे. मागे वळून पाहिल्यास त्यांच्या लक्षात येईल की, त्यांच्या तुलनेत आम्ही अधिक चांगले काम करत आहोत, असे प्रत्युत्तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ठाकरेंच्या टिकेला दिले.**

## गोकुळसाठी महायुतीची एकजूट

■ कोल्हापूर,ता.२४(प्रतिनिधी)–

**महायुतीमध्ये कोणी छोटा नाही, कोणी मोठा नाही. आम्ही सगळे जुळेभाऊ आहोत. गोकुळची निवडणूक महायुती म्हणून एकत्रित लढविणार असून, घटक पक्षांकडे मिळून ४४०० ठराव आहेत. त्यामुळे आमचा विजय निश्चित आहे,' असा दावा उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी गुरुवारी केला. दरम्यान, महायुतीच्या नेत्यांनी शुक्रवारी (ता.२५) करवीर निवासिनी अंबाबाई देवीचे दर्शन घेऊन गोकुळ निवडणुकीच्या प्रचाराचा शुभारंभ करण्याचा निर्णय घेतला आहे.**

### आज प्रचार शुभारंभ; सात ऑक्टोबरनंतर अंतिम चित्र

गोकुळच्या जागावाटपाबाबत चर्चा करण्यासाठी गुरुवारी महायुतीच्या प्रमुख नेत्यांची बैठक झाली. या बैठकीला मंत्री चंद्रकांत पाटील, पालकमंत्री प्रकाश आबिटकर, मंत्री हसन मुश्रीफ, खासदार धनंजय महाडिक, आमदार विनय कोरे, आमदार अमल महाडिक, आमदार चंद्रदीप नरके, आमदार राजेंद्र पाटील–यड्रावकर, माजी आमदार के. पी. पाटील, (पान २ वर)

### मुश्रीफांकडून बिनविरोधची चर्चा फेटाळली

**मंत्री मुश्रीफ यांनी गोकुळची निवडणूक बिनविरोध होण्याची शक्यता फेटाळून लावली. बिनविरोध निवडणूक शक्य नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. प्राथमिक दूध संस्थांच्या पात्र–अपात्रतेच्या प्रश्नावरून सुमारे १४०० संस्था प्रतिनिधींमध्ये नाराजी होती. ही नाराजी निश्चितपणे दूर होईल आणि सर्वजण आनंदाने मतदान करतील, असे मुश्रीफ यांनी सांगितले. अदृश्य शक्ती आता लुप्त झाली आहे असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.**

### संकटाच्या काळात बांधावर पोहोचा

कृषिमंत्र्यांचे अधिकाऱ्यांना निर्देश

■ नाशिक,ता.२४–

**'शेतकरी प्रथम' या भूमिकेतून संकटग्रस्त शेतकऱ्यांना जास्तीत जास्त दिलासा देण्यासाठी प्रशासनाने थेट बांधावर** (पान २ वर)

### दुष्काळजन्य उपायांसाठी मंत्रिमंडळ उपसमिती स्थापन

■ मुंबई,ता.२४–

**राज्यातील दुष्काळजन्य परिस्थितीवर मात करण्यासाठी आणि तातडीने उपाययोजना आखण्यासाठी राज्य शासनाने महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमितीची स्थापना करण्यात आली.**

मुख्यमंत्री यांच्या सूचनेनुसार या समितीमध्ये नऊ मंत्र्यांचा समावेश असून मुख्य सचिव हे समिती सदस्य आहेत. समितीच्या माध्यमातून टंचाईग्रस्त भागांची प्रत्यक्ष पाहणी करून तातडीने मदत पुरवली जाणार आहे. २२ सप्टेंबर रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर २३ सप्टेंबर रोजी शासन निर्णय प्रसिद्ध केला आहे. त्यानुसार राज्यातील दुष्काळ, पाणी टंचाई आणि चारा टंचाईवर सतत लक्ष ठेवून योग्य ते निर्णय घेण्याचे संपूर्ण अधिकार या उपसमितीला देण्यात आले आहेत.

## ज्ञानेश कुमारांच्या विरोधात महाभियोग

■ नवी दिल्ली,ता.२४–

### काँग्रेस विरोधकांच्या संपर्कात

**मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात विरोधी पक्ष संसदेच्या दोन्ही सभागृहात महाभियोग प्रस्ताव आणण्याच्या तयारीत आहेत.**

काँग्रेसने या मुद्द्यावर विरोधी पक्षांशी संपर्क साधण्यास सुरुवात केली आहे. काँग्रेसच्या सूत्रांनुसार, पुढील दोन आठवड्यांत हा प्रस्ताव मांडण्याची नोटीस संसदेत सादर केली जाऊ शकते. विरोधी पक्षांनीही यासाठी तयारी सुरू केली आहे. याशिवाय, काँग्रेसने आपल्या राज्य शाखांना २५ सप्टेंबर रोजी आपापल्या राज्यातील निवडणूक आयोगाच्या कार्यालयापर्यंत निषेध मोर्चा काढण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच, मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना अटक करून त्यांना पदावरून हटवण्याची मागणी करण्याचेही निर्देश देण्यात आले आहेत.



निवडणूक आयोगाच्या कार्यपध्दतीवरून तसेच मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरावलोकनावर (एसआयआर) विरोधी पक्ष आणि निवडणूक आयोग यांच्यातील वाद वाढत असतानाच या घडामोडी समोर आल्या आहेत.अलीकडेच समोर आलेल्या एका माध्यम अहवालात दावा करण्यात आला होता की, निवडणूक आयुक्त सुखबीर सिंह संधू आणि विवेक जोशी यांनी गेल्या १० महिन्यांत आयोगाच्या काही निर्णयांवर आणि प्रक्रियांवर अनेक वेळा आक्षेप नोंदवले होते. या अहवालाच्या पार्श्वभूमीवर विरोधी पक्षांनी सीईसी ज्ञानेश कुमार यांच्याविरोधात कारवाई करण्याची मागणी केली आहे.अहवालानुसार, विरोधी पक्षांनी यापूर्वीही ज्ञानेश कुमार यांना पदावरून हटवण्यासाठी नोटीस दिल्या होत्या. एप्रिल २०२६ मध्ये राज्यसभेतील (पान २ वर)

**मुख्य निवडणूक आयुक्तांना पदावरून हटवण्याची प्रक्रिया भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३२४(५) अंतर्गत निर्धारित करण्यात आली आहे. यासाठी संसदेत निर्धारित प्रक्रियेचे पालन करावे लागते.**

### विकास प्रकल्पांचा निधी दुष्काळासाठी वापरावा

**-उध्दव ठाकरे-**

विधिमंडळाचे विशेष अधिवेशन बोलवा

■ मुंबई,ता.२४–

**राज्यावर दुष्काळाचे विचित्र संकट आले आहे. पुढच्या पावसापर्यंत शेतकऱ्यांना या संकटाची झळ पोहोचणार आहे. त्यामुळे या शेतकऱ्यांना दिलासा देण्याची आवश्यकता आहे.**



राज्यात ज्या योजना सुरू आहेत, जे विकास प्रकल्प सुरू आहेत. ते केवळ कंत्राटदारांच्या भल्यासाठी आहेत. त्यामुळे प्राधान्य म्हणून सरकारने या योजना आणि विकास प्रकल्पांचा निधी दुष्काळासाठी वापरावा, अशी (पान २ वर)

### उद्याचा अंक बंद

अनंत चतुर्दशी निमित्त दै. महासत्ता कार्यालयास सुट्टी असल्याने शनिवार दि. २६ रोजीचा अंक प्रसिध्द होणार नाही. याची वाचक, अंक एजंट, जाहीरातदार यांनी नोंद घ्यावी.

–सरव्यवस्थापक

| सोने प्रति तोळा | चांदी प्रति किलो |
| --- | --- |
| १५१८०० रु. | २३३००० रु. |

अंडी ५९० रुपये शेकडा

### हास्यतुषार




## कोल्हापूरात विसर्जन मिरवणुकीवर चार हजार पोलिसांची नजर

■ कोल्हापूर, ता.२४(प्रतिनिधी)–

**सार्वजनिक गणेश विसर्जन मिरवणुकीसाठी कोल्हापूर पोलीस यंत्रणा सज्ज झाली आहे. शहरातील मिरवणूक मार्गावर पोलिस, राज्य राखीव दल, होमगार्ड आणि निर्भया पथकांसह तब्बल चार हजारांचा बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे. गर्दीच्या ठिकाणी महिला आणि लहान मुलांच्या सुरक्षेवर विशेष लक्ष ठेवले जाणार असून, ध्वनीमर्यादा, स्ट्रक्चर, लेझर लाईट आदी नियमांचे उल्लंघन करणाऱ्या मंडळांवर कारवाई केली जाणार आहे.**

सकाळी आठ वाजल्यापासून मिरवणूक मार्गावर पोलिस बंदोबस्त सुरू होईल. साध्या वेशातील पोलिस कर्मचारी गर्दीत मिसळून लक्ष ठेवणार आहेत. महिला आणि युवतींची छेडछाड रोखण्यासाठी निर्भया पथकांची स्वतंत्र गस्त राहणार आहे. मिरजकर तिकटी (पान २ वर)

**– असा असेल बंदोबस्त–**

**पोलिस अधीक्षक १, अपर पोलिस अधीक्षक १, पोलिस उपअधीक्षक ९, पोलिस निरीक्षक ३५, उपनिरीक्षक १११, प्रशिक्षणार्थी उपनिरीक्षक ३४, श्रेणी उपनिरीक्षक ४०, पोलिस अंमलदार १,०७५, नवप्रविष्ट पुरुष अंमलदार ३७२, महिला अंमलदार १८०, होमगार्ड १,३००, आरसीपी २०० आणि आयआरबीच्या सहा तुकड्यांसह सुमारे चार हजारांचा बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे.**

## हल्ला केला तर गंभीर परिणाम!

### युध्द हिंद महासागरापर्यंत पसरेल ;इराणचा अमेरिकेला इशारा

■ तेहरान,ता.२४–

**अमेरिका आणि इराण यांच्यात मध्य–पूर्वेत सुरू असलेल्या युध्दाला आता नऊ महिने पूर्ण होण्याची वेळ आली आहे. मात्र, अद्याप हे युध्द थांबण्याची चिन्हे दिसत नाहीत. इराणने इशारा दिला आहे की, अमेरिकेने हल्ला केल्यास तेहरान हा संघर्ष हिंद महासागरापर्यंत वाढवू शकतो.**

संघर्ष पर्शियन आखात आणि होर्मुझ सामुद्रधुनीपासून लाल समुद्रापर्यंत पसरला आहे. त्यामुळे आणखी युध्द झाले, तर हा संघर्ष आणखी पुढे वाढून हिंद महासागरापर्यंत



आणि कदाचित त्याही पुढे पोहोचण्याची शक्यता आहे. मध्य–पूर्वेतील तणाव सर्वोच्च पातळीवर पोहोचलेला असताना इराणकडून हे वक्तव्य करण्यात आले आहे. होर्मुझ सामुद्रधुनीपासून लाल समुद्रापर्यंत जहाजांची वाहतूक मोठ्या प्रमाणात ठप्प झाली आहे.

अमेरिकेकडून कोणतीही नवी लष्करी कारवाई झाल्यास संपूर्ण प्रदेशातील अमेरिकी हितसंबंध आणि मालमत्तांविरोधात प्रत्युत्तराची कारवाई केली जाऊ शकते. हिंद महासागर हा जगातील पाच महासागरीय क्षेत्रांपैकी तिसरा सर्वांत मोठा महासागर आहे. त्याचे क्षेत्रफळ सुमारे ७०.५ दशलक्ष चौरस किलोमीटर (२७.२ दशलक्ष चौरस मैल) असून, पृथ्वीवरील जलपृष्ठभागाच्या सुमारे २० टक्के भाग त्याने व्यापला आहे. त्याच्या उत्तरेला भारत, इराण, पाकिस्तान आणि बांगलादेश यासह आशिया खंड आहे. हिंद महासागर पर्शियन आखाताला भारतासह (पान २ वर)

(पान १ वरून)

## आज भाग जाहीर होणार

ज्या भागात रब्बीची पेरणी शक्य आहे, त्या भागातील शेतकऱ्यांनाही मदत देण्याचा प्रयत्न केला जाईल. रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी मोठ्या प्रमाणावर कामे हाती घेतली जातील. जलसंधारणाच्या कामांवर भर देत जलसाठे निर्माण करणे आणि गाळमुक्त धरणांची कामे करण्याचेही सरकारचे नियोजन असल्याचे फडणवीस यांनी सांगितले. केंद्र सरकारकडून मदत मिळण्यास काही प्रक्रिया पूर्ण कराव्या लागतात. मात्र, केंद्राच्या निधीची वाट न पाहता राज्य सरकार आपल्या स्तरावर मदत करत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मदत सरसकट करण्याचा प्रयत्न असला तरी कायद्यानुसार पंचनामे करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले.

सोयाबीन खरेदीबाबतही सरकारची तयारी असल्याचे सांगत, गरज पडल्यास संपूर्ण सोयाबीन खरेदी केली जाईल, असे मुख्यमंत्री म्हणाले. यंदा शासकीय दरापेक्षा खासगी बाजारातील दर अधिक राहण्याची शक्यता असून सोयाबीन नोंदणीची प्रक्रिया लवकर सुरू केली जाईल. दिवाळीपूर्वीच शेतकऱ्यांना मदत करण्याचा सरकारचा प्रयत्न आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.दरम्यान, अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालयातील आग दुर्घटनेच्या अहवालाबाबत बोलताना हा अहवाल लवकरच सार्वजनिक केला जाईल, असे फडणवीस यांनी सांगितले. अहवालातून दुर्घटनेची वस्तुस्थिती स्पष्ट होईल, असा दावाही त्यांनी केला.

## आयात शुल्कात कपात

प्रमुख कच्च्या खाद्यतेलांवरील मूलभूत सीमा शुल्क कमी केले आहे. त्यानुसार, कच्च्या सूर्यफूल तेलावरचे मूलभूत सीमा शुल्क दहा टक्केवरून शून्यावर आणले तर कच्च्या सोयाबीन तेलावरचे आणि कच्च्या पाम तेलावरचे मूलभूत सीमा शुल्क दहा टक्क्यां वरून पाच टक्केपर्यंत कमी केले आहे.कच्चे आणि शुद्ध खाद्यतेल यांच्यातील १९.२५ टक्के आयात शुल्क तफावत कायम ठेवत सरकारने एकाच वेळी संबंधित शुद्ध खाद्यतेलांवर लागू असलेले मूलभूत सीमा शुल्कही कमी केले आहे.

ही शुल्क सुसूत्रीकरण प्रक्रिया आंतरराष्ट्रीय खाद्यतेलाच्या वाढलेल्या किमती आणि परिणामी देशांतर्गत एकूण खर्च व किरकोळ किमतींमध्ये झालेली वाढ लक्षात घेऊन केली आहे. आयात केलेल्या खाद्यतेलांच्या एकूण खर्चाचा आयात शुल्क हा एक महत्त्वाचा भाग असतो आणि त्यामुळे त्याचा देशांतर्गत बाजारभावावर परिणाम होतो.

कच्च्या खाद्यतेलांवरच्या मूलभूत सीमा शुल्कातल्या कपातीमुळे त्यांचा एकूण खर्च कमी होईल आणि देशांतर्गत पुरवठा साखळीद्वारे हा फायदा ग्राहकांपर्यंत पोहोचवणे सोपे होईल अशी अपेक्षा आहे.अन्नधान्याच्या किमती आणि एकंदर महागाईचा दबाव नियंत्रित करण्याच्या व्यापक उद्दिष्टाला हातभार लावताना ग्राहकांना दिलासा देणे हा या उपाययोजनेचा उद्देश आहे. देशांतर्गत शुद्धीकरण क्षमतेच्या वापराला पाठिंबा देण्यासाठी आणि शुद्ध खाद्यतेलांच्या अति आयातीला आळा घालण्यासाठी सरकारने कच्चे आणि शुद्ध खाद्यतेल यांच्यातील शुल्क तफावत कायम ठेवली आहे. या उपायामुळे देशातील मूल्यवर्धनाला पाठिंबा मिळत असताना देशांतर्गत तेल शुद्धीकरण कंपन्यांना अधिक समान संधी मिळण्याची अपेक्षा आहे.

## नऊ प्रवासी जळून खाक

झाला. बस दिल्लीच्या काश्मिरी गेटहून महोबासाठी रवाना झाली होती. एसीमध्ये स्फोट झाल्याने आग लागल्याची सांगण्यात येत आहे. प्रवासी सुनील कुमार यांनी सांगितले की, बसमध्ये जळल्याचा वास येत होता. चालक आणि क्लीनर सिगारेट ओढत होते.प्रवाशांनी विरोध केला तेव्हा दोघेही हसू लागले.काही वेळाने बसला आग लागली.आग लागल्यानंतरही चालकाने तातडीने बस थांबवली नाही. प्रवाशांनी काचा फोडल्यानंतर बस थांबवण्यात आली.

पोलिसांनी सांगितले की, ही बस मध्य प्रदेशातील राज कल्पना ट्रॅव्हल्सची आहे. बसवर १९ चलान झाली असून १ लाख ७५ हजार रूपयांचादंड ठोठावण्यात आला आहे.पोलिसांनी चालक पवन आणि वाहक योगेश यांना अटक केली आहे.बसचा मागील भाग कापून अग्निशमन कर्मचारी आत पोहोचले व मृतदेह बाहेर काढण्यात आले.बचावकार्य सुमारे २ तास सुरू होते. बहुतांश मृतदेह सीटवर आढळले असून, मोठ्या प्रमाणात जळाल्यामुळे त्यांची ओळख पटवणे कठीण आहे. या घटनेत अनेक प्रवाशांचे सामान, रोकड, दागिने, मोबाईल फोन इत्यादीही जळून खाक झाले.

## ...तर गंभीर परिणाम

आशियातील प्रमुख अर्थव्यवस्थांशी जोडतो. या महासागरातून जगातील काही महत्त्वाचे सागरी व्यापारी मार्ग जातात. भारत हिंद महासागराच्या उत्तरेकडील भागात स्थित असून, आखाती देश, आफ्रिका आणि आग्नेय आशियासोबत भारताचे मोठे सागरी व्यापारी संबंध आहेत.हा संघर्ष हिंद महासागरापर्यंत पोहोचल्यास जहाज वाहतूक, विमा, ऊर्जा पुरवठा आणि प्रादेशिक व्यापारावरील जोखीम वाढू शकते. अमेरिका-इराण युद्धाचा परिणाम आधीपासूनच भारतावर होत आहे. तेल, एलपीजी आणि जहाज वाहतुकीचा खर्च वाढल्याने जगभरातील अर्थव्यवस्थांवर त्याचा परिणाम होत आहे.

## महाभियोगाची तयारी

विरोधी पक्षांच्या खासदारांनी त्यांना पदावरून हटवण्यासाठी नोटीस दिली होती. या नोटीसवर ७३ खासदारांच्या स्वाक्षऱ्या असल्याचे समोर आले होते.

आता काँग्रेस विरोधी पक्षांना एकत्र घेऊन संसदच्या दोन्ही सभागृहांत नव्याने प्रस्ताव मांडण्याच्या तयारीत आहे. मात्र, हा प्रस्ताव मंजूर करण्यासाठी संसदेत आवश्यक समर्थन मिळवणे ही स्वतंत्र घटनात्मक प्रक्रिया असेल.दरम्यान, आता मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याविरोधात विरोधी पक्ष पुन्हा एकदा एकवटले आहेत.

एका अहवालात दावा करण्यात आला आहे की, निवडणूक आयुक्त सुखबीर सिंह संधू आणि विवेक जोशी यांनी देशभरात मतदार यादीच्या 'एसआयआर' दरम्यान नावे जोडणे आणि वगळणे यासह अनेक मुद्द्यांवर आक्षेप नोंदवले होते. दुसरीकडे, निवडणूक आयोगाने म्हटले आहे की, विचारविनिमय दरम्यान वेगवेगळी मते असणे ही सामान्य प्रक्रियेचाच एक भाग आहे. आयोगाचे सर्व निर्णय प्रस्थापित वैधानिक प्रक्रियांनुसार घेतले जातात.

## जामवाल यांची नियुक्ती

महाराष्ट्र भाजपाला अपेक्षित असलेले संघटन महामंत्री या जबाबदारीत अजय जामवाल यांची नियुक्ती झाली आहे.विदर्भावर अधिक लक्ष केंद्रित करण्यासाठी महत्त्वाची नियुक्ती.

महाराष्ट्र प्रदेश सह संघटन मंत्री या जबाबदारी अतिशय अनुभवी व बंगाल तसेच अनेक प्रदेशांच्या निवडणुका आणि भारतीय जनता पार्टीच्या संघटन व जनजाती मोर्चा सारख्या महत्त्वपूर्ण आघाडीचा अखिल भारतीय अनुभव असलेले श्री सतीश धोंड यांची नियुक्ती महाराष्ट्र प्रदेश सह संघटन मंत्री पदावर करण्यात आली आहे त्यांचे केंद्र हे नागपूर असणार आहे.

## गोकुळसाठी महायुतीची एकजूट

(पान १ वरून)

माजी आमदार राजेश पाटील, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष राहुल पाटील, गोकुळचे माजी चेअरमन विश्वास पाटील, अरुण डोंगळे आणि नविद मुश्रीफ यांच्यासह प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. बैठकीत निवडणुकीची पुढील रणनीती आणि जागावाटपाबाबत चर्चा झाली.

बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना चंद्रकांत पाटील यांनी सांगितले की, सात ऑक्टोबरपर्यंत उमेदवारी अर्ज माघारीची मुदत आहे. या कालावधीत महायुतीतील कोणत्या घटकाकडे किती ठराव आहेत, याचा विचार करून जागावाटपाचा निर्णय घेतला जाईल. महायुतीमध्ये कोणतेही मतभेद किंवा मनभेद नाहीत. कोणताही घटक पक्ष मोठा अथवा छोटा नसून सर्वजण एकत्रितपणे निवडणूक लढवतील, असे त्यांनी स्पष्ट केले.चंद्रदीप आमदार शिवाजी पाटील बैठकीला उपस्थित नसल्याबाबत विचारले असता पालकमंत्री प्रकाश आबिटकर आणि आमदार विनय कोरे यांनी गणेशोत्सवामुळे ते येऊ शकले नसल्याचे सांगितले. चंद्रकांत पाटील यांनी आमदार शिवाजी पाटील यांचा ठाणे येथे गणेशोत्सवाचा कार्यक्रम असल्याने ते बैठकीला उपस्थित राहू शकले नसल्याचे स्पष्ट केले.

यावेळी जनसुराज्य शक्ती पक्षाचे समित कदम, गोकुळचे माजी संचालक बाळासाहेब खाडे, अंबरिश घाटगे, अजित नरके, प्रा. किसन चौगले, रणजित पाटील, युवराज पाटील, जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष तानाजी पाटील, माजी उपाध्यक्ष सतीश पाटील, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष बाबासाहेब पाटील-आसुर्लेकर, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख विजय बलुगडे, राष्ट्रवादीचे जिल्हा परिषदेतील गटनेते सुधीर देसाई आदी उपस्थित होते.

## कोल्हापूरात विसर्जन मिरवणुकीवर चार हजार पोलिसांची नजर

(पान १ वरून)

बिनखांबी गणेश मंदिर, पापाची तिकटी आणि गंगावेश या गर्दीच्या चार प्रमुख ठिकाणी अतिरिक्त पोलिस कुमक तैनात केली जाणार आहे. मिरवणुकीतील साऊंड सिस्टीमची ध्वनीतीव्रता तपासण्यासाठी स्वतंत्र पथके कार्यरत राहणार आहेत. मंडळांच्या वाहनांची कागदपत्रे, स्ट्रक्चरचे मोजमाप, लेझर लाईट, साऊंड सिस्टीम आणि प्रेशर हॉर्नची तपासणी केली जाणार आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या मंडळांवर कारवाई केली जाईल, असे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

**१७ ठिकाणी पार्किंग**

मिरवणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरात १७ ठिकाणी वाहनांच्या पार्किंगची व्यवस्था करण्यात आली आहे. नागरिकांनी निर्धारित ठिकाणीच वाहने उभी करावीत, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

**सराईतांवरही नजर**

विसर्जन मिरवणुकीच्या गर्दीचा गैरफायदा घेऊन सराईत गुन्हेगार किंवा हद्दपार व्यक्तींकडून अनुचित प्रकार होऊ नये, यासाठी स्वतंत्र पथके तैनात केली आहेत.

गोपनीय पथकांकडून त्यांच्या हालचालींवर लक्ष ठेवले जाणार आहे. एखाद्या ठिकाणी अनुचित प्रकार घडल्यास राखीव पोलिस तुकडी तातडीने घटनास्थळी पोहोचेल, अशी व्यवस्था करण्यात आली आहे.

## निधी दुष्काळासाठी वापरावा-ठाकरे

(पान १ वरून)

मागणी माजी मुख्यमंत्री तथा शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी केली आहे. ते मुंबईत आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते. विधिमंडळाचे विशेष अधिवेशन घेऊन ठोस उपाययोजना काय करणार, याची माहिती सर्वांना द्यावी, अशी आग्रही मागणीही त्यांनी केली.विकासाच्या नावाने राज्यात उधळपट्टी सुरू आहे. राज्याला बुलेट ट्रेनची गरज नाही. जे काही प्रकल्प सुरू आहेत. ते केवळ कंत्राटदारांचे धन आहे. दुष्काळात जशा आपण प्राथमिकता बदलतो, तशीच प्राथमिकता आता बदलली पाहिजे. लाडकी बहीण योजनेसारख्या योजनांमध्ये भ्रष्टाचार झाला आहे. विकास प्रकल्पांसाठी जो निधी खर्च केला जात आहे. तो निधी दुष्काळासाठी वापरला पाहिजे. इतर ठिकाणी कारण नसताना वळवलेला पैसा या कामासाठी वळवा. यावेळी दुष्काळी भागाची पाहणी करणार असल्याचे ठाकरेंनी सांगितले. मी विदर्भात जाऊन पाहणी करणार आहे. आधी आदित्य ठाकरे जाऊन दुष्काळी भागाची पाहणी करेल. त्यानंतर मी जाऊन पाहणी करणार आहे. तसेच ज्या ठिकाणी दुष्काळ आहे, तिथे शिवसैनिकांनी हेल्प सेंटर सुरू करून शेतकऱ्यांना मदत करावी, असे आवाहन उद्धव ठाकरे यांनी केले आहे.

इतिहासातील ३१ हजार कोटींचे पॅकेज मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले होते. ज्यांची जमीन खरडून गेली होती, त्यांना हेक्टरी साडे तीन लाख रुपये जाहीर केले होते. त्यांना प्रत्यक्ष किती मदत पोहोचली? त्याची माहिती सरकारने दिली पाहिजे. यावर्षी मोसमाच्या सुरुवातीलाच दुष्काळ पडू शकतो, असा अंदाज हवामान खात्याने दिला होता. जागतिक अभ्यास केंद्रांनीही त्याचा इशारा दिला होता. ही शक्यता लक्षात घेऊन दुष्काळ निवारणासाठी पावले उचलली होती का? शेतकऱ्यांना दुबार, तिबार पेरणी करावी लागते. यावर्षीची हालत भयंकर आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी सरकारने काय केले ते सांगावे, असे उद्धव ठाकरे यांनी म्हटले आहे.

## गोवा बनावटीच्या दारुसह दहा लाखांचा मुद्देमाल जप्त

कोल्हापूर, ता.२४(प्रतिनिधी)

**गोवा बनावटीचे विदेशी मद्य विक्रीच्या उद्देशाने वाहतूक करणाऱ्या कारवर राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पथकाने शिनोळी सीमा तपासणी नाक्याच्या पथकाने कारवाई केली.**

या कारवाईत ४३ बॉक्समधील ३ लाख ५३ हजार ८८० रुपये किमतीचे गोवा बनावटीचे मद्य आणि ६ लाख ५० हजार रुपये किमतीची कार, असा एकूण १० लाख ३ हजार ८८० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी संशयित मूसा अब्दुलरजाक जमादार (रा. कोरोची) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या शिनोळी सीमा तपासणी नाक्याच्या पथकाला गुरुवारी गोवा बनावटीचे विदेशी मद्य वाहतूक केली जाणार असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पथकाने मोटणवाडी रस्त्यावर सापळा रचला. यावेळी सोनेरी रंगाची कार संशयावरून अडवून तपासणी केली असता, त्यामध्ये विविध ब्रँडचे गोवा बनावटीचे विदेशी मद्याचे ४३ बॉक्स आढळून आले.

## पंढरपूर पालिकेच्या विविध कल्याणकारी योजना

### नागरिकांनी लाभ घ्यावा; मुख्याधिकाऱ्यांचे आवाहन

■ पंढरपूर, ता.२४(प्रतिनिधी)–

**शहरी भागातील नागरिकांचे राहणीमान सुधारण्यासाठी, पायाभूत सुविधांचा विकास करण्यासाठी आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना सक्षम करण्यासाठी नगरपालिका प्रशासनाच्या वतीने विविध शासकीय व स्थानिक पातळीवरील कल्याणकारी योजना राबविल्या जात आहेत. या योजनांचा लाभ शहरातील जास्तीत जास्त पात्र नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी केले आहे.**

गणेशोत्सवातील भक्तीमय वातावरणाला लोकहिताच्या संवादाची जोड देत शासनाच्या विविध योजना आणि उपक्रमांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी 'लोकसंवाद-२०२६' उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत संभाजी नगर, पंढरपूर येथील छत्रपती संभाजी नगर, गणेश उत्सव तरुण मंडळात विविध जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी दीनदयाळ अंत्योदय योजना – राष्ट्रीय शहरी उपजीविका अभियान अंतर्गत बेरोजगार तरुणांना मोफत कौशल्य प्रशिक्षण, प्रधानमंत्री आवास योजना – शहरी अंतर्गत शहरातील बेघर आणि कच्च्या घरात राहणाऱ्या पात्र कुटुंबांना पक्के घर बांधण्यासाठी थेट आर्थिक अनुदान यासह विविध योजनांबाबत माहिती दिली. यावेळी शहर उपनिरीक्षक दत्तात्रेय लेंडवे यांनीही मार्गदर्शन केले. कार्यक्रमास पोलीस उप निरीक्षक गाडेकर, अभिमन्यू साबळे, आनंता साबळे, पांडुरंग वरपे, गणेश परदेशी, रवी साबळे, अतुल जाधव, पैगंबर मणेरी, बापू देवकर, संदीप साबळे, अॅड.पुजारी, गणेश कोळी यांच्यासह मंडळाचे पदाधिकारी, नागरिक उपस्थित होते.

## नेकलेस रोडच्या हालचालींना वेग

### पुणे टीमकडून पाहणी; ६८० कोटींच्या प्रस्तावित आराखडा तयार

■ कराड, ता.२४(प्रतिनिधी)–

**शहराच्या विकासाला नवी दिशा देणाऱ्या सुमारे ६८० कोटी रुपयांच्या प्रस्तावित 'नेकलेस रोड' प्रकल्पाच्या हालचालींना वेग आला आहे. प्रकल्पाच्या प्राथमिक आराखड्याच्या अनुषंगाने पुणे येथील तज्ज्ञांच्या पथकाने गुरुवारी शहरातील प्रस्तावित मार्ग, नदीकाठचा परिसर, पूल, घाट आणि वाहतुकीच्या दृष्टीने महत्त्वाच्या ठिकाणांची प्रत्यक्ष पाहणी केली.**

या प्रकल्पात वाहतूक सुलभीकरणाबरोबरच कृष्णा-कोयना नदीकाठाचा विकास, रिव्हर फ्रंट, स्व. यशवंतराव चव्हाण समाधीस्थळ परिसराचे सुशोभीकरण आणि पर्यावरण संवर्धनाला प्राधान्य देण्यात येणार आहे.कृष्णा आणि कोयना नद्यांच्या संगमामुळे कराडला लाभलेला विस्तीर्ण नदीकाठ आणि नैसर्गिक परिसर लक्षात घेऊन 'नेकलेस रोड'ची संकल्पना पुढे आली आहे. प्राथमिक आराखड्यानुसार जुन्या कोयना पुलापासून नव्या कृष्णा पुलाच्या परिसरापर्यंत जोडणाऱ्या मार्गाचा विचार करण्यात आला आहे. शहरातील प्रमुख रस्ते, चौक आणि पुलांवरील वाहतुकीचा ताण कमी करण्यासाठी पर्यायी मार्ग उपलब्ध करून देणे, हा प्रकल्पाचा महत्त्वाचा उद्देश आहे.पुणे येथील पथकाने प्रस्तावित मार्गाची पाहणी करताना उपलब्ध जागा, विद्यमान रस्ते, वाहतूक व्यवस्था, नदीकाठची भौगोलिक परिस्थिती तसेच विकासासाठी संभाव्य ठिकाणांचा आढावा घेतला. वाहतुकीपुरता मर्यादित न राहता नदीकाठच्या परिसराच्या विकासालाही प्रकल्पात महत्त्व देण्यात आले आहे. घाट, बगीचे, सुशोभीकरण, नागरिकांसाठी चालण्याच्या व विरंगुळ्याच्या जागा तसेच रिव्हर फ्रंटच्या माध्यमातून नदीकाठ अधिक आकर्षक करण्याचा विचार आहे.

## ज्ञानेश कुमार यांच्याविरोधात कोल्हापूर खंडपीठात याचिका

(पान १ वरून)

मतदार यादीचा डेटाबेस, इलेक्ट्रॉल रजिस्ट्रेशन ऑफिसर्सची कार्यपद्धती आणि संबंधित सॉफ्टवेअर प्रक्रियांबाबत हे आक्षेप असल्याचा दावा याचिकेत करण्यात आला आहे. 'चीफ इलेक्शन कमिशनर अँड अदर इलेक्शन कमिशनर्स अॅक्ट, २०२३'च्या कलम १८ नुसार निवडणूक आयोगाचे कामकाज सामूहिक पद्धतीने झाले का, असा प्रश्नही उपस्थित करण्यात आला आहे.जुलै २०२६ मध्ये –६ मध्ये करण्यात आलेल्या बदलांवर तसेच प्रणालीच्या कार्यपद्धतीवरही याचिकेत आक्षेप घेण्यात आला आहे. दोन निवडणूक आयुक्तांनी या प्रक्रियांबाबत आक्षेप घेतले असतानाही त्याकडे दुर्लक्ष करून निर्णय घेण्यात आल्याचा दावा याचिकाकर्त्यांनी केला आहे.

याचिकेत कथित १४ एकतर्फी प्रशासकीय आदेश व बदल रद्द करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच महाराष्ट्रातील प्रक्रिया थांबविणे,प्रक्रियेदरम्यान मतदार यादीतून वगळण्यात आलेली नावे पुनर्स्थापित करणे आणि नव्याने कायदेशीर पद्धतीने मतदार याद्या तयार व मंजूर होईपर्यंत संबंधित राज्यांतील आगामी विधानसभा निवडणुका स्थगित ठेवण्याची मागणी करण्यात आली आहे.

प्रक्रियेतील कथित अनियमिततेची चौकशी करण्यासाठी निवृत्त उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली स्वतंत्र न्यायिक समिती स्थापन करण्याची मागणीही याचिकेत करण्यात आली आहे. याचिकेत टी.एन. शेषन विरुद्ध युनियन ऑफ इंडिया आणि एस.एस. धनाओ विरुद्ध युनियन ऑफ इंडिया या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयांचा संदर्भ देण्यात आला आहे.



शहापूर खण येथे विसर्जनासाठी करण्यात आलेली तयारी.

## पुढच्या वर्षी लवकर या!

(पान १ वरून)

आहेत. पारंपरिक विसर्जन मार्ग हा एकेरी मार्ग राहणार असून मिरवणुकीतील वाहनांना या मार्गावर परतीचा प्रवासाला बंदी राहील.

महानगरपालिकेच्यावतीने मुख्य मिरवणूक मार्गावरील शहरातील विविध रस्त्यावरील खड्डे मुजविण्यात आले असून विसर्जनस्थळी क्रेन तसेच प्रकाशझोताची व्यवस्था तसेच निर्माल्य गोळा करण्यासाठी वाहनांची सोय आणि यांत्रिक बोटही तैनात करण्यात आली आहे. मिरवणूक येणाऱ्या गणेश मंडळाच्या स्वागतासाठी इचलकरंजी फेस्टिव्हल, शिवसेना, मारवाडी युवा मंच, दै. राष्ट्रगीत, साईप्रसाद ग्रुप, इचलकरंजी बिल्डर्स असोशिएशन, क्रेडाई इचलकरंजी, भारतीय जनता पार्टी, हिंदू एकता, महिला दक्षता समिती, इचलकरंजी शहर काँग्रेस कमिटी, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, मुस्लिम वेल्फेअर फौंडेशन आर्दीसह विविध स्वागत कक्ष उभारण्यात आले आहेत. तर विविध सामाजिक संघटनांच्या वतीने मिरवणुकीत सहभागी होणाऱ्यांसाठी पिण्याच्या पाण्याची तसेच आरोग्य तपासणीचीही व्यवस्था करण्यात आलेली आहे.

## संकटाच्या काळात बांधावर पोहोचा

(पान १ वरून)

जाऊन काम करावे, असे निर्देश कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिले. नाशिक विभागातील पीक परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी झालेल्या बैठकीत पीक नुकसानीचे प्रत्यक्ष मूल्यमापन, मुदतपूर्व पीक कापणी प्रयोग, पीक विमा दावे आणि वीजपुरवठ्यासह विविध प्रश्नांवर सकारात्मक चर्चा झाली.

नाशिक विभागातील पीक परिस्थितीचा सविस्तर आढावा घेण्यासाठी विभागीय आयुक्त कार्यालयातील सभागृहात ही बैठक कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. बैठकीस नाशिकचे पालकमंत्री गिरीश महाजन, शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे, अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा जळगांवचे पालकमंत्री गुलाबराव पाटील, वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, आमदार माणिकराव कोकाटे, विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, कृषी आयुक्त सुरज मांढरे यांची व्यासपीठावर उपस्थिती होती.

यावेळी कृषिमंत्री श्री.भरणे म्हणाले की, अधिकाऱ्यांनी आता शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन समस्या ऐकल्या पाहिजेत. संकटाच्या काळात शेतकऱ्यांच्या व्यथा समजून घेणे अत्यंत गरजेचे आहे. प्रशासनातील अधिकाऱ्यांनी केवळ कार्यालयीन पातळीवर आढावा न घेता प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांच्या समस्या जाणून घ्याव्यात आणि त्या सोडविण्यासाठी तातडीने कार्यवाही करावी, असा सूचना त्यांनी केल्या.

## पाकचा अफगाणवर पुन्हा हवाई हल्ला

इस्लामाबाद, ता.२४–

**पाकिस्तान आणि अफगाणिस्तानमधील तणाव पुन्हा एकदा झपाट्याने वाढला आहे. पाकिस्तानने गुरुवारी पहाटे अफगाणिस्तानातील १० ठिकाणांवर हवाई हल्ले केल्याचे सांगितले.**

या ठिकाणांचा वापर एक दिवस आधी पाकिस्तानवर ड्रोन हल्ले करण्यासाठी करण्यात आला होता, असा पाकिस्तानचा दावा आहे. दोन्ही देशांदरम्यान सीमेवर गोळीबार आणि घुसखोरीचे आरोप सातत्याने वाढत असतानाच ही कारवाई करण्यात आली आहे. त्यामुळे प्रादेशिक देशांच्या मध्यस्थीने शांतता प्रस्थापित करण्याच्या प्रयत्नांनाही धक्का बसण्याची शक्यता आहे.


आकरावा स्मृतिदिन | ३८ वा स्मृतिदिन



कै. शामराव शंकर चव्हाण




कै. शंकर सखाराम चव्हाण

साथ सुटली लाख मोलाची, छाया विरली वटवृक्षाची
ज्योत विझली आज आशेची, नजर ठेवून ईश्वर दरबारी
वाट पाहतो तुमच्या पुनर्जन्माची...

अशोक शंकर चव्हाण * सुरेश शंकर चव्हाण
रविंद्र शामराव चव्हाण * विनायक शामराव चव्हाण
समस्त चव्हाण (शेळके) परिवार, शहापूर.

॥ आकरावा स्मृतिदिन ॥



मा. नगरसेवक
कै. शामराव शंकर चव्हाण (बापू)

मार्गदर्शक होता सदा आमचे तुम्ही
मिळणार नाही तुमच्यासारखा परत कुणी
तुमच्या जाण्याने झालो पोरके आम्ही
मूर्ती तुमची सदैव आमच्या मनी !
हिच आपल्या आकराव्या स्मृतिदिनी
साश्रुनयनांची भावपूर्ण श्रद्धांजली !

आमच्या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष व
मा. नगरसेवक कै. शामराव शंकर चव्हाण (बापू)
यांच्या दहाव्या स्मृतिदिनास विनम्र अभिवादन!

शहापूर शिक्षण मंडळ, शहापूर संचलित
विनायक हायस्कूल, विनायक विद्यालय, विशाल विद्यालय,
विनायक बालवाडी, विशाल बालवाडी, विनायक ऑलिम्पियाड
मा. अध्यक्ष, संचालक मंडळ व सर्व शाखांचे मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी, पालक

# श्री बसवेश्वर पतसंस्थेचा सुवर्ण महोत्सव

## रविवारी सभासदांना भेटवस्तू कार्यक्रम

इचलकरंजी,ता.२४–

**वीरशैव समाजाची मानबिंदू असलेली श्री बसवेश्वर नागरी सहकारी पतसंस्था लि.इचलकरंजी या संस्थेच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त येथील मराठा मंडळ सांस्कृतिक भवनमध्ये रविवार,ता. २७ रोजी सकाळी १०: ३० वाजता सभासदांना भेटवस्तू वाटप कार्यक्रम विविध मान्यवरांच्या हस्ते होणार आहे.**



सभासद भेटवस्तू कार्यक्रम श्री सिध्देश्वर सुक्षेत्र कारीमठ–हत्तरगी चे प.पुज्य स्वामी श्री.म.नि.प्र. गुरूसिध्देश्वर महास्वामी,सहकार महर्षि माजी खास.कल्लाप्पाण्णा आवाडे,माजी आरोग्य मंत्री विजयराव देशमुख,माजी मंत्री प्रकाश आवाडे, आम. राहुल आवाडे, जोल्ले ग्रुपचे संस्थापक बीडीसीसी बँकेचे चेअरमन माजी खास. अण्णासाहेब जोल्ले आदि मान्यवरांच्या हस्ते होणार आहे.तरी या कार्यक्रमाला सभासद बंधूनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन पतसंस्थेचे चेअरमन प्रकाश दत्तवाडे यांनी केले आहे.



धनादेश प्रदान करताना जिल्हा न्यायाधीश एस. एस. मौदेकर , अँड.सी.बी.कोरे (रेंदाळकर), अॅड. निखिल कोरे, सुधाकर वाटेगावे

# अपघातातील जखमीस ४८ लाखाची नुकसान भरपाई

कोल्हापूर,ता.२४ –

**कोल्हापूर जिल्हा सत्र न्यायालयात आयोजित केलेल्या लोकन्यायालयात ऋषिकेश सुर्यकांत शिंदे (वय२१) या वाहन अपघातातील जखमीस ४८ लाखांची नुकसान भरपाई मंजूर झाली. त्याच दिवशी मंजूर रक्कमेचा धनादेश प्रदान करणेत आला.**

ऋषिकेश शिंदे हे मोटरसायकलवरून सांगलीकडे जाताना उदगाव गावच्या हद्दीत समोरून येणारे मोटारसायकल धडकलेने अपघात होवून त्यांना डोळ्यास व शरिरावर दुखापत झाली होती. मोटारसायकलचे गो डिजीट विमा कंपनीला जखमीस ४८ लाखाची नुकसान भरपाई देण्याचा आदेश न्यायालयाने दिले.

शिंदे यांना लोक न्यायालयातून अॅड.सी.बी. कोरे ( रेंदाळकर) यांनी योग्य पाठपुरावा करून जलद,सुलभ व योग्य अशी ४८ लाखांची भरपाई मजूंर करणेचे काम पाहिले.

# हद्दपार गुन्हेगारास अटक

इचलकरंजी,ता.२४–

गणेशोत्सव कालावधीत हातकणंगले तालुक्यातून हद्दपार केले असताना युवराज उर्फ बाळू शिवाजी पताडे (वय ३४) हा गणेशनगर परिसरात मिळून आल्याने शहापूर पोलिसांनी त्याला ताब्यात घेत गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणी पोलिस कॉन्स्टेबल रोहित डावाळे यांनी फिर्याद दिली आहे. १४ ते २६ सप्टेंबर कालावधीत अपर तहसिलदार यांच्या आदेशान्वये युवराज पताडे याला हातकणंगले तालुक्यातून हद्दपार करण्यात आले आहे. परंतु या आदेशाचा भंग करुन युवराज हा गणेशनगर परिसरात मिळून आला. या प्रकरणी त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# कोरोचीत दीड लाखाचे दागिने लंपास

**इचलकरंजी,ता.२४–** कोरोचीतील घरातून चोरट्याने १०.१६० ग्रॅम वजनाचे १ लाख ६२ हजार ५६० रुपयांचे सोन्याचे मिनी गंठण लंपास केले. या प्रकरणी संगीता बाबुराव जगदाळे (वय ४९ रा. विवेकानंदनगर) यांनी शहापूर पोलिसात फिर्याद दिली आहे. संगीता जगदाळे या विवेकानंदनगर येथे वास्तव्यास असून १७ ते १८ सप्टेंबर या कालावधीत चोरट्याने त्यांच्या घरातून १०.१६० ग्रॅम वजनाचे सोन्याचे मिनी गंठण चोरुन नेले आहे. जगदाळे यांनी शोधाशोध करत तसेच नातेवाईकांकडे चौकशी केल्यानंतर ते मिळून आले नाही. त्यामुळे त्यांनी शहापूर पोलिसात चोरीची फिर्याद दिली आहे.

# शरदचे आठ लाख मेट्रिक टन गाळपाचे उद्दिष्ट

## आम.डॉ.राजेंद्र पाटील–यड्रावकर

नरंदे,ता.२४ –

**आगामी गळीत हंगाम पूर्ण क्षमतेने यशस्वी करण्यासाठी शरद साखर कारखाना प्रशासनाने सर्व उपाययोजना केल्या आहेत. वेळेत ऊस तोडणी वाहतूक सुविधा उपलब्ध करून देण्यास प्राधान्य दिले जाईल. आठ लाख मेट्रिक टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी सर्वांनी एकजुटीने प्रयत्न करावेत. कारखान्यातील तांत्रिक कामे अंतिम टप्प्यात आली असून उत्कृष्ट प्रकारे हंगाम पूर्ण करण्यासाठी कारखाना सज्ज झाला आहे अशी माहिती कारखान्याचे अध्यक्ष आमदार डॉ. राजेंद्र पाटील यड्रावकर यांनी दिली.**



शरद साखर कारखान्याच्या बॉयलर प्रदीपनप्रसंगी चेअरमन राजेंद्र पाटील यड्रावकर,आदित्य पाटील,अमोल चव्हाण, प्रचिता कोळी, सीमा म्हैशाळे, दीप्ती जाधव व इतर. (छाया. – अनंतसिंग)

नरंदे येथील शरद सहकारी साखर कारखान्याच्या २५ व्या बॉयलर प्रदीपन कार्यक्रम प्रसंगी ते बोलत होते. युवा नेते संचालक आदित्य पाटील यड्रावकर,जिल्हा परिषद सदस्य अमोल चव्हाण, प्रचिता कोळी,पंचायत समिती सदस्या सीमा म्हैशाळे, दीप्ती जाधव ,प्रवीण देसाई,कुरुंदवाड चे उपनगराध्यक्ष दीपक गायकवाड प्रमुख उपस्थित होते.

प्रारंभी कर्मचारी संभाजी लोंढे, शुभांगी लोंढे ,संचालक विद्यासागर मरजे, शिवगोंडा पाटील यांच्या हस्ते पूजा करण्यात आली.

संचालक सुभाष सिंग रजपूत यांनी स्वागत केले. पोपट भोकरे यांनी आभार मानले. कार्यक्रमास अविनाश गायकवाड, राष्ट्रवादी काँग्रेसचे हातकणंगले तालुका अध्यक्ष संभाजी पवार,उदय डांगे,केशव राऊत, महादेव धनवडे ,लक्ष्मण चौगुले, रावसो कुंभोजे, रविकांत कारदगे, अजित उपाध्ये, रावसाहेब चौगुले, दादा पाटील, रणजीत पाटील, सतीश मलमे,पराग पाटील,चंद्रकांत जोग, फैजअली पटेल,विजय माने देशमुख, कार्यकारी संचालक मोतीलाल पट्टणकुडे, मुख्य कार्यकारी अधिकारी बी.ए.आवटी, आर.बी.पाटील, रमेश गंगाई, सुधाकर पाटील उपस्थित होते.

# विसर्जन मिरवणुकीत ध्वनी मर्यादेचे उल्लंघन; सहा जणांवर गुन्हा

मिरज,ता. २४ (प्रतिनिधी)–

**गणेश विसर्जन मिरवणुकीदरम्यान ध्वनीप्रदूषण प्रतिबंधक नियमांचे उल्लंघन करून मोठ्या आवाजात डॉल्बी आणि डीजे साऊंड सिस्टीम वाजवल्याप्रकरणी मिरज शहर पोलिसांनी सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. ही कारवाई रात्री नागोबा कट्टा भागात करण्यात आली.**

या प्रकरणी पोलीस अंमलदार दत्तात्रय पुंडलिक राणे यांनी फिर्याद दिली आहे. माहितीनुसार, रात्री ११:४५ च्या सुमारास नागोबा कट्टा परिसरात मुरलीधर गणेश उत्सव मंडळाच्या विसर्जन मिरवणुकीत आरोपींनी नियमांचे उल्लंघन करून अत्यंत मोठ्या आवाजात (१२०.९ डेसिबल) डॉल्बी साऊंड सिस्टीम चालवली. पोलीस अधिकाऱ्यांनी आणि कर्मचाऱ्यांनी साऊंड सिस्टीम बंद करण्याबाबत वारंवार सूचना व इशारे देऊनही आरोपींनी त्याकडे दुर्लक्ष केले व मिरवणूक पुढे नेण्यास नकार दिला.

पोलीस प्रशासनाच्या लेखी व तोंडी आदेशाचा भंग करून सार्वजनिक उपद्रव निर्माण केल्याप्रकरणी सुनील धोंडीराम इंगवले (वय ३५, रा. खतीब गल्ली, मिरज), निशांत शिवप्पा म्हैत्रे (वय ३८, रा. हिरेमठ गल्ली, मिरज), विशाल अॅन्थनी फर्नांडिस (वय ४०, रा. हिरेमठ गल्ली, मिरज), ओंकार राजू रजपूत (वय ३५, रा. हिरेमठ गल्ली, मिरज), शिवराज प्रकाश पाटील (वय ३५, रा. हिरेमठ गल्ली, मिरज – सर्व डॉल्बी मालक) आणि प्रशांत मदन बगडे (वय ४५, रा. समर्थनगर, बेळगाव–डॉल्बी ऑपरेटर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोहेकॉ पाटील पुढील तपास करत आहेत.

# तडीपार आदेशाचे उल्लंघन; दोघांवर गुन्हा

मिरज,ता.२४ (प्रतिनिधी)–

**कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी मिरज शहर पोलिसांनी तडीपार आरोपींवर कारवाईचा बडगा उगारला. ध्रुव राहुल भोरे (वय २२, रा. कमानवेस, मंगळवार पेठ, मिरज) आणि विश्वेश धोंडीराम घोडके (वय २५, रा. गोठण गल्ली, मिरज) या दोघांवर तडीपार आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी गुन्हा दाखल झाला आहे.**



विश्वेश घोडके



ध्रुव भोरे

उपविभागीय दंडाधिकारी, मिरज यांच्या आदेशानुसार दोघांना १९ ते २५ सप्टेंबर २०२६ या कालावधीत सांगली–मिरज–कुपवाड महानगरपालिका हद्दीत प्रवेशास मनाई करण्यात आली होती. मात्र, गणेश विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर गस्त घालत असताना ध्रुव भोरे हा नागोबा कट्टा येथे, तर विश्वेश घोडके हा श्रीकांत चौक येथे आढळून आला. पोलीस प्रशासनाने तडीपार आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाईचा इशारा दिला आहे.

# श्री गणेशा आरोग्य अभियानास प्रतिसाद

कोल्हापूर ता. २४ (प्रतिनिधी)–

**श्री गणेशोत्सवात भक्तांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष व सार्वजनिक आरोग्य विभाग, कोल्हापूर यांच्या समन्वयाने आयोजित करण्यात आलेल्या 'श्री गणेशा आरोग्याचा २.०' या उपक्रमाला जिल्ह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे.**

या उपक्रमांतर्गत जिल्ह्यातील १ हजार ८८ आरोग्य शिबिरांच्या माध्यमातून ९६ हजार ६३६ नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी व उपचाराचा लाभ घेतला असल्याची माहिती मुख्यमंत्री सहाय्यता निधी, कक्षप्रमुख डॉ.चंद्रकांत परुळेकर यांनी दिली. या शिबिरांमध्ये ४४ हजार २८३ पुरुष, ५० हजार ३६८ महिला तर २हजार बालकांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

# २२ कोटीच्या कामाचे कार्यादेश देण्यासाठी घाईगडबड का?

## विरोधी पक्षनेते उदयसिंग पाटील

इचलकरंजी,ता.२४ –

**अपूर्ण यंत्रणा, अपूर्ण रॅम्प आणि कायदेशीर प्रक्रिया प्रलंबित असताना कचरा संकलनाच्या २२ कोटीच्या कामाचे कार्यादेश देण्यासाठी घाई ही अत्यंत गंभीर बाब आहे. त्यामुळे ठेकेदाराला गडबडीने कार्यादेश न देण्याची मागणी शिवशाहु विकास आघाडीने केली असल्याचे विरोधी पक्षनेते उदयसिंग पाटील यांनी सांगितले.**



महापालिकेने शहरातील घरोघरी जाऊन कचरा संकलनाच्या कामासाठी २२ कोटीची निविदा काढली आहे. हे काम सुरु करण्यापूर्वी आवश्यक यंत्रणा, मनुष्यबळ, दुय्यम संकलन केंद्र, रॅम्प, जीपीएस व्यवस्था, वजनकाटा, कचरा प्रक्रिया यंत्रणा प्रत्यक्षात सक्षम आहेत का ? याची प्रशासनाने प्रथम खात्री करणे आवश्यक आहे. मात्र, ही सर्व यंत्रणा अपूर्ण असून कायदेशीर प्रक्रियाही प्रलंबित असताना ठेकेदाराला कार्यादेश देण्याची घाई सुरु आहे. सदरचे काम सुरु करण्यापूर्वी ८० घंटागाड्या, कचरा प्रक्रिया करणारी यंत्रणा, ४० कर्मचाऱ्यांची उपस्थिती, रॅम्प आणि दुय्यम कचरा संकलन केंद्र, ठेकेदाराला अतिरीक्त ५ टक्के नफा कशासाठी, वजनकाटा सुरु करुन वजनाच्या आधारे देयक द्यावे, जीपीएस यंत्रणेशिवाय देयक देऊ नये, अंदाजपत्रकात दाखवलेले ३८७ कामगार प्रत्यक्ष आहेत का यासह अनेक प्रश्न उपस्थित करत उदयसिंग पाटील यांनी अंदाजपत्रकात ९९ लाख ७९ हजार ८६३ रुपये आकस्मित खर्चाची तरतुद कोणत्या आधारावर केली आहे ते स्पष्ट करावे.

कंपनीला कार्यादेश देण्याआधी संपूर्ण अंदाजपत्रकाची तांत्रिक व वित्तीय तपासणी करावी, इतर संबंधित कंपन्या घरोघरी कचरा संकलनाचे काम वार्षिक सुमारे १० कोटीमध्ये करण्यास तयार असतील आणि कमी खर्चात हे काम होणार असेल तर प्रशासनाने स्वतंत्र पडताळणी करावी.असे ही उदयसिंग पाटील यांनी सांगितले. यावेळी काँग्रेस शहराध्यक्ष प्रकाश मोरबाळे, नगरसेवक शिवाजी पाटील,अमरजित जाधव उपस्थित होते.

# 'श्री दत्त शिरोळ'चा बॉयलर अग्नी प्रदीपन उत्साहात

शिरोळ,ता. २४ (प्रतिनिधी)–

**येथील श्री दत्त शेतकरी सहकारी साखर कारखान्याचा सन २०२६–२७ च्या ५५ व्या गळीत हंगामाचा बॉयलर अग्नीप्रदीपन समारंभ दत्त उद्योग समूहाचे मार्गदर्शक संचालक गणपतराव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली चेअरमन रघुनाथ पाटील व त्यांच्या पत्नी सुशीला पाटील या उभयंतांच्या हस्ते विधिवत झाला.गणपतराव पाटील यांनी, सर्व सभासद बंधूंनीआपला सर्व ऊस कारखान्यास गाळपास पाठवून सहकार्य करावे असे आवाहन केले.**



श्री दत्त साखर कारखान्याच्या बॉयलर अग्नीप्रदीपन समारंभप्रसंगी गणपतराव पाटील ,चेअरमन रघुनाथ पाटील व त्यांच्या पत्नी सुशीला पाटील व इतर.

यावेळी कारखान्याचे व्हा. चेअरमन शरदचंद्र पाठक,संचालक अरुणकुमार देसाई,विनया घोरपडे,अनिलकुमार यादव, बाबासो पाटील, विश्वनाथ माने, शेखर पाटील, बसगोंडा पाटील, अॅड. प्रमोद पाटील, निजामसो पाटील, अमर यादव, दरगु माने गावडे, ज्योतीकुमार पाटील, सिदगोंडा पाटील, सुरेश कांबळे, संगीता पाटील कोथळीकर, अस्मिता पाटील, इंद्रजीत पाटील, रणजीत कदम, महेंद्र बागे, विजय सूर्यवंशी, मलकारी तेरदाळे, बाळासाहेब पाटील हालसवडे, रावसाहेब नाईक, अनंत धनवडे, मंजूर मेस्त्री, कार्यकारी संचालक संजीव देसाई, को –जन. मॅनेजर व्ही. आर. इंगळे याच्यासह सर्व खाते प्रमुख तसेच धनाजी पाटील नरदेकर, शर्करा औद्योगिक श्रमिक संघ व कामगार सोसायटीचे सर्व पदाधिकारी, आप्पासाहेब उर्फ सा. रे. पाटील जयसिंगपूर उदगाव बँकेचे संचालक व पदाधिकारी, दत्त भांडारचे पदाधिकारी, आ. जयंत आसगावकर, विलास वैद्य, तसेच विविध संस्थांचे पदाधिकारी यांच्यासह महाराष्ट्र व कर्नाटकातील बहुसंख्य सभासद उपस्थित होते. आभार प्रदीप बनगे यांनी मानले.

# जनगणना दुसरा टप्पा ; लोकसंख्या गणनेसाठी सज्ज व्हा

## – जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड

कोल्हापूर ता. २४ (प्रतिनिधी)–

**जनगणना–२०२७ च्या दुसऱ्या टप्प्यातील प्रत्यक्ष लोकसंख्या गणनेच्या कामांसाठी अधिकारी कर्मचाऱ्यांनी सज्ज रहावे, असे आवाहन करुन प्रशिक्षण चार्ज अधिकारी व कर्मचाऱ्यांनी गांभीर्याने घेऊन त्यातील सूचना व कार्यपद्धतीचे काटेकोरपणे पालन करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड यांनी केले.**

जनगणना–२०२७ च्या दुसऱ्या टप्प्यातील प्रत्यक्ष लोकसंख्या गणनेच्या अनुषंगाने जिल्हास्तरीय प्रशिक्षणाचे आयोजन जिल्हाधिकारी कार्यालयातील नवीन सभागृहात करण्यात आले, पहिल्या टप्प्यातील घरांची यादी व घरगणना प्रक्रिया पूर्ण झाली असून, दुसऱ्या टप्प्यात प्रत्येक घरातील प्रत्येक व्यक्तीची स्वतंत्र माहिती संकलित करण्यात येणार आहे.

यासाठी ४० प्रश्नांच्या आधारे माहिती घेण्यात येणार असून, प्रत्येक घर व व्यक्ती गणनेत समाविष्ट होईल याची विशेष दक्षता घ्यावी, असे आवाहन करुन चार्ज अधिकारी व पर्यवेक्षकांनी प्रगणकांच्या कामावर प्रभावी देखरेख ठेवून घरभेटी, माहिती संकलन, पडताळणी व अपूर्ण माहितीची पूर्तता याबाबत नियमित आढावा घ्यावा. जनगणना माहितीची गोपनीयता राखणे बंधनकारक असून, माहिती अनधिकृत व्यक्तीस देऊ नये. असे आवाहनही यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी केले.

# मिरजेत अल्पवयीन मुलीचे अपहरण

मिरज,ता. २४ (प्रतिनिधी)–

**मिरज शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीतून १६ वर्षीय अल्पवयीन मुलीला अज्ञात व्यक्तीने फूस लावून पळवून नेल्याची घटना समोर आली आहे. याबाबत नसीमा हसन शेख (वय ४०, रा. कुंभार हॉस्पिटल पाठीमागे, ख्वाजा झोपडपट्टी, मिरज) यांनी मिरज शहर पोलिसात फिर्याद दाखल केली आहे.**

सकाळी सुमारे ९.१० वाजता शेख यांच्या घरातून त्यांची भाची समीर पिरा शेख हिला अज्ञात व्यक्तीने फूस लावून सोबत नेल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

सदर मुलगी सडपातळ बांध्याची असून सावळा रंग आहे. घटनेच्या वेळी तिने चॉकलेट रंगाचा टॉप आणि निळ्या रंगाची जिन्स परिधान केली होती. तिला मराठी व हिंदी भाषा बोलता येते.

# तंदूरुस्त बंदोबस्त उपक्रम आदर्शवत : अण्णासाहेब जाधव

## सौ. सरस्वती रामकिशोर धूत चॅरीटेबल ट्रस्ट, जिल्हा माहेश्वरी सभा यांचा पुढाकार

इचलकरंजी, ता. २४ –

**गणेश विसर्जन बंदोबस्तात पोलीस रात्रंदिवस अग्रेसर राहून आपले कर्तव्य पार पाडत असतात. अशावेळी दरवर्षी पोलिसांच्या तंदुरुस्तीसाठी सरस्वती रामकिशोर धूत चॅरीटेबल ट्रस्ट आणि कोल्हापूर जिल्हा माहेश्वरी सभा आपले सामाजिक कर्तव्य जपत आले आहे. यामुळे या औद्योगिक शहरातील कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी आम्हाला अधिक मोठा हातभार लागत आहे, असे प्रतिपादन अपर पोलीस अधिक्षक अण्णासाहेब जाधव यांनी केले.**



सौ. सरस्वती रामकिशोर धूत ट्रस्ट आणि कोल्हापूर जिल्हा माहेश्वरी सभा यांच्यावतीने विसर्जन बंदोबस्तातील पोलिसांसाठी तंदूरुस्त बंदोबस्त उपक्रम अपर पोलीस अधिक्षक अण्णासाहेब जाधव, विक्रांत गायकवाड, डॉ. एस. पी. मर्दा, नितीन धूत, चंदनमल मंत्री आदींच्या हस्ते झाले.

येथील सौ. सरस्वती रामकिशोर धूत चॅरिटेबल ट्रस्ट आणि कोल्हापूर जिल्हा माहेश्वरी सभा यांच्या सहकार्याने यंदाही गणेश विसर्जन मिरवणूकीतील बंदोबस्तावर असणाऱ्या पोलिसांसाठी तंदूरुस्त बंदोबस्त उपक्रम घेण्यात आला. यावेळी ते बोलत होते. मराठा मंडळ सांस्कृतीक भवनमध्ये झालेल्या या कार्यक्रमास पोलीस उप अधिक्षक विक्रांत गायकवाड, माहेश्वरी सभेचे चंदनमल मंत्री, डॉ. एस. पी. मर्दा आदींच्या हस्ते सुमारे ८५० पोलिसांना चिक्की, राजगिरा लाडू या पौष्टीक आहारासह मिनरल पाण्याची बॉटल यांचे वाटप करण्यात आले.

कोल्हापूर जिल्हा माहेश्वरी सभेचे जिल्हाध्यक्ष नितीन धूत यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. ते म्हणाले, इचलकरंजी पोलिस दलाने यंदा शहरातील गणेशोत्सवाला शिस्त लावली. सकाळ माध्यम समुहाच्या सहकार्याने पोलिसांसाठी तंदूरुस्त बंदोबस्त उपक्रमांसह गेल्या कांही वर्षात अनेक सामाजिक उपक्रम राबविले आहेत. शहराच्या सुरक्षेसाठी पोलिसांचे आरोग्य जपण्यासाठी येणाऱ्या काळात त्यांच्यासाठी भव्य आरोग्य शिबीराचे आयोजन केले जाणार आहे.

श्रीकांत मंत्री यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी मान्यवरांचा सर्व पोलीस अधिकाऱ्यांचा माहेश्वरी युवा संघटनेच्या आरोग्यम पुस्तिकेसह शाल देवून सत्कार करण्यात आला. सुत्रसंचालन मुकेश खाबाणी यांनी केले. आभार पंडित कोंडेकर यांनी मानले. नियोजन माहेश्वरी सभा चे शिवप्रसाद तापडीया, सुरेंद्र हेडा,हरीश सारडा, आनंद बांगड, कृष्णकांत भूतडा, दिनेश बाहेती आदींनी केले.

व्यासपिठावर पोलीस निरिक्षक शरद मेमाणे, महेश चव्हाण, गजेंद्र लोहार, सचिन सुर्यवंशी, प्रमोद शिंदे, गोरख चौधर, सहाय्यक पोलीस निरिक्षक विकास शिंदे यांच्यासह माहेश्वरी सभेचे लालचंद गट्टाणी, शांतीकिशोर मंत्री, सुरेश दरगड, रामनिवास मुंदडा, लक्ष्मीकांत बांगड, बजरंग काबरा, दयानंद बाहेती, रामुशेठ मुंदडा, श्रीकांत बंग, रामनारायण गट्टाणी, नंदकिशोर भुतडा, धनराज डाळ्या, सत्यनारायण धूत, मनोज राठी, मुरली हेडा, सुरेश बांगड, बालकिसन टुवाणी, उमेश राठी, संजय सोमाणी, रामदेव राठी, मनोज सारडा आदी उपस्थीत होते.

# सरकार शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही : मंत्री मुश्रीफ

सेनापती कापशी, ता.२४(प्रतिनिधी)–

पिके संकटात आल्यामुळे राज्यात सरसकट शंभर टक्के दुष्काळ पडला आहे. या नैसर्गिक संकटात सरकार शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही, सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. सरकार दुष्काळ जाहीर करणार असून शेतकऱ्यांनी घाबरून जाऊ नये, असे आवाहन वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी केले. हसूर खुर्द (ता.कागल) येथे शेतकरी मेळावा झाला.



हसूर खुर्द येथे शेतकरी मेळाव्यात बोलताना मत्री हसन मुश्रीफ शेजारी संजयबाबा घाटगे,शशिकांत खोत, सूर्याजी घोरपडे आदी.

मंत्री मुश्रीफ पुढे म्हणाले, दोन दिवसांपूर्वीच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्रिमंडळाच्या बैठकीत दुष्काळ सदृश्य परिस्थिती जाहीर केली आहे.ज्या– ज्या शेतकऱ्यांचे पिकांचे नुकसान झाले आहे त्या– त्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई दिल्याशिवाय सरकार स्वस्त बसणार नाही. कारण हे शेतकऱ्यांचे सरकार आहे.

संजयबाबा घाटगे यांनी, शेतकऱ्यांच्या जीवनातील समृद्धी पाहून समाधान वाटत आहे. सध्याच्या दुष्काळी परिस्थितीतही पीक–पाणी चांगले पिकू दे. मुश्रीफ यांच्या पाठबळावर गावचा चांगला विकास झाला आहे. येथून पुढेही दोन्ही गटांनी एकजुटीने,आनंदाने रहा, अशी इच्छा व्यक्त केली.मेळाव्यास शशिकांत खोत, सुनिल चौगले, सूर्याजी घोरपडे, धनाजी तोरस्कर, दीपक सोनार, दिनेश मुसळे, आनंदा जाधव, ए.जी. साळोखे, दत्तात्रय गडकरी, उपसरपंच सुभाष माने, बाबूराव भोसले, पुरूषोत्तम साळोखे,अशोक दाभोळे यांच्यासह ग्रा.पं.सदस्य, विविध संस्थांचे पदाधिकारी, महिला व ग्रामस्थ उपस्थित होते.

महासत्ता

सुविचार :- 'स्वत:ला घडविण्यात आपला वेळ खर्च करा म्हणजे तुम्हाला इतरांना दोष द्यायला वेळच मिळणार नाही.'
– स्वामी विवेकानंद



■ संपादकीय ■

# मतभेदांचे मोहोळ

देशातील निवडणूक प्रणाली नियंत्रित करणाऱ्या निवडणूक आयोगाच्या सदस्यांमध्ये वादविवाद आणि विसंवाद असल्याची बातमी एका इंग्रजी वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झाल्यानंतर आता देशपातळीवर उलट सुलट चर्चा सुरू झाली आहे. मुळात भारताचा निवडणूक आयोग दीर्घकाळापासून वादात अडकलेला आहेच. आता निवडणूक आयोगाच्या मुख्य पदावर काम करणारे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार आणि त्यांचे दोन सहकारी संधू आणि जोशी यांच्यामध्ये वाद असल्याच्या बातम्या प्रसिद्ध होऊ लागल्या आहेत. ज्ञानेश कुमार यांच्या सहकाऱ्यांना त्यांची कार्यपद्धती मान्य नाही आणि गेल्या दहा महिन्यांच्या कालावधीमध्ये या दोघांनी तब्बल १४ वेळा विरोधी भूमिका घेतली असल्याचे या बातम्यांमध्ये म्हटल्याचे दिसून येते. निवडणूक आयोगाने या बातम्यांचा खुलासा केला असला आणि अशा प्रकारचे मतभेद ही नैसर्गिक गोष्ट असल्याचे म्हटले असले, तरी एकूणच ज्या निवडणूक आयोगावर नेहमीच बोटे दाखवली जात होती त्या आयोगाचे काम वादग्रस्त आहे हे सिद्ध करणारी ही घटना निश्चितच आहे. भारतीय संविधानामध्ये निवडणूक आयोगाची स्थापना करण्याबाबत तरतुदी करण्यात आल्या तेव्हा मुख्य निवडणूक आयुक्त आणि दोन आयुक्त यांचे अधिकार समान असतील असे अधोरेखित करण्यात आले होते. म्हणजेच तीनपैकी दोघांनी जर एखाद्या विषयाला विरोध केला तर तो निर्णय घेता येत नाही असे सांगून ठेवण्यात आले आहे. मुख्य निवडणूक आयुक्त हे पद जरी असले तरी त्या पदाला मुख्यपणा असा काही नाही. इतर आयुक्तांप्रमाणेच त्यांचे अधिकार आहेत असे नेहमीच सांगण्यात येते. खूप वर्षांपूर्वी जेव्हा टी एन शेषन मुख्य निवडणूक आयुक्त होते, तेव्हा त्यांनी खऱ्या अर्थाने देशात निवडणूक सुधारणा लागू केल्या होत्या. म्हणजेच निवडणूक आयोगाचे जे अधिकार आहेत ते खऱ्या पद्धतीने राबवण्यास सुरुवात केली होती. तेव्हा त्याचा फटका अनेक वेळा सत्ताधारी पक्षालाही बसला होता. त्या काळातही शेषन यांच्या दोन सहकाऱ्यांनी त्यांच्या कार्यपद्धतीच्या विरोधात नाराजी व्यक्त केली होती. अर्थात आजही शेषन यांचे कार्य आदर्श कार्य म्हणून नोंदवले जाते. पण दुर्दैवाने विद्यमान मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याबाबत तसे म्हणता येत नाही. गेल्या काही वर्षांच्या कालावधीमध्ये निवडणूक आयोगाच्या अखत्यारीत असलेले निर्णय घेताना ज्या प्रकारे वादग्रस्त निर्णय घेण्याची प्रक्रिया सुरू ठेवण्यात आली आहे ते पाहता निवडणूक आयोगाच्या सदस्यांमध्ये वाद असणे आणि मतभेद असणे हे लक्षणीय मानावे लागेल. काही पक्षांच्या फुटीनंतर फुटीर पक्षाला दिलेले अधिक महत्त्व असो किंवा फुटीनंतर मूळ पक्षाचे चिन्ह काढून घेऊन फुटीर गटाला बहाल करण्याचा निर्णय असो किंवा मूळ पक्षाचे नावसुद्धा फुटीर गटाला वापरण्याची परवानगी देणे असो, असे अनेक निर्णय वादग्रस्त निर्णय म्हणून सांगितले जातात. महत्त्वाची गोष्ट म्हणजे देश पातळीवर जी मतदार याद्या शुद्ध करण्याची मोहीम सुरू झाली आहे, त्यावरून निवडणूक आयोगामध्ये मतभेद असल्याचे समोर येत आहे. ज्ञानेशकुमार यांनी अट्टाहासाने जो एक फॉर्म निर्माण केला आणि त्या फॉर्ममधील तपशीलामध्येसुद्धा सुधारणा केली, त्याला इतर दोन आयुक्तांनी ठाम विरोध केला होता. पण तरीसुद्धा तो फॉर्म तसाच पुढे रेटण्यात आला, अशा प्रकारची माहितीही आता पुढे येत आहे. देशात विविध ठिकाणी लोकसभा मतदारसंघात किंवा विधानसभा मतदारसंघात लाखोंच्या संख्येने मतदारांची नावे कमी होत आहेत. ते पाहता मतदार याद्या शुद्ध करण्याच्या निमित्ताने सत्ताधारी पक्षाला अनुकूल ठरतील अशीच नावे फक्त मतदार यादीमध्ये राहावीत अशा प्रकारे निवडणूक आयोग काम करते की काय अशी पण शंका येऊ लागली आहे. या पार्श्वभूमीवर ज्ञानेश कुमार यांना इतर दोन सदस्यांनी विरोध करणे समजण्यासारखे आहे आणि त्यांनी खरंच तसा विरोध केला असेल तर त्यांचे अभिनंदन करावे लागेल. एकीकडे ईव्हीएमवर मतदान घेण्याच्या विषयावरसुद्धा निवडणूक आयोग संशयाच्या भोवऱ्यात असताना त्या पाठोपाठ आता मतदार याद्या शुद्धीकरणाची मोहीमसुद्धा वादग्रस्त ठरत आहे. जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेल्या भारत देशामध्ये निवडणुकीच्या माध्यमातूनच सत्ता मिळते आणि निवडणुकीच्या माध्यमातून सत्ता जाते. साहजिकच ही प्रक्रिया जेवढी प्रामाणिक, पारदर्शी आणि स्वच्छ असेल तेवढा लोकांचा लोकशाहीवरील विश्वास वाढत जातो. पण सध्या निवडणूक आयोग किंवा इतर अनेक संविधानिक संस्था ज्या प्रकारे सत्ताधारी पक्षाचे बाहुले झाल्याप्रमाणे कार्यरत राहिले आहेत ते पाहता अशा संस्थांमध्ये काम करणाऱ्या काही लोकांनी अशा प्रकारे आपले मतभेद जर समोर आणले तरच या संस्था वाचण्याची काही अंधुक आशा निर्माण होऊ शकते. भारतीय लोकशाही ज्या यंत्रणेवर अवलंबून आहे त्यामध्ये असे परस्पर विरोधी मतभेद असणे योग्य मानता येणार नाही.

# ग्राहकहितैषी पाऊल

**सणासुदीचा हंगाम आला की ऑनलाईन बाजारपेठांवर ४० टक्के, ५० टक्के, ७० टक्के अशा सवलतींचा वर्षाव सुरू होतो. ग्राहकाला दाखवला जाणारा हिशेब साधा असतो. वस्तूची आधीची किंमत ५,००० रुपये आणि आता ती ३,००० रुपये म्हणजे तब्बल ४० टक्के बचत. पण खरी मेख त्या पाच हजार रुपयांच्या 'आधीच्या किमती'त असते. ती वस्तू प्रत्यक्षात कधी तेवढ्या किमतीला विकली गेली होती का, की विक्रीपूर्वी संदर्भ किंमत वाढवून सवलत मोठी भासवण्यात आली, हे ग्राहकाला सहसा समजत नाही.**

ऑनलाईन शॉपिंगची क्रेझ असणारी तरुणपिढी तर याचा विचारही करत नाही. ब्रिटनमधील ग्राहक संघटना 'व्हिच' ही अनेक वर्षे अशा 'ब्लॅक फ्रायडे'च्या ऑफर्स तपासत आली आहे. या संस्थेच्या मते, अनेक सवलती प्रत्यक्षात दिसतात तेवढ्या फायदेशीर नसतात. भारतीय ग्राहकांचाही अनुभव वेगळा नाही. ज्या वस्तूंवर अनेक दिवस नजर असते, तिची 'सेल' सुरू झाल्यावर दाखवली जाणारी सवलतीनंतरची किंमत काही वेळा आधीच्या सामान्य किमतीइतकीच असते. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने कन्झ्युमर प्रोटेक्शन (ई-कॉमर्स) (अमेंडमेंट) रूल्स, २०२६ अधिसूचित केले असून ते १ जानेवारी २०२७ पासून लागू होणार आहेत.



या नव्या नियमांनुसार एखाद्या ऑनलाईन विक्रेत्याने किंवा प्लॅटफॉर्मने किंमत कमी केल्याची जाहिरात केली तर त्याला सवलतीची नवी किंमत आणि 'प्रायर प्राईस' दोन्ही दाखवावे लागतील. ही 'प्रायर प्राईस' विक्रेत्याच्या सोयीने ठरवलेली असणार नाही, तर सवलत जाहीर करण्यापूर्वीच्या ३० दिवसांत त्या वस्तू किंवा सेवेची सर्वांत कमी किंमत असेल. त्यामुळे वस्तू २,००० रुपयांना नियमितपणे विकून सणाच्या आधी ४,००० रुपये दाखवायची आणि नंतर '५० टक्के सवलत' असे आकर्षक लेबल लावून तीच दोन हजारांना विकायची, या पद्धतीला आळा बसू शकतो. नवे नियम केवळ किंमतींपुरते मर्यादित नाहीत. ग्राहकाने एखादी वस्तू शोधल्यानंतर त्याला दिशाभूल करणारे किंवा मूळ शोधाशी संबंध कमी असलेले निकाल वर आणण्यासाठी प्लॅटफॉर्मला सर्च रिझल्टस्मध्ये फेरफार करता येणार नाही, असेही या नियमावलीत नमूद करण्यात आले आहे. पैसे देऊन सर्चबारमध्ये 'वर आणलेल्या' उत्पादनांना स्पष्टपणे 'स्पॉन्सर्ड' किंवा तत्सम ओळख द्यावी लागेल. केंद्रीय ग्राहक संरक्षण प्राधिकरणाने २०२३ मध्ये जाहीर केलेल्या 'डार्क पॅटर्न्स'विरोधी मार्गदर्शक सूचनांचे पालनही बंधनकारक करण्यात आले आहे. त्यानुसार कंपन्यांना दरवर्षी सेल्फ-ऑडिट करून त्याचे कम्प्लायन्स सर्टिफिकेट दर्शवावे लागेल. म्हणजेच बनावट काउंटडाउन टायमर, ग्राहकाने न मागितलेली सेवा आधीच निवडून ठेवणे, कृत्रिम स्केअर्सिटी निर्माण करणे किंवा जाहिरात आणि नैसर्गिक सर्च रिझल्ट यांची सीमारेषा धूसर करणे यांसारख्या पद्धतींवरही अधिक लक्ष राहणार आहे. या बदलाची गरज किती मोठी आहे, याचे उत्तर ग्राहकांच्या तक्रारींत मिळते.

सरकारी आकडेवारीनुसार २०२५ मध्ये नॅशनल कन्झ्युमर हेल्पलाईनकडे १७,७१,६२२ तक्रारी आल्या होत्या. यापैकी ५,११,१९६, म्हणजे जवळपास २९ टक्के, ई-कॉमर्स क्षेत्राशी संबंधित होत्या. त्यामुळे नवे नियम अधिक पारदर्शक बाजार निर्माण करतानाच तक्रार निवारणाची साखळीही मजबूत केली जाणार आहे. प्रत्येक ई-कॉमर्स संस्थेला नॅशनल कन्झ्युमर हेल्पलाईनच्या कन्व्हर्जन्स मेकॅनिझममध्ये सहभागी व्हावे लागेल आणि तक्रार निवारण अधिकाऱ्याकडे दाखल केलेल्या तक्रारीची प्रत ग्राहकाला द्यावी लागेल. मार्केट प्लेसेसना रिटर्न-

दैनंदिनी

रिफंड अटी, वॉरंटी, डिलिव्हरी, पेमेंट, बेस्ट-बिफोर किंवा यूज-बिफोर यांसारखी माहिती अधिक स्पष्टपणे द्यावी लागणार आहे. आयात केलेल्या वस्तूंबाबत इम्पोर्टर आणि कंट्री ऑफ ओरिजिनची माहितीही आवश्यक असेल.

केंद्र सरकारने उचललेले हे पाऊल नवीन नाही. सवलतींसाठी ३० दिवसांच्या सर्वांत कमी किमतीचा संदर्भ वापरण्याची पद्धत युरोपियन युनियनने २०२२ पासूनच स्वीकारली आहे. अमेरिकेच्या फेडरल ट्रेड कमिशनच्या चौकटीत जाहिरातीत दाखवलेली 'फॉर्मर प्राईस' ही प्रत्यक्ष व्यवहारातील बोनाफाईड किंमत असणे अपेक्षित आहे; कॅलिफोर्नियात संदर्भ किंमतीबाबत ९० दिवसांचा निकष वापरला जातो. भारताची नवी दिशा त्यामुळे वेगळी नसून ती आंतरराष्ट्रीय ग्राहक संरक्षण पद्धतींशी साधर्म्य राखणारी आहे. फरक एवढाच की भारतीय नियम सध्या प्रामुख्याने ई-कॉमर्सच्या संदर्भात आहेत. ऑनलाईन खरेदीत किंमत इतिहास (प्राईस हिस्ट्री) तपासण्यासाठी स्वतंत्र प्राईस ट्रॅकर्स उपलब्ध असू शकतात. दुकानात टांगलेल्या शर्टवर 'एमआरपी ४,९९९ रुपये, आता फक्त १,९९९ रुपये' अशी पाटी दिसली तर ती वस्तू प्रत्यक्षात किती काळ आणि किती ग्राहकांना त्या किमतीत विकली गेली, हे जाणण्याचा सामान्य ग्राहकाकडे मार्ग नसतो. स्पर्धात्मक बाजारात सवलत आवश्यकच आहे आणि ग्राहकाला त्याचा लाभ मिळालाच पाहिजे. पण किंमत वाढवून नंतर ती कमी करण्याच्या गणिताला 'सवलत' म्हटले जाऊ लागले, तर ग्राहकाची निवड माहितीवर नव्हे तर भ्रमावर आधारित होते. ◆◆◆

# सुख-सुविधांच्या काळात हरवत चाललेले 'आरोग्य'

## बदललेली जीवनशैली विविध रोगांना आमंत्रण देण्यास कारणीभूत

**आजचा माणूस सुख-सुविधांनी समृद्ध झाला आहे; पण आरोग्याच्या बाबतीत मात्र तो दिवसेंदिवस दरिद्री होत चालला आहे. विज्ञानाने जीवन अधिक सोपे केले, श्रम कमी केले, वेळ वाचवला आणि हाताशी सुख-सोयींची असंख्य साधने आणून ठेवली. मात्र वाचवलेला वेळ शरीरासाठी वापरण्याऐवजी मोबाईल, टीव्ही आणि विविध प्रकारच्या मनोरंजनाच्या हवाली केला जात आहे. रोगांवर उपचार करण्यासाठी नवनवीन औषधे आणि तंत्रज्ञान विकसित होत आहे; परंतु रोगांना आमंत्रण देणारी आपली जीवनशैली बदलण्याची तयारी मात्र कमी होत चालली आहे.**



सुख-सुविधा वाढल्या, पण शरीरातील स्फूर्ती, चपळता आणि सहनशक्ती कमी होत गेली. निरोगी शरीरासाठी श्रम, संयम, संतुलित आहार आणि शिस्तबद्ध दिनचर्या आवश्यक असते. पूर्वी पायी चालणे हा जीवनाचा सहज आणि स्वाभाविक भाग होता. आज मात्र थोड्याशा अंतरासाठीही वाहनाची गरज भासते आणि दोन मजले चढायचे म्हटले तरी लिफ्ट शोधली जाते. एकेकाळी प्रवासाचे साधन आणि व्यायामाचे माध्यम असलेली सायकल आज अनेक घरांच्या कोपऱ्यात धूळ खात पडलेली दिसते; काही घरांतून तर ती पूर्णपणे हद्दपार झाली आहे.

शरीराला श्रम मिळाले नाहीत, तर त्याची शक्ती क्षीण होणारच. शेतात नांगर चालला नाही, तर जमीन हळुहळू पडीक पडते; त्याचप्रमाणे शरीराला हालचाल मिळाली नाही, तर त्यातही जडत्व निर्माण होते. दिवसभर खुर्चीवर बसून राहणे, घरी आल्यानंतर सोफ्यावर अंग टाकणे आणि त्यानंतर तासन्तास मोबाईलमध्ये बुडून जाणे, ही आज अनेकांची नेहमीची दिनचर्या बनली आहे. 'व्यायामासाठी वेळ नाही,' अशी तक्रार करणाऱ्या माणसाकडे स्क्रीनसमोर तासन्तास बसण्यासाठी मात्र वेळ असतो. योग, प्राणायाम आणि ध्यान यांसारख्या आरोग्यदायी साधनांकडेही काही ठिकाणी अंतर्मुख होण्याचे माध्यम म्हणून नव्हे, तर प्रदर्शनाचा भाग म्हणून पाहिले जात आहे. शरीर आणि मनासाठी आवश्यक असलेली शिस्त केवळ बोलण्यात राहून उपयोग नाही; ती प्रत्यक्ष जीवनात उतरवावी लागते.

झोपेच्या बाबतीतही आधुनिक माणूस आपल्या शरीराशी अन्याय करत आहे. रात्री उशिरापर्यंत मोबाईलच्या पडद्यावर डोळे खिळवून ठेवायचे आणि सकाळी उशिरापर्यंत अंथरुणात पडून राहायचे, अशी विस्कळीत दिनचर्या अनेकांच्या जीवनाचा भाग बनली आहे. रात्री डोळे मोबाईल शोधतात आणि सकाळी डोळे उघडताच हात पुन्हा मोबाईलकडे जातो. शरीर विश्रांतीची मागणी करत असते; पण मन सतत नव्या मनोरंजनाच्या शोधात असते.अशा परिस्थितीत दिवसभर थकवा, चिडचिड आणि अस्वस्थता जाणवत राहिली,तर त्यात नवल ते काय ? आहार-विहारातील बदल तर आणखी चिंताजनक आहेत.माणूस आपल्या जिभेच्या चोचल्यांच्या इतका आहारी गेला आहे की भूक मागे पडली आणि चव पुढे आली. मीठ, मिरची, मसाले, तेल, तूप आणि साखरेचा भरमसाठ वापर करून पदार्थ इतके चटपटीत केले जातात की साधे, घरगुती जेवणही आता अनेकांना बेचव वाटू लागले आहे. जिभेला प्रत्येक वेळी नवी चव हवी असते आणि त्या चवीचा सगळा भार बिचारे पोट वाहत राहते.


बुफे संस्कृतीने या प्रवृत्तीला आणखी खतपाणी घातले आहे. समोर पदार्थांची लांबलचक रांग दिसली की गरज मागे पडते आणि हव्यास पुढे येतो.जितके खायचे आहे त्यापेक्षा अधिक पदार्थ ताटात वाढून घेतले जातात. भोजन ही शरीराची गरज न राहता जणू चवीची स्पर्धाच बनते.ताट भरले जाते; पण शरीराला खरोखर काय हवे आहे, याचा विचार मात्र मागे पडतो. आपल्या ताटाचे स्वरूपही बदलत चालले आहे. पालेभाज्या, इतर भाज्या, डाळी, कडधान्ये, कोशिंबीर, फळे आणि संपूर्ण धान्य यांचे प्रमाण कमी होत आहे; तर मैदा, तळलेले पदार्थ, मीठ आणि साखरेचे प्रमाण वाढत आहे. तंतुमय पदार्थ हे आहाराचे महत्त्वाचे घटक असूनही त्यांच्याकडे दुर्लक्ष केले जाते. ज्या ताटात निसर्गाची देणगी कमी आणि प्रक्रिया केलेल्या पदार्थांचे प्रमाण अधिक आहे, त्या ताटाकडे गांभीर्याने पाहण्याची वेळ आली आहे.

फास्ट फूडने तर धावपळीच्या जीवनाला आणखी वेग दिला आहे. शरीराला घाई नको असते; त्याला योग्य पोषण हवे असते. अधिक मीठ, साखर आणि चरबी असलेल्या पदार्थांचे वारंवार सेवन आरोग्यासाठी हितावह नाही. बाजारातील पदार्थ अधूनमधून चवीत बदल म्हणून खाणे वेगळे आणि त्यांनाच रोजच्या आहाराचा आधार बनवणे वेगळे. घरचे साधे जेवण कदाचित आकर्षक किंवा चटपटीत वाटणार नाही; पण शरीराच्या गरजा पूर्ण करण्याच्या दृष्टीने ते अधिक उपयुक्त ठरू शकते. आहारातून मिळणारी अतिरिक्त ऊर्जा आणि जीवनातील कमी झालेला शारीरिक श्रम यांचा परिणाम शरीरावर अतिरिक्त चरबीच्या रूपाने दिसू लागला आहे. मुलेही या बदलापासून अलिप्त राहिलेली नाहीत. खेळाच्या मैदानाऐवजी स्क्रीन, घरच्या पौष्टिक खाण्याऐवजी पॅकेटमधील पदार्थ आणि मैदानी खेळाऐवजी मोबाईलवरील खेळ, अशी परिस्थिती निर्माण होत असेल तर पालकांनी वेळीच सजग होणे गरजेचे आहे.

निरोगी शरीर ही अचानक मिळणारी उपलब्धी नाही. संयमित आहार-विहार, नियमित दिनचर्या, पुरेशी झोप, शारीरिक हालचाल आणि सातत्यपूर्ण प्रयत्न यांच्या एकत्रित परिणामातून ते घडते. म्हणून सुख-सुविधांना जीवनाचे अंतिम ध्येय न मानता, जीवन अधिक सुलभ करणारी साधने म्हणून त्यांचा वापर केला पाहिजे. कारण खरे सुख सुविधा वाढण्यात नाही, तर त्या सुविधांचा वापर करूनही शरीराला निरोगी, मनाला प्रसन्न आणि जीवनाला संतुलित ठेवण्यात आहे.

■ मच्छिंद्र ऐनापुरे, जत

## दैनिक पंचांग(सुर्योदयकालीन ग्रहस्थिती)




**शुक्रवार,ता.२५.९.२०२६,** विक्रम संवत २०८२, शिवशक ३५३, शालिवहन शके १९४८, पराभव नाम संवत्सरे, दक्षिणायणे, वर्षा ऋतो, भाद्रपद मासे, शुक्ल पक्षे, चतुर्दशी तिथी, २३.०८ नंतर पौर्णिमा तिथी, शततारका नक्षत्र, ११.२३ नंतर पूर्वाभाद्रपदा नक्षत्र, कुंभरास, २९.३२ नंतर मीनरास, शुल योग, १४.५१ नंतर गंड योग, गरज करण ११.१८ नंतर, वणिज करण २३.०८ पर्यंत, दिनमान ११.५९, सुर्योदय ६.२५, सुर्यास्त १८.२४ (कोल्हापूरचे), राहू काळ सकाळी १०.३० ते १२, अनंत चतुर्दशी, रात्री ११.०८ नंतर पौर्णिमा, सकाळी ११.३० पर्यंत ऊस,मिरची लागवड, वेल लावणे, औषध घेणे, मोठ सुरु करणे, भद्रा २३.०८ नंतर.

**ज्यो:केशव पेटकर महाराज-९६०४७०९१५९**

## ❊ राशीभविष्य ❊

**मेष**–सामाजिक किंवा धार्मिक कार्यात सहभागी होणे आणि चांगल्या कामांमध्ये पैसे किंवा वेळ गुंतवणे यामुळे मनाचे समाधान होईल.

**वृषभ**– तुम्हाला प्रभावशाली आणि अनुभवी लोकांच्या संपर्कात येण्याची संधी मिळू शकते, ज्यामुळे भविष्यात तुमच्या कार्यक्षेत्राला फायदा होऊ शकतो.

**मिथून**– तुमची प्रतिभा, बुद्धिमत्ता आणि कार्यक्षमता तुम्हाला इतरांपेक्षा वेगळे करू शकतात.ज्या कामात तुम्ही बऱ्याच काळापासून मेहनत घेत आहात,त्याचे सकारात्मक परिणाम मिळण्याची शक्यता आहे.

**कर्क**– जवळच्या व्यक्तीकडून मौल्यवान भेटवस्तू किंवा कोणतीही सुखद बातमी मिळू शकते. इतरांच्या बोलण्याने जास्त प्रभावित होण्याऐवजी स्वतःच्या क्षमतेवर विश्वास ठेवा.

**सिंह**–विद्यार्थ्यांनी अभ्यासावर लक्ष केंद्रित करावे. कोणत्याही बाबतीत निष्काळजीपणा भविष्यात समस्या निर्माण करू शकतो.

**कन्या**– आज तुम्हाला तुमच्या मेहनतीचे आणि प्रामाणिकपणाचे सकारात्मक परिणाम मिळू शकतात. त्यामुळे तुमचे काम पूर्ण भक्तीभावाने करत रहा आणि यशासाठी शॉर्टकट घेणे टाळा.

**तुळ**– भविष्यातील उद्दिष्टांसाठीच्या तुमच्या प्रयत्नांचे सकारात्मक परिणाम मिळण्याची शक्यता आहे. सतत तुमच्या ध्येयावर लक्ष केंद्रित करा.

**वृश्चिक**– व्यवसायाशी संबंधित कोणतीही जुनी योजना आज तुमच्या कामात येऊ शकते. कामाच्या ठिकाणी घेतलेले निर्णय फायदेशीर ठरतील.

**धनु**– अचानक वाढणारे खर्च तुमची आर्थिक योजना खराब करू शकतात आणि यामुळे तुमचे मन थोडे अस्वस्थ होऊ शकते.प्रवास किंवा कामाच्या वेळी निष्काळजीपणा करू नका.

**मकर**–घाईघाईने एखादे काम पूर्ण करण्याऐवजी शांत मनाने आणि सकारात्मक विचार करून पुढे जा. धीराने केलेले प्रयत्न तुम्हाला इच्छित यशाकडे नेऊ शकतात.

**कुंभ**– आजच्या विशेष दिवशी तुमच्या तंदुरुस्तीमुळे तुम्ही एखादे असामान्य काम कराल.आज तुमच्या आई-वडिलांपैकी कुणी धन बचत करण्यासाठी सल्ला देऊ शकतात.

**मीन**–तुमचे यश पाहून काही लोक मत्सर करू शकतात किंवा कामात अनावश्यक अडथळे आणण्याचा प्रयत्न करू शकतात.अशा लोकांच्या शब्दांकडे लक्ष देण्याऐवजी ध्येयावर आणि कामावर लक्ष केंद्रित करा.

## वाचकांचा पत्रव्यवहार

### झेंडा चौक ते मरगुबाई मंदिर मार्गावर पोलिस नियंत्रण आवश्यक

अनंत चतुर्दशीदिवशी इचलकरंजी शहरातील सर्व गणेश मंडळांची मोठी वाजत-गाजत विसर्जन मिरवणूक निघते. शिवतीर्थ ते टिळकपुतळा दरम्यान दुतर्फा अनेक पक्ष व संघटना यांचे स्वागत मांडव असतात, पोलिसांचा बंदोबस्तही याच दरम्यान असतो. मात्र टिळक पुतळ्याजवळील स्वागत मांडवनंतर पुढे शक्यतो कोणतेही स्वागत कमान नसतात. तसेच या मार्गांवर शाळा, कोर्ट, जज्ज निवास, दवाखाने नाहीत, फक्त निवासी भाग आहे. त्यामुळे झेंडा चौक ते मरगुबाई मंदिर दरम्यान पोलिस खात्याला थोडी उसंत मिळते आणि नेमके याचवेळी बहुतांश वेळेस मंडळांची मिरवणूक रेंगाळत असते. तसेच यादिवशी दुपारच्या वेळेत तसेच रात्री ७ ते १२ यावेळेत येथील नागरिकांना मोठ्या आवाजातील गाणी तसेच ढोल-ताशे यांचा आवाज सक्तीने ऐकावाच लागतो. त्यामुळे झेंडा चौकातून पुढे रसना कॉर्नर, विठ्ठल मंदिर, गुजरी कॉर्नर, श्रीराम मंदिर कॉर्नर व दर्गा चौक या भागात राहणाऱ्या नागरिकांना व जुन्या वस्तींना याचा प्रचंड त्रास सहन करावा लागतो. याचा दुसऱ्यादिवशी प्रचंड त्रास होऊन झोप न होणे, डोके व कान दुखणे, लहान मुले, वृद्ध नागरिक आजारी पडणे, असे त्रास जाणवतात. तरी अनंत चतुर्थी दिवशी पोलिस खाते व महापालिकेने झेंडा चौक ते मरगुबाई मंदिर दरम्यान बंदोबस्त वाढवून रेंगाळणारी मिरवणूक पुढे नेण्यासाठी हालचाल करावी.

■ मकरंद कुलकर्णी, इचलकरंजी

### अनंत चतुर्दशीचे महात्म्य

'अनंत' म्हणजे ज्याचा अंत नाही, अशी चैतन्यरूपी शक्ती. अनंत हे श्री विष्णूचे नाव आहे. अनंताची पूजा करण्याचे व्रत ज्यांनी घेतले आहे, ते अनंत चतुर्दशीच्या दिवशी (भाद्रपद शुक्ल चतुर्दशी) अनंताची पूजा करतात. ही पूजा घरातील कर्ता पुरुष करतो. शुक्रवार ता.२५ सप्टेंबर रोजी अनंतचतुर्दशी आहे. गेलेले वैभव पुन्हा मिळवण्यासाठी हे व्रत करतात अशी मान्यता आहे. या दिवशी ब्रह्मांडात गणेशतत्त्वही १० टक्के अधिक प्रमाणात प्रक्षेपित होते. गणेशभक्तांना याचा लाभ मिळतो.

अनंतव्रताच्या संदर्भात पौर्णिमायुक्त चतुर्दशी अर्थात ज्या दिवशी चतुर्दशी तिथीसोबत पौर्णिमा तिथीही येते, अशी चतुर्दशी अनंतव्रतासाठी अधिक लाभदायक मानली जाते. श्रीविष्णूंसोबत श्री यमुनादेवी आणि शेषनाग हेही या व्रताचे देवी-देवता आहेत. आपणही या दिवशी श्री गणेशाला भावपूर्ण शरण जाऊन श्री गणेशाय नमः किंवा श्रीविष्णूची कृपा प्राप्त करण्यासाठी ॐ नमो भगवते वासुदेवाय हा नामजप करणे पुष्कळ लाभदायक आहे.

■ सौ. आदिती देखणे

### दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांना अतितातडीची मदत करावी

महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थिती बाबतीत विरोधक कमालीचे आक्रमक झालेले दिसून येत आहे. प्रसार माध्यमातून शेतकऱ्यांची दयनीय अवस्था दाखविली जात आहे. महाराष्ट्राला दुष्काळ तसा नवा नाहीच पण साधारणपणे दर तीन ते चार वर्षांनी अशी गंभीर परिस्थिती दुष्काळामुळे होत असते. महाराष्ट्रातील दुष्काळी भाग तथा जिल्हा जवळजवळ ठरलेला आहे. राज्यातील दुष्काळी भागात माणसाच्या सोबत जनावरांचे देखील अतोनात हाल होत आहे. पिण्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. शेतकरी सतत कर्जबाजारी होत असल्यामुळे हतबल झाला आहे. शेतकऱ्यांना जी काही मदत मिळणार आहे ती फक्त आणि फक्त शासनाच्यामार्फत मिळणार आहे म्हणजे मुख्यमंत्री आणि त्यांची अधिकारी टीम शेतकऱ्यांच्या बांधावर येणे आणि दुष्काळी भागाचा दौरा करणे त्यामुळे गरजेचे झाले आहे. म्हणूनच मराठवाडा,विदर्भ आणि राज्यातील इतरही दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांना शासनाने अतितातडीची उपाययोजना करुन मदत करायला हवी,असे वाटते.

■ संजय साळगांवकर


महासत्ता हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक वसंतराव कृष्णाजी दत्तवाडे यांनी तरुण आर्टस् ॲन्ड प्रेस, गट नं. ४४४/२/३-ए , महासत्ता चौक, इचलकरंजी येथे छापून इचलकरंजी, सांगली, कराड व सातारा येथील कार्यालयातून प्रसिद्ध केले. आर.एन्.आय.रजि.नं. ६३११९/९४ मुख्य कार्यालय:'मँचेस्टर भवन' ४४४ /२/३-ए, महासत्ता चौक, इचलकरंजी-४१६११५., दूरध्वनी क्रं.-०२३०-२४३४३४५ संपादकीय विभाग,२४३४३४३ जाहिरात विभाग, फॅक्स क्र. २४३५५११. विभागीय कार्यालय- मुंबई -दूरध्वनी क्र. २२६२४५६० , पुणे - दूरध्वनी २४४९१०६०, सातारा दूरध्वनी क्र. २३३४०१. कराड -दूरध्वनी क्र. २२४५६४ , इस्लामपूर- २२४११९., सांगली - दूरध्वनी क्रं.२३७३७५५.❊ कोल्हापूर - दूरध्वनी क्रं. २५४५४०१ , गडहिंग्लज - दूरध्वनी क्र.२२२९४९., निपाणी- दूरध्वनी क्रं.२२२१६५., चिकोडी दूरध्वनी क्र.२७३०३१.
टीप- पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी जाहिरात प्रतिनिधी श्री. दि. पा. मोमीन यांचेवर राहील. मा. संपादक किंवा व्यवस्थापकीय संपादक यांचेवर रहाणार नाही.

# निपाणी तालुक्यात ग्रा.पं.साठी मोर्चेबांधणी सुरु

## २७ ग्रामपंचायतीचे आरक्षण जाहीर;नोव्हेंबर अखेर निवडणुकीचे संकेत

निपाणी,ता.२४(प्रतिनिधी)-

**ग्रामीण राजकारणाचा कणा समजल्या जाणाऱ्या ग्रामपंचायत निवडणुकांचा बिगुल वाजण्याची घटका आता जवळ आली आहे. निपाणी तालुक्यातील एकूण २७ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रशासनाने प्रभागनिहाय अधिकृत आरक्षण जाहीर केले आहे. हे आरक्षण जाहीर होताच गावागावांतील राजकीय वातावरण कमालीचे तापले असून, भावी उमेदवारांची मोर्चेबांधणी आणि गणिते जुळवण्यासाठी प्रचंड धावपळ सुरू झाली आहे.**



**विधानसभेची रंगीत तालीम**

**ग्रामंपचायत निवडणूका या पक्षाच्या चिन्हावर होत नसतात.मात्र या निवडणूकीकडे विधानसभा निवडणूकीची रंगीत तालीम म्हणून पाहीले जाते.**

प्रशासकीय सूत्रांकडून मिळालेल्या संकेतांनुसार चालू वर्षाच्या नोव्हेंबरअखेर मतदान प्रक्रिया पार पडण्याची दाट शक्यता आहे.

तालुक्यातील २७ ग्रामपंचायतींचे आरक्षण जाहीर झाल्यामुळे अनेक वॉर्डांमधील जुनी राजकीय समीकरणे पूर्णपणे कोलमडली आहेत. अनेक महिन्यांपासून ज्या वॉर्डातून पुरुष उमेदवारांनी निवडणुकीची जय्यत तयारी केली होती, तिथे अचानक महिला किंवा इतर राखीव प्रवर्गाचे आरक्षण पडल्याने अनेक प्रस्थापित नेत्यांचा पुरता हिरमोड झाला आहे. परिणामी, आता स्वतःऐवजी आपल्या घरातील महिला (पत्नी,आई किंवा बहीण) किंवा विश्वासू कार्यकर्त्याला निवडणुकीच्या रिंगणात उतरवण्यासाठी इच्छुकांनी चाचपणी सुरू केली आहे.

नोव्हेंबर महिन्याच्या अखेरीस निवडणुका होण्याचे संकेत असल्याने नेत्यांकडे आता अत्यंत कमी कालावधी उरला आहे.यामुळे तालुक्यातील मोठ्या गावांपासून ते लहान वाड्या-वस्त्यांवर आत्तापासूनच गुप्त बैठका, रात्रीचे कट्टे आणि चहाच्या टपऱ्यांवर राजकीय गप्पांना उधाण आले आहे. विरोधी गटातील तगडा उमेदवार आपल्या पॅनेलमध्ये कसा ओढता येईल, यासाठी नेत्यांकडून साम,दाम, दंड,भेद या सर्व नीतींचा वापर सुरू झाला आहे.सणासुदीचे औचित्य साधून इच्छुकांनी मतदारांच्या थेट घरापर्यंत पोहोचण्यास सुरुवात केली आहे. वाढदिवस, लग्नकार्य तसेच गावातील धार्मिक कार्यक्रमांना उपस्थित राहून मतदारांशी संपर्क साधला जात आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातूनही तरुण उमेदवारांनी डिजिटल प्रचाराचा पाया रचण्यास सुरुवात केली आहे.संभाव्य निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निपाणी तालुका महसूल विभाग आणि पंचायत प्रशासन सतर्क झाले आहे.मतदार याद्या अद्ययावत करणे, प्रभाग रचनेनुसार मतदारांचे वर्गीकरण करणे आणि मतदान केंद्रांची प्राथमिक तपासणी करणे यांसारख्या तांत्रिक कामांना प्रशासकीय पातळीवर वेग आला आहे. एकंदरीत पाहता, निपाणी तालुक्यातील या २७ ग्रामपंचायतींच्या निवडणुकीमुळे आगामी काळात ग्रामीण भागातील राजकीय संघर्ष कमालीचा चुरशीचा आणि अटीतटीचा होणार, हे आता निश्चित झाले आहे.

# श्री धनलक्ष्मी संस्थेला ६६.४७ लाखाचा नफा

## अध्यक्ष रविंद्र शिंदे

निपाणी,ता.२४(प्रतिनिधी)-

**सर्वसामान्य गोरगरीब माणूस केंद्रस्थानी ठेवून कै. विश्वासराव शिंदे यांनी सुरू केलेल्या या संस्थेचा लाभ सर्वसामान्यांना होत आहे. संस्थेला चालू आर्थिक वर्षात ६६.४७ लाख इतका निव्वळ नफा असल्याची माहिती चेअरमन रविंद्र शिंदे यांनी केले.**



**निपाणीःयेथील श्री धनलक्ष्मी क्रेडीट सौहार्द संस्थेच्या वार्षिक सभेत बोलताना अध्यक्ष रविंद्र शिंदे, बाजूस संचालक मंडळ.**

ते येथील सहकार क्षेत्रात आघाडीवर असणाऱ्या श्री धनलक्ष्मी क्रेडीट सौहार्द सहकारी संस्थेच्या नुतन सभागृहात पार पडलेल्या २८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत बोलत होते. प्रारंभी कै. विश्वासराव शिंदे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले.क्रीडापटू वैष्णवी रावळ,वकील ओम कमते, कायदा सल्लागार ॲड. विजय श्रीपण्णावर, ऋतुराज दबडेयांचा विशेष सत्कार करण्यात आला. उपस्थितांचे स्वागत सुनील काळगे यांनी करून प्रास्ताविकातून संस्थेच्या प्रगतीचा आढावा घेतला.

अहवाल वाचन करताना संस्थेचे सेक्रेटरी अनिल भोसले म्हणाले, संस्थेकडे ३३.४७ लाख इतके भाग भांडवल आहे.राखीव निधी ५.५६ कोटी आहे. संस्थेकडे २३.९९ कोटींच्या ठेवी असून १३.३८ कोटींचे कर्ज वाटप करण्यात आले आहे.१५.४१ कोटींची गुंतवणूक सुरक्षित ठिकाणी करण्यात आली आहे. संस्थेला चालू आर्थिक वर्षात ६६.४७ लाख रुपये निव्वळ नफा झाला असून संस्थेचे वार्षिक उलाढाल ३२.३२ कोटी आहे.उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात सभेतील विषयांना मंजुरी दिली.

यावेळी झुंजार दबडे, विठ्ठल वाघमोडे, बाळासाहेब सुर्यवंशी, गोपाळराव नाईक आदींनी मनोगत व्यक्त केले. अनिल भोसले यांनी उपस्थित प्रश्नांचे निरसन केले.यावेळी उपाध्यक्ष मधुकर खवरे,सुनील वाडकर,महेंद्र सांगावकर,अनिल सांगावकर, सुभाष कुकडे, राहुल शिंदे, विजय साळोखे, विरेंद्र यडुरे, परशराम कांबळे, श्रीमती सुनिता शिंदे, सौ. सुप्रिया चोरगे गजानन शिंदे, सोमनाथ शिंदे,सुकुमार भाट, संदीप कामत, आदी उपस्थित होते.सूत्रसंचालन नितीन साळुंखे यांनी केले.आभार सतिश यडुरे यांनी मानले.

# प्राथमिक कृषी संघाची वार्षिक सभा खेळीमेळीत

बारवाड,ता.२४(वार्ताहर)-

**भोज विविध्योद्देश प्राथमिक ग्रामीण कृषी सहकारी संघाची ११० वी वार्षिक सभा संघाचे अध्यक्ष सचिन केस्ते यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.**



**भोज येथील विविध्योद्देश प्राथमिक ग्रामीण संघाच्या सभेत दीपप्रज्वलन प्रसंगी सचिन केस्ते,सुदर्शन मुराबट्टे व इतर.**

सभेची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व रोपाला पाणी घालून व शेतकरी गिताने झाली. स्वागत डॉ.सुदर्शन मुराबट्टे यांनी केले. यावेळी अहवाल वाचन करताना अध्यक्ष सचिन केस्ते म्हणाले की,अहवाल सालात संघाचे २६३५ सभासद असून शेअर भांडवल १ कोटी ९४ लाख १२ हजार ७८०, निधी २ कोटी ८६ लाख ३४ हजार ६६०, गुंतवणूक १४ कोटी २ लाख २७ हजार ९७६, बँक कर्ज १७ कोटी ४४ लाख १२ हजार ६०३, सभासद कर्ज २९ कोटी ८६ लाख ४८ हजार ६८ रु.इतके असून संघास अहवाल सालात ६९ लाख १५ हजार ८९९ रु.नफा झाला असल्याचे सांगितले.सभेचे विषय वाचन व नफा तोटा ताळेबंद पत्रकाचे वाचन संजय गावडे यांनी करून सर्व विषयांना मंजुरी मिळविली. सूत्रसंचालन मुख्य कार्यनिर्वाहक राजगौडा पाटील यांनी केले.

यावेळी उपाध्यक्ष भरत गुरव, संचालक प्रशांत पाटील, अमोल मुराबट्टे, चंद्रकांत पाटील, सुनील पाटील, डॉ.सुदर्शन मुराबट्टे, इंद्रायणी माने, रंजना मुराबट्टे, राजेंद्र माने, अश्विनी ममदापूरे, संतोष चव्हाण यांच्यासह सभासद, ठेवीदार, इतर संस्थांचे पदाधिकारी, भोज भोजवाडी ग्रामस्थ व सेवक वर्ग उपस्थित होते.आभार राजगौडा पाटील यांनी मानले.

## कोजिमाशिच्या तज्ञ संचालकपदी विनोद वारके

बिद्री,ता.२४(प्रतिनिधी)-



**कोल्हापूर जिल्हा माध्यमिक शिक्षण सेवकांची सहकारी पतसंस्था (कोजिमाशि)च्या तज्ञ संचालकपदी भारतमाता हायस्कूल बिद्री(ता.कागल) शाळेचे लिपिक विनोद दत्तात्रय वारकेयांची निवड झाली. संचालक मंडळाच्या बैठकीत सर्वानुमते ही निवड करण्यात आली.**

या निवडीकामी त्यांना मनोज फराकटे, जिल्हा परिषद सदस्या शोभाताई फराकटे, शिक्षक नेते दादासाहेब लाड, रघुनाथ कुंभार यांचे सहकार्य लाभले.यावेळी संस्थेचे चेअरमन राजेंद्र पाटील, प्रकाश कोकाटे,मदन निकम, एस पी. पाटील, पी. व्ही. पाटील, प्र. मुख्या. टी. आर. पाटील, एन. एम. पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी जयवंत कुरडे आदी मान्यवर उपस्थित होते.

# तिसरीपासून आयसीटी विषय स्वतंत्रपणे शिकविण्याची मागणी

मुरगूड, ता.२४(प्रतिनिधी)-

**महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (एससीईआरटी), पुणे येथे सुरू असलेल्या नवीन शैक्षणिक अभ्यासक्रमामध्ये माहिती व संप्रेषण तंत्रज्ञान (आयसीटी)हा विषय इयत्ता तिसरीपासून स्वतंत्रपणे शिकविण्यात यावा तसेच इयत्ता दहावीच्या बोर्ड परीक्षेसाठी आयसीटी विषय पूर्ववत सुरू करण्यात यावा, अशी मागणी आयसीटी शिक्षक संघटना महाराष्ट्र राज्य यांच्यावतीने शिक्षण संचालकांकडे करण्यात आली आहे .**

या मागणीसंदर्भात संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणेचे संचालक हेमंत वसेकर यांची भेट घेऊन निवेदन देणेत आले. विद्यार्थ्यांना बदलत्या तंत्रज्ञानाच्या युगात आवश्यक असलेले संगणक व डिजिटल कौशल्यांचे शिक्षण लहान वयापासून मिळावे, तसेच माध्यमिक स्तरावर आय.सी.टी विषयाला अधिक महत्त्व मिळावे व भावी पिढी संगणक साक्षर व्हावी, या उद्देशाने ही मागणी करण्यात आली आहे. .मागणीचे निवेदन सादर करताना महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद, पुणे महानगरचे कार्यवाह विष्णू मोरे, शिक्षक संघटनेचे कार्याध्यक्ष सुशांत लुगडे, सचिन पाटील, सचिव मनोज कांबळे, कविराज पाटील, किशोर यादव आणि अनुप रेडेकर उपस्थित होते.नवीन शैक्षणिक अभ्यासक्रमात विषयाला स्वतंत्र स्थान देण्याबाबत तसेच दहावी बोर्ड परीक्षेसाठी हा विषय पूर्ववत सुरू करण्याबाबत शासनस्तरावर सकारात्मक विचार व्हावा, अशी अपेक्षा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

# निपाणी असोसिएशन ऑफ आर्किटेक्टच्या अध्यक्षपदी धनंजय खराडे

निपाणी,ता.२४(प्रतिनिधी)-

**येथील असोसिएशन ऑफ आर्किटेक्ट अँड इंजिनिअरच्या अध्यक्षपदी धनंजय खराडे यांची तर उपाध्यक्षपदी अनुप पाटील यांची अभियंता दिनी बिनविरोध निवड करण्यात आली.**

संघटनेच्या सेक्रेटरीपदी अभिजीत जिरगे, जॉईंट सेक्रेटरीपदी चंद्रकांत पाटील आणि खजिनदारपदी नवीन बाडकर यांची निवड करण्यात आली. संघटनेच्या कार्यालयात आयोजित बैठकीत ही निवड करण्यात आली. मावळते अध्यक्ष अमित रामनकट्टी यांनी नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार केला.नूतन अध्यक्ष खराडे व इतर पदाधिकाऱ्यांनी सर्वांच्या सहकार्याने संघटनेच्या प्रगतीसाठी काम करणार असल्याचे सांगितले. यावेळी सुरेश रायमाने, सुदेश बागडी, गजानन शिंदे, दिपक माने, राजशेखर हिरेकुडी, ओंकार वरुटे, सुनील बल्लोळ,सोमनाथ परमणे,आसिफ मुल्ला,मनोज पणदे,कैलास कलघट्टे,अमित तांदळे, शुभम नडाळे, तौफिक बागवान,अमोल जाधव, अमर चौगुले, अजय माने यांच्यासह संघटनेचे सदस्य उपस्थित होते.


**धनंजय खराडे**


**अनुप पाटील**


**अभिजीत जिरगे**

# मुरगूड येथे पर्युषण पर्व सोहळा उत्साहात

मुरगूड, ता.२४(प्रतिनिधी)-

**जैन धर्मातील पवित्र समजल्या जाणाऱ्या पर्युषण पर्वचा अध्यामिक सोहळा उत्साहात पार पडला.**

येथील बाजारपेठेतील श्री.जैन श्वेतांबर मंदीरमध्ये श्री.वासुपूज्य भगवान काच मंदीर पासून रथयात्रा काढण्यात आली . शहरातील प्रमुख मार्गावरून ही रथयात्रा मिरवणूक ढोलताशा व बेंजोच्या निनादामध्ये उत्साहात काढण्यात आली. हा सोहळा थाटामाटाचा किंवा मनोरंजनाचा सण नसून तो आत्मशुध्दी, आत्मपरीक्षण, संयम,तप आणि क्षमाभावाचा काळ आहे, असे मानले जाते.

या पर्युषण पर्व उत्सवानिमित्य आठ दिवसामध्ये मंदिरात दररोज विविध पूजा, स्नात्र पूजा, वाचन, विविध नयनरम्य आंगी याबरोबरच सायंकाळी आरती, भावना (भक्ती गीते), दांडिया रास ,गर्भानृत्ये असे विविध कार्यक्रम भक्तीरसात संपन्न झाले. पर्युषण पर्व मधील ''संवत्सरी'' दिवशी जीव प्राण्यांची क्षमा याचना मागून संपन्न झाली.या काळात मंदीराभोवती सुंदर विद्यूत रोषणाई करण्यात आली होती. या उत्सवामध्ये मुरगूड येथील जैन बांधवाबरोबर सोनगे, बाणगे, बिद्री,राशिवडे येथील जैन बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते .

# युवा पिढीने स्वावलंबनाच्या विचारांचा अंगीकार करावा

## कांतीलाल राठोड

कोगनोळी,ता.२४(प्रतिनिधी)-

**महात्मा ज्योतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा पुढे नेत कर्मवीर भाऊराव पाटील यांनी ग्रामीण भागात ज्ञानाची गंगा पोहोचविली. आजच्या तरुण पिढीने त्यांच्या स्वावलंबनाच्या विचारांचा अंगीकार करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन निपाणी येथील ज्येष्ठ समाजसेवक कांतीलाल राठोड यांनी केले.**



**कुर्ली येथील सिद्धेश्वर विद्यालयात बोलताना कांतीलाल राठोड शेजारी जी.जी.निकाडे,विश्वनाथ पाटील,एस.एस.चौगुले व मान्यवर.**

रयत शिक्षण संस्थेच्या कुर्ली (ता. निपाणी) येथील सिद्धेश्वर विद्यालयात कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १३९ व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी जी.जी.निकाडे हे होते.प्रारंभी टी.एम.यादव यांनी स्वागत केले. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते कर्मवीर भाऊराव पाटील व लक्ष्मीबाई पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन दीपप्रज्वलन करण्यात आले. तत्पूर्वी सकाळी गावातून सवाद्य प्रभातफेरी काढण्यात आली.

याप्रसंगी अक्षता निकाडे, सिद्धी शिंदे व शुभदा कोकणे यांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जीवन कार्याचा आढावा घेतला.यावेळी प्रज्वल पाटील याची कुस्ती स्पर्धेत राज्य पातळीवर निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. ए.ए.चौगुले यांनी पारितोषिक अहवाल वाचन केले. याप्रसंगी कांतीलाल राठोड यांनी विद्यालयास सॅनिटरी नॅपकिन व्हेंडिंग व डीसपोजल मशीन देणगी स्वरुपात दिले.यावेळी मुख्याध्यापक एस.एस.चौगुले, राजाराम पाटील, आनंदा ढगे, मनोज निकाडे, संतोष निढोरे, नामदेव पाटील, बी.एस.हेरवाडे, सिताराम चौगुले, एस.डी.वडराळे, नानासाहेब पाटील, आप्पासाहेब लोकरे, प्रल्हाद प्रताप, रणजित माने, सुभाष निकाडे, दिगंबर माने, लक्ष्मण यादव, एम. एच. बरगाले, विलास पाटील यांच्यासह शिक्षकवृंद, पालक व विद्यार्थी उपस्थित होते. ए.ए.चौगुले यांनी सूत्रसंचलन केले तर के.ए.नाईक यांनी आभार मानले.

# मुलांनी आई -वडिलांचे संस्कार विसरू नयेत-सौ.गौंडाजे

माणकापूर,ता.२४(वार्ताहर)

**आई-वडिलांच्या संस्कारामुळेच आज तुम्ही घडलेले आहात. त्यामुळे आई-वडिलांचे उपकार तुम्ही विसरू नका. तसेच आई-वडिलांचे संस्कार देखील विसरू नका. याकरिता आई-वडिलांशी प्रेमानेच वागले पाहिजे,असे ठामपणे सौ. तेजस्विनी गौंडाजे, शिरदवाड यांनी ''वीराचार्य बाबासाहेब कुचनुरे स्मृती पर्युषण पर्व व्याख्यानमाला''२०२६ अंतर्गत ''उत्तम शौच'' या ४ थ्या धर्म संस्कार विषयावर संबोधन करताना माणकापूर येथे मत व्यक्त केले.**

याप्रसंगी वीर सेवा दल यांच्यावतीने व्याख्यात्या सौ.तेजस्विनी गौंडाजे, कु.स्वस्ति व कु.स्तुति गौंडाजे आणि प्रायोजिका सौ.सपना तळपदे, सौ.प्रणिता बेडकिहाळे, सौ.प्रणिता भेंडवाडे, पत्रकार शिवाजी येडवान यांचा शाल, श्रीफळ व गुलाबपुष्प देवून सत्कार करण्यात आला. यावेळी समस्त दिगंबर जैन समाज, वीर महिला मंडळ, सन्मती युवा मंच व वीर सेवा दलाचे सर्व पदाधिकारी आणि श्रावक-श्राविका उपस्थित होते.



**कुन्नूरः येथील गणेश सहकारी संघाच्या वार्षिक सभेत दीपप्रज्वलन करताना चेअरमन कृष्णा दळवी,सुनिल चौगुले, कुमार बन्ने व मान्यवर.**

# गणेश सहकारी संघाची वार्षिक सभा खेळीमेळीत

बारवाड,ता.२४(वार्ताहर)-


**कुन्नूर येथील श्री गणेश सहकारी संघाची १२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा बाळासो कुंभार यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. स्वागत व प्रास्ताविक सुनील चौगुले यांनी केले.**

अहवाल वाचनात सेक्रेटरी रमेश तावदारे करताना म्हणाले, अहवाल सालात सभासद ७८४ असून ठेवी १४ कोटी १५ लाख २ हजार ३५७ रु.,गुंतवणूक ६ कोटी ६७ लाख ७ हजार ४५६ रु.,कर्जे ६ कोटी ६३ लाख ५९ हजार ८२४ रु.इतकी असून संघास १२ लाख ५ हजार ४५६ रु.इतका नफा झाल्याचे सांगितले.यावेळी चेअरमन कृष्णा दळवी, कुमार बन्ने यांनीही मनोगत व्यक्त केले.यावेळी व्हा.चेअरमन अरुण तावदारे, शंकर तावदारे, शिवाजी कोळेकर, अशोक जासूद, राजेंद्र सांगवडे, हर्षवर्धन पाटील, बाळासो तिटवे, विश्वास गुडसे, सुवर्णा शिरोळे, वैशाली कोरे, संजय माने, डॉ. बाबासो चौगुले यांच्यासह मान्यवर, सभासद, ठेवीदार व सेवक वर्ग उपस्थित होते.सूत्रसंचालन गोमटेश पाटील यांनी तर आभार जगदीश तावदारे यांनी मानले.

## निधन वार्ता

### दगडू लोहार

साके,ता.२४(वार्ताहर)-



हिरा कॉलनी,उंचगाव ता करवीर येथील दगडू कृष्णा लोहार (वय ७५) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी,मुली,दोन मुले, सुना नातवंडे असा परिवार आहे

### सुरेश पाटील

कोगनोळी,ता.२४(प्रतिनिधी)-



कुर्ली (ता. निपाणी) येथील माजी सैनिक सुरेश बापू पाटील (वय ५६) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी, सून, नातवंडे,जावई असा परिवार आहे.

# सफाई कामगारांना घरकुलाचा लाभ देण्यासाठी प्रयत्नशील

## उत्तम पाटील;बोरगाव नगरपंचायतीत सफाई कामगार दिन साजरा

बोरगाव,ता.२४(वार्ताहर)-

**बोरगाव शहर व परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी अहोरात्र मेहनत घेणाऱ्या सफाई कामगारांच्या कुटुंबांना हक्काचे घर मिळावे, यासाठी कर्नाटक शासनाकडून सफाई कामगारांना विशेष घरकुल योजना प्रारंभ केली आहे. या योजनेतून शहरातील सफाई कामगारांना लाभ मिळावा यासाठी आपण मुख्यमंत्र्यांसह जिल्हा पालकमंत्री व संबंधित खात्याच्या मंत्री व अधिकाऱ्यांना भेटून घरकुल योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करू, अशी ग्वाही युवा नेते उत्तम पाटील यांनी दिली.**



**बोरगांव नगरपंचायत येथे आयोजित सफाई कामगार दिनानिमित्त सफाई कामगारांचा सत्कार प्रसंगी उत्तम पाटील शेजारी नगराध्यक्ष दिगंबर कांबळे, उपनगराध्यक्ष रुकसाना आफराज, पदाधिकारी.**

सफाई कामगार दिनानिमित्त बोरगाव नगरपंचायत येथे आयोजित कार्यक्रमात बोलताना उत्तम पाटील म्हणाले, सफाई कामगार आपल्या आरोग्याची आणि परिसराच्या स्वच्छतेची काळजी घेतात. त्यांच्या कष्टामुळे आपण स्वच्छ वातावरणात जगतो. त्यामुळे त्यांच्या श्रमाचा सन्मान करणे ही आपली सामाजिक जबाबदारी आहे.स्वतःच्या कुटुंबासाठी हक्काचे घर असावे, हे प्रत्येकाचे स्वप्न असते. सफाई कामगारांच्या या स्वप्नाला हातभार लावण्यासाठी पात्र लाभार्थ्यांना घरकुल योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी संबंधित विभागाकडे पाठपुरावा करण्यात येईल. सफाई कामगारांच्या प्रश्नांसाठी केवळ आश्वासन न देता त्यांच्या पाठीशी प्रत्यक्ष उभे राहण्याचा आपला प्रयत्न राहील, असे सांगितले.

नगराध्यक्ष दिगंबर कांबळे म्हणाले,सफाई कामगार म्हणजे केवळ स्वच्छता करणारा कर्मचारी नाही; तो आपल्या आरोग्याचा, आपल्या शहराच्या स्वच्छतेचा आणि समाजाच्या सुरक्षिततेचा खरा रक्षक आहे. कोरोनासारख्या कठीण काळात अनेक जण घरात सुरक्षित होते, मात्र सफाई कामगारांनी स्वतःच्या जीवाची पर्वा न करता रस्त्यावर उतरून आपले कर्तव्य बजावले. त्यांचे हे योगदान समाजाने कायम स्मरणात ठेवले पाहिजे.सफाई कामगारांना सन्मानाची वागणूक, सुरक्षित कामाचे वातावरण, आवश्यक सुरक्षा साधने आणि त्यांच्या कुटुंबांच्या प्रगतीसाठी आवश्यक सुविधा मिळणे यासाठी आपण प्रयत्न केले पाहिजे असे सांगितले.

कार्यक्रमास उपनगराध्यक्षा रुकसाना अपराज, सभापती प्रदीप माळी नगरसेवक अभयकुमार मगदूम, नगरसेविका शोभा हावले,वर्षा मनगुते, संगीता शिंगे, अश्विनी पवार,गिरिजा वठारे, तुळशीदास वसवाडे, जावेद मकानदार, भारती वसावाडे,संजय पवार,आरोग्य निरीक्षक महेश नदीकेश्वर, रुक्मन गजरे, हिम्मत अफराज, निलेश ऊरणकर महालिंग, गजरे, बाळू अफराज, यांच्यासह सफाई कामगार व पदाधिकारी उपस्थित होते.



**निपाणीः रक्तदान शिबीरप्रसंगी उपस्थित मंडळाचे पदाधिकारी.**

# शिवशक्ती युवक मंडळाचे रक्तदान शिबीर उत्साहात

निपाणी,ता.२४(प्रतिनिधी)-

**श्री शिवशक्ती युवक मंडळ, शिवपथ निपाणी व अंकुर ब्लड बँक निपाणी यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते.या उपक्रमास रक्तदात्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. मंडळाला ४८ वर्षे पूर्ण झाल्याने श्री गणेश चतुर्थी उत्सवानिमित्त हे शिबीर आयोजित करण्यात आले होते.**

याप्रसंगी सहा.उपनिरीक्षक सरस्वती नरसन्नावर, हालशुगर संचालक समित सासणे, ओंकार शिंदे, विकास चव्हाण, सुनिल शेलार, प्रथमेश शिंदे, कलंदर बाणेदार, नंदकुमार ऐनापुरे, संजय पाटील, शेखर शेलार, चेतन चव्हाण, सिध्दार्थ बिद्रे यांच्यासह मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

**पहिल्या पंधरा शब्दास ७५ रू, पुढील प्रत्येक शब्दास ७ रू, शब्द मर्यादा ५० पर्यंत**

### * खरेदी विक्री *

**गाळे विकणे/भाड्याने देणे आहे.** सेंच्युरी प्लाझा इमारतीमधील पहिल्या मजल्यावरील ऑफिस, दुकानगाळे भाड्याने किंवा विकणे आहे. संपर्क-९९६०४२३९१५, ८६५७४४१०९२

**एसपीएम मिलिंग विकणे आहे.** व लेथवर टर्नर पाहिजे. संपर्क-८३९०२१२०५४, इचलकरंजी.

**कोरोची/तारदाळ/हातकणंगले** मध्ये १०/२० गुंठे रस्ता असणारी शेतजमीन विकत पाहिजे. मो. ८४२१९६२३२८

**कौंटर विकणे-** कॅश कौंटर एल साईज व रेग्युलर- कबनूर पायल हॉल. संपर्क-९८२२४२५७३७

**२४ बाय २५** (६०० स्क्वे. फूट) फ्लॅट १५ फूटी रोडटच विकणे आहे. समर्थनगर, तारदाळ रोड. संपर्क-८८०६६३८८५५

**फ्लॅट विकणे-** रूई मानेनगर येथील २ गुंठेचा एनए प्लॉट ४० बाय ५० कंपौंडसह विकणे. संपर्क-९४२२०३२०९९

**कपडे वाळत घालण्याचे** हॅंगिंग स्टॅंड डासाची जाळी, किचन ट्रॉली, कबुतर जाळी. संपर्क-राहुल एंटरप्रायजेस. ७५०७७१६६६४, ७५०७७२६६६४

**२६४६ स्क्वे. फूट** आरसीसी शेड विकणे आहे. (एनए) स्टेशन रोडजवळ, व्यंकटेश कॉलनी, जवाहरनगर. संपर्क-९७६४४०५८८९, ९८५०९४९०८०

**जुने सोफासेट** रिपेअरी करून देऊ. नवीन सोफा, पडदे व गादी ऑर्डरीप्रमाणे तयार करून देऊ. संपर्क-८२६१०८९५९०

**भिडे पिठाची चक्की विकणे आहे.** १६ इंची-२ नग, कमी वापरलेली ७।। एचपी मोटर व पल्वलायझर ७।। एचपी (ऑटो चक्की) ७५% लाईट बचत, ० मेंटेनन्स. अर्जंट विकणे. संपर्क-७४९८४९१३३१

**फक्त ६ लाखामध्ये प्लॉट** (६ ते १५ नं. प्लॉट) खरेदी पत्राच्या खरेदीसह सातबारा पत्रकी नाव लावून देण्याच्या हमीसह प्लॉट ३० बाय ५० स्क्वे. फूट, प्रशस्त डांबरी रस्ता, स्ट्रीट लाईटसह वीज कनेक्शन, प्रत्येक प्लॉटला पिण्याच्या पाण्याचे कनेक्शन, ड्रेनेजसाठी पक्की गटर, संपूर्ण प्लॉटला तारेचे कंपौंड सुविधा-हाकेच्या अंतरावर इचलकरंजी, बोरगाव मेन रोड, बस स्टॅंड, किराणा, दवाखाना, चांगली कॉलनी, शांत व सुंदर परिसर. साईट पत्ता- आयको मिलसमोर, यशवंत कॉलनी रोड. संपर्क-९६७३९५०८०६

**शेड विकत/गहाणवट पाहिजे.** संगमनगर परिसरात १५०० ते २००० स्क्वे. फूट संपर्क-९९७०८९९७२२

**विकणे आहे.** नांदणी येथील एनए झालेली ३ एकर २५ गुंठे सांगली, कोल्हापूर रोडपासूनजवळ असलेली जमीन टेक्स्टाईल इंडस्ट्री, पॉवरलूम किंवा इतर इंडस्ट्री करीता उपयोगी असलेली. विकत देणार आहे. खालील नंबरवर संपर्क साधावा. मो. ९८२३०५२१४०

**शहापूर येथील** म्हसोबा रोडलगत बिगरशेती प्लॉट नं. २४ (२० बाय ३२.८) चौ. फूट ६५५-८९प्लॉट नं.२६ (२० बाय ३२.३) चौ. फूट ६४५-३४ असे दोन प्लॉट विकणे आहे. संपर्क-९४२३९८४६१३

**श्री महालक्ष्मी लेडीज टेलर्स-** आमचेकडे मशिन एंम्ब्रॉयडरी व आरीवर्क व सर्व प्रकारचे ड्रेस, ब्लाऊज वेस्टर्न, घागरा अर्जंट शिऊन मिळेल. संपर्क-७४९९९१०४४६, ९३२२८८७८९३

**२ बीएचके फ्लॅट** रेडी पझेशन विक्रीसाठी उपलब्ध. २४ तास पाणी, लिफ्ट कर्जाची सोय. स्वामी समर्थ प्लाझा, जवाहरनगर, इचलकरंजी. ९८९०११६१६१

**जुने व नवीन पॉवरलूम** घेवू व देवू तसेच फवारा, कांडीमशीन डक्टींग व रिकामे बिमे देवू व घेवू. ८३१७२९१००८

**मोकळी जागा विकणे आहे.**३५०० स्क्वे.फूट. राणी बागेसमोर, एचडीएफसी बँक शेजारी. मेन रोड. ९२५६५७२७२७

### * नोकरी विषयक *

**होलसेल औषध दुकानात कामगार पाहिजेत.** शिक्षण १२ वी.(मुले / मुली).संपर्क-ग्रीन मेडिको,सरस्वती हायस्कूल शेजारी भोन माळ,इचलकरंजी, मो.क्र.-७८७५६५७०८५, ९७३०१३२५२६.

**हॉस्पिटल** NICU साठी नर्सिंग स्टाफ पाहिजे. संपर्क-७३९७८७२७३३, इचलकरंजी.

**अकौटींग टॅली प्राईममध्ये** अनुभवी अकौटंट पाहिजे. लेडीज (दोन वर्षे) अनुभव. फोन-९३२६००८२९५

**संस्कृती दूध संकलन** केंद्र मजले या ठिकाणी दूध संकलनासाठी पुरूष कर्मचारी पाहिजे. वेळ-सकाळी-७.३० ते ११.०० व सायं. ६.३० ते ९.००. संपर्क-८२०८४२३९३०

**शाहूनगर चंदूर येथे** इंडस्ट्रीजमध्ये हेल्पर पाहिजेत. १२ तासासाठी राहणेची सोय (युपी/बिहारींना प्राधान्य) संपर्क-९४२२५३५०९१

**वकीलांच्या ऑफिसमध्ये** ऑफिस कामासाठी मुलगा पाहिजे. वेळ- स. ९.३० ते २-सं. ६.३० ते ८.३० मो. ९८८१८१७९८८

**गोडाऊनमध्ये कामासाठी** मुले हवी आहेत. ईएसआयसी+पीएफ ची सोय. संपर्क-९८२२५२८९८५

**वर्कशॉपमध्ये** १) हेल्पर-३, २)व्हीएमसी प्रोग्रॅमर-१ ३) अकौंटट-१ ४) सीएनसी सेटर-१, ४)फोरमन-१ पाहिजेत. आकर्षक पगार, फुलटाईम/पार्ट टाईम. मो. ८३२९१०४२२३, विक्रमनगर, इचलकरंजी.

**ट्रक ड्रायव्हर पाहिजे.** लोकल बगॅस व लाकूड वहातुकीसाठी ट्रॅक्टरवर ड्रायव्हर कायमस्वरूपी पाहिजे. आकर्षक पगार देऊ. संपर्क-७४०६११७१५५, ९३२५७४९६२८

**यु.एस. पोलो** कपड्यांच्या शोरूममध्ये खास दिवाळीत १५ दिवसांसाठी मुले/मुली पाहिजेत. आकर्षक पगार दिला जाईल. भेटा-व्यंकटराव हायस्कूल रोड, युनियन बँकेसमोर, इचलकरंजी.

**पिझ्झा आऊटलेटमध्ये** किचनसाठी कामगार (मुले) पाहिजेत. अनुभवींना प्राधान्य. संपर्क-८४२१४०८१९७, ७२७६११७३९०

**पोळ इलेक्ट्रीकल सुवर्णसंधी.** इलेक्ट्रीकल कामासाठी कामगार हवे आहेत. शिकाऊ उमेदवार काम शिकण्याची सुवर्णसंधी. अनुभवी कामगार (अनुभवांना प्राधान्य) काम शिकून उत्तम भविष्य बनवा. कॉल नं. ९६८९०५०५७९

**सिक्युरिटी गार्ड पाहिजेत.** खंजिरे शाहू पुतळ्याजवळ, जे.के. नगर ८,१२ तास, पगार, ११००० ते १४०००. नाईट शिफ्ट मिळेल. ९२८४०२३२६६, ८२३७३७८९८१

**नामवंत कंपनीत** अनुभवी ड्रायव्हरची भरती सुरू आहे. ट्रान्सपोर्ट लायसन्स असणे आवश्यक आहे. तसेच आपल्या येथे कामगार भरती सुरू आहे. वयोमर्यादा १८ वर्षे ते ४० वर्षापर्यंत. संपर्क-८४५९५६७०३८, पत्ता-सोलगे मळा, श्रध्दा ऑलिम्पियाड इंग्लिश स्कूलशेजारी, इचलकरंजी.

**स्वस्तिक डाईंग** अॅन्ड प्रिटींग मिल्स आंबेडकर पुतळा, पेट्रोल पंपासमोर, साफसफाईसाठी पुरूष पाहिजे. संपर्क-८९७५६१०६१०

**श्री लक्ष्मी इंडस्ट्रियल इस्टेट** हातकणंगले येथील एअरजेट युनिटमध्ये अनुभवी मेन दिवाणजी पाहिजे. संपर्क-७२७६४७५९५२, ७५१७४००६८९

**श्री लक्ष्मी इंडस्ट्रियल इस्टेट** हातकणंगले येथील एअरजेट लूममध्ये अनुभवी १० क्वॉलिटी राऊंडर पाहिजेत. ८ तास ड्युटी. संपर्क- ७२७६४७५९५२,

**रसवंती आणि नारळपाणी दुकानात** साफसफाईसाठी कामगार पाहिजे. कोरोची (कामाची वेळ सकाळी ७ ते ११ फक्त ४ तास.) संपर्क-९३७०६६७२२०

**कामगार पाहिजे.** लेडीज कापड दुकानात कामासाठी लेडीज कामगार पाहिजे. संपर्क-पुष्कर बुटिक, तारा हॉटेलजवळ, इचलकरंजी. ८६१९४८३३२३

**पाहिजेत.** व्हीएमसी ऑपरेटर जॉब इन्स्पेक्टर सीएनसी व लेथ ऑपरेटर, हेल्पर, पगार-१०००० पासुन पुढे, पाहिजेत. हॉटेलमध्ये वेटर कामासाठी संध्या. ६ ते ११.००. संपर्क-९७६५४०९३९७

**सर्व्हीसिंग आणि ग्रिसींगसाठी** शिकाऊ व अनुभवी कामगार पाहिजे. संपर्क-९९२२४९९२३२

**VI सिम** विक्रीसाठी मुले/मुली पाहिजेत. आकर्षक पगार पीएफ+ईएसआयसी सुविधा. मो. ८५३०७६६४२९.

**कामगार पाहिजे.** बेकरी व्यवसायासाठी कामाची वेळ- ८ ते ३ व दुसरी व शिफ्ट ३ ते ९.३०, आकर्षक पगार. संपर्क-९८२२६४५२२०

**फार्मासिस्ट किंवा नॉनफार्मासिस्ट** अनुभवी मुले/मुली व डॉक्टर पाहिजे, इचलकरंजी. ८४२१४२६६८५

**नामवंत गारमेंटमध्ये** ओवरलॉक साठी/तागे कटींगसाठी हेल्पर लागणार आहेत. गारमेंटमध्ये कामासाठी हेल्पर लेडीज/जेंटस लागणार आहेत. बॅग शिलाई करण्यासाठी गारमेंटर लागणार आहेत. तरी त्वरीत संपर्क साधावा. मो. ९०२८७९९१५३

**नामवंत कंपनीमध्ये** स्टोअर इनचार्ज, अनुभवी अकौंन्टट (टॅली अनुभवी, सेल्ससाठी महिला व हेल्पर पाहिजेत.) स्टेशन रोड, इचलकरंजी. ९२७२३३७९५५

**घरकामासाठी लेडीज पाहिजे.** संपर्क-७२७६१२३७११, इचलकरंजी.

**सुवर्णसंधी-** इचलकरंजी येथील फूड कॅफेसाठी युवक हेल्पर सर्व कामांसाठी जेंटस (१८+ते ३०) पाहिजेत. संपर्क-९५०३८३०४७९

**आईस्क्रीम फॅक्टरी** आणि पार्लरसाठी अनुभवी कामगार पाहिजेत. वेळ-सकाळी ९ ते ४ पर्यंत. संपर्क-९०२८८३१४५५

**सिक्युरिटी गार्ड पाहिजेत.** खंजिरे, पार्वती, जुना तारदाळ नाका, ८/१२ तास, ८ ते ४, ४ ते रात्री १२, तात्काळ. मोबाईल-९८५०९४५२२६, ९४२३२८४८३३

**घरोघरी जाहिरात करण्यासाठी** लेडीज पाहिजे. काम ५ तास, फिक्स पेमेंट ४००+२०० इन्सेंटिव्ह. मो. ८८५५०६१०९६, ९१६८०५९६९४

**इंग्लिश मेडियम स्कूलसाठी** शिक्षक भरणे. (Play to 4th) तसेच ऑफिस बॉय, टेलिकॉलर व मावशी पाहिजे. ९९२२३१४३०९, ९१४६१२९०३३

**रिटेल मेडिकलमध्ये** कामासाठी फूलटाईम/पार्टटाईम कामगार पाहिजे. संपर्क-जाधव मेडिकल, सिध्दीविनायक कॉम्प्लेक्स, विरशैव बँकेजवळ, इचलकरंजी. फोन-८८८८०८०००२

**Location :** Ichalkaranji. Post-फॅब्रिक डिझायनर (Fabric Designer) अनुभव (Experience) २ ते ४ वर्षे. टेक्सट्रॉनिक्स सॉफ्टवेअर का उपयोग आपको Textronics Software का अच्छी तरह से उपयोग करना आना चाहिए।. इसके जरिए नए फॅब्रिक डिझाइन और पॅटर्न्स तैयार करणे होंगे। Contact-9422413779

**Location :** Ichalkaranji. Post: Full Time Accountant, Experience : 1 to 3 years. 1) Should Understand Accounting Basics. Contact-9766214479

**Location :** Ichalkaranji. Post: Coders/App Script Coding Experience : 0 to 2 years. 1) Should Understand Usage of AI. Contact-9766214479

**होलसेल औषध दुकानामध्ये** कामाकरीता १० वी/१२ वी झालेली मुले/मुली पाहिजेत. पत्ता-सुशिल फार्मा एल.एल.पी. नाईट कॉलेजजवळ, इचलकरंजी. संपर्क-९०९६२६१२७२, मुलाखतीची वेळ- सकाळी १० ते दुपारी-१ वाजेपर्यंत. रविवार बंद.

**सर्व्हिसिंग सेंटरमध्ये** अनुभवी/शिकाऊ कामगार पाहिजे. संपर्क-९१७५४७५९५५

**घरकामासाठी व हॉस्पिटलमध्ये** कामासाठी बाई पाहिजे. पत्ता-बोरगावे हॉस्पिटल. ९५४५५३१११३

**Require-** Looking for Talented Professionals to Join our Team- 1) PPC Executive Post-3. 2) Data Entry Executive-Post-3. 3) Helper-Graige/Yarn godown Post-2. Experience-1-2 year (Preferred for Textiles) Salary-Handsome packing for the right candidate. Apply within 10 days. To-Mail-rm.hr.admin@ratanmoti.com Contact-7719860909

**चष्म्याच्या दुकानात** कामगार पाहिजे. ऑफिसबॉय/सेल्समन जेंटस. संपर्क-स्वामीराज आयवर्ल्ड, शाहू कॉर्नर, इचलकरंजी. फोन-९८५००४४२२३

**इचलकरंजी शहरात** छत्रपती संभाजी महाराज चौक येथे इंग्रजी माध्यमासाठी इ. १ ली ते ५ वी शिक्षक/शिक्षिका गरजू पाहिजेत. संपर्क-८६५५१३७१७१, ८६८६१३७१७१

**ड्रायव्हर पाहिजे.** घरगुती गाडीवर अनुभवी लायसनधारक (अॅटो गिअर/मॅन्युअल गाडी) संपर्क-८४८५०५११९८२

**गोडाऊनमध्ये हमाली कामासाठी** कामगार पाहिजे. पगार-४५०० ते ५५०० आठवड्याला. संपर्क-९४२२०४४२९२. जयकिसान पशुखाद्य, सांगली रोड, बडबडे हॉस्पिटलसमोर, इचलकरंजी.

**Required-** for Diagnostic Center Experienced/ Freshers Receptionist (F)-3. Typist (F)-1. Wardboy-1. For long Term only. Contact-9921267176, 9075657461

**मोठ्या साडीच्या शोरूममध्ये** अनुभवी/शिकाऊ जेंटस/लेडीज सेल्समन पाहिजेत. पार्टटाईम कॉलेजमधील चालतील. तसेच बाहेरगावी फिरणारा जेंटस तरूण सेल्समन पाहिजे. संपर्क-९६७३७००६३३

**अर्जंट सिक्युरिटी गार्ड पाहिजे.** पार्वती इंडस्ट्रिज, यड्राव व खंजीरे इंडस्ट्रिज इचलकरंजी, ड्युटी-८ तास, आकर्षक पगार व इतर सुविधा. संपर्क-९८५०९७४५८५, ९८२३५१३०६०

**नामवंत फर्निचर शोरूममध्ये** कायमस्वरूपी हेल्पर कामासाठी मुली/मुले पाहिजेत. आकर्षक पगार, प्रत्यक्ष भेटा. स्टेशन रोड, डेक्कन मिलजवळ, इचलकरंजी. ८६०३१५१५१५, ९३३७९३९३९३

**पाहिजेत.** स्टोअर असिस्टंट-२, पदवीधर, कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक, अनुभवी बँक ऑफिस (बिलींगकरीता) पदवीधर, अनुभवी. फोन-९७६६२५६६५५

**सिक्युरिटी गार्डस पाहिजेत.** इचलकरंजी शहराकरीता ड्युटी ८ व १२ तास. वय-२५ ते ५०, आकर्षक पगार. ९०२१५५६१००

**लेडीज पाहिजेत** कॉम्प्युटर ऑपरेटर, मेल लिहिता वाचता यावे व टेलिफोन ऑपरेटर पाहिजे. मो. ९६०४०००८४५.

**कापड पेढीसाठी** ऑफिस स्टाफ पाहिजे व कॉम्प्युटरचे ज्ञान असलेला अकौंटट पाहिजे. मो. ७९७२६७२१७०.

**कॅफेसाठी कामगार पाहिजे.** (मुलगा/मुलगी) संपर्क- मंगलमुर्ती टॉकीजरोड, महेश क्लबजवळ, इचलकरंजी. फोन-७२१८८२८००८

**पाहिजेत मशिन** शॉपसाठी त्वरीत सीएमएम, सीएनसी/एचएमसी/व्हीएमसी ऑपरेटर पाहिजे. जागा प्रत्येकी-१, आकर्षक पगार, ईएसआयसी सुविधा उपलब्ध. मो. ७८४१९११२९६, ९८५०८७१४८१.

### * कर्जविषयक *

**होमलोन मॉरगेज** चालू कर्ज कमी दराने एनए असो नसो प्लॉट तारण, खरेदी खात्रीने मंजूरी. ९०९६०६६५०५

**श्री असोसिएटस फायनांशियल** कन्सलटंट पर्सनल लोन, व्यवसाय लोन, गृहकर्ज, शेती कर्ज, वाहन कर्ज, कॅश क्रेडिट (सी.सी.) मालमत्ता तारण कर्ज, एमएसएमई कर्ज, प्रोजेक्ट लोन, बॅलेन्स ट्रान्सफर, टॉपअप लोन, टेकओव्हर लोन, शैक्षणिक कर्ज. पत्ता- रत्नप्लाझा बिल्डींग, आमराई रोड, जी-१ शॉप, महासत्ता चौक, इचलकरंजी. मो. ९५११९९५१७९, ९५११९९६१३६

**सरकारी ३५ % सबसिडी** कर्ज नवीन, जुने उद्योगाकरीता संपूर्ण सहकार्य. थोरात सर-९६६५४०८८२८. व्यावसायिक मार्गदर्शन, एम.सी.ई.डी. मिटकॉन कोल्हापूर/सांगली जिल्हा.

**होमलोन, मॉर्गेजलोन-**करून मिळेल. कोणतीही प्रॉपर्टी चालेल. कोणतेही अॅडव्हॉन्स चार्जेस नाहीत. मो. ९५६१९११७३१

### * बोअरवेल *

**सिध्देश्वर बोअरवेल-**आमचेकडे ४।।'' व ६।।'' बोअरवेल योग्य दरात मारून मिळेल. सांगली नाका, इचलकरंजी. मो. ८५५४९८४५६३, ७७७५९३७५७२

### * भाड्याने देणे घेणे *

**सर्वसोयीनियुक्त २ बीएचके बंगला** भाड्याने देणे आहे. जय सांगली नाका, सोलगे मळा, जयदत्त अॅल्युमिनिअम शेजारी, इचलकरंजी. मो. ९९७५१०५३१२, ९६२३१०१७१९

**वन रूम किचन** आणि ७०० स्क्वे. फूट आर.सी.सी. शेड सर्वसोयीनियुक्त भाड्याने देणे आहे. पत्ता-आशिर्वाद, आझाद चौक, लोकमान्य नगर, कोरोची. ९६२३२४११७८, ८८८८१३०८३७

**विद्यार्थ्यांसाठी कॉटबेसिसवर** रूम भाड्याने देणे आहेत. चौगुले मळा, इचलकरंजी. संपर्क-९७६५३८८१७०

**१ बीएचके** सर्वसोयीनियुक्त भाड्याने देणे आहे. सेंच्युरी प्लाझा, मगदूम मळा, सांगली रोड, इचलकरंजी. संपर्क-९८६५३८८१७०

**भाड्याने देणे.** हॉटेल बँक, पतसंस्था, शोरूम व इतर व्यवसायासाठी बेसमेंट १००० फूट ग्राऊंड फ्लोअर ८०० फूट, फर्स्ट फ्लोअर-८०० फूट. पत्ता- अजब फर्निचरसमोर, नवीन महानगरपालिकेजवळ, स्टेशन रोड, इचलकरंजी. संपर्क-९८२२०६१५७५

**१ बीएचके भाड्याने देणे आहे.** तळमजला सर्वसोयीनियुक्त लायकर मळा, अलायन्स हॉस्पिटलमागील बाजुस, इचलकरंजी. संपर्क-९८८१०८१९२०

**२ गुंठे रिकामा प्लॉट** भाड्याने देणे. संगमनगर, तारदाळ रोडटच, पाण्याच्या टाकीजवळ. संपर्क-७५८८९१९४२१

**गाळे भाड्याने देणे आहे.** पार्वती व्हीला इमारतीमधील ग्राऊंड फ्लोअरवरील दुकान गाळे सांगली रोड, फॉर्च्युनजवळ. संपर्क-९९६०४२३९१५, ८६५७४४१०९२

**सर्व सोयीनियुक्त** २ बीएचके बंगला भाड्याने देणे आहे. दत्तनगर, चंदूर रोड, कबनूर. फोन-७५८८२७३८०४

**घर गहाणवट पाहिजे.** ४ ते ५ लाखामध्ये इचलकरंजी व कबनूर परिसरामध्ये. संपर्क-९५०३८७१९०४

**२००० स्क्वे. फूट गोडाऊन** भाड्याने देणे. गारमेंट, ऑफिस, बँकसाठी इंडस्ट्रियल इस्टेट, ईदगाह मैदान मागे. संपर्क-७२१८१२१११७

**गाळा भाड्याने देणे.** आरसीसी ११ बाय १२ राधाकृष्ण टॉकीज चौक, पॉप्युलर मोटर ट्रेनिंगसमोर, इचलकरंजी. फोन-९८८१८१४७२७, ९८२२६३०१३३

**इचलकरंजी एसटी स्टॅंड लगत** १० बाय २० आरसीसी दुकानगाळा भाड्याने देणे आहे. संपर्क-९४२२०४४७४७

**२ बीएचके फ्लॅट** गहाणवट देणे/विकणे आहे. आयकॉन पार्क, आमराई रोड, इचलकरंजी. ९८८१०९१२८०, ९८६०८०३६९५

**१ बीएचके गहाणवट देणे आहे.** ताबा १ महिन्यानंतर पार्वती गेटसमोर, कोल्हापूरी हॉटेलमागे, खोतवाडी. संपर्क-९७६६११३८८०

**एएससी कॉलेजजवळ** गोडाऊन आणि गाळा भाड्याने देणे आहे. संपर्क-९१३०००२७६६, इचलकरंजी.

**मोक्याच्या ठिकाणी** शरद कॉलेजसमोर सांगली नाका येथे २५००,२०००,१५००,१००० आरसीसी हॉल/गाळा भाड्याने देणे. संपर्क-८७८८२२९१६५, ९७६७०४०५७९

**थोरात चौक** स्विमिंग पूलसमोर १००० स्क्वे. फूट गाळा भाड्याने देणे. कोणत्याही व्यवसायासाठी. ९१५८०५४०४६

**पार्वती इंडस्ट्रियल इस्टेटमधील** नवीन बांधलेली १२००० स्क्वे. फूट शेड भाड्याने देणेची आहे. संपर्क-७७२००१३००१

**दुकानगाळा भाड्याने** देणे. १३ बाय १३ चे ४ दुकानगाळे, आभार फाटा चौक, चंदूर. मो. ९८६०५५३८२३.

**३० बाय २७ आरसीसी शेड** सर्व सोयीनियुक्त भाड्याने देणे आहे. संपर्क-९०२१०९०२०७, ९८२३३२३२०३, गुरूकन्ननगर, इचलकरंजी.

**घर भाड्याने देणे.** तीनबत्ती चार रस्ता, चंदूर रोड, योगायोगनगर, १ रूम किचन सर्व सोयीनियुक्त फक्त कुटूंबासाठी. संपर्क-९६९९०२६१८१, ९४२१८१६४४५

**१ बीएचके भाड्याने देणे आहे.** एएससी कॉलेजजवळ, इचलकरंजी. फोन-९०६७३३३९६५

**छोटी जाहिरात मोठा प्रतिसाद**

### वाचकांसाठी निवेदन

**दै.महासत्ता** वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द होणाऱ्या खरेदी-विक्री, नोकरीविषयक, भाड्याने देणे-घेणे, कर्ज, गुंतवणूक, व्यवसाय, आरोग्य विषयक व इतर सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहीरातदाराने दिल्यानुसार प्रसिध्द केला जातो. प्रत्येक जाहीरातीच्या आशयाची सखोल शहानिशा करणे शक्य नसल्यामुळे यातील कोणत्याही माहितीच्या सत्यतेबाबत **दै.महासत्ता** व्यवस्थापन हमी घेऊ शकत नाही. याची वाचकांनी नोंद घ्यावी. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पुर्ततेसंदर्भात कोणतीही जबाबदारी **दै.महासत्ता** वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक अथवा मालक हे जबाबदार राहणार नाहीत. याची कृपया नोंद घ्यावी. **व्यवस्थापक**

## हिरा राम हायस्कूलमध्ये एड्स जनजागृती मोहीम

**इचलकरंजी, ता.२४-**

**येथील गणेशनगर भागातील हिरा राम हायस्कूलमध्ये महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण अंतर्गत कोल्हापूर जिल्हा आरोग्य खात्याच्या विद्यमाने इयत्ता आठवी व नववीच्या विद्यार्थ्यांना एड्स या गंभीर आजाराबद्दल माहिती मिळावी यासाठी समुपदेशिका स्मिता कांबळे यांनी मार्गदर्शन केले.**



स्वागत व प्रास्ताविक पाटील यांनी केले. मुख्याध्यापक सुरेंद्र सपकाळ अध्यक्षस्थानी होते. आभार ज्योती कांबळे यांनी केले.

# दस्तगीर साहेब दर्गा उरुस उत्साहात

**निपाणी,ता.२४ (प्रतिनिधी)-**

**येथील संत बाबा महाराज चव्हाण प्रस्थापित हजरत पिरानेपीर दस्तगीर साहेब यांच्या उरुसाला तीन दिवसापासून प्रारंभ झाला आहे. मंगळवारी संदल बेडीचा उरुस झाला. बुधवारी भर उरूस झाला. तर गुरूवारी शिळा ऊरूस झाला. यानिमित्त नैवेद्य अर्पण करण्यासह दर्शनासाठी भाविकांनी दिवसभर गर्दी केली होती.**



बाबामहाराज समाधीचे दर्शन घेताना रणजितसिंह देसाई, संग्रामसिंह देसाई, श्रीमंत दादाराजे देसाई व इतर .

चव्हाण वारस,फकीर आणि मानकऱ्यांच्या प्रमुख उपस्थितीत दर्गाह तुरबतीला नैवेद्य दाखवून भाविकांनी दंडातील चांदीची बेडी दंडवत घालण्यासह देवाला अर्पण केली. गंधरात्रनिमित्त चव्हाण घराण्यातर्फे गंध व गलेफ मानकऱ्यांसह सवाद्य नेऊन तुरबतीस अर्पण करण्यात आला.

चव्हाण वारसांतर्फे मलिदा, ताक, कण्या व गोडा नैवेद्य अर्पण केला. जिजामाता चौकात आतषबाजी करण्यात आली. शिळा उरूसानिमित्त पहाटे चव्हाण वाड्यातून मानाचा गलेफ व गंध दर्गा मंडपमध्ये जाऊन दर्गा तुरबतीवर चव्हाण वारस व मानकऱ्यांचा समवेत चढविण्यात आला.


यावेळी चव्हाण वारस, उरूस कमिटी अध्यक्ष बाळासाहेब देसाई -सरकार, रणजितसिंह देसाई-सरकार, संग्रामसिंह देसाई सरकार, पृथ्वीराज चव्हाण, राजूबाबा निपाणकर, श्रीमंत दादाराजे देसाई-निपाणंकर सरकार, संजय माने, विवेक मोकाशी, जयराम मिरजकर, प्रभाकर पठाडे, शरद माळगे, संजय पावले, बंडा गंथडे, संतोष गंथडे, सनी साळुंखे, आतिष सुतार, सचिन पावले, उरुस कमिटीचे पदाधिकारी व सदस्य मानकरी उपस्थित होते.सायंकाळी चव्हाणवाड्यात खारीक,उदीचा कार्यक्रम झाला.उरूस उत्सवासाठी शिवाजी चौक, कामगार चौक, दर्गाह गल्ली व दर्गाह परिसरात विविध खेळण्यांची दुकाने, मेवा मिठाईची दुकाने थाटण्यात आली आहेत.

पाळण्यांचीही गर्दी झाली आहे. राजू मुजावर, हमीद मुजावर, सुभान मुजावर, ख्वाजा मुजावर, मोदीन मुजावर, निहाल मुजावर, सद्दाम मुजावर, जाफर मुजावर, शब्बीर मुजावर, सलमान मुजावर, यासीन हवालदार,परशराम विटेकरी, रफीक बुदिहाळे यांच्यासह मानकरी उपस्थित होते.

# यशवंत धर्मार्थ रुग्णालयात ३२ विमा कंपन्याची कॅशलेस सुविधा

**वारणानगर,ता.२४(प्रतिनिधी)-**

**जनरल इन्शुरन्स कॉन्सिलच्या पॅनेलवर कोडोली (ता.पन्हाळा) येथील यशवंत धर्मार्थ रूग्णालयाचे नाव समाविष्ठ करण्यात आले आहे. यामुळे ३२ विविध विमा कंपन्यांची कॅशलेश सुविधा उपलब्ध झाली असल्याची माहिती यशवंत शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव डॉ.जयंत पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली.**



**जनरल इन्शुरन्स कॉन्सिलच्या पॅनेलवर यशवंत धर्मार्थ रूग्णालयाचे नाव समाविष्ठ झाल्याचे प्रमाणपत्र दाखवताना डॉ.जयंत पाटील, विनिता पाटील, डॉ.मिलिंद गोडबोले व इतर.**

ते म्हणाले, जनरल इन्शुरन्स कॉन्सिलच्या नियमानुसार आवश्यक असणाऱ्या सर्व सोयीसुविधा रूग्णालयात उपलब्ध करण्यात आल्या आहेत.अशा सुविधा असणारे ग्रामीण भागातील पहिलेच रूग्णालय असल्याने जनरल विमा पॉलिसीधारक रूग्णांना आवश्यकतेनुसार तात्काळ वैद्यकिय सेवा मिळणार आहे.एकाच छताखाली विविध ३२ विमा कंपन्याची सुविधा मिळणार असल्याने वेळ व पैशाची बचत होवून वेळेत औषध उपचार सुरू होण्यास मदत होणार आहे. कॅशलेस सुविधा असणाऱ्या पॉलिसी धारकांना कोणत्याही प्रकारचे शुल्क भरावे लागणार नाही. सध्या रूग्णालयात २७२ बेड असून आयुर्वेद व अॅलोपॅथी या दोन्ही औषधोपचार पध्दतीच्या सुविधा उपलब्ध आहेत. ज्या विमा कंपन्याच्या पॉलिसीमध्ये अॅलोपॅथी प्रमाणे पंचकर्म किंवा अन्य आयुर्वेद औषधोपचार पध्दतीची सुविधा उपलब्ध आहेत त्यांना त्याचा लाभ घेता येईल. गरजू रुग्णांनी या सुविधांचा लाभ घ्यावा,असे आवाहन डॉ.पाटील यांनी केले. यावेळी संस्थेच्या विश्वस्त विनिता पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.संजय कुबल, प्राचार्य डॉ.मिलिंद गोडबोले, डॉ.अभिजित इंगवले, डॉ.सुर्यकिरण वाघ, डॉ. हर्षल साबळे, पुंडलिक पाटील, संजय नलवडे, अजिक्य मोरे उपस्थित होते.

# उपलोकायुक्तांकडून चिक्कोडीतील रूग्णालय, नगरपालिकेच्या कामकाजाची झाडाझडती

**चिक्कोडी,ता.२४ (प्रतिनिधी)-**

**राज्याचे उपलोकायुक्त न्यायमूर्ती बी. वीरप्पा यांनी गुरुवारी चिक्कोडी येथील माता व शिषु, सरकारी तालुका रुग्णालय, बसस्थानक व नगरपालिकेला भेट देऊन कार्यालयाच्या कामकाजाची व विविध विभागांची कसून तपासणी केली. अनेक ठिकाणी त्रुटी आढळल्याने ताशेरे ओढले.**

उपलोकायुक्तांनी नगरपालिकेतील जन्म-मृत्यू नोंदणी.ई-स्वत्तू, ई-खाता आणि बी-खाता, बांधकाम परवाने, कचरा विल्हेवाट वाहनांचा तपशील, शहरातील पथदिव्यांची देखभाल त्यावर होणारा खर्च,नवीन लेआउट्सना (नव्या वसाहती) दिलेल्या परवानग्या याबाबतची सविस्तर माहिती अधिकाऱ्यांकडून घेतली.अतिक्रमणे किंवा बेकायदेशीर बांधकामांबाबत नागरिकांच्या कांही तक्रारी असल्यास,त्यांनी थेट लोकायुक्तांकडे तक्रार करावी, असे आवाहन केले.

बसस्थानकाला भेट देऊन तेथील गैरसोयी आणि कामकाजाची कसून पाहणी केली.स्थानकातील खाद्यपदार्थ स्टॉल, कॅंटीन, शौचालय स्वच्छता राखण्याबात सुचना दिल्या. पार्किंग प्रवाशांकडून जादा शुल्क उकळल्यास कंत्राटदाराचा ठेका त्वरित रद्द करण्याचे आदेश दिले.पिण्याच्या शुद्ध पाण्याची योग्य व्यवस्था करण्याच्या सूचनाही दिल्या.

माता शिशू रूग्णालयाला भेट देवून गैरहजर कर्मचारी आणि रुग्णालयाच्या दुरावस्थेवर संताप व्यक्त केला.रुग्णालयाच्या कामकाजाची आणि उपलब्ध सुविधांची त्यांनी कसून पाहणी केली.अनेक गंभीर त्रुटी आणि गैरव्यवस्थापन समोर आल्याने त्यांनी अधिकाऱ्यांना चांगलेच फैलावर घेतले. डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांच्या उपस्थिती पुस्तिकेची तपासणी केली. यावेळी अनेक डॉक्टर आणि कर्मचारी निर्धारित वेळेवर उपस्थित नसल्याचे आढळून आले. काहींनी अगोदरच स्वाक्षरी करून रुग्णालयातून दांडी मारल्याचेही त्यांच्या निदर्शनास आले. रुग्णालयाच्या औषध भांडार आणि रुग्णांना वाटल्या जाणाऱ्या औषधांची तपासणी केली.प्रसूती विभागातील कागदपत्रांची तपासणी करताना, गरोदर महिलांची नोंदणी आणि रेकॉर्ड योग्यरित्या ठेवले जात नसल्याचे त्यांच्या लक्षात आले.गरोदर महिलांचे मदर कार्ड,आधार कार्ड,रेशन कार्ड आदी कागदपत्रे घेऊन रजिस्टरमध्ये त्याची अचूक नोंद करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.गरोदर महिलांना विविध तपासण्या आणि स्कॅनिंगसाठी खाजगी रुग्णालये किंवा स्कॅन सेंटर्समध्ये पाठवले जात असल्यामुळे गंभीर चिंता व्यक्त केली. जिल्हा आरोग्य व कुटुंब कल्याण अधिकारी आणि तालुका वैद्यकीय अधिकारी नियमितपणे रुग्णालयाला भेट देऊन पाहणी करत नसल्याचे निदर्शनास येताच उपलोकायुक्तांनी त्यांनाही खडेबोल सुनावले. या पाहणी दौऱ्यावेळी उपलोकायुक्तांचे सचिव अरविंद, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सदस्य सचिव के. एन. शिवकुमार, लोकायुक्त पोलीस अधीक्षक प्रसन्न देसाई, अप्पर जिल्हाधिकारी विजयकुमार होनकेरी, उपविभागीय अधिकारीएस. एस. संपगावी, जिल्हा पंचायत प्रकल्प संचालक रघू बंगारप्पनवर, तहसीलदार आर. आर. बुर्ली आणि चिकोडी नगरपालिकेचे मुख्याधिकारी जगदीश ईटी आदी अधिकारी उपस्थित होते.

## जिल्हास्तरीय टेबल टेनिस स्पर्धेत नव कृष्णा व्हॅली स्कूल प्रथम

**कुपवाड,ता.२४(प्रतिनिधी)-**

**सांगली जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा क्रीडा परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने १४ वर्षांखालील जिल्हास्तरीय टेबल टेनिस स्पर्धेत नव कृष्णा व्हॅली स्कूल(इंग्रजी माध्यम)च्या मुलांच्या संघाने प्रथम क्रमांक मिळविला.**

या यशामुळे संघाची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली असून, स्पर्धा २६ सप्टेंबर रोजी रत्नागिरी जिल्ह्यातील डेरवण येथे होणार आहे.प्रशिक्षक सूर्यकांत कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी हे यश मिळविले. शाळेने मुलांच्या तसेच मुलींच्या गटातही चॅम्पियनशिप मिळवत उल्लेखनीय कामगिरी केली.

## सचिन गुरव यांचे निधन

**निपाणी,ता.२४(प्रतिनिधी)-**



आडी येथील सचिन कल्लाप्पा गुरव वय (३७) यांचे बुधवारी अल्पशः आजाराने निधन झाले.ते पत्रकार अमर गुरव यांचे ज्येष्ठ बंधू होत.त्यांच्या पश्चात आई-वडील, भाऊ,बहिण, भावजय, चुलते असा परिवार आहे.

## जाहीर नोटीस

मौजे तारदाळ येथील गट नंबर ६३५ पैकी प्लॉट नंबर १ चे क्षेत्र १६०.३१ चौरस मिटर ची खुली जागा मिळकत यासी चतुः सिमा- पुर्वेस - श्री जहांगीर महात यांची मिळकत. पश्चिमेस- श्री नबीलाल मुल्ला यांची मिळकत. दक्षिणेस - श्री महंमदअली शेख यांची मिळकत. उत्तरेस - २० फुट रुंदीचा रस्ता सदर ची मिळकत श्री. मौला बाबालाल शेख. रा. इचलकरंजी यांचे कब्जे मालकीची मिळकत असुन त्यांनी सदर मिळकतीचे तोंडी करारपत्र आमचे अशिलांकडून संचकार रक्कम करून दिलेले आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा कोणताही हक्क दावा, पोटगी, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणुन दिली नोटीस सही ता. २२/०९/२०२६

**ॲड. आनंद प्रकाश पटवा**
रा. आसरा नगर, बसस्टॉप जवळ, सांगली रोड, इचलकरंजी.
मो. ९४२०७७६४८६

## जाहीर नोटीस

मौजे तारदाळ येथील क.ग.नं. ४८५ क पैकी प्लॉट नं. १५ चे क्षेत्र १५७.९३ चौ.मी. ची मिळकत यासी चतु:सिमा पुर्वेस - रस्ता, पश्चिमेस रस्ता, दक्षिणेस- गट नं. ४८५ क पैकी मिळकत, उत्तरेस- प्लॉट नं. १६ ची मिळकत येणे प्रमाणे चतु:सिमेतील मिळकत ही १. गीता प्रशांत कोळेकर व २. प्रशांत सच्चिदानंद कोळेकर दोघे रा. कबनूर यांचे कब्जेमालकीची मिळकत असून त्यांनी सदर मिळकतीची संचकार पावती आमचे अशिलांना करून देवून त्यांचेकडून संचकार रक्कम स्विकारली आहे. सदर मिळकतीबाबत कोणाचा कोणताही हक्क, करार, दावा, पोटगी, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी मुदतीनंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही. म्हणून दिली नोटीस सही तारीख : २३/०९/२०२६ रोजी.

**ॲड. आनंद प्रकाश पटवा**
रा. आसरा नगर, बसस्टॉप जवळ, सांगली रोड, इचलकरंजी.
मो. ९४२०७७६४८६

## जाहीर नोटीस

मौजे यड्राव येथील क.ग.नं. ३१ ब यापैकी ३२, ३३, ३४, ३९, ४०, ४१ मध्ये बांधलेल्या रो-हाउस नं. २ चे सातबारा प्रमाणे क्षेत्र ४० चौ.मी. ची मिळकत दक्षीण बाजूस असलेल्या ४ बाय १७ खुल्या मिळकतीसह यासी चतु:सिमा - पुर्वेस - रो हाउस नं. ३, पश्चिमेस - रो हाउस नं. १, दक्षिणेस- रस्ता, उत्तरेस- रो हाउस नं. ६ ची मिळकत येणेप्रमाणे चतु:सिमेतील मिळकत ही सौ. आसावरी उदय चव्हाण रा. इचलकरंजी यांचे कब्जेमालकीची मिळकत असून त्यांनी सदर मिळकतीची तोंडी संचकार पावती आमचे अशिलांना करून देवून त्यांचेकडून संचकार रक्कम स्विकारली आहे. सदर मिळकतीबाबत कोणाचा कोणताही हक्क, करार, दावा, पोटगी, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी मुदतीनंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही. म्हणून दिली नोटीस सही तारीख : २३/०९/२०२६ रोजी.

**ॲड. आनंद प्रकाश पटवा**
रा. आसरा नगर, बसस्टॉप जवळ, सांगली रोड, इचलकरंजी.
मो. ९४२०७७६४८६

# शंकरराव जाधव विद्या मंदिरला टीव्ही प्रदान

इचलकरंजी,ता.२४-

**इचलकरंजी केमिस्ट असोसिएशन व ग्रीन मेडिको एलएलपी यांच्या संयुक्त विद्यमाने लिगाडे मळा येथील शंकरराव जाधव विद्या मंदिरला टीव्ही भेट देण्यात आला.**



**टीव्ही प्रदानप्रसंगी नगरसेवक प्रदीप धुत्रे,मदन पाटील,सुनिल पाटील,रवींद्र पाटील आदी.**

गरीब विद्यार्थ्यांना डिजिटलच्या माध्यमातून शिक्षण घेता यावे,या उदात्त हेतूने महाराष्ट्र राज्य केमिस्ट असोसिएशनचे सचिव व कोल्हापूर जिल्हा केमिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष मदन पाटील याच्या मार्गदर्शनाखाली उपक्रम राबविण्यात आला.नगरसेवक प्रदीप धुत्रे यांच्या हस्ते शाळेला टीव्ही प्रदान करण्यात आला.यावेळी कोल्हापूर जिल्हा केमिस्ट असोसिएशनचे संचालक रवींद्र पाटील, कुमार बोरगांवे,सुनिल पाटील,कपिल कुलकर्णी, विजय देवणे, माजी संचालक तेरदाळे, इचलकरंजी केमिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष संतोष पाटील, सचिव शहाजी राणे यांच्यासह पदाधिकारी, ग्रीन मेडिकोचे जयसिंग जाधव, सिकंदर मुजावर,आनंद बडवे, अजित चौगुले, सुरेश बालिघाटे तसेच मुख्याध्यापिका पाटील, अध्यापक वारे व शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

## जाहीर नोटीस

**मौजे कोरोची** येथील गट नं. ६३८ / ६३९ / १ पैकी प्लॉट नं. १५ व १६ मधील क्षेत्र - ९३-० चौ. मी . खुली जागा व घर मिळकत सर्व . यासी चतु:सिमा-**पुर्वेस** - तिबिले यांची मिळकत, **पश्चिमेस** - पडीयार यांची मिळकत, **दक्षिणेस**- कृष्णात पाटील यांची मिळकत, **उत्तरेस** - रस्ता येणेप्रमाणे चतुः सिमेतील मिळकत ही **श्री. राहुल प्रकाश शिवकाळे रा. कोरोची** यांचे कब्जेमालकीची असुन त्यांनी आमचे अशिलांशी मिळकत निर्वेध व निष्कर्जी असलेचे सांगुन संचकार रक्कम स्विकारून त्यांच्याशी मिळकत विक्री करण्याचे तोंडी ठरवले आहे. तरी सदर मिळकतीबाबत कोणाचा हक्क, दावा, बोजा, वारसा, करार, इजमेंट इ. वगैरे असल्यास सदर नोटीस प्रसिध्दी पासुन ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्त्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणुन दिली नोटीस . सही ता.२३/०९/२०२६

**ॲड. अर्जुन तात्यासाहेब माने**
गाळा नं . ३४, दुय्यम निबंधक ऑफीस शेजारी, राजाराम स्टेडियम, इचलकरंजी,
मो .७८२०९०९७०५

## जाहीर नोटीस

मौजे तारदाळ येथील गट नं. ८४ पैकी प्लॉट नं. २६ चे क्षेत्र - ११४ - ४० चौ. मी. खुली मिळकत यासी चतुः सिमा पुर्वेस - प्लॉट नं. २५ ची मिळकत, पश्चिमेस - प्लॉट नं. २७ ची मिळकत, दक्षिणेस - प्लॉट नं. ०९ ची मिळकत, उत्तरेस- रस्ता. येणेप्रमाणे चतुः सिमेतील मिळकत ही श्री. सुखदेवराम पुखराज प्रजापत यांचेकडुन सौरभ अशोक माळी, विजयकुमार पांडुरंग माळी, कपिल विजय चौगुले व महेश प्रकाश भिसे रा. इचलकरंजी यांनी करारपत्राने घेतलेली असुन त्यांनी आमचे अशिलांशी मिळकत निर्वेध व निष्कर्जी असलेचे सांगुन संचकार रक्कम स्विकारून त्यांच्याशी मिळकत विक्री करण्याचे संचकारपत्र केले आहे. तरी सदर मिळकतीबाबत कोणाचा हक्क, दावा, बोजा, वारसा, करार, इजमेंट इ. वगैरे असल्यास सदर नोटीस प्रसिध्दीपासुन ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्त्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणुन दिली नोटीस . सही ता. २३/०९/२०२६

**ॲड. अर्जुन तात्यासाहेब माने**
गाळा नं . ३४, दुय्यम निबंधक ऑफीस शेजारी, राजाराम स्टेडियम, इचलकरंजी,
मो .७८२०९०९७०५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांना कळविणेत येते की...

**मिळकतीचे वर्णन:- इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील रि.स.नं. ७/४/अ ची मिळकत गुंठेवारी झालेले असून. यामधील भुखंड क्र. ३ चौ. मी १४६.० चौ. फुट १५७०.९६ म्हणजेच हे. आर. ०-०१.४६ ची खुली जमीन मिळकत. यासी चतु:सिमा:- पुर्वेस :- ९ मीटर रूंदीचा रस्ता, पश्चिमेस :- भुखंड क्र ६ ची मिळकत, दक्षिणेस : श्री. दरीबे यांची मिळकत, उत्तरेस :- भुखंड क्र. ४ ची मिळकत.**

येणेप्रमाणे चतु:सिमेतील मिळकत **श्री. अनिल भिमराव सुर्यवंशी रा. इचलकरंजी** यांचे मालकी वहिवाटीची असून त्यांच्याकडून **श्री. जुबेर अकबर मुतवल्ली** यांनी करारपत्राने घेवू केलेली असून त्यास अनुसरून सदर मिळकत त्यांनी आमचे अशिलांना खरेदी देणेचे ठरवून संचकारपत्र करून संचकार रक्कम स्विकारलेली आहे. सदरची मिळकत निर्वेध व निष्कर्जी असल्याचा निर्वाळा दिला आहे. सबब सदर मिळकतीवर कोणाचाही हक्क संबंध दावा अगर तक्रार असल्यास नोटीस प्रसिध्द झालेपासून (७) सात दिवसाचे आत खालील ॲडव्होकेट यांचे पत्यावर कागदपत्रासह लेखी खुलासा करावा. म्हणून दिली जाहीर नोटीस

ता. २३/०९/२०२६

**ॲड.रागिणी उ. मोरबाळे**
१६/१२०१, गोकुळ चौक, इचलकरंजी.
मोबा.नं.९७६७१८३८९१

## जाहीर नोटीस

सर्व लोकांना कळविणेत येते की...

**मिळकतीचे वर्णन:- इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील रि.स.नं. ७/४ / अ ची मिळकत गुंठेवारी झालेले असून. यामधील भुखंड क्र. ४ ची मिळकत चौ.मी. १४६.० चौ. फुट १५७०.९६ म्हणजेच हे. आर. ०-०१.४६ ची खुली जमीन मिळकत. यासी चतु:सिमा-पुर्वेस :- ९ मीटर रूंदीचा रस्ता, पश्चिमेस भुखंड क्र.५ ची मिळकत. दक्षिणेस :- भुखंड क्र. ३ ची मिळकत, उत्तरेस:- भुखंड क्र ५ :- श्रीकांत सुर्यवंशी यांची मिळकत.**

येणेप्रमाणे चतु:सिमेतील मिळकत **श्री. अनिल भिमराव सुर्यवंशी रा. इचलकरंजी** यांचे मालकी वहिवाटीची असून त्यांच्याकडून **श्री. जुबेर अकबर मुतवल्ली** यांनी करारपत्राने घेवू केलेली असून त्यास अनुसरून सदर मिळकत त्यांनी आमचे अशिलांना खरेदी देणेचे ठरवून संचकारपत्र करून संचकार रक्कम स्विकारलेली आहे. सदरची मिळकत निर्वेध व निष्कर्जी असल्याचा निर्वाळा दिला आहे. सबब सदर मिळकतीवर कोणाचाही हक्क संबंध दावा अगर तक्रार असल्यास नोटीस प्रसिध्द झालेपासून (७) सात दिवसाचे आत खालील ॲडव्होकेट यांचे पत्यावर कागदपत्रासह लेखी खुलासा करावा. म्हणून दिली जाहीर नोटीस

ता. २३/०९/२०२६

**ॲड.रागिणी उ. मोरबाळे**
१६/१२०१, गोकुळ चौक, इचलकरंजी.
मोबा.नं.९७६७१८३८९१

# रुकडीतील बैल छाप खत कारखाना बंद करू नका

## शेतकरी संघाच्या वार्षिक सभेत सभासदांचा ठराव

कोल्हापूर, ता. २४ (प्रतिनिधी)-

**शेतकऱ्यांमध्ये लोकप्रिय असलेले शेतकरी संघाचे 'बैल छाप' हातमिश्र खत तयार करणारा रुकडी (ता. हातकणंगले) येथील कारखाना बंद करू नये, अशी मागणी शेतकरी संघाच्या ८६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत करण्यात आली. याबाबतचा ठराव सभेत आवाजी मतदानाने मंजूर करण्यात आला. दरम्यान, संघाच्या विविध ठिकाणी असलेल्या रिकाम्या जागांचा वापर करून सौरऊर्जा प्रकल्प उभारावेत आणि त्यातून संघाचे उत्पन्न वाढवावे, अशी मागणीही सभासदांनी केली.**

शाहू स्मारक भवन येथे झालेल्या सभेच्या अध्यक्षस्थानी संघाचे चेअरमन ॲड. दत्तात्रय राणे होते. 'बैल छाप' हातमिश्र खताला शेतकऱ्यांकडून मोठी मागणी असून हा खत कारखाना शेतकरी संघाची ओळख आहे. सुमारे ९० टक्के शेतकरी या खताचा वापर करतात. त्यामुळे कारखाना बंद केल्यास संघाच्या व्यवहारावर परिणाम होईल, अशी भूमिका सभासदांनी मांडली.

खत कारखाना बंद करू नये, असा ठराव पाटील यांनी मांडला. त्याला उपस्थित सभासदांनी आवाजी मतदानाने मंजुरी दिली. तसेच पट्टण कोडोली येथील शिरीष देसाई यांनी संघाच्या विविध ठिकाणी असलेल्या जागा वापराविना पडून असल्याचे सांगत त्यावर सौरऊर्जा प्रकल्प उभारण्याची मागणी केली. या मागणीला एस. एम. पाटील यांनी अनुमोदन दिले.प्रा. रूपा शहा यांनी संघाने नवीन प्रकल्प सुरू करण्याची मागणी केली. किरण पिस्ते, अमित भोसले, भीमराव नाळे, श्रीकांत सरनाईक, मनोहर माळी आणि राजगोंडा पाटील यांनीही विविध सूचना मांडल्या. उपाध्यक्ष परशुराम कांबळे यांनी आभार मानले.

दरम्यान,संघाचे निवृत्त कर्मचारी चंद्रकांत चव्हाण यांनी संघातील कथित गैरव्यवहाराबाबत प्रश्न उपस्थित केला. संघाचे लेखापरीक्षण केले जाते आणि लेखापरीक्षकांची नियुक्तीही केली जाते. असे असताना गैरव्यवहार कसे घडतात, याची जबाबदारी निश्चित झाली पाहिजे, अशी भूमिका त्यांनी मांडली. माजी अध्यक्ष बाबा नेसरीकर यांच्या कार्यकाळातील एका घटनेचा दाखला देत त्यांनी संघाच्या सध्याच्या कारभारावरही प्रश्न उपस्थित केले. संघात मनमानी सुरू असल्याचा आरोप त्यांनी केला.

## जाहीर नोटीस

मौजे टाकवडे येथील गट नं ३७४ पैकी क्षेत्र हे. ०.१५.०० आर ची मिळकत यासी चतु:सिमा- पुर्वेस - राजाराम कांबळे यांची मिळकत, पश्चिमेस - पांडु कांबळे यांची मिळकत, दक्षिणेस- बाबू चौगुले यांची मिळकत, उत्तरेस - पाणंद रस्ता, सदर मिळकत ही श्री अशोक दऱ्याप्पा चौगुले रा. टाकवडे यांचे कब्जे मालकीची मिळकत असुन त्यांनी आमचे अशिलांचेकडून संचकार रक्कम स्वीकारून त्यांना तोंडीकरार करून दिलेले आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, बोजा, करार, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणून दिली नोटीस सही ता. २४/०९/२०२६

**ॲड. आनंद प्रकाश पटवा**
रा. आसरा नगर, बसस्टॉप जवळ, सांगली रोड, इचलकरंजी.
मो. ९४२०७७६४८६

## जाहीर नोटीस

मौजे तारदाळ येथील गट नं. ६३९ पैकी प्लॉट नं. २५ चे क्षेत्र -५३-० चौ. मी. खुली मिळकत यासी चतुः सिमा पुर्वेस - जमादार यांची मिळकत, पश्चिमेस - २० फुट रस्ता, दक्षिणेस - पटेल यांची मिळकत, उत्तरेस - २० फुट रस्ता येणे प्रमाणे चतु:सिमेतील मिळकत ही वसिम अब्दुलगफार शिरगुप्पे यांचेकडुन श्री. विनोद दत्तात्रय कोराणे रा. तारदाळ यांनी करारपत्राने घेतलेली असुन त्यांनी आमचे अशिलांशी मिळकत निर्वेध व निष्कर्जी असलेचे सांगुन संचकार रक्कम स्विकारून त्यांच्याशी मिळकत विक्री करण्याचे करारपत्र केले आहे. तरी सदर मिळकती बाबत कोणाचा हक्क, दावा, बोजा, वारसा, करार, इजमेंट इ. वगैरे असल्यास सदर नोटीस प्रसिध्दीपासुन ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्त्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणुन दिली नोटीस सही ता . २४/०९ /२०२६

**ॲड. अर्जुन तात्यासाहेब माने**
गाळा नं . ३४, दुय्यम निबंधक ऑफीस शेजारी, राजाराम स्टेडियम, इचलकरंजी,
मो .७८२०९०९७०५

## जाहीर नोटीस

मौजे कबनूर येथील गट नं. ९०५/२/१/प्लॉट नं. ०५ चे क्षेत्र - ९२.६० चौ. मी. खुली मिळकत संपुर्ण . यासी चतु:सिमा पुर्वेस - प्लॉट नं. ०६ ची मिळकत, पश्चिमेस - ९ मीटर रस्ता, दक्षिणेस - प्लॉट नं. ०८ ची मिळकत, उत्तरेस - गट नं.९०७ ची मिळकत . येणेप्रमाणे चतुः सिमेतील मिळकत हि पिरगोंडा बाबगोंडा पाटील, सुरज सुभाष पाटील व संगीता सुभाष पाटील यांचेकडून अमर परसु कोरवी रा. नेरली - कोल्हापुर यांनी करारपत्राने घेतलेली असून त्यांनी आमचे अशिलांशी मिळकत निर्वेध व निष्कर्जी असलेचे सांगुन भरीव संचकार रक्कम स्विकारून त्यांचयाशी मिळकत विक्री करण्याचे करारपत्र केले आहे. तरी सदर मिळकती बाबत कोणाचा हक्क, दावा, बोजा, वारसा, करार, इजमेंट इ. वगैरे असल्यास सदर नोटीस प्रसिध्दीपासुन ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्त्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी . म्हणुन दिली नोटीस. सही ता. २४/०९/२०२६

**ॲड. अर्जुन तात्यासाहेब माने**
गाळा नं . ३४, दुय्यम निबंधक ऑफीस शेजारी, राजाराम स्टेडियम, इचलकरंजी,
मो .७८२०९०९७०५

## जाहीर नोटीस

ता. हातकणंगले पैकी इचलकरंजी येथील रि.स.नं. ४२९ / क पैकी प्लॉट नंबर १० चे क्षेत्र १३५ - २६ चौरस मीटर ची जागा व यावरील बंदिस्त शेड यास इ.म.न.पा. मालमत्ता क्र. २/२७२ ने नोंद असलेली यातील सोयीसह शेड जागा मिळकत सर्व. यासी चतु:सिमा - पुर्वेस सरकारी रस्ता (पंचगंगा नदीकडे जाणारा), पश्चिमेस-१० फुट रुंदीचा रस्ता, दक्षिणेस-लक्ष्मी देवालयाकडे जाणारा सरकारी रस्ता व उत्तरेस- १० फुट रुंदीचा रस्ता. येणेप्रमाणे चतु:सिमेतील मिळकत ही श्रीमती द्राक्षायणी सुभाष पाटील रा. कबनूर यांचे स्वसंपादीत मालकी वहिवाटीची असून ती त्यांनी आमचे मित्र यांना खरेदी देणेचे ठरवुन तसा करारपत्र ही करुन देवुन संचकार रक्कम स्विकारलेली आहे. सदर वरील मिळकत ही निर्वेध व निष्कर्जी असल्याचा निर्वाळा पाटील यांनी आमचे मित्र यांना दिलेला आहे.

सदर वरील मिळकतीवर अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा गहाण, दान, बक्षीस, करार, लेखी अगर तोंडी व्यवहार केलेला असलेस अथवा कसलाही हक्क, अधिकार, वगैरे असलेस ते त्यांनी सात (७) दिवसाचे आत खालील पत्त्यावर अस्सल कागदपत्रासह समक्ष भेटुन खात्री करुन द्यावी.

सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आलेस आमचे मित्र वरील मिळकतीचा व्यवहार पुर्ण करुन घेतील म्हणून दिली जाहीर नोटीस सही. दि. २४/०९/२०२६

**श्री. भाऊसाहेब कुबेर पाटील**
(स्टॅम्प रायटर)-
पत्ता राजाराम स्टेडियम, गाळा नं. २४, इचलकरंजी
मो.नं. ९९२१६०२७००

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

**१) मिळकतीचे वर्णन :-** जि. कोल्हापुर, ता. हातकणंगले, पैकी क।। इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील मिळकतीचा जुना सि.स.नं.५९९५/अ/३१/३२ अ याचा नवीन **सि.स.नं. १२४९९** याचा टी. पी. स्कीम नं. २ फायनल **प्लॉट नं.१६/३१+३२** असून प्रापर्टी कार्डाप्रमाणे क्षेत्र २२६६ चौ. मी. यापैकी प्रत्यक्ष जागेवरील याची मोजमापे पुर्व बाजू **१४० फुट**, पश्चिम बाजू १४०फुट,दक्षिण बाजू ५२.५ फुट व उत्तर बाजू **५४.९ फुट** असे क्षेत्र **७५३.६ चौ. मी**. याचे ८१०८.७६ चौ. फुटाची खुली जागा व यामधील **५६१ चौ.मी**.ची ड प्रतिचे बांधकाम असलेली इमारत मिळकत याचा **वार्ड नं. १८ घर नं. १७४** याचा नवीन मालमत्ता **नं. १८१०००२९५** असून यामधील लाईट, पाणी कनेक्शनसह यांसी चतुः सिमा **पुर्वेस** - तारादेवी कचरुलाल बांगड व रामगोपाल लालचंद बांगड यांची मिळकत, **पश्चिमेस** - सि.स.नं. १२४९९ पैकी समाईक भिंत व श्री उदय गजानन मुरदुंडे यांची मिळकत,**दक्षिणेस**- सरकारी रस्ता, **उत्तरेस**- सरकारी रस्ता.

२) वर नमुद केलेली मिळकत ही **श्री रफिक अमजद सय्यद व सौ. नसीमबानू रफिक सय्यद, रा. सलिम कंपाऊंड दुसरा मजला १५ / अ क्रॉसलेन खेतवाडी मुंबई - ४००००४** यांचे मालकी हक्काची व कब्जे वहिवाटीची असून त्यांनी सदरची मिळकत ही निर्वेध व निष्कर्जी असलेचा निर्वाळा आमचे अशिलांना देवून संचकार दाखल रक्कम स्विकारून मिळकत नोटरी करारपत्राने विक्री करणेचे ठरले आहे. सबब, वर नमुद मिळकतीबाबत कोणाचाही हक्क दावा, पोटगी अर्ज, आरक्षण, तारणगहाणदस्त अगर इतर कोणत्याही प्रकारची हरकत असलेस त्यांनी सदरची जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ **(सात)** दिवसाचे आंत खाली नमुद केले पत्यावर लेखी कळवावे. म्हणून दिली जाहीर नोटीस ता. २३/०९/२०२६ इ.रोजीचे.

**ॲड.सुनिल सु.धुपदाळे**
रा.१७/२९४,पुजारी मळा, राजमाता नगर, इचलकरंजी
मो.नं. ९३२६०२२३८५

## जाहीर नोटीस

१) मिळकतीचे वर्णन - जिल्हा व तुकडी कोल्हापूर, पोट तुकडी हातकणंगले पैकी मे. सह. दुय्यम निबंधकसो, वर्ग - २ इचलकरंजी यांचे अधिकार कक्षेतील नव्याने इचलकरंजी महानगरपालीका हद्दीत समाविष्ट झालेली मुळची शहापूर येथील क.ग.नंबर ३८ पैकी बिगरशेती प्लॉट नं. बी/३ याचा सि.स.नं. १८६२५/B३ याची फुटात मोजमापे पुर्व बाजू १३.१९ मी., पश्चिम बाजु १३.१८ मी., दक्षिण बाजु ७.५८ मी., उत्तर बाजु ७.५८ मी. असे एकुण क्षेत्र ९९.९८ चौ.मी. म्हणजेच १०७५.७८ चौ. फुटाची बिगरशेती झालेली खुली जागा मिळकत. यासी चतुः सिमा - पुर्वेस : सदर गट नंबर पैकी प्लॉट नं. ४ ची मिळकत, पश्चिमेस : सदर गट नंबर पैकी प्लॉट नं. २ ची मिळकत, दक्षिणेस : सदर गट नंबर पैकी प्लॉट नं. २७ ची श्री. कुबेर मगदुम वगैरे यांची मिळकत, उत्तरेस : ६ मीटर रुंदीचा रस्ता.

२. येणेप्रमाणे वर कलम १ मध्ये वर्णन केलेली मिळकत ही श्री. संजीवकुमार योगेंद्र साहू, रा. बावणे गल्ली, इचलकरंजी यांचे मालकी व कब्जा वहिवाटीची असुन त्यांनी सदरची मिळकत निर्वेध व निष्कर्जी असल्याचा निर्वाळा आमचे अशिलांना देवून, सदरची मिळकत आमचे अशिलांना कायम खुष खरेदी देणेचे ठरवले आहे व कराराद्वारे संचकारादाखल भरघोस रक्कमही स्विकारली आहे. त्याप्रमाणे आमचे अशिल लवकरच खरेदीपत्र पुर्ण करुन घेणार आहेत.

सबब, सदर मिळकतीवर कोणाचेही तारण गहाण, कब्जा, पोटगी, वहिवाट, कुळ, वहिवाट, दान, चालु दावा, ॲटेचमेंट, खरेदी, करार, इजमेंट अगर इतर कोणतेही कायदेशिर हक्क संबंध असलेस ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ (सात) दिवसांचे आत अस्सल कागदपत्रांसह आमचे खालील पत्त्यावर प्रत्यक्ष भेटून आपल्या हक्काचा खुलासा करावा. मुदतीत कोणाची हरकत न आलेस सदर मिळकत निर्वेध व निष्कर्जी असलेचे समजुन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील नंतर कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही. म्हणून दिली जाहीर नोटीस सही ता. २४/०९/२०२६.

**ॲड. जी. पी. कोल्हापूरे** (नोटरी)
रा.७/२५०/८ सिंधूभवन, मेनरोड, इचलकरंजी - ४१६११५,
मोबा. ९८५०१०४२७३

## जाहीर इशारा

तमाम लोकांना कळवणे करीता आमचे अशिल श्रीमती रेणुका अशोक सुतार, रा- इचलकरंजी यांनी दिले माहितीवरून व दाखविले कागदपत्रावरुन त्यांचे सांगणेवरून जाहीर इशारा प्रसिध्द करण्यात येतो की,

अ)मिळकतीचे वर्णन:ता.हातकणंगले. जि. कोल्हापूर पैकी कसबा इचलकरंजी म.न.पा. हद्दीतील सि.स.नं. १७७९२ या वरील सिध्दी रेसीडेन्सी या इमारतीमधील पहिल्या मजल्यावरील सदनिका क्र. १०४ याचे बिल्टअप क्षेत्र ६९.२३ चौ.मी.ची मिळकत यासी षष्ठसिमाः-पूर्वेस अपार्टमेंटचे कंपाऊंड, पश्चिमेस-स.क्र. १०१ व अपार्टमेंटचे कंपाऊंड, दक्षिणेस-अपार्टमेंटचे कंपाऊंड व रस्ता, उत्तरेस - स.क्र. १०१ व जिना, वर - स.क्र. २०४, खाली-पार्किंग.

ब) जि. व तु. कोल्हापूर, ता. हातकणंगले पैकी मौजे तारदाळ येथील क.ग.नं. २०९ क्षेत्र हे. २.१८पैकी गुंठेवारी बिगरशेती भूखंड क्र.२४ याचे क्षेत्र २५० चौ. मी. यासी चतु:सिमा पूर्वेस:- भू.क्र. २५,पश्चिमेस :- भू.क्र. २३, दक्षिणेस:- मुस्लिम सोसायटीची मिळकत, उत्तरेस:- रस्ता.

क) जि.व तु.कोल्हापूर, ता. शिरोळ पैकी मौजे यड्राव येथील क.ग.नं.४७३/अ/१/९ क्षेत्र हे. ३.४६.६० आरची बिगरशेती प्लॉट मिळकत यासी चतु:सिमा पूर्वेस गट नं. ४७३/अ/ब, पश्चिमेस-प्लॉट नं.८, दक्षिणेस- रस्ता, उत्तरेस- प्लॉट नं.६.

ड) जि.व तु.कोल्हापूर, ता.हातकणंगले पैकी मौजे तारदाळ येथील क.ग.नं. ३२१ क्षेत्र हे. ३.७५ पैकी औद्योगिक बिगरशेती तु.नं. ५क याचे क्षेत्र ८९.७० चौ. मी. यासी चतुः सिमा पूर्वेस :- न.म.पैकी उर्वरीत मिळकत, पश्चिमेसः - रस्ता, दक्षिणेस :- तु.नं. ५ब, उत्तरेस :- तु.नं. ६अ.

इ) जि.व तु.कोल्हापूर, ता. हातकणंगले पैकी इचलकरंजी म.न.पा. हद्दीतील रि.स.नं. ६४० हि. क्र. २ पैकी गुंठेवारी भूखंड क्र. १, क्षेत्र १०२ चौ.मी.ची मिळकत यांसी चतुः सिमा पूर्वेस :- भू.क्र. २ व ३ची मिळकत, पश्चिमेस, दक्षिणेस व उत्तरेस :-रस्ता

ई)जि.व तु.कोल्हापूर,ता.हातकणंगले पैकी इचलकरंजी म.न.पा. हद्दीतील रि.स.नं. ६४० हि.क्र.२पैकी गुंठेवारी भूखंड क्र. २ व ३ मधील अविभाज्य समाईक हिस्सेचे क्षेत्र ३७.५५ चौ. मी. यांसी चतु:सिमा पूर्वेस :- श्री.अतिग्रे यांची मिळकत, पश्चिमेस:- श्री. संतोष सुतार यांची मिळकत, दक्षिणेस व उत्तरेस :-रस्ता.

उ)जि.व तु.कोल्हापूर, ता. हातकणंगले पैकी इचलकरंजी म.न.पा. हद्दीतील शहापूर येथील क.ग.नं. १७७ क्षेत्र हे. १.०५आर, याचा सि.स.नं. १८५५३/अ या मिळकतीवरील जिजामाता पार्क या निवासी इमारतीमधील

१) विंग ए इमारतीमधील सातव्या मजल्यावरील स.क्र. ७०६ याचे क्षेत्र ५२.३९ चौ. मी. ची सदनिका. २) विंग ए इमारतीमधील सातव्या मजल्यावरील स.क्र. ७०२याचे क्षेत्र ३३.१३ चौ. मी. ची सदनिका.

ऊ) जि.बेळगांवी,ता.चिक्कोडी, पैकी मौजे चिंचणी गावचे हद्दीतील प्लॉट नं.८९ याचा संगणीकृत मिळकत क्र.१५०४००४०६५००३२०२५२असा नमूद असून चिंचणी ग्राम पंचायत मिळकत क्र.१८२९याचे क्षेत्र १५७.५३ चौ.मी. ची खुलीजागा यासी चतु:सिमा पूर्वेस- रि.स.नं.४७२, पश्चिमेस- रस्ता, उत्तरेस-प्लॉट नं.८८, दक्षिणेस- रस्ता.

येणेप्रमाणे कलम अ ते ऊ मध्ये नमुद स्थावर मिळकती या संतोष अशोक सुतार यांच्या मालकी, कब्जे वहिवाटीच्या तसेच रजि.करारपत्राने घेवू केलेले मिळकती आहेत. **संतोष अशोक सुतार हे दि.** १७/७/२०२६ इ.रोजी मयत झाले असून त्यांना आमच्या अशिल **श्रीमती रेणुका अशोक सुतार, पुजा संतोष सुतार, श्रध्दा व मान्यता संतोष सुतार** असे जवळचे, सरळ व कायदेशीर वारस आहेत. अशी वस्तुस्थिती असताना आमच्या अशिल श्रीमती रेणुका अशोक सुतार यांचा उपरोक्त मिळकतीतील वारसा हक्क व हिस्सा डावलून **पुजा संतोष सुतार** या मिळकती परस्पर विक्री, तबदिली अगर त्यावर कर्ज बोजे निर्माण करणेच्या तसेच त्रयस्थांचे हितसंबंध निर्माण करणेच्या प्रयत्नात असलेचे आमचे अशिलांस खात्रीलायकरित्या समजून आले आहे.

सबब या जाहीर इशाऱ्याने कळविणेत येते की, वर नमूद मिळकतीत आमचे अशिलांचा हक्क व हिस्सा असलेने त्यांचे अपरोक्ष वर नमुद मिळकतींबाबत कोणीही, कसल्याही प्रकारचे तबदिलीचे व्यवहार करू नयेत. याउपर काही व्यवहार केलेस ते आमचे अशिलांचे मिळकतीतील हक्क व हिस्स्यावर बंधनकारक राहणार नाहीत. कोणाचीही फसगत होऊ नये करीता प्रस्तूत जाहीर इशारा प्रसिध्द केला आहे. ता. २४/९/ २०२६.

**ॲड. सचिन दामोदर सवदी**
बी. ए., एलएल.बी.
महालक्ष्मी पसायदान अपार्टमेंट, गावभाग,
हरी मंदिर समोर, इचलकरंजी-४१६ ११५
मो.नं. ९०७५००४०८१

# महिलांनी कुटूंबाच्या सर्वांगिण विकासासाठी प्रयत्न करावेत

## सोनाली माडकर; कोलीक येथे सेवा योजना सप्ताह उत्साहात

बाजार भोगाव,ता.२४(प्रतिनिधी)-

**महिलांनी आपल्या आरोग्याकडे लक्ष देऊन पौष्टिक आहार घेणे गरजेचे आहे. आई सुदृढ राहिली तरच मुले आणि कुटुंबही सुदृढ राहील. प्रत्येक घरातील महिलेने बचत गटाच्या चळवळीशी जोडून घेऊन आर्थिक सक्षमतेबरोबरच कुटुंबाच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करावेत, असे प्रतिपादन पन्हाळा पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी सोनाली माडकर यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभारी सरपंच दीपक पाटील हे होते.**

महिलांचे आरोग्य, कुटुंबाचे हित, आर्थिक स्वावलंबन आणि गावातील स्वच्छता या सर्व बाबींना एकत्रितपणे प्रोत्साहन देणारा एकात्मिक बाल विकास प्रकल्पांतर्गत सेवा योजना सप्ताह कोलीक, (ता.पन्हाळा) येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. प्रशासनाच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमातून



**कोलीक - पाक कृती स्पर्धेतील विजेत्या महिलांना प्रशस्तीपत्रक देताना गटविकास अधिकारी सोनाली माडकर शेजारी दीपक पाटील,सुमन जाधव व इतर.**

महिलांना आरोग्य, पोषण, बचत गट आणि विविध शासकीय योजनांची माहिती देत विकासाच्या मुख्य प्रवाहात सहभागी होण्यासाठी प्रेरणा देण्यात आली.

शासन विविध लोककल्याणकारी योजना राबवत असून त्याचा लाभ प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत पोहोचणे महत्त्वाचे असल्याचे माडकर यांनी सांगितले. प्रत्येक कुटुंबाने सोलर लॅम्प योजनेचा लाभ घेण्यासाठी महावितरणकडे अर्ज करावा, असे आवाहन त्यांनी केले.कार्यक्रमाची सुरुवात सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून झाली.

पर्यवेक्षिका तेजस्विनी टिपुगडे यांनी प्रास्ताविक केले. पाककृती व रांगोळी स्पर्धेत सहभागी झालेल्या महिलांना प्रशस्तिपत्रक व शिल्ड देऊन गटविकास अधिकारी सोनाली माडकर व मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. ग्रामपंचायतीच्या वतीने सोनाली माडकर यांचा सत्कार करण्यात आला.ग्रा.पं. अधिकारी सुशांत चौगुले यांनी स्वागत केले.

यावेळी सुमन जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली सेविका नीता सुतार, गंगुताई पाटील, सुनीता दशवत,अर्चना कांबळे, पल्लवी गावडे, पूजा गुरव, सुनीता गबाळे, मालुबाई पवार यांच्यासह बाजारभोगाव अंतर्गत २७ अंगणवाडी सेविका व मदतनीस, आशा कर्मचारी व ग्रामपंचायत गावकर्यांनी हा कार्यक्रम यशस्वी करणेसाठी विशेष योगदान दिले.

# गणेशवाडीतील गणेशोत्सवाला ऐतिहासिक वारसा

बुबनाळ, ता. २४ (अनिल जासुद) -

**गणेशवाडी (ता.शिरोळ) येथील गणेशोत्सवाला स्वांतत्र्यपूर्व,ऐतिहासिक वारसा लाभला आहे.सन १९२३ मध्ये स्थापन झालेल्या श्री सार्वजनिक गणेशोत्सव संस्थेला यावर्षी १०३ पूर्ण झाली.**

सन १९१६ चा काळ.सारा देश स्वांतत्र्यांच्या चळवळीने पेटून उठला होता.अशावेळी देव,देश अन धर्माची शिकवण देण्यासाठी गणेशवाडीत लोकसेवा संघ वाचनालय व व्यायामशाळा स्थापन झाली. सन १९१७ मध्ये येथे टिळकांची मोठी सभा झाली. अदांजे तीन हजाराहून अधिक लोक या सभेस उपस्थित होते.यावेळी गणेशवाडीकरांनी स्वातंत्र्य चळवळीला १५० रुपयांची देणगीही दिली.या भेटीत लोकमान्य टिळकांनी लोकसेवा संघास गणेशोत्सवाची प्रेरणा दिली.यावेळी संघाचे अध्यक्ष श्रीपाद मास्तर मराठे यांच्या पुढाकाराने वाचनालयाच्या कार्यालयात गणेशवाडीत पहिला गणेशोत्सव साजरा झाला.तीन- चार वर्षे संघामध्ये गणेशोत्सव साजरा झाला. सन १९२३ मध्ये गणेशवाडीत याला व्यापक स्वरुप प्राप्त व्हावे, स्वातंत्र्य चळवळीला बळ मिळावे,स्वांतत्र्यांच्या प्रेरणेने गावातील युवक एकत्र यावेत यासाठी हा

**संस्थेच्या ''श्रीं''ची मुर्ती ही पर्यावरणपुरक शाडुच्या मातीपासून बनविलेली असते.''श्रीं''चे आगमन व विसर्जन हे पालखीतुनच केले जाते.यामुळे पारंपरिकतेचा वारसा आजही जपला जात आहे.**

**-बळवंत गोरवाडे**

उत्सव सार्वजनिक करण्यात आला.१९२३ मध्ये गावातील मुख्य चौकात गणेशोत्सव हा श्री सार्वजनिक गणेशोत्सव संस्थेच्या नावे सुरु करण्यात आला.अल्पावधीतच या उत्सवास भव्य स्वरुप प्राप्त झाले.१९५० ते १९८० च्या दशकात विविध सामाजिक,कौटुबिंक नाटकांनी हा उत्सव वेगळ्याच उत्तुंग अशा ऊंचीवर नेऊन ठेवला.

अॅड.राघवेंद्र गोरवाडे,आप्पासाहेब गावडे,चिंतामणी भट आणि संस्थेचे सर्व कार्यकर्ते त्याच वेळच्या प्रेरणेने राष्ट्रीय सेवेची भावना जोपासत उत्साहात आजही पारंपरिक पद्धतीने गणेशोत्सव साजरा करीत आहेत. पहिला गणेशोत्सव ज्या मखरात साजरा झाला.ते मखर लोकसेवा संघाने आजही सुस्थितीत जतन करुन ठेवले आहे.

गणेशोत्सवानिमित्त गावातील सुमारे २५ गणेशोत्सव मंडळे स्वागत कमानीच्या माध्यमातुन विविध सामाजिक संदेश देत देव,देश आणि धर्मसेवेचे कार्य निष्ठेने बजावत आहेत.



रिक्रेशन हॉलजवळील गल्लीत साठलेले कचऱ्याचे ढीग.

## रिक्रेशन हॉल परिसरात कचऱ्याचे साम्राज्य

इचलकरंजी,ता.२४-

**येथील मंगळवार पेठ, रिक्रेशन हॉलजवळील गल्लीत इतर ठिकाणांहून कचरा आणून टाकल्याने कचऱ्याचे मोठे ढीग निर्माण झाले आहे जणू त्या जागेला नागरिकांनी कचऱ्याचा डेपोच बनवला आहे.तरी महानगरपालिकेने तातडीने कचऱ्याचा उठाव करून परिसर स्वच्छ करावा,अशी मागणी नागरिकांतून होत आहे.**

हा कचरा सुंदरबाग जवळील हातगाडे, खानावळ गल्ली व इतर भोजनालय आणि इतर गल्लीतून आणून रिक्रेशन हॉलजवळील गल्लीत टाकला जातो.याच कचऱ्यातून भटक्या कुत्र्यांचा प्रादूर्भाव वाढला आहे.नागरिकांना कचऱ्यातून वाट काढत ये-जा करावी लागते. एकीकडे स्वच्छतेच्या नावाखाली मोठे मोठे दावे केले जातात तर दुसरीकडे गल्लीतील कचऱ्याचे ढीग प्रशासनाच्या कारभारची पोल खोल करत आहेत.नागरिकांकडून वारंवार तक्रारी करूनही परिस्थितीत सुधारणा होत नसेल तर जबाबदारी नेमकी कोणाची ? असा सवाल उपस्थित केला जात असून महानगरपालिकेने तातडीने कचरा उठाव करावा, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

# चरणच्या पीएमश्री विद्यामंदिरात शिक्षकांची त्वरित नियुक्ती करा

## ..अन्यथा सोमवारी शाळेला टाळे;अमरसिंह पाटील यांचा शिक्षण विभागाला इशारा

सरूड,ता.२४(प्रतिनिधी)-

**शाहूवाडी तालुक्यातील चरण येथील पीएमश्री विद्यामंदिरमध्ये इयत्ता सहावी व सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी आवश्यक असणाऱ्या पदवीधर शिक्षकांची तातडीने नियुक्ती करावी अथवा पर्यायी व्यवस्था करावी, अशी जोरदार मागणी जिल्हा परिषद सदस्य अमरसिंह हंबीरराव पाटील यांनी केली आहे. या संदर्भात २८ सप्टेंबरपर्यंत ठोस निर्णय न झाल्यास शाळा बंद आंदोलन करून शाळेला टाळे ठोकण्याचा इशारा त्यांनी शिक्षण विभागाला दिला आहे.**

या संदर्भात जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षणाधिकाऱ्यांना देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, चरण येथील पीएमश्री विद्यामंदिरातील पदवीधर अध्यापक शिवाजी केशव पाटील यांची मुख्याध्यापक पदावर पदोन्नती होऊन मार्च २०२५ मध्ये बदली झाली. त्यानंतर विषय शिक्षिका कविता शंकर मगदूम यांचीही ऑक्टोबर २०२५ मध्ये बदली झाली. मात्र, या दोन महत्त्वाच्या शिक्षकांच्या बदलीनंतर इयत्ता सहावी व सातवीच्या वर्गांवरील अध्यापनासाठी अद्याप एकाही शिक्षकाची नियुक्ती करण्यात आलेली नाही.

**पटसंख्या घटतेय, पालक गोळा करतायत वर्गणी!**

निवेदनात शाळेच्या घसरत्या पटसंख्येबाबत चिंता व्यक्त करण्यात आली आहे. शाळेची पटसंख्या २०२२-२३ मध्ये २०५ होती, ती २०२३-२४ मध्ये १७८,२०२४-२५ मध्ये १५८ आणि चालू शैक्षणिक वर्षात (२०२५-२६) थेट १२९ वर आली आहे. पटसंख्या वेगाने घटत असताना दुसरीकडे आवश्यक शिक्षकच उपलब्ध नसल्याने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भविष्यावर अत्यंत प्रतिकूल परिणाम होत आहे. विद्यार्थ्यांना मुलभूत शैक्षणिक सुविधा व शिक्षक उपलब्ध करून देणे ही प्रशासनाची मुख्य जबाबदारी आहे. परंतु, प्रशासन सुस्त असल्याने गावातील पालक व ग्रामस्थांना स्वतः वर्गणी गोळा करून दोन खाजगी शिक्षकांची व्यवस्था करावी लागत असल्याचा गंभीर आरोप अमरसिंह पाटील यांनी निवेदनाद्वारे केला आहे.प्रशासनाने या बाबीची तत्काळ दखल घेऊन २८ सप्टेंबरपर्यंत येथे कायमस्वरूपी किंवा पर्यायी शिक्षकांची नियुक्ती करावी ;अन्यथा ग्रामस्थ व पालकांच्या साथीने शाळा बंद आंदोलन छेडून शाळेला टाळे ठोकले जाईल, असा इशारा पाटील यांनी दिला आहे.

# आपटे वाचन मंदिरतर्फे सोमवारी शिक्षक गौरव पुरस्कार वितरण

इचलकरंजी,ता.२४-

**आपटे वाचन मंदिर इचलकरंजीच्यावतीने दिले जाणारे प्रतिष्ठेचे व सन्मानाचे शिक्षक गौरव पुरस्कार वितरण सोहळा सोमवार ता.२८ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजता ग्रंथालयाच्या बजाज सभागृहात होणार असून प्रा.डॉ.केदार मारूलकर, विभाग प्रमुख, कॉमर्स आणि मॅनेजमेंट,शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर यांच्या शुभहस्ते शिक्षकांचा सत्कार संपन्न होणार आहे.**

या पुरस्कारामध्ये बालवाडी विभाग-सौ.लता चौगुले,(श्री शांतीनाथ बाल विद्यामंदिर, इचलकरंजी), प्राथमिक विभाग- सौ.वर्षा निशाणकर ( सौ.गंगामाई विद्यामंदिर, इचलकरंजी),माध्यमिक विभाग-डॉ.राहुल कुलकर्णी (गोविंदराव हाय. व ज्यु. कॉलेज, इचलकरंजी),कनिष्ठ महाविद्यालय प्रा.सौ.हेमांगी वडेर (श्री आण्णासाहेब डांगे महाविद्यालय, हातकणंगले),महाविद्यालय विभाग- प्रा.डॉ.विनायक गायकवाड (डी.के.टी.ई. टेक्स्टाईल व इंजिनिअरींग इन्स्टिटयूट, इचलकरंजी) यांचा समावेश आहे. तरी या समारंभास सर्वांनी उपस्थित रहावे,असे ग्रंथालयाच्यावतीने कळविणेत येत आहे.



## बँक ऑफ बडोदा व बरंच काही फौंडेशनकडून महापालिकेला साहित्याची भेट

कोल्हापूर,ता.२४(प्रतिनिधी)-

**शहरातील बँक ऑफ बडोदा व बरंच काही फौंडेशनच्यावतीने कोल्हापूर महानगरपालिकेला १३७ एलईडी दिवे, ५ एलईडी स्क्रीन व २० संगणक संच असे सुमारे १२ लाख रुपये किमतीचे साहित्य सीएसआरच्या माध्यमातून देण्यात आले.**

या साहित्याचा लोकार्पण व हस्तांतरण कार्यक्रम पार पडला. बँक ऑफ बडोदाचे रिजनल हेड प्रकाश जाधव व बरंच काही फौंडेशनचे संस्थापक अध्यक्ष संदीप संकपाळ यांनी सदर साहित्य आयुक्त डॉ. राजेंद्र भारूड यांच्याकडे सुपूर्द केले.महानगरपालिकेच्या विकासकामांमध्ये सामाजिक संस्था, उद्योग व विविध आस्थापनांनी सीएसआरच्या माध्यमातून सहभागी होऊन शहराच्या विकासासाठी योगदान द्यावे असे आवाहन यावेळी आयुक्त डॉ.राजेंद्र भारुड यांनी केले आहे. यावेळी अतिरिक्त आयुक्त रविकांत आडसूळ, अतिरिक्त आयुक्त शिल्पा दरेकर,उपआयुक्त नागेंद्र मुतकेकर,सहाय्यक आयुक्त संजय सरनाईक, शहर अभियंता रमेश मस्कर,नीरज पांडे, अभिजीत खराडे, बरंच काही फौंडेशनच्या अश्विनी संकपाळ, अरविंद माने आदी उपस्थित होते.

# प्रवासादरम्यान जादा भाडे आकारल्यास तक्रार करा

कोल्हापूर,ता.२४(प्रतिनिधी)-

**प्रवाशांनी प्रवासादरम्यान जादा अथवा मनमानी भाडे आकारले जात असल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित बसचे तिकीट, वाहन क्रमांक, प्रवासाचा तपशील व आकारलेले भाडे याबाबतची माहिती, तक्रारी कार्यालयाचा व्हॉट्सअॅप क्रमांक ९४२३०१२१३४ तसेच** e-mail- rto.09-mh@mah.gov.in **वर नोंदवाव्यात, असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी मनोज ओतारी यांनी केले आहे.**

१३ ते २० सप्टेंबर या कालावधीत एकूण २३७ बसेस तपासण्यात आल्या. यापैकी ६६ वाहने दोषी आढळली तर ८ वाहने जादा भाडेप्रकरणी आढळून आल्या. २३७ वाहनांना जादा भाडे न आकारण्याबाबत सूचना देण्यात आल्या. सहा. प्रादेशिक परिवहन अधिकारी तसेच वायुवेग पथकांमध्ये कार्यरत मोटार वाहन निरीक्षक व सहा.मोटार वाहन निरीक्षक यांनी किणी टोल नाका येथे खासगी प्रवासी बसेसची विशेष तपासणी मोहीम राबविली.या तपासणी मोहिमेमध्ये १९० बसेसची तपासणी करण्यात आली. यामध्ये ५७ वाहने दोषी आढळली तर २ वाहने जादा भाडे आकारल्याप्रकरणी आढळून आली. यासबंधी १९० वाहनांना जादा भाडे न आकारण्याच्या सूचना देण्यात आल्या.

# राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून जीवनाची नवी दिशा गवसते-यलगुद्रे

जयसिंगपूर,ता.२४(प्रतिनिधी)-

**श्रीमती गंगाबाई खिवराज घोडावत कन्या महाविद्यालय, जयसिंगपूर येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने राष्ट्रीय सेवा योजना दिन उत्साहात साजरा करण्यात आला.**

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व राष्ट्रीय सेवा योजना गीताने झाली. महाविद्यालयाचे प्रो. डॉ. पी. एस. वाघमारे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले.यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून



**जयसिंगपूर येथे आयोजित कार्यक्रमात बोलताना डॉ.यलगुद्रे.**

डॉ.आर.एस.यलगुद्रे (लोकनेते प्रा.शरद पाटील महाविद्यालय, मिरज) यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्त्व, स्वयंसेवकांची सामाजिक जबाबदारी आणि समाजसेवेतीलची भूमिका याबाबत मार्गदर्शन राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून जीवनाची नवी दिशा गवसते असे सांगितले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रकाश पाटील यांनी अध्यक्षीय मनोगतात विद्यार्थिनींनी समाजाप्रती संवेदनशील राहून राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रमांत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन केले.आभार प्रो.डॉ.जी. एस. चव्हाण यांनी मानले. याप्रसंगी डॉ.उमाजी पाटील, डॉ.शिवप्रसाद शेटे उपस्थित होते. कार्यक्रमास एनएसएस स्वयंसेविका, व महाविद्यालयातील कर्मचारी उपस्थित होते.

श्रीहरी
शुक्रवार, ता. २५/०९/२०२६ पासून
रोज २ खेळ, दु. १ व ४ वा.
मस्त रोमँटीक हिंदी चित्र
सुहागरात की कहानी
A खुली खिडकी ७ वा. प्रौढांसाठी

श्रीदत्त
शुक्रवार, ता. २५ पासून
रोज ४ खेळ १*४*७ व १० वाजता
मस्त रोमँटीक इंग्रजी चित्रपट
फॅन्टसम
A शहरात प्रथमच * फक्त प्रौढांसाठी A


















# परतीच्या पावसाने ओढ दिल्याने शेतकरी चिंतातूर

## चांदोली परिसरातील चित्र; भाताचे उत्पादन घटण्याची शक्यता

चरण,ता.२४(वार्ताहर)-

**भाताचे आगार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या चांदोली (ता.शिराळा) परिसरात परतीच्या पावसाने पाठ फिरवल्याने शेतकरी चिंतेत सापडला आहे. अतिवृष्टीमध्येही तग धरून राहणारे प्रमुख पीक म्हणून भातशेतीकडे पाहिले जाते.मात्र यंदा सुरुवातीच्या काळात समाधानकारक पाऊस झाल्यानंतर ऐन लोंबी येण्याच्या आणि तांदूळ भरण्याच्या काळात पावसाने ओढ दिल्याने भात पिकाच्या उत्पादनावर मोठा परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.**

चांदोली परिसरातील डोंगराळ, माळरान तसेच पावसावर अवलंबून असलेल्या शेतजमिनींमध्ये मोठ्या प्रमाणात भाताची लागवड केली जाते. या भागातील शेतकऱ्यांच्या खरीप हंगामाचे मोठे गणित भात पिकाभोवती फिरते. त्यामुळे सध्या पावसाने घेतलेली विश्रांती शेतकऱ्यांसाठी चिंतेचा विषय ठरली आहे.भात पीक साधारणपणे १२० ते १४० दिवसांमध्ये तयार होते. या संपूर्ण कालावधीत पिकाच्या वाढीच्या विविध टप्प्यांवर पाण्याची आवश्यकता असते. विशेषतः पेरणी, लावणी, रोपांची वाढ, लोंबी येणे आणि दाणे भरणे या टप्प्यांमध्ये पावसाची मोठी गरज भासते.

यंदा सुरुवातीला मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्याने भात पिकाने पहिल्या तीन टप्प्यांत चांगला जोर धरला. पेरणीच्या काळात पाऊस मिळाला, त्यानंतर लावणीच्या वेळीही पाण्याची कमतरता भासली नाही. रोपे लागल्यानंतर त्यांना तग धरण्यासाठी आवश्यक असलेला पाऊसही चांगला झाला. त्यामुळे यंदा भाताचे उत्पादन चांगले येईल, अशी शेतकऱ्यांना अपेक्षा निर्माण झाली होती. मात्र त्यानंतर पावसाने ओढ दिल्याने परिस्थिती बदलली आहे. सध्या भात पीक लोंबी येण्याच्या टप्प्यावर आहे. काही ठिकाणी लोंबी बाहेर पडण्यास सुरुवात झाली असून हळव्या जातीच्या भाताला लोंबी आली असली तरी त्यामध्ये तांदूळ भरण्याचे प्रमाण अत्यंत कमी असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.



चांदोली परिसरात भाताच्या लोंबीमध्ये दाणे भरण्यास सुरुवात झाल्याने शेतकरी पावसाच्या प्रतिक्षेत आहेत.

### माळरानावरील भातशेती सर्वाधिक धोक्यात?

चांदोली परिसरातील डोंगराळ आणि माळरान भागात मोठ्या प्रमाणात भाताची लागवड केली जाते. या भागातील अनेक शेतजमिनींना सिंचनाची कायमस्वरूपी सुविधा उपलब्ध नसल्याने शेतकऱ्यांना पूर्णपणे पावसावर अवलंबून राहावे लागते. पावसाची सुरुवात चांगली झाल्याने शेतकऱ्यांनी भातशेतीची मशागत, पेरणी,लावणी आणि इतर कामांसाठी मोठा खर्च केला. आता पीक उत्पादनाच्या अंतिम टप्प्याकडे जात असताना पावसाने साथ सोडल्याने शेतकऱ्यांच्या वर्षभराच्या मेहनतीवर संकट आले आहे.

### पाऊस न पडल्यास उत्पादनावर मोठा परिणाम?

भात पीक सध्या अत्यंत महत्त्वाच्या टप्प्यात आहे. लोंबी बाहेर पडल्यानंतर त्यामध्ये दाणे भरण्याची प्रक्रिया सुरू होते. या काळात पाण्याची कमतरता निर्माण झाल्यास दाणे पूर्णपणे न भरणे, दाण्यांचे वजन कमी होणे आणि एकूण उत्पादनात घट होण्याची शक्यता असते.त्यामुळे आता परतीचा पाऊस पडतो की नाही, यावर चांदोली परिसरातील भातशेतीचे पुढील चित्र मोठ्या प्रमाणात अवलंबून आहे. आणखी पावसाची ओढ कायम राहिल्यास भात उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता शेतकरी व्यक्त करीत आहेत.कृषी विभागाने चांदोली परिसरातील डोंगराळ व माळरान भागातील भात पिकांची प्रत्यक्ष पाहणी करून सद्यस्थितीचा आढावा घ्यावा आणि पावसाअभावी संभाव्य नुकसानाची नोंद घ्यावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

> **भाताला सध्या लोंबी येण्याचा आणि दाणे भरण्याचा महत्त्वाचा काळ आहे. पावसाने अशीच ओढ दिली तर लोंबीमध्ये दाणे व्यवस्थित भरणार नाहीत आणि उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता आहे. त्यामुळे आता परतीच्या पावसाची प्रतीक्षा आहे.**
>
> **-मारुती पाटील, शेतकरी**



सातारा : मानाची ढाल देऊन विजेत्या मंडळांना सन्मानित करताना ना.शिवेंद्रसिंहराजे भोसले.

# सुंदर गणेश मूर्ती स्पर्धेतील विजेत्यांचा साताऱ्यात सन्मान

सातारा,ता.२४(प्रतिनिधी)-

**कलर्स सोशल फाउंडेशन सातारा, निर्मिती प्रतिष्ठान व रंगप्रवाह नाट्यसंस्थेच्या वतीने गतवर्षी गणेशोत्सवात घेण्यात आलेल्या सुंदर गणेश मूर्ती स्पर्धेतील प्रथम तीन विजेत्या मंडळांना राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या हस्ते सन्मानचिन्ह स्वरूपात मानाची ढाल देऊन सन्मानित करण्यात आले.**

प्रथम तीन क्रमांकाच्या विजेत्या मंडळांमध्ये जंगीवाडा युवा प्रतिष्ठान, सातारचा उभा राजा, नवतरुण गणेश क्रीडा मंडळ या मंडळांचा समावेश होता. याप्रसंगी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष ईम्रान मोमीन, उपाध्यक्ष इरफान शेख, सचिव अमरसिंह मोकाशी, खजिनदार अरिफ शेख, रितेश नांगरे पाटील, मनीष काशीद, प्रथमेश देवकर, ऋषिकेश गंगावणे, मुकेश कुलकर्णी, आसिफ मुलानी, सादिक अंबेकरी, असद बागवान, कुमार अवघडे, अख्तर शेख, रमेश जाधव, कांताआबा जाधव, सुरेश जाधव, मंगेश सरकार, दिशान आतार, अमित काळे यांच्यासह विजेत्या मंडळांचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# कर्मवीरांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याची गरज-कदम

पलूस,ता.२४(प्रतिनिधी)-

**कर्मवीर भाऊराव पाटील यांनी ग्रामीण व सर्वसामान्य समाजातील विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षणाची गंगा पोहोचवून सामाजिक परिवर्तनाची मुहूर्तमेढ रोवली. त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक विचारांचा वारसा पुढे नेणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते तथा स्वर्गीय यशवंतराव चव्हाण स्मृती गौरव समितीचे अध्यक्ष प्रदीप कदम यांनी केले.**

पलूस येथील राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यालयात शिक्षणमहर्षी पद्मभूषण कर्मवीर भाऊराव पाटील यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी प्रदीप कदम यांच्या हस्ते कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.यावेळी सागर कदम, तुकाराम धायगुडे, आमिर पठाण, तुषार सूर्यवंशी, राहुल पाटील यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# श्री विठ्ठल व श्री रुक्मिणी मातेच्या मूर्ती संवर्धनाचे काम प्रगतीपथावर

पंढरपूर,ता.२४(प्रतिनिधी)-

**येथील श्री विठ्ठल व श्री रुक्मिणी मातेच्या मूर्तींचे दीर्घकालीन जतन, संरक्षण व संवर्धन करण्याच्या दृष्टीने भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण व राज्य पुरातत्त्व विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली संवर्धनाचे काम सुरू करण्यात आले असून सदर काम सध्या प्रगतीपथावर आहे, अशी माहिती मंदिरे समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.**

भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण, छत्रपती संभाजीनगर यांच्या तज्ज्ञ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली मूर्तींच्या प्रत्यक्ष संवर्धन प्रक्रियेस सुरुवात करण्यात आली आहे. संवर्धनाच्या प्राथमिक टप्प्यात मूर्तींची शास्त्रीय पद्धतीने संपूर्ण स्वच्छता करण्यात आली असून, त्यानंतर आवश्यक तांत्रिक प्रक्रियेनुसार मूर्तींवर संरक्षक आवरण देण्याचे काम करण्यात येणार आहे. संपूर्ण प्रक्रियेत मूर्तींच्या प्राचीन स्वरूपास, पावित्र्यास अथवा धार्मिक परंपरांना कोणतीही बाधा निर्माण होणार नाही, याची विशेष काळजी घेण्यात येत आहे. मूर्ती संवर्धनाच्या संपूर्ण प्रक्रियेदरम्यान श्रींच्या मंदिराचे पावित्र्य, धार्मिक परंपरा व सुरक्षा यांना सर्वोच्च प्राधान्य देण्यात येत आहे. संबंधित पुरातत्त्व तज्ज्ञ, अधिकारी व मंदिर समितीच्या समन्वयाने प्रत्येक प्रक्रिया काळजीपूर्वक पार पाडली जात आहे. मूर्ती संवर्धनाचे काम दि. २५ सप्टेंबरपर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन असून, त्यानंतर दि. २६ सप्टेंबरपासून श्री विठ्ठल व श्री रुक्मिणी मातेचे दर्शन भाविकांसाठी पूर्ववत सुरू करण्यात येणार आहे, असे कार्यकारी अधिकारी श्रीकांत यादव यांनी सांगीतले.

# जिल्हा बँकेसाठी राजकीय हालचाली गतिमान

सांगली,ता.२४(प्रतिनिधी)-

**सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीसाठी चर्चेच्या फेऱ्या सुरू झाल्या असून भाजपने या निवडणुकीसाठी स्वतंत्र पॅनेलचा निर्णय घेतला आहे. सत्ताधारी गट सर्वांना सोबत घेण्याच्या पावित्र्यात दिसत आहे. त्यादृष्टीने चर्चा, बैठका होत असून या निवडणुकीत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची शिवसेना आणि अजितदादा पवार यांची राष्ट्रवादी ही महाविकास आघाडीसोबत जाण्याची शक्यता आहे.या पक्षांनी प्रत्येकी तीन जागांची मागणी केली असून नेमका काय निर्णय होणार याकडे लक्ष लागून आहे.**

जिल्हा बँकेच्या निवडणुकीचा बिगूल वाजला असून गुरूवारपासून उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. १ नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. निवडणूक जाहीर होताच जिल्ह्यातील राजकीय हालचाली गतिमान झाल्या आहेत. ही निवडणूक पक्षीय पातळीवर होत नसली तरी भाजपा विरोधात सर्व पक्ष असे समीकरण जुळण्याची शक्यता दिसून येत आहे. निवडणुकीसाठी आघाडीच्या नेत्यांनी बैठकांचा धडाका लावला आहे.मागील सत्तेत असलेल्या शिवसेना एकनाथ शिंदे आणि अजितदादांच्या राष्ट्रवादीला पॅनेलमध्ये घेण्याच्या हालचाली सुरू असून तशी स्वतंत्र चर्चा त्यांच्या नेत्यांबरोबर केली आहे.



### भाजपा विरोधात सर्वपक्षीय निवडणुकीची शक्यता

दोनच दिवसापूर्वी सांगलीमध्ये राष्ट्रवादी अजित पवार पक्षाच्या नेत्यांबरोबर आमदार जयंत पाटील, आमदार डॉ विश्वजित कदम, खास. विशाल पाटील यांनी जागा वाटपावर चर्चा केली. यावेळी राष्ट्रवादीकडून माजी आमदार विलासराव जगताप, अजितराव घोरपडे आदी नेते उपस्थित होते. त्यांनी तीन जागांची मागणी केल्याचे सांगण्यात आले. त्यानंतर आघाडीतील नेत्यांनी दुसऱ्या दिवशी शिवसेना शिंदे गटातील नेत्यांबरोबर चर्चा केली. या बैठकीला आम.सुहास बाबर, विद्यमान संचालक तानाजी पाटील आदी उपस्थित होते. मागीलवेळी तीन जागांची मागणी असताना दोन जागा मिळाल्या, त्यामुळे यावेळी तरी तीन जागा द्याव्यात, अशी आग्रही मागणी सेनेने केल्याचे सांगण्यात आले. आता आघाडीचे नेते महायुतीतील घटक पक्ष असलेले सेना आणि अजितदादांच्या राष्ट्रवादीला नेमक्या किती जागा देतात याकडे लक्ष आहे.



सोसायटीचे चेअरमन सर्जेराव तांबवेकर, मार्गदर्शक विराज शिंदे यांचे अभिनंदन करताना आ.जयंतराव पाटील,बाजूस मान्यवर.

# स्व.गुलाबराव पाटील पुरस्काराने शंकरराव शिंदे सोसायटीचा गौरव

आष्टा,ता.२४(प्रतिनिधी)-

**सांगली जिल्हा मध्य. सह. बँक व स्व. गुलाबराव पाटील प्रतिष्ठान, सांगली यांच्या वतीने आयोजित कार्यक्रमात आष्टा येथील शंकरराव शिंदे उत्तर भाग सोसायटीला 'सहकार तपस्वी स्व. गुलाबराव पाटील पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या स्व. वसंतदादा पाटील सभागृहात पुरस्कार वितरण कार्यक्रम उत्साहात पार पडला.**

यावेळी बँकेचे चेअरमन मानसिंगराव नाईक, व्हा. चेअरमन जयश्रीताई पाटील,आ.जयंतराव पाटील,आ.सत्यजित देशमुख, संचालक वैभव शिंदे, जगन्नाथ बसुगडे व मान्यवर उपस्थित होते.सलग तीन वर्षे मेंबर पातळीवर शंभर टक्के कर्जवसुली केल्याबद्दल आष्टा येथील स्व.शंकरराव शिंदे उत्तर भाग सेवा सह. सोसायटीस पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले.या कार्यक्रमानंतर आमदार जयंत पाटील यांच्या हस्ते सोसायटीचे मार्गदर्शक तथा नगरसेवक विराज शिंदे, सर्जेराव तांबेकर यांच्यासह सर्व संचालकांचा सत्कार करण्यात आला. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल सभासद, संचालक मंडळ व हितचिंतकांकडून अभिनंदन करण्यात येत आहे.

# येडेनिपाणीच्या विकासासाठी प्रयत्नशील राहू

## सत्यजित देशमुख

शिराळा,ता.२४(प्रतिनिधी)-

**ग्रामपंचायतीचे कामकाज अधिक सक्षम होण्यासाठी ग्रामसचिवालय, नागरिकांच्या आरोग्यासाठी खुली व्यायामशाळा व वसुंधरा उद्यान, तसेच विद्यार्थ्यांसाठी शाळेतील आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर दिला जात आहे. येडेनिपाणीच्या विकासासाठी आवश्यक असलेल्या कामांचा सातत्याने पाठपुरावा करून ती पूर्ण करण्यासाठी प्रयत्नशील राहू, असे प्रतिपादन आमदार सत्यजित देशमुख यांनी केले.**

आमदार सत्यजित देशमुख यांच्या प्रयत्नातून येडेनिपाणी येथे मा.बाळासाहेब ठाकरे स्मृती ग्रामपंचायत कार्यालय बांधणी योजनेअंतर्गत ग्रामसचिवालय इमारतीच्या बांधकामाचे वास्तू भूमिपूजन करण्यात आले. यासोबतच वसुंधरा उद्यान व खुल्या व्यायामशाळेचे तसेच जिल्हा परिषद शाळेतील स्वयंपाकघर व भोजन कक्षाचे उद्घाटन करण्यात आले.या कार्यक्रमात ते बोलत होत.

यावेळी शिवसेना नेते गौरव नायकवडी, देवराज पाटील, जिल्हा परिषद सदस्य जयराज पाटील, धैर्यशील पाटील, पंचायत समिती सदस्य नीतातार्ई पाटील, आनंदराव पाटील,नंदकुमार पाटील, गटविकास अधिकारी डॉ. आबासाहेब पवार, सरपंच शामबाला माळी, उपसरपंच किरण पाटील, सी. एच. पाटील, डॉ.प्रकाश पाटील यांच्यासह अन्य मान्यवर व ग्रामस्थ उपस्थित होते.



येडेनिपाणी येथील कार्यक्रमप्रसंगी उपस्थित आ.सत्यजित देशमुख,गौरव नायकवडी, देवराज पाटील, जयराज पाटील आदी.

# डीएलसी प्रमाणपत्र न काढल्यास पेन्शन बंद होणार

## कोरेगाव तालुक्यातील १९२१ लाभार्थ्यांना इशारा

कोरेगाव,ता.२४(वार्ताहर)-

**विशेष सहाय्य योजनेंतर्गत संजय गांधी निराधार व स्वावलंबन योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना सुरू असून, या योजनेंतर्गत कोरेगाव तालुक्यातील ७८३७ लाभार्थ्यांना पेन्शन दिली जात आहे. सदर पेन्शन डीबीटी संगणक प्रणालीद्वारे लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा होते. मात्र, पेन्शन सुरू ठेवण्यासाठी लाभार्थ्यांनी डीएलसी (डिजिटल हयात प्रमाणपत्र) काढणे आवश्यक आहे.**

तथापी कोरेगाव तालुक्यातील १९२१ लाभार्थ्यांनी अद्याप डीएलसी डिजिटल हयात प्रमाणपत्र काढलेले नसून या लाभार्थ्यांना शासनाकडून वेळोवेळी मुदतवाढ देऊनही त्यांनी प्रमाणपत्र काढलेले नसल्याचे तहसीलदार डॉ. संगमेश कोडे यांनी सांगितले.

डीएलसी डिजिटल हयात प्रमाणपत्र काढण्याबाबत सूचना यापूर्वी देण्यात आल्या आहेत. तरीही प्रमाणपत्र न काढलेल्या लाभार्थ्यांना तहसील कार्यालयामार्फत लेखी पत्र देऊन डीएलसी डिजिटल हयात प्रमाणपत्र ८ दिवसांत काढून घ्यावे, अन्यथा पेन्शन बंद करण्याबाबतची प्रक्रिया सुरू केली जाईल, असे महसूल नायब तहसीलदार सचिन कुचेकर यांनी सांगितले. कोरेगाव तालुक्यातील लाभार्थ्यांना दरमहा डीबीटी संगणक प्रणालीद्वारे पेन्शन वाटप करण्यात येते. विशेष सहाय्य योजनेंतर्गत संजय गांधी निराधार व श्रावणबाळ सेवा राज्य योजनेचे लाभार्थी वंचित राहू नयेत, यासाठी शासनाने डीएलसी डिजिटल हयात प्रमाणपत्र काढणे बंधनकारक केले आहे. त्यामुळे कोरेगाव तालुक्यातील १९२१ लाभार्थ्यांनी तातडीने डीएलसी डिजिटल हयात प्रमाणपत्र काढावे, असे आवाहन तहसीलदार डॉ. संगमेश कोडे यांनी केले आहे.

दरम्यान, कोरेगाव तालुक्यातील जे लाभार्थी येत्या ८ दिवसांत डीएलसी प्रमाणपत्र सादर करणार नाहीत, त्यांची पेन्शन बंद करण्याचा निर्णय घेण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

# कृष्णा कारखाना यशाची परंपरा कायम राखेल-डॉ.भोसले

## कृष्णा कारखान्याचा बॉयलर अग्निप्रदीपन सोहळा संपन्न

कराड,ता.२४(प्रतिनिधी)-

**यंदा दुष्काळाचे सावट आणि उसाच्या टंचाईमुळे राज्यभरातील अनेक कारखाने अवघे ६० ते ९० दिवस चालण्याची शक्यता आहे. परंतु, अशा आव्हानात्मक परिस्थितीतही सभासद शेतकरी, कामगार आणि संपूर्ण कृष्णा परिवाराला सोबत घेऊन शिस्त व पारदर्शक कारभाराच्या बळावर यशवंतराव मोहिते कृष्णा सहकारी साखर कारखाना यशाची परंपरा कायम राखेल, असा ठाम विश्वास कारखान्याचे चेअरमन डॉ.सुरेश भोसले यांनी व्यक्त केला.**

येथील यशवंतराव मोहिते कृष्णा सहकारी साखर कारखान्याच्या ६७ व्या गाळप हंगामाचा बॉयलर अग्निप्रदीपन सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. याप्रसंगी ते बोलत होते. कारखान्याचे चेअरमन डॉ. सुरेश भोसले व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. उत्तरा भोसले यांच्या हस्ते बॉयलर अग्निप्रदीपन करण्यात आले. याप्रसंगी कृष्णा विश्व विद्यापीठाचे विश्वस्त विनायक भोसले, कराड पंचायत समिती सभापती नंदाताई यादव, जि.प. सदस्य शैलजा शिंदे, प्रियांका साळुंखे, जितेंद्र पाटील,पंचायत समिती सदस्य प्रदीप पाटील, कृष्णा बँकेचे संचालक शिवाजी पाटील, नेर्लेचे सरपंच संजय पाटील आदींची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ.भोसले पुढे म्हणाले,यंदा कमी पावसामुळे ऊस लागणीच्या वाढीवर परिणाम झाला असून, त्यातच दुष्काळाच्या सावटामुळे उसाच्या वजनात घट होण्याची शक्यता आहे. साखरेचे दर काही दिवस वाढले तरी त्याचा फायदा फार काळ मिळाला नाही. सध्या शेतकरी संघटनांकडून सरकारकडे साखरेची किमान विक्री किंमत प्रति किलो ५० रुपये करण्याची मागणी केली जात आहे. वाढता वाहतूक खर्च, डिझेल आणि पीपी बॅग्जचे वाढलेले दर पाहता साखरेची किमान विक्री किंमत ४५ ते ५० रुपये मिळाल्याशिवाय ही कारखानदारी टिकणे कठीण झाले आहे.ते पुढे म्हणाले, यंदा दुष्काळामुळे उसाची वाढ झालेली नाही, तर दुसरीकडे चारा टंचाईमुळे ऊस चाऱ्यासाठी जाण्याचा धोका निर्माण झाला आहे. या संकटातून संपूर्ण साखर उद्योगाला सावरण्यासाठी किमान तीन वर्षांचा काळ लागेल. अशा कठीण परिस्थितीतही कृष्णा कारखान्याने कामगारांच्या हिताला प्राधान्य दिले. यावेळी सर्व संचालक, अधिकारी, कर्मचारी व सभासद शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रारंभी मॅनेजिंग डायरेक्टर बाजीराव सुतार यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. मान्यवरांचा सत्कार कराड तालुका साखर कामगार युनियनचे अध्यक्ष एम. के. कापूरकर यांनी केला. संचालक लिंबाजी पाटील यांनी आभार मानले. रामभाऊ सातपुते यांनी सूत्रसंचालन केले.



यशवंतराव मोहिते कृष्णा सहकारी साखर कारखान्यात बॉयलर अग्निप्रदीपन सोहळ्याप्रसंगी चेअरमन डॉ.सुरेश भोसले, सौ. उत्तरा भोसले व इतर मान्यवर.

# अन्यायकारक उपसाबंदी तातडीने रद्द करा

## कराड तालुक्यातील शेतकऱ्यांची मागणी ;अधिकाऱ्यांना निवेदन

कराड ,ता.२४(प्रतिनिधी)-

**कार्यकारी अभियंता, टेंभू उपसा सिंचन प्रकल्प व्यवस्थापन विभाग ओगलेवाडी यांनी कृष्णा कोयना नदीवरील सहकारी उपसा सिंचन संस्था व खाजगी पंपधारक शेतकऱ्यांना पाणी उपसा बंदीचे नुकतेच आदेश काढले आहेत.**

या अन्यायकारक व एकतर्फी उपसा बंदी विरोधात कराड तालुक्यातील शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने एकत्रित येऊन टेंभू उपसा प्रकल्प,ओगलेवाडी येथील कार्यालयावर जाऊन अधिकाऱ्यांना जाब विचारला तसेच यावेळी शेतकऱ्यांनी अधिकाऱ्यांना लेखी निवेदन सादर करून ताबडतोब ही अन्यायकारक उपसा बंदी रद्द करण्याची आक्रमक मागणी केली.

निवेदनात म्हटले आहे की,गेले एक महिना पावसाने दडी मारल्याने संपूर्ण राज्यातच दुष्काळ तीव्र होताना दिसत आहे. कराड तालुक्यातही पाऊस नसल्याने ऊसासहित खरीप हंगामातील सोयाबीन, भुईमूग,भात इत्यादी पिके धोक्यात आली आहेत.अशा कठीण परिस्थितीत कुठलीही पूर्वकल्पना न देता कार्यकारी अभियंता टेंभू उपसा सिंचन प्रकल्प व्यवस्थापन विभाग यांनी अचानक उपसा बंदी आदेश काढले आहेत. त्यामुळे हातातोंडाशी आलेली पिके डोळ्यादेखत जळून जाताना बघण्याची वेळ शेतकऱ्यावर आली आहे.कोयना धरणात मुबलक पाणी साठा असताना प्रशासनाच्या या नियोजनशून्य, अन्यायकारक, तुघलकी कारभारामुळे शेतकऱ्यांच्या खरीप हंगामाच्या आशा मावळल्या आहेत. तरी ही उपसा बंदी ताबडतोब रद्द करण्यात यावी, अन्यथा मोठे आंदोलन करण्यात येईल, असा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे.

यावेळी तालुक्यातील शेतकरी, सहकारी उपसा सिंचन संस्था पदाधिकारी उपस्थित होते.



अधिकाऱ्यांना निवेदन देताना कराड तालुक्यातील शेतकरी.

# कर्नाटक सरकारकडून अलमट्टी उंची वाढीसाठी भूसंपादनाला वेग

## पाणीसाठ्यात १०० टिएमसी वाढीचे उद्दिष्ट; १८४ गावातील ७५,५६३ एकर जमीन बुडणार

विजयपूर,ता.२४(दिपक शिंत्रे)-

**अलमट्टी धरणाची उंची ५१९.६० मीटरवरून ५२४.२५६ मीटरपर्यंत वाढविण्याच्या महत्त्वाकांक्षी निर्णयाने उत्तर कर्नाटकाच्या सिंचन विकासाला नवी दिशा मिळण्याचा दावा सरकारकडून केला जात आहे; मात्र या विकासाच्या केंद्रस्थानी असलेल्या शेतकऱ्यांच्या जमिनी,घरे आणि पुनर्वसनाचा प्रश्न अजूनही तितकाच गंभीर आहे. अप्पर कृष्णा प्रकल्पाच्या (UKP-३) तिसऱ्या टप्प्यात अलमट्टी जलाशयाची पातळी वाढविल्यानंतर मोठ्या क्षेत्रावर परिणाम होणार असून, बाधित शेतकऱ्यांना वेळेत आणि योग्य भरपाई मिळणे हा आता सर्वात महत्त्वाचा प्रश्न बनला आहे.**



कर्नाटक राज्य विधानसभा येथे २१ सप्टेंबर रोजी झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत(युकेपी३)अंतर्गत अलमट्टीच्या हद्दीतील १८४ गावांच्या भूसंपादन व पुनर्वसन प्रक्रियेला गती देण्याबाबत चर्चा झाली.जलसंपदा मंत्री एन. चेलुवरायस्वामी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत प्रलंबित भरपाई तातडीने देणे,भूसंपादन जलद करणे आणि बाधितांचे पुनर्वसन पूर्ण करण्यावर भर देण्यात आला. बाधित शेतकरी व कुटुंबांना विलंब न करता भरपाई देण्यावर चर्चा करण्यात आली

**विकासाचा मोठा आराखडा, पण त्याची किंमत कोण देणार?**

यूकेपी तीन अंतर्गत अलमट्टी धरणाची जलाशय पातळी ५१९.६० मीटरवरून ५२४.२५६ मीटरपर्यंत वाढविण्याचे नियोजन आहे.या वाढीमुळे सुमारे १०० टीएमसी अतिरिक्त पाणीसाठा उपलब्ध करण्याचे उद्दिष्ट आहे. संपूर्ण यूकेपी ३ साठी १,३३,८६७ एकर जमीन संपादनाची आवश्यकता असल्याचे कर्नाटक आर्थिक पाहणी अहवालात नमूद आहे.त्यापैकी अलमट्टीच्या वाढीव पातळीमुळे बुडणाऱ्या क्षेत्रासाठी ७५,५६३ एकर जमीन आणि १८८ गावांचा प्रकल्पीय अंदाज अधिकृत अहवालात नमूद आहे.

मात्र,अलीकडील बैठकीच्या वृत्तांमध्ये १८४ गावांच्या भूसंपादन प्रक्रियेला प्राधान्य देण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे. त्यामुळे १८४ आणि १८८ या आकड्यांतील फरकाचा अधिकृत गावनिहाय तपशील शासनाकडून स्पष्ट होणे आवश्यक आहे.

**७९ गावांमध्ये प्रक्रिया सुरू**

उपलब्ध वृत्तानुसार १८४ बुडीतग्रस्त गावांपैकी ७९ गावांमध्ये विविध टप्प्यांवर भूसंपादन प्रक्रिया सुरू आहे.आणखी ८७ गावांमध्ये अधिसूचना आणि पूरबाधित स्थितीचा विचार करून पुढील प्रक्रिया करण्याचे नियोजन असल्याचे बैठकीत सांगण्यात आले.उर्वरित गावांचा टप्प्याटप्प्याने विचार केला जाणार आहे.

सरकारने भूसंपादनाला गती देण्याचा निर्णय घेतला असला तरी बाधित शेतकऱ्यांसाठी खरा प्रश्न आहे तो भरपाईची रक्कम प्रत्यक्ष खात्यात कधी जमा होणार?

**एकरी ४० लाखांपर्यंत भरपाई**

यूकेपी-३ साठी सरकारने भूसंपादनाच्या भरपाईचे दर मोठ्या प्रमाणात वाढविले आहेत.अधिकृत आर्थिक पाहणी अहवालानुसार बुडीत क्षेत्रातील भात/सिंचन जमीन एकरी ४० लाख रू तर कोरडवाहू जमीन एकरी रू ३० रू लाख या दराने संपादन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. कालव्यांसाठी स्वतंत्र दर निश्चित करण्यात आले आहेत.

पूर्वीच्या एकरी रू २ लाखांच्या तुलनेत ही मोठी वाढ आहे.मात्र दर वाढविण्याचा निर्णय आणि प्रत्यक्ष भरपाईचे वितरण या दोन वेगळ्या बाबी आहेत. शेतकऱ्यांना शासनाच्या निर्णयाचा प्रत्यक्ष लाभ मिळण्यासाठी कागदपत्रांची पूर्तता, भूसंपादन प्रक्रिया आणि निधी वितरण या सर्व टप्प्यांना गती मिळणे आवश्यक आहे.

**७१ हजार एकर जमीन अजूनही प्रलंबित?**

२१ सप्टेंबरच्या बैठकीनंतर प्रसिद्ध झालेल्या वृत्तानुसार, १८ गावांचे भूसंपादन पूर्ण झाले असून उर्वरित १६६ गावांतील सुमारे ७१,२८४ एकर जमीन संपादनाची प्रक्रिया बाकी असल्याचे नमूद करण्यात आले आहे.यातील काही प्रकरणे न्यायालयात प्रलंबित असून ती लोकअदालतीच्या माध्यमातून निकाली काढण्याचे प्रयत्न सुरू असल्याचेही वृत्त आहे.

भूसंपादनाच्या वादांमुळे प्रक्रिया लांबण्याचे चित्र काही न्यायालयीन प्रकरणांतही दिसते. विजयपूर जिल्ह्यात यूकेपीच्या विशेष भूसंपादन अधिकाऱ्यांविरुद्ध भरपाईसंबंधी अनेक प्रकरणे न्यायालयात प्रलंबित असल्याच्या नोंद आहे.

**१,१०० घरांचा प्रश्नही गंभीर**

बागलकोट शहराच्या किल्ला परिसरातील सुमारे १,१०० घरांचे स्थलांतर हा यूकेपी-३मधील आणखी एक संवेदनशील विषय आहे.या कुटुंबांना बागलकोट नवनगर युनिट-२ किंवा युनिट-३ मध्ये योग्य निवासी भूखंड उपलब्ध करून देण्याबाबत बैठकीत चर्चा झाली. पुनर्वसनाला विलंब होऊ नये,यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आल्याचे वृत्त आहे.

घर गमावणाऱ्या कुटुंबांसाठी केवळ भूखंड देणे पुरेसे नसून रस्ते, पाणी, वीज, शाळा,आरोग्य सुविधा,उपजीविकेची साधने आणि सामाजिक पुनर्वसन या सर्व बाबींचा विचार करणे आवश्यक आहे.

**शासनासमोर दुहेरी जबाबदारी**

युकेपी-३ हा केवळ धरणाची उंची वाढविण्याचा प्रकल्प नाही. त्यामागे मोठ्या प्रमाणावर सिंचन, पाणी साठवण, कालवा व्यवस्था आणि उत्तर कर्नाटकाच्या विकासाचा आराखडा आहे.कर्नाटक आर्थिक पाहणी अहवालानुसार यूकेपी-३ अंतर्गत ग्रामीण व शहरी मिळून मोठ्या संख्येने कुटुंबे प्रकल्पामुळे प्रभावित होणार आहेत. त्यामुळे शासनासमोर एकाच वेळी दोन जबाबदाऱ्या आहेत. एकीकडे प्रकल्पाला वेळेत गती देणे आणि दुसरीकडे जमीन गमावणाऱ्या प्रत्येक कुटुंबाला न्याय देणे.

**विकासाच्या बदल्यात विस्थापन नको; न्याय्य पुनर्वसन हवे**

अलमट्टीच्या वाढीव पाणीसाठ्यामुळे हजारो एकर जमीन आणि अनेक गावांवर परिणाम होणार असेल, तर या प्रकल्पाचा लाभ आणि त्याची किंमत यांचा समतोल साधणे गरजेचे आहे.

शेतकऱ्यांसाठी जमीन म्हणजे केवळ मालमत्ता नसून त्यांच्या कुटुंबाचा उत्पन्नाचा स्रोत आहे. त्यामुळे बाजारभाव, शासनाने निश्चित केलेली भरपाई, पीक व सिंचनाची स्थिती, घरांचे मूल्य, झाडे, विहिरी आणि इतर मालमत्ता यांचा योग्य विचार करून भरपाई देणे महत्त्वाचे आहे.

त्याचबरोबर पुनर्वसनाची प्रक्रिया कागदावर पूर्ण न करता प्रत्यक्ष सुविधा उपलब्ध करून देणे गरजेचे आहे.

**आता प्रतीक्षा निर्णयाची नव्हे, अंमलबजावणीची**

युकेपी-३ ला गती देण्याचा निर्णय झाला आहे.भरपाईचे वाढीव दर निश्चित झाले आहेत.भूसंपादन प्रक्रियेला प्राधान्य देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. मात्र बाधितांच्या दृष्टीने पुढील प्रश्न स्पष्ट आहे

**''जमीन जाणार आहे हे निश्चित झाले; मग भरपाई आणि पुनर्वसन कधी?''**

या प्रश्नाचे उत्तर शासनाच्या पुढील कार्यवाहीतून मिळणार आहे.गावनिहाय भू संपादनाचे वेळापत्रक,पात्र लाभार्थ्यांची यादी, निधी वितरणाची तारीख आणि पुनर्वसनाच्या ठिकाणी उपलब्ध होणाऱ्या सुविधा यांची माहिती सार्वजनिक केल्यास या प्रक्रियेत अधिक पारदर्शकता येऊ शकते. अलमट्टीची उंची वाढेल, पाणीसाठा वाढेल, सिंचनाचा विस्तार होईल; पण या विकासाच्या प्रवाहात जमीन गमावणाऱ्या शेतकऱ्यांच्या हक्कांचा प्रश्न मागे राहता कामा नये.






चंदुर-पाच ट्रॅक्टर व आठ ट्रॉलीमधून विविध जिवंत देखावे सादर करणारी चांदणी चौक गणेश मंडळाची विसर्जन मिरवणुक.

## चंदुरमध्ये अनोख्या गणेश विसर्जन मिरवणुकीत जिवंत देखावे सादर

चंदुर,ता.२४(वार्ताहर)-

**येथील न्यू चांदणी चौक गणेशोत्सव मंडळाने पाच ट्रॅक्टर व आठ ट्रॉलीच्या माध्यमातून प्रत्येक वाहनांमध्ये वेगवेगळे असे जिवंत देखावे सादर करून अनोखी विसर्जन मिरवणूक काढली.प्रामुख्याने या मिरवणुकीमध्ये शेतकरी आत्महत्या,जिल्हा परिषदेच्या मराठी शाळा वाचवणेसाठीचे प्रयत्न, ऐतिहासिक पावनखिंड देखावा,ग्रामदैवत श्री महासिद्ध देवस्थान पालखी उत्सव सोहळा,वासुदेव ,कडकलक्ष्मी, (पोतराज), कुस्ती सारखे खेळ ,ग्रामदैवतांची सासन काठी नाचविणे यांचे जिवंत देखावे सादर करण्यात आले.**

ही विसर्जन मिरवणूक डॉल्बी मुक्त आणि फटाके मुक्त अशी पर्यावरण पूरक काढण्यात आली होती. गावातील सर्व महिला व पुरुष मंडळी यांनी हिरीरीने या मिरवणुकीमध्ये सहभाग दर्शवला. या पारंपारिक मिरवणुकीचे संपूर्ण पंचक्रोशीमध्ये कौतुक होत आहे. गतवर्षी सुद्धा या मंडळाने आषाढी वारी संपूर्ण दर्शन सोहळा हा देखावा सादर केला होता त्यास गणराया अवॉर्ड प्राप्त झाला होता. मंडळाच्या सर्व कार्यकर्त्यांनीहे देखावे सादर केले.या संपूर्ण विसर्जन मिरवणुकीचे नियोजन मंडळाचे अध्यक्ष राजू पाटील,उपाध्यक्ष मुकुंद घोडके, शितल गुरव,स्वप्निल माने आणि सर्व कार्यकर्ते यांनी केले. मिरवणुकीचे सूत्रसंचालन प्रा. रघुनाथ शिरढोणे यांनी केले.

## निवडणुक आचारसंहितेची काटेकोर अंमलबजावणी करा-शीतल उगले

कोल्हापूर,ता.२४(प्रतिनिधी)-

**पुणे विभाग पदवीधर आणि शिक्षक मतदार संघाच्या निवडणुकीत आदर्श आचार संहितेची काटेकोरपणे अंमलबजावणी जिल्हा निवडणूक प्रशासनाने करावी; पाचही जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या हद्दीतील राजकीय पक्षांचे, आचारसंहितेचा भंग होईल असे जाहिरात फलक, मालमत्ता विरूपण कायद्याचे उल्लंघन करणारे होर्डिंग्ज, भित्तीपत्रके, भिंतींवरील मजकूर तत्काळ काढण्याचे निर्देश निवडणूक निर्णय अधिकारी तथा विभागीय आयुक्त शीतल तेली-उगले यांनी पुणे येथे एका बैठकीत बोलतांना दिले.**

पुणे,सातारा,सोलापूर,कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातील जिल्हाधिकारी, महानगरपालिका आयुक्त, पोलीस आयुक्त , जिल्हा पोलीस अधीक्षक आदींची बैठक दूरदृष्यप्रणालीद्वारे श्रीमती तेली-उगले यांच्या अध्यक्षतेखाली विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी त्यांनी हे निर्देश दिले. यावेळी आयुक्तालयाच्या सामान्य प्रशासन विभागाचे अतिरिक्त आयुक्त तुषार ठोंबरे यांच्यासह संबंधित जिल्ह्यांतील अधिकारी उपस्थित होते. आचार संहितेच्या अनुषंगाने 'काय करावे, काय करू नये?' आदी सूचनांचे पालन व्हावे यासाठी सर्व शासकीय यंत्रणांना सूचना द्याव्यात, असेही त्यांनी सांगितले.

# उसाच्या दुसऱ्या हप्त्यासाठी शेतकरी आक्रमक

## राजू शेट्टींच्या नेतृत्वाखाली लढा तीव्र करण्याचा निर्धार

दौलत हलकर्णी,ता.२४(प्रतिनिधी)

**वाढलेल्या साखर व उपपदार्थांच्या दराच्या पार्श्वभूमीवर मागील गळीत हंगामातील ऊस दराचा दुसरा हप्ता प्रतिटन ३०० रुपये मिळावा, तसेच साखरेचा किमान भाव ५० रुपये प्रतिकिलो करावा, या प्रमुख मागण्यांसाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेने आंदोलनाची धार अधिक तीव्र करण्याचा निर्धार केला आहे.**

या मागण्यांसाठी केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी यांच्या हुबळी येथील निवासस्थानासमोर होणाऱ्या आंदोलनाची तसेच १० ऑक्टोबर रोजी जयसिंगपूर येथे होणाऱ्या ऊस परिषदेसाठी शेतकऱ्यांना निमंत्रण देण्यासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष तथा माजी खासदार राजू शेट्टी यांच्या प्रमुख उपस्थितीत बुधवारी चंदगड तालुक्यातील पाटणे फाटा येथे जाहिर सभा संपन्न झाली.



पाटणे फाटा येथील जाहिर सभेत आंदोलनासाठी वज्रमुठ दाखविताना राजू शेट्टी व स्वाभिमानीचे पदाधिकारी.

सभेपूर्वीच परिसरात शेतकऱ्यांची मोठी गर्दी झाली होती.ऊस दर,साखर व उपपदार्थांच्या वाढलेल्या बाजारभावाचा शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळावा,यासाठी एकजुटीने आवाज उठविण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

प्रास्ताविक करताना स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष प्रा. दिपक पाटील यांनी शेतकऱ्यांनी संघटित होऊन साखर कारखान्यांकडे आपल्या हक्काच्या दराची मागणी करणे गरजेचे असल्याचे सांगितले.

बेळगाव तालुका अध्यक्ष परशराम पाटील, चंदगड पंचायत समितीचे माजी सभापती जगन्नाथ हुलजी, शिवसेना बांधकाम सेनेचे महाराष्ट्र अध्यक्ष प्रशांत अनगुडे यांनी शेतकऱ्यांचा आवाज बुलंद करण्यासाठी राजू शेट्टी यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याचे आवाहन केले.

स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे राज्याध्यक्ष राजेंद्र गड्ड्याणावर यांनी ऊस उत्पादकांच्या प्रश्नांवर आक्रमक भूमिका मांडत शेतकऱ्यांच्या मागण्या मान्य झाल्याशिवाय साखर कारखाने सुरू होऊ देणार नसल्याचा इशारा दिला. सभेत बोलताना राजू शेट्टी यांनी 'जयसिंगपूरला जे ठरवतो, ते करून दाखवतो, ही परंपरा कायम ठेवायची आहे,' असे सांगत साखर उद्योगाशी संबंधित केंद्र सरकारच्या आयात-निर्यात धोरणाचा ऊस दरावर होणारा परिणाम स्पष्ट केला. देशातील साखर उत्पादन, उपलब्ध साठा आणि आगामी गळीत हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना योग्य ऊस दर मिळण्यासाठी केंद्र सरकारने योग्य धोरण स्वीकारण्याची गरज असल्याचे त्यांनी मांडले.

केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी यांच्या हुबळी येथील घरासमोरील आंदोलन आणि १० ऑक्टोबर रोजी जयसिंगपूर येथे होणाऱ्या ऊस परिषदेला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. तालुका संघाचे उपाध्यक्ष तानाजी गडकरी, सुरेश रेगडे, शंकर मनवाडकर, विष्णु गावडे, बेळगांव तालुका अध्यक्ष परशराम पाटील तसेच चंदगड व सिमाभागातुन आलेले शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पर्यावरणपूरक गणपती विसर्जन करावे-अनिसची मागणी

कोल्हापूर,ता.२४(प्रतिनिधी)

**पर्यावरण पुरक गणपती विसर्जन न करणाऱ्या सार्वजनिक मंडळे,संघटना व व्यक्तींच्यावर कडक कारवाई करावी अशी मागणी अंधश्रध्दा निर्मूलन समितीने जिल्हा पोलीस उपाधीक्षक राजेंद्र म्हस्केयांच्याकडेनिवेदनाव्दारेकेली.**

यावेळी अंधश्रध्दा निर्मुलन संस्थेचे अध्यक्ष व कोल्हापूर कॅन्सर सेंटरचे प्रमुख डॉ. सुरज पवार यांनी सांगितले की,पर्यावरण पुरक गणपती विसर्जन न केल्यास धोकादायक पाण्यामुळे कॅन्सरचे प्रमाण वाढते. यावेळी जिल्हा उपाधीक्षक राजेंद्र म्हस्के आपण अशीच जनजागृती करावी त्यासाठी पोलीस खात्यामार्फत योग्य ते सहकार्य मिळेल अशी ग्वाही दिली. यावेळी संस्थेचे रमेश वडणगेकर,गीता हसुरकर, प्रशांत गोंधळी, उपाध्याक अनिल टावेकर,दत्तात्रय लवेकर, प्रमोद सनदी,शकील देसाई, अभिजीत दुर्गे, सुनिल गायकवाड, अशोक मानकर आदी उपस्थित होते.

# कुंथूगिरी डोंगरात वाघ चौरा वनस्पतीचा शोध

## संशोधनाची आंतरराष्ट्रीय पातळीवर दखल; दुष्काळी भागात प्रथमच दिसले अस्तित्व

हातकणंगले,ता.२४ (आनंदा काशीद)

**आळते (ता .हातकणंगले येथील ) कुंथूगिरी डोंगराच्या शुष्क-अवर्षणीय परिसंस्थेत, सांगलीतील निसर्ग अभ्यासकांना वाघ चौरा (शास्त्रीय नाव) ही भूई-आमरी वनस्पती प्रथमच आढळली आहे.या संबंधीची माहिती सार्क देशांतील वनस्पती व प्राणी संशोधनातील शास्त्रीय लिखाण प्रकाशित करणाऱ्या झुज प्रिंट या नामांकित नियत कालिकात नुकतीच प्रसिध्द झाली आहे.**

रोहन पाटील (बॉटनी फॉर पिपल्स असोसिएशन) आणि सांगलीच्या नॅकॉन्स संस्थेचे वन्यअभ्यासक अमोल जाधव, विशाल कोठावळे,प्रज्योत हंचनाळे यांनी संयुक्तपणे नुकतीच ही नोंद केली.

देवराई अभ्यासक रोहन पाटील सांगली, कोल्हापूर जंगल भागात नागरीक आणि विद्यार्थ्यांसाठी वनस्पती ओळख कार्यक्रम घेतात. विद्यार्थ्यांना वनस्पती शास्त्राची माहिती व्हावी हा या मागचा हेतू असतो.

सप्टेंबर महिन्यात हातकणंगले तालुक्यातील कुंथूगिरी जवळील डोंगराळ भागात घेतलेल्या या वनस्पती ओळख कार्यक्रमात,सांगलीतील वन्यजीव अभ्यासक अमोल जाधव,विशाल कोठावळे, प्रज्योत हंचनाळे यांना वाघचौरा हा भूआमरी प्रकार दिसला.त्यांनी लगेच तो पाटील यांना दाखवला. त्यानंतर व्यवस्थित खात्री करून या भूआमरीच्या नवीन वन-भौगोलिक प्रदेशातील प्रथम आढळल्याची माहिती पाटील यांनी झूजप्रिंट या नामांकित नियत कालिकाला पाठवली.

यासाठी जळगाव येथील प्रसिध्द वनस्पती तज्ञ डॉ. दिलीपकुमार उंदीरवाडे यांनी रोहन पाटील यांना सखोल मार्गदर्शन केले.



**वाघचौरा ही सदाहरित व निमसदाहरित वनात आढळणारी भूईआमरी प्रजाती आहे. मात्र क्वचितच तो शुष्क-अवर्षणग्रस्त पर्जन्य छायेच्या परिसंस्थेत दिसतो.एरवी तो कोल्हापूर-सांगली-सातारा जिल्ह्यातील पश्चिम घाटातील सदाहरित जंगलात आढळतो मात्र हातकणंगले तालुक्यातील पूर्वेकडील दुष्काळी-अवर्षणी परिसंस्थेत पश्चिम घाटापासून बऱ्याच बाजूला याचे सापडणे यातून हा भाग वनस्पती वैविध्याने सर्वगुणसंपन्न आणि प्रदुषणमुक्त आहे हेच दिसून येते.**



हातकणंगले तालुक्यातील कुंथूगिरी डोंगरात शुष्क परिसंस्थेत नव्याने आढळलेला वाघ चौरा भूईआमरीचा नवा प्रकार

डॉ. अपर्णा वाटवे यांनीही प्रकाशनासाठी महत्वाचे मार्गदर्शन केले. झूजप्रिंट हे सार्क देशांतील वनस्पती व प्राणी संशोधनातील शास्त्रीय लिखाण प्रकाशित करते. या नियतकालिकात सदर शोध प्रकाशित होणे ही सांगलीसाठी आणि कुंथूगिरीसाठी अभिमानाची गोष्ट ठरली आहे. डॉ.पतंगराव कदम महाविद्यालय सांगलीवाडी(सांगली) यांनी महत्वाच्या संदर्भ पुस्तकांची उपलब्धता करून दिली. नेचर कॉंझर्वेशन सोसायटी (नॅकॉन्स)चे अध्यक्ष तबरेज खान, घोडावत इंटरनॅशनल स्कूलचे शिक्षक गोपाल गायकवाड, बीना ईनामदार यांचे देखील यात सक्रीय सहकार्य मिळाले.

वाघ चौरा हे जमिनीवर उगवणारे मोठ्या आकाराचे भू - ऑर्किड( भूईआमरी प्रकार) आहे. याच्या पाकळ्यांचा भाग वाघाच्या नाका-मिशीजवळील भागासारखा दिसत असल्याने याला वाघ चौरा असे नाव पडले आहे.उघड्या, मध्यम डोंगर उतारावर झुडुपांमध्ये हे उगवते.दरवर्षी जूनमध्ये उगवण होऊन ऑक्टोबर नंतर वाळून जाते. कंदविक्री, तोड,चराई,हौशी लोक अशामुळे ही ऑर्किड प्रजाती कमी होण्याच्या मार्गावर आहे. याचा नैसर्गिक अधिवास जपणे महत्वाचे आहे.

# विद्यमान संचालकांसह आठ जणांचे अर्ज

सांगली,ता.२४ (प्रतिनिधी)–

**सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीची प्रक्रिया सुरू होताच जिल्ह्यातील सहकार क्षेत्रातील राजकीय हालचालींना वेग आला आहे. पहिल्याच दिवशी विद्यमान संचालक पृथ्विराज पाटील, वैभव शिंदे यांच्यासह आठ जणांनी विविध गटांतून उमेदवारी अर्ज दाखल केले. दरम्यान पहिल्या दिवशी २४३ उमेदवारी अर्जांची विक्री झाल्याने निवडणूक रिंगणात उतरण्यासाठी इच्छुकांची मोठी संख्या असल्याचे चित्र आहे.**

## पहिल्या दिवशी २४३ अर्जांची विक्री

पहिल्या दिवशी वैभव विलासराव शिंदे यांनी इतर शेती संस्था गटातून दोन अर्ज दाखल केले. प्रताप पंढरीनाथ पाटील यांनी प्राथमिक कृषी पतपुरवठा व विकास सेवा संस्था गटातून उमेदवारी अर्ज दाखल केला. पृथ्विराज गुलाबराव पाटील यांनी नागरी सहकारी बँका व पतसंस्था गटातून दोन अर्ज दाखल केले. याच गटातून सुनील नारायण पाटील यांनीही अर्ज दाखल केला. तसेच सतीश सयाजीराव देशमुख आणि सुनील शामराव जाधव-पाटील यांनी 'क-४' गटातून उमेदवारी अर्ज दाखल केले.

पहिल्याच दिवशी मोठ्या प्रमाणावर अर्जांची विक्री झाल्याने आगामी काळात उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी मोठी गर्दी होण्याची शक्यता आहे. विविध सहकारी संस्था, शेती संस्था, नागरी सहकारी बँका व पतसंस्था तसेच इतर मतदारसंघांमध्ये इच्छुकांकडून मोर्चेबांधणी सुरू झाली आहे. जिल्हा बँकेच्या निवडणुकीत प्रत्येक मतदारसंघाचे स्वतंत्र राजकीय गणित असल्याने संभाव्य उमेदवारांकडून आपापल्या गटातील संस्थांशी संपर्क वाढविण्यावर भर दिला जात आहे. प्रमुख राजकीय गटांकडून अधिकृत उमेदवार निश्चित करण्याची प्रक्रिया सुरू असतानाच अनेक इच्छुकांनी स्वतंत्रपणे अर्ज घेण्यास सुरुवात केली आहे.

पहिल्याच दिवशी २४३ अर्जांची विक्री झाल्याने प्रत्यक्षात किती उमेदवार निवडणूक रिंगणात उतरतात, याकडे आता लक्ष लागले आहे. अर्ज दाखल करण्याची मुदत संपल्यानंतर छाननी आणि माघारीच्या टप्प्यात अंतिम चित्र स्पष्ट होणार आहे. त्यामुळे सध्या अर्जविक्रीची मोठी संख्या असली तरी अंतिम लढतीतील उमेदवारांची संख्या त्यापेक्षा वेगळी असण्याची शक्यता आहे. दरम्यान, जिल्हा बँकेच्या निवडणुकीच्या निमित्ताने सहकार क्षेत्रातील जुन्या समीकरणांना नव्याने आकार देण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. कोणत्या गटातून कोणाला उमेदवारी मिळते, कोण माघार घेतो आणि कोणत्या उमेदवारांना प्रमुख राजकीय गटांचा पाठिंबा मिळतो, यावर आगामी निवडणुकीचे चित्र अवलंबून राहणार आहे. पहिल्याच दिवशी अर्ज दाखल होण्यास सुरुवात झाल्याने जिल्हा बँकेच्या निवडणुकीची औपचारिक रणधुमाळी सुरू झाली असून, पुढील काही दिवसांत उमेदवारी अर्जांबरोबरच राजकीय हालचालींनाही आणखी वेग येण्याची शक्यता आहे.

# राजारामबापू कारखाना बायोगॅस निर्मिती प्रकल्प उभा करणार

## –आम.जयंत पाटील

ईश्वरपूर,ता.२४ (प्रतिनिधी)

**साखर उद्योगामध्ये प्रेसमडपासून गॅस निर्मिती करणाऱ्या बायोगॅस निर्मिती प्रकल्पास चांगले भवितव्य आहे. प्रकल्पास शासन अनुदान मिळत असून गॅसला चांगला दरही मिळत आहे. राजारामबापू सहकारी साखर कारखाना निश्चित पणे बायोगॅस निर्मिती प्रकल्प उभा करेल,असा विश्वास माजी मंत्री आ.जयंतराव पाटील यांनी व्यक्त केला.**



राजारामबापू कारखान्याच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत बोलताना आ.जयंतराव पाटील. समवेत अध्यक्ष प्रतिकदादा पाटील,पी. आर.पाटील,रघुनाथ पाटील,प्रा.शामराव पाटील

राजारामबापू पाटील सहकारी साखर कारखानाच्या ५७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ते बोलत होते. राजारामबापू साखर कारखान्याचे अध्यक्ष प्रतिकदादा पाटील हे सभेच्या अध्यक्ष स्थानी होते. प्रारंभी लोकनेते राजारामबापू पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन व दिपप्रज्वलन शेतकरी संघटनेचे जेष्ठ नेते रघुनाथदादा पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी राज्य साखर संघाचे अध्यक्ष पी.आर.पाटील,प्रा.शामराव पाटील,उरुण ईश्वरपूर नगराध्यक्ष आनंदराव मलगुंडे, पं.स. सभापती उदयसिंह पाटील,माजी आ.भगवानराव साळुंखे,माजी जि.प.अध्यक्ष देवराज पाटील, राजारामबापू सह.बँकेचे अध्यक्ष विजयराव यादव, राजारामबापू दुध संघाचे अध्यक्ष संग्राम फडतरे, राजारामबापू कारखान्याचे उपाध्यक्ष विजयराव पाटील,प्र.कार्यकारी संचालक विजय मोरे प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी दिल्ली येथे सामाजिक उत्तर दायित्व पुरस्कार मिळाल्याबद्दल प्रतिकदादा पाटील यांचा सत्कार करण्यात आला.

आ. पाटील म्हणाले, शासनाने ७ हॉर्स पॉवर पेक्षा कमी वापर असणाऱ्या शेतकऱ्यांचे वीज बिल माफ केले आहे. त्याप्रमाणे शासनाने राज्यातील सहकारी पाणीपुरवठा संस्थांचेही वीज बिल माफ करावे,यासाठी आम्ही न्यायालयात गेलो आहे.एफ आर पी चा कायदा झाला, मात्र या कायदाने साखर कारखान्यातील ऊस दराची स्पर्धा संपली आहे. कालपरत्वे कायद्यात बदल व्हायला हवेत. शासनाने साखर विक्रीचे दर वाढवायला हवेत, अशी सूचना आम्ही केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांना भेटून केलेली आहे.

कारखान्याचे अध्यक्ष प्रतिकदादा पाटील यांनी सन २०२५-२६ मधील ऊस गाळप, साखर विक्री,आर्थिक परिस्थिती आणि सामाजिक बधिलकीतून राबविल्या जाणाऱ्या प्रकल्पासह सातत्याने ऊस पुरवठा करणाऱ्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्यासाठी काही नवे उपक्रम जाहीर केले.

यावेळी पी.आर.पाटील,रघुनाथदादा पाटील यांनी मार्गदर्शन केले. तर शंकरराव मोहिते,रविंद्र पिसाळ,लक्ष्मण पाटील,बाजीराव पाटील यांनी काही सूचना केल्या. या सभेत सर्व विषयावर खेळीमेळीच्या वातावरणात चर्चा होऊन ते एकमताने मंजूर करण्यात आले.

या सभेस बी.डी.पवार,विनायक पाटील,आष्टा उपनगराध्यक्ष दिलीपराव वग्याणी,जे.के.जाधव, माणिकराव पाटील,शशिकांत पाटील,संभाजी कचरे,भीमराव पाटील,बाळासाहेब पाटील,शहाजी पाटील,संजय पाटील, सुस्मिता जाधव,सुनिता देशमाने,प्रदीप पाटील,प्रताप मधाळे,संग्राम जाधव,देवराज देशमुख,गणेश शेवाळे तसेच विविध संस्था व कारखान्याचे आजी-माजी संचालक व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्र.कार्यकारी संचालक विजय मोरे यांनी सभा नोटीस व विषय पत्रिकेचे वाचन केले,तर सचिव डी.एम.पाटील यांनी मागील इतिवृत वाचन केले. कारखान्याचे उपाध्यक्ष विजयराव पाटील यांनी आभार मानले. संदीप तांबवेकर यांनी सूत्रसंचालन केले.



# श्री अरिहंतकडून सभासद हिताला सर्वोच्च प्राधान्य

## –चेअरमन अभिनंदन पाटील

बोरगांव,ता.२४ (प्रतिनिधी)

**आजच्या बदलत्या आर्थिक आणि तंत्रज्ञानाच्या युगात सहकार क्षेत्रासमोर अनेक आव्हाने आहेत. मात्र, विश्वास, पारदर्शकता, आधुनिक तंत्रज्ञान आणि सभासद केंद्रित सेवा या चार आधारस्तंभांवर आपल्या सोसायटीची वाटचाल असून ३६ वर्षांचा विश्वास हीच आमची खरी ताकद आणि पुढील उज्वल वाटचाल हीच आमची जबाबदारी आहे. संस्थेची आर्थिक शिस्त, पारदर्शक कारभार आणि सभासदहित यांना सर्वोच्च प्राधान्य दिले असल्याचे मत श्री अरिहंत को ऑप क्रेडिट सोसायटीचे चेअरमन अभिनंदन पाटील यांनी व्यक्त केले.**

बोरगाव येथे श्री अरिहंत को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड बोरगाव या मुख्य शाखेचा ३६ वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला.

संस्थेचे संचालक युवा नेते उत्तम पाटील म्हणाले, सोसायटीने आपल्या कार्यातून सभासदांच्या आर्थिक गरजा समजून घेत त्यांना योग्य सेवा देण्याचा सातत्याने प्रयत्न केला आहे. सोसायटीच्या माध्यमातून सभासदांना अधिक सुलभ, पारदर्शक आणि आधुनिक सेवा देण्यावर भर राहणार असल्याचे पाटील यांनी सांगितले.

याप्रसंगी सोसायटीचे उपाध्यक्ष सतीश पाटील, संचालक सुभाष शेट्टी, जयपाल नागावे, भूजगौडा पाटील, जम्बू मळवाडी, राजू मगदूम, नगराध्यक्ष दिगंबर कांबळे, संजय पाटील, पिरागौडा पाटील, संदीप पाटील, सोसायटीचे सीईओ अशोक बंकापुरे, सहाय्यक व्यवस्थापक अभय खोत,अभिनंदन बेनाडे, भरत गुंडे, कृषी संघाचे सीईओ आर.टी.चौगुले, सुरेश खोत, शांतिनाथ तेरदाळे, जीवंधर फिरगन्नावर सर्व संचालक व पदाधिकारी उपस्थित होते.

# १५ लाखांच्या थकीत करापोटी कोरोची ग्रा.पं.कडून महावितरणच्या सब-स्टेशन जप्तीचा प्रयत्न

कोरोची,ता.२४ ( वार्ताहर)

**गेल्या ११ वर्षांपासून महावितरणकडून थकीत असलेल्या सुमारे १५ लाख रुपयांच्या घरफाळा व मालमत्ता कराच्या वसुलीसाठी गुरूवारी कोरोची ग्रामपंचायतीने सब-स्टेशनची थेट जप्ती करण्यासाठी कारवाई हाती घेतली. सरपंच संतोष भोरे, ग्रामविकास अधिकारी रांझा पाटील, कर्मचारी,ग्रामपंचायत सदस्यांसह ग्रामस्थांनी सब-स्टेशनवर धडक देऊन महावितरणच्या अधिकाऱ्यांना घेराव घालत धारेवर धरले. यामुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.**


महावितरण अधिकाऱ्यांना धारेवर धरताना सरपंच संतोष भोरे यांच्यासह ग्रा.पं. सदस्य (छाया : अमित काकडे )

जलस्वराज्य पाणीपुरवठा योजनेचे थकीत वीज बिल भरण्यासाठी सणासुदीचे दिवस विचारात घेऊन वीज खंडित न करण्याची विनंती करण्यासाठी पदाधिकारी कार्यालयात गेले होते.मात्र, तेथील अधिकारी मिसाळ यांनी लोकप्रतिनिधींची बाजू न ऐकता ''बाहेर बसा, इथे थांबायचं नाही'' अशी अपमानास्पद वागणूक दिली. तसेच, आधी ६ लाख रुपये भरून घेतल्यानंतर पुन्हा १० लाख रुपयांची मागणी करत गावचा पाणीपुरवठ्याचा वीजपुरवठा खंडित केला होता. यामुळे सणासुदीच्या दिवसांत गणेश मंडळांच्या महाप्रसादावेळी व ग्रामस्थांना तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागला. ग्रामपंचायतीने महावितरणच्या सब-स्टेशनसाठी कोट्यवधी रुपयांची ५० गुंठे जमीन मोफत दिली. शेजारच्या अनेक गावांची लाखो रुपयांची वीज बिले थकीत असताना फक्त कोरोची गावालाच का टार्गेट केले जात आहें. यावेळी महावितरणच्या अधिकाऱ्यांनी ९७ हजार रुपयांचा धनादेश देऊन मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला; मात्र ग्रामपंचायतीने नाकारत संपूर्ण थकीत रक्कम एकाच वेळी भरण्याचा पवित्रा घेतला.परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन महावितरणचे कार्यकारी अभियंता वैभव गोंदिलकर व प्रसाद अवघडे यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली.ग्रामपंचायतीच्या पदाधिकाऱ्यांशी चर्चा करत पाणीपुरवठ्याबाबत उद्भवणाऱ्या कोणत्याही समस्येची वैयक्तिक जबाबदारी घेण्याचे आणि पूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.अधिकाऱ्यांच्या आश्वासनानंतर जप्तीची कारवाई तात्पुरती स्थगित करण्यात आल्याचे सरपंच भोरे यांनी सांगितले. येत्या सोमवारी गटविकास अधिकारी यांच्या उपस्थितीत विशेष बैठक बोलवण्यात आली आहे. यावेळी उपसरपंच सतीश सूर्यवंशी, ग्रा.पं. सदस्य साहेबलाल शेख, शितल पाटील, विकी माने, पूनम भोसले, वंदना शिरसाट, अमर कोरोचीकर, प्रेम आवळे, अमित कांबळे यांच्यासह ग्रामस्थ व कर्मचारी उपस्थित होते.

# राजर्षी शाहू शेतकरी समविचारीला सत्यजित पाटील यांचा पाठिंबा

सरूड,ता.२४ (प्रतिनिधी)

**गोकुळ दूध संघाच्या आगामी पंचवार्षिक निवडणुकीत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने राजर्षी शाहू शेतकरी समविचारी आघाडीला पाठिंबा देऊन त्यांच्यासोबतच निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला आहे. माजी आमदार सत्यजित पाटील-सरूडकर यांनी गुरुवारी प्रसिद्धीपत्रकाद्वारे ही महत्त्वपूर्ण घोषणा केली. विशेष म्हणजे, शाहूवाडी-पन्हाळा तालुक्यातून आपल्या कुटुंबातील कोणत्याही व्यक्तीचा अर्ज दाखल न करता सर्वसामान्य कार्यकर्त्यांना संधी देण्यात आल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.**



गोकुळ निवडणुकीसाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने यापूर्वी स्वतंत्रपणे ठराव दाखल करण्यात आले होते. मात्र, दूध उत्पादक, दूध संस्था, कामगार आणि कार्यकर्त्यांसोबत झालेल्या सविस्तर चर्चेत बहुतांश ठरावधारकांनी समविचारी आघाडीला पाठिंबा देण्याचा आग्रह धरला. दूध उत्पादक आणि संस्थांच्या व्यापक हितासाठी कार्यकर्त्यांच्या या आग्रहाचा सन्मान करत हा निर्णय घेण्यात आल्याचे सत्यजित पाटील यांनी सांगितले.

ग्रामीण भागातील दूध उत्पादक शेतकऱ्यांना उभारी देण्यात गोकुळचे मोठे योगदान आहे. सध्या या आघाडीला जिल्ह्यातून मोठा प्रतिसाद मिळत असून आगामी निवडणुकीत समविचारी आघाडीला मोठे यश मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

२९ सप्टेंबरला सरूड येथे ठरावधारकांचा मेळावा या पार्श्वभूमीवर मंगळवार, दि. २९ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता सरूड येथे शाहूवाडी तालुक्यातील ठरावधारकांचा मेळावा आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्यास आमदार सतेज पाटील, माजी आमदार सत्यजित पाटील-सरूडकर आणि तालुक्यातील प्रमुख पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

**कुटुंबाला उमेदवारी नाही; कार्यकर्त्यांना न्याय!**

शाहूवाडी-पन्हाळा तालुक्यातून आपल्या कुटुंबातील कोणालाही उमेदवारी न देता सर्वसामान्य कार्यकर्त्यांना संधी देण्यात आल्याचे सत्यजित पाटील यांनी स्पष्ट केले.

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्ष आणि माजी आमदार बाबासाहेब पाटील-सरूडकर यांच्यावर प्रेम करणाऱ्या दूध संस्था व ठरावधारकांनी कोणत्याही आमिषाला बळी न पडता ठाम पाठिंबा दिला आहे. आघाडीतील सर्व उमेदवारांच्या विजयासाठी पूर्ण ताकदीने मैदानात उतरणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# शेतकऱ्यांना विविध सुविधा देण्यावर दूध संघाचा भर

## –भूषण नाईक

शिराळा,ता.२४ (प्रतिनिधी)

**मानसिंगराव नाईक भाऊ यांच्या मार्गदर्शनाखाली लोकनेते फत्तेसिंगराव नाईक आप्पा सहकारी दूध उत्पादक संघाने सातत्याने प्रगतीची वाटचाल सुरू ठेवली असून, बदलत्या काळानुसार दूध व्यवसायात आधुनिक तंत्रज्ञान, गुणवत्तापूर्ण उत्पादन आणि शेतकऱ्यांना विविध सुविधा उपलब्ध करून देण्यावर संघाचा भर आहे, असे प्रतिपादन संघाचे तज्ञ संचालक भूषण नाईक यांनी केले.**



बिऊर येथील संघाच्या दुग्धशाळेत आयोजित ४९व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ते बोलत होते. सभेच्या अध्यक्षस्थानी संघाचे चेअरमन अमरसिंह नाईक होते. यावेळी व्हा. चेअरमन. प्रकाश धस, कार्यकारी संचालक रविंद्र यादव संचालक मंडळ, दूध संस्था व सेंटरचे प्रतिनिधी तसेच दूध उत्पादक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संचालक शिवाजी यमगर यांनी प्रास्ताविक केले. सुनील निंबाळकर यांनी सभेची नोटीस वाचन केले. संचालक बबन पाटील यांनी मनोगत व्यक्त करताना दूध उत्पादकांनी गाय दुधाबरोबरच म्हैस दुधाचे संकलन वाढविण्याचे आवाहन केले.

संघाचे जनरल मॅनेजर माणिक पवार म्हणाले,अन्न व औषध प्रशासनाच्या नियमांचे प्रभावी पालन करून स्वच्छ व निर्भेळ दूध संघास उपलब्ध करून देण्याचे आवाहन त्यांनी केले.

सभेच्या निमित्ताने जादा दूध पुरवठा करणाऱ्या संस्था, उत्तम गुणवत्तेचे दूध पुरवठा करणारे दूध उत्पादक व संस्था चालक यांचा चेअरमन अमरसिंह नाईक यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

संचालक गणेश पाटील यांनी आभार मानले.


**|| आज बाळाचा वाढदिवस ||**


चि.आदित्य राजू म्हैशाळे

**आठवा वाढदिवस**

आनंदाचे हास्य तुझ्या
सदैव ओठी राहू दे
आयुष्याच्या प्रत्येक स्पर्धेत
यश तुला मिळू दे
याच वाढदिवसाच्या शुभेच्छा..!

आजी-आजोबा, मम्मी-पप्पा,
मामा-मामी, मावशी-काका,
काका-काकी, आत्या-मामा,
परि * अथर्व * पृथ्वीराज
आर्यन * सानू * अमोल * अजित
पूनम * निखिल * ज्ञानवी

**समस्त म्हैशाळे परिवार, इचलकरंजी**


# करवीर विकास सोसायटीची वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीत



टाकवडे, ता.२४ (प्रतिनिधी)

**येथील मातृसंस्था म्हणून ओळखली जाणारी श्री करवीर सहकारी विकास सेवा सोसायटी मर्यादित टाकवडेची ८६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थेच्या हॉलमध्ये संपन्न झाली.**

स्वागत गणेश कांबळे यांनी केले. संस्थेचे जेष्ठ सभासद शंकर भाऊ भोसले यांच्या हस्ते संस्थेचे स्फूर्ती स्थान कै. साथी शंकररावजी निर्मळ यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. सभेचे अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष मानवेंद्रनाथ निर्मळ होते. अहवाल वाचन संस्थेचे क्लार्क सुनील निर्मळ यांनी केले. विषय वाचन संस्थेचे सचिव संजय मिरजकर यांनी केली. संस्थेस १६ लाख २१ हजार ६४३ रुपये इतका नफा झाला आहे. संस्थेस ऑडिट वर्ग अ आहे. संस्थेने सभासदांना १२% लाभांश दिलेला आहे. सतत अ वर्ग असणारी संस्था म्हणून करवीर सोसायटीस ओळखले जाते. यावेळी साथी शंकराव निर्मळ पतसंस्थेचे अध्यक्ष सौरभ निर्मळ, उदय झुटाळ, हुसेन शेख, विक्रम घोरपडे, मनोहर निर्मळ, सुखदेव जनवाडे, मोहन जनवाडे, गणेश कांबळे, सोपान कांबळे, सुरेश कांबळे यासह संस्थेचे सर्व संचालक सभासद हितचिंतक कर्मचारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. संस्थेचे जेष्ठ सभासद शंकर कोळी यांनी आभार मानले.


**महापारेषण**
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

**ई-निविदा नोटीस**

एसआरएम निविदा क्र. १८/२०२६-२७; **(RFX No. ७०००४१६७१)**
कोल्हापूर येथील बापट कॅम्प कार्यालय परिसरातील ईएचव्ही वाहिनी प्रकल्प उपविभाग १ व २ आणि ईएचव्ही प्रकल्प उपविभाग कार्यालयाची दुरुस्ती व संबंधित स्थापत्य कामे.
**अंदाजित रक्कम** रु. १८,४४,८४०.००, **निविदा सादर करण्याची अंतिम तारीख :** २५.०९.२०२६ (११.००) ते ०५.१०.२०२६ (११.००)
**टीप :** सदरच्या कामाची फेरनिविदा करण्याची गरज पडल्यास वृत्तपत्रांमध्ये पुन्हा प्रसिद्ध करण्यात येणार नाही. पुढील प्रक्रियेकरिता इच्छुक निविदा सादर करणाऱ्यांनी महापारेषण कंपनीच्या वेबसाईटला भेट द्यावी.
अधिक माहितीसाठी वेबसाईटला भेट द्या –
**https://srmetender.mahatransco.in** कार्यकारी अभियंता (स्था)
अउदा स्था. बांध. नि सु. विभाग, कोल्हापूर


## जाहीर प्रसिध्दीकरण

सांगली जिल्ह्यातील सर्व नागरी/ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थांना याव्दारे सुचित करण्यात येते की, नियोजित डफळापूर व्यापारी को.ऑप. क्रेडिट सोसायटी लि. डफळापूर, ता.जत, जि.सांगली या संस्थेच्या सांगली जिल्हा कार्यक्षेत्र पतसंस्था नोंदणीसाठीचा प्रस्ताव या कार्यालयास प्राप्त झालेला असून सदर संस्थेचे नोंदणी कामी कोणाचेही आक्षेप/हरकत असल्यास या कार्यालयास दिनांक ०६/१०/२०२६ रोजी पर्यंत कार्यालयीन वेळेत समक्ष उपस्थित राहून, आपले लेखी म्हणणे सादर करावे. विहित मुदतीत कोणाचे काहीही म्हणणे न आल्यास नोंदणीबाबत पुढील कार्यवाही केली जाईल याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

दिनांक –२४/०९/२०२६
स्थळ – सांगली

-- स्वाक्षरी --
(सुनिल चव्हाण)
जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, सांगली

## जिल्हा वक्फ अधिकारी कार्यालय, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, सांगली

अजिंक्य टॉवर्स, चांदणी चौक, माळी मंगल कार्यालयासमोर, विश्रामबाग, सांगली ४१६ ४१०

जा.क्र.जिवअ/सांगली/चौकशी/४९८/२०२६ दि.-२३ सप्टेंबर २०२६

**(जाहीर प्रगटन)**

उम्मीद अधिनियम १९९५ च्या कलम ६९ अन्वये वक्फ संस्थेच्या योग्य प्रशासनाकरीता योजना मंजूर करणेबाबत.

वक्फ संस्थेचे नाव व पत्ता : **दर्गा कमिटी मौजे भाळवणी, ता. खानापुर, जि. सांगली** (MSBW/SGL/३९१/२०२५)

उपरोक्त वक्फ संस्था महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळात नोंदणीकृत असुन अर्जदार मुजावर अजमुद्दीन सय्यद यांनी दिनांक २१/०९/२०२६ रोजीच्या अर्जान्वये सदर संस्थेच्या व्यवस्थापनाकरीता महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकडे प्रारुप योजना दाखल केलेली आहे. प्रारुप योजनेतील तरतूदीनुसार विश्वस्तांचा कार्यकाळ पाच वर्षांचा असून विश्वस्त् निवडीची रित सर्वसाधारण सभेत बहुमताद्वारे निवडण्यात येईल अशी आहे. योजनेमध्ये नमूद प्रस्तावित व्यवस्थापन समिती खालीलप्रमाणे आहे :-

| अ.क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| १ | मुजावर अजमुद्दीन सय्यद | अध्यक्ष |
| २ | मुजावर समीर मुनिर | उपाध्यक्ष |
| ३ | मुजावर जाफर अकबर | सचिव |
| ४ | मुजावर मोहसीन म. इलियास | खजिनदार |
| ५ | मुजावर जियाउद्दीन सादीक | सदस्य् |
| ६ | मुजावर सलीम करीम | सदस्य् |
| ७ | मुजावर शौकत कासम | सदस्य् |
| ८ | मुजावर म. इकबाल सादीक | सदस्य् |
| ९ | मुजावर फैयाज अल्लाउद्दीन | सदस्य् |
| १० | मुजावर याकुब इसहाक | सदस्य् |
| ११ | मुजावर फैयाज फकीर | सदस्य् |
| १२ | मुजावर इनायतुल्ला म्हुमलाल | सदस्य् |
| १३ | मुजावर अल्लाउद्दीन गुलाब | सदस्य् |
| १४ | मुजावर मुसा हामजेखान | सदस्य् |
| १५ | मुजावर अ. गफूर अकबर | सदस्य् |

सदर प्रारुप योजनेबाबत काही तक्रारी, आक्षेप असल्यास संबंधितांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ८ दिवसाच्या आत, जिल्हा वक्फ अधिकारी, अजिंक्य टॉवर्स, चांदणी चौक, माळी मंगलकार्यालयासमोर, विश्रामबाग, सांगली येथे आपले म्हणणे दाखल करावे.विहीत वेळेनंतर आक्षेप प्राप्त झाल्यास त्याची दखल घेण्यात येणार नाही. याची दक्षता घ्यावी.

सही/-
अब्दुल रफिक अब्दुल रशिद
जिल्हा वक्फ अधिकारी
महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, सांगली

# रोशिबिना देवीला वुशूमध्ये रौप्य

## आशियाई स्पर्धेत सलग तीन पदके जिंकणारी पहिली भारतीय खेळाडू



नागोया,ता. २४–

**भारतीय वुशू खेळाडू रोशिबिना देवी नोरमने २०२६ च्या आशियाई क्रीडा स्पर्धेत महिलांच्या ६० किलो सांडा प्रकारात रौप्य पदक जिंकले. अंतिम सामन्यात ती चीनच्या झांग शियाओयूकडून ०–२ ने पराभूत झाली. झांगने दोन्ही फेऱ्या ५–० ने जिंकून १०–० अशा फरकाने सुवर्णपदक पटकावले. पराभव होऊनही, रोशिबिनाने सलग तिसरे आशियाई क्रीडा स्पर्धेतील पदक जिंकण्याचा पराक्रम केला आहे. सलग तीन आशियाई क्रीडा स्पर्धांमध्ये वुशूमध्ये पदके जिंकणारी ती पहिली भारतीय महिला ठरली आहे.**

अंतिम सामना रोशिबिना आणि झांग शियाओयू यांच्यात अटीतटीचा होईल अशी अपेक्षा होती, पण चिनी खेळाडूने सुरुवातीपासूनच आघाडी घेतली. झांगने पहिल्या फेरीत ५–० अशी आघाडी घेतली आणि दुसऱ्या फेरीतही तीच कामगिरी कायम ठेवली. रोशिबिना ०–२ ने हरली आणि झांगने एकूण १०–० गुणांसह सुवर्णपदक जिंकले. रोशिबिनाला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले.

रोशिबिनाचे हे तिसरे आशियाई खेळांमधील पदक आहे. तिने २०१८ च्या जकार्ता–पालेमबांग आशियाई खेळांमध्ये महिलांच्या ६० किलो सांडा प्रकारात कांस्य पदक जिंकले होते.त्यानंतर तिने २०२३ च्या हांगझू आशियाई खेळांमध्ये त्याच प्रकारात रौप्य पदक जिंकले. २०२६ च्या आशियाई खेळांमध्ये रौप्य पदक जिंकले.






# नेमबाजीत मिश्र सांघिक स्किट प्रकारात भारताला पहिले पदक

नागोया,ता.२४ –

**भारतीय नेमबाज अनंतजीत सिंग नरुका आणि परिनाझ धालीवाल यांनी आशियाई क्रीडा स्पर्धेतील मिश्र सांघिक स्किट प्रकारात कांस्यपदक जिंकून भारताच्या पदकतालिकेत १५ व्या स्थानावर झेप घेतली. आशियाई क्रीडा स्पर्धेतील मिश्र सांघिक स्किट प्रकारातील भारताचे हे पहिले पदक आहे. अंतिम फेरीत सहा सीरीजनंतर या भारतीय जोडीने ४४ गुण मिळवले.**

चीनने ५२ गुणांसह सुवर्णपदक जिंकून नवा विश्वविक्रम प्रस्थापित केला. दक्षिण कोरियाने ५१ गुणांसह रौप्यपदक पटकावले. चीनने कतारने प्रस्थापित केलेला ४७ गुणांचा विश्वविक्रम मागे टाकला.अनंतजीत आणि परिनाझ यांनी पात्रता फेरीत १५० पैकी १३८ गुण मिळवून चौथे स्थान पटकावले होते. चीन १४० गुणांसह, दक्षिण कोरिया १४३ गुणांसह आणि कतार १४५ गुणांसह पुढे राहिले.

### अनंतजीत–परिनाझ जोडीने पटकावले कांस्य

त्यानंतर भारतीय जोडीने अंतिम फेरीत कांस्यपदक जिंकले.

अनंतजीत आणि परिनाझ या दोघांनीही यापूर्वी या आशियाई क्रीडा स्पर्धेत आपापल्या सांघिक स्पर्धांमध्ये पदके जिंकली होती. अनंतजीतने पुरुषांच्या स्किट सांघिक स्पर्धेत कांस्यपदक मिळवून दिले, तर परिनाझने रायझा ढिल्लन आणि महेश्वरी चौहान यांच्यासोबत महिलांच्या स्किट सांघिक स्पर्धेत कांस्यपदक पटकावले.यापूर्वी, पुरुषांच्या १० मीटर एअर पिस्तूल सांघिक स्पर्धेत भारताला पदक मिळवता आले नव्हते. कमलजीत, केदारलिंग बालकृष्ण आणि आकाश भारद्वाज यांच्या भारतीय संघाने १७२७–५३ गुणांसह चौथे स्थान पटकावले.

# बॉक्सिंगमध्ये सुमित कुंडूचे आव्हान संपुष्टात



नागोया, ता.२४ –

**आशियाई खेळांमध्ये पुरुषांच्या ७० किलो वजनी गटात भारतीय बॉक्सर सुमित कुंडूची मोहीम दुखापतीमुळे राऊंड–ऑफ–१६ मध्येच संपुष्टात आली.**

सुमितने इराकच्या अली अल–सरायविरुद्ध प्रभावीपणे वापर करत पहिली फेरी जिंकली. अलीने कडवी झुंज देऊनही सुमितने दुसरी फेरी ३–२ अशी जिंकली. मात्र, तिसरी फेरी सुरू होताच पाय घसरल्याने तो लंगडू लागला आणि गुडघ्याच्या दुखापतीमुळे रेफरी स्टॉप्स कॉन्टेस्ट या नियमानुसार त्याला सामना गमवावा लागला.

सुमितने आशियाई खेळांमधील पुरुषांच्या ७० किलो वजनी गटाच्या राऊंड–ऑफ–१६ मध्ये प्रवेश केला होता.पहिली फेरी जसजशी पुढे सरकली, तसतसा सुमित सामन्यात स्थिरावला आणि त्याने आपली लय शोधली. सिन्सिरीच्या प्रयत्नांनंतरही, पंचांनी पहिली फेरी ४–१ अशी सुमितच्या बाजूने दिली.दुसऱ्या फेरीत त्याने संयमाने ठोसे मारले. सिन्सिरीला आपली आक्रमकता वाढवणे गरजेचे असताना, सुमितचा आत्मविश्वास वाढला आणि त्याने शेवटच्या ३० सेकंदात काही जोरदार हल्ले करत ती फेरी जिंकली.तिसऱ्या फेरीत त्याने अनावश्यक देवाणघेवाण टाळली, पण त्याच वेळी प्रभावी ठोसे मारणे आणि सामन्यावर नियंत्रण ठेवणे सुरूच ठेवले.सुमितने अंतिम फेरीत वर्चस्व गाजवले; पाचही पंचांनी गुण त्याच्या बाजूने दिले आणि त्याने ५–० असा विजय मिळवत सामना जिंकला. या विजयासह सुमितने आशियाई खेळांमधील पुरुषांच्या ७० किलो वजनी गटाच्या राऊंड–ऑफ–१६ मध्ये प्रवेश केला होता.

# सतनाम–सलमान जोडीला पुरुषांच्या डबल स्कल्स प्रकारात रोईंगचे कांस्य

नागोया, ता.२४ –

**आशियाई क्रीडा स्पर्धेत रोइंगमध्ये भारताच्या सतनाम सिंग आणि सलमान खान या जोडीने पुरुषांच्या डबल स्कल्स प्रकारात कांस्यपदक पटकावले. पुरुषांच्या सिंगल स्कल्समध्ये बलराज पनवार चौथ्या स्थानावर राहिल्याने त्याचे पदक थोडक्यात हुकले.**

सतनाम सिंग आणि सलमान खान यांनी पुरुषांच्या डबल स्कल्सच्या अंतिम फेरीत ६:१३.२५ अशी वेळ नोंदवून कांस्यपदक जिंकले. या भारतीय जोडीने शर्यतीच्या सुरुवातीच्या टप्प्यात उत्कृष्ट कामगिरी केली आणि ५०० मीटर, १००० मीटर व १५०० मीटरपर्यंत दुसरे स्थान कायम राखले.




ही भारतीय जोडी सुवर्णपदक विजेत्या चीनच्या यी शुडी आणि नी यिदे या जोडीपेक्षा केवळ अर्धा सेकंद मागे होती. तथापि, अंतिम टप्प्यात सतनाम आणि सलमान यांचा वेग मंदावला आणि ते तिसऱ्या स्थानावर घसरले. चिनी जोडीने सुवर्णपदक जिंकले, तर उझबेकिस्तानच्या मेहरोजबेक ममातकुलोव आणि पावेल सोरिन यांनी रौप्यपदक पटकावले. भारतीय जोडी सुवर्णपदकापासून ३.४८ सेकंद आणि रौप्यपदकापासून २.७६ सेकंद मागे राहिली.बलराज पनवारही पुरुषांच्या एकेरी स्कल्समध्ये ५०० मीटर, १००० मीटर आणि १५०० मीटरमध्ये दुसऱ्या स्थानी राहिला.

# मुंबईत पुरुष-महिला कुस्तीसाठी ३० सप्टेंबरला निवड चाचणी

नवी दिल्ली,ता.२४ –

**केंद्र सरकारच्या युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालयांतर्गत असलेल्या भारतीय क्रीडा प्राधिकरणाच्या मुंबईतील नॅशनल सेंटर ऑफ एक्सलन्स संस्थेतर्फे ३० सप्टेंबर रोजी पुरुष आणि महिला कुस्तीसाठी निवड चाचण्या घेण्यात येणार आहेत. या चाचण्या मुंबईतील कांदिवली (पूर्व) येथील आकुर्ली रोडवरील एसएआय श्री अटलबिहारी वाजपेयी नॅशनल सेंटर ऑफ एक्सलन्स येथे आयोजित केल्या जातील.**



१७ वर्षांखालील, २० वर्षांखालील आणि २३ वर्षांखालील वयोगटांतील पात्र मुला–मुलींसाठी या निवड चाचण्या खुल्या आहेत. महिला कुस्तीत मुलींसाठी ५० किलो आणि त्याहून अधिक,फ्रीस्टाईल कुस्तीसाठी मुले ५७ किलो आणि त्याहून अधिक तर ग्रीको–रोमन कुस्तीत मुले ५५ किलो ते १३० किलोसाठी चाचण्या घेण्यात येतील.

पात्र खेळाडूंनी चाचणीसाठी येताना आपले वय, ओळख आणि पात्रतेचे निकष सिद्ध करणारी सर्व मूळ प्रमाणपत्रे, कागदपत्रे आणि इतर नोंदी सोबत आणणे बंधनकारक आहे. या चाचण्यांमुळे पात्र युवा कुस्तीगीरांना एसएआय नॅशनल सेंटर ऑफ एक्सलन्स येथे प्रशिक्षणासाठीच्या निवड प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी मिळेल.

# वेस्ट इंडिजविरूध्द भारत तीन वनडे, पाच टी २० सामने खेळणार

नवी दिल्ली,ता.२४–

**वेस्ट इंडिज संघ भारत दौऱ्यावर येत असून या दौऱ्यात तीन वनडे आणि पाच टी २० सामन्यांची मालिका खेळवली जाणार आहे. २७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर या दरम्यान हे सामने खेळवले जातील.**

शुभमन गिलच्या नेतृत्वात भारताचा वनडे संघ खेळेल, तर आशियाई क्रीडा स्पर्धेतून परतल्यानंतर श्रेयस अय्यरच्या नेतृत्वात भारताचा टी २० संघ खेळणार आहे. वेस्ट इंडिजचे वनडे आणि टी २० या दोन्ही मालिकेत शाय होप कर्णधारपद सांभाळणार आहे.

भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यात आधी वनडे मालिका होणार असून या मालिकेतील सामने २७, ३० सप्टेंबर आणि ३ ऑक्टोबर रोजी अनुक्रमे तिरुअनंतपुरम, गुवाहाटी आणि न्यू चंदिगढ येथे होतील.त्यानंतर ६, ९, ११, १४ आणि १७ ऑक्टोबर रोजी अनुक्रमे लखनौ, रांची, इंदोर, हैदराबाद आणि बंगळुरु येथे टी२० सामने होणार आहेत. ही मालिका भारतीय संघ ऑक्टोबरच्या अखेरीस न्यूझीलंड दौऱ्यावर जाण्यापूर्वी होणार आहे.

वेस्ट इंडिजविरुद्धच्या वनडे मालिकेत रवींद्र जडेजा, यशस्वी जैस्वाल, मोहम्मद सिराज, ऋतुराज गायकवाड यांसारख्या खेळाडूंचे पुनरागमन झाले आहे, तसेच नमन धीर, आकिब नबी अशा नव्या चेहऱ्यांना संधी मिळाली आहे.या वनडे मालिकेत विराट कोहली, रवींद्र जडेजा आणि रोहित शर्मा या दिग्गज खेळाडूंच्या कामगिरीकडे लक्ष असेल. ही वनडे मालिका पुढच्या वर्षी होणाऱ्या वर्ल्ड कपच्या तयारीच्या दृष्टीने महत्त्वाची आहे.

# १०,००० मीटर धावणेत सीमा कुमारीला कांस्य

## भारताचा १६ वर्षांचा पदकांचा दुष्काळही संपवला

नागोया,ता.२४–

**भारतीय लांब पल्ल्याची धावपटू सीमा कुमारीने ऐतिहासिक कामगिरी करत २०२६ च्या आशियाई खेळांमध्ये महिलांच्या १०,००० मीटर शर्यतीत कांस्य पदक जिंकले.सीमा कुमारीने महिलांच्या १०,००० मीटर शर्यतीत ३२ मिनिटे ४१.५४ सेकंदांची वेळ नोंदवत कांस्य पदक जिंकले. आशियाई खेळांमधील हे तिचे पहिले पदक आहे. या पदकामुळे सीमाने महिलांच्या १०,००० मीटर शर्यतीतील भारताचा १६ वर्षांचा पदकांचा दुष्काळही संपवला आहे.**




सीमाचे हे ऐतिहासिक पदक केवळ ट्रॅकवरील तिच्या वेगवान गतीचा परिणाम नाही, तर हिमाचल प्रदेशच्या डोंगरांमध्ये अनवाणी पायांनी सुरू झालेल्या धैर्य, गरिबी आणि संघर्षाचा हा विजय आहे. सीमा, हिमाचल प्रदेशातील चंबा जिल्ह्यातील एका लहानशा गावात राहते. सीमा अवघी १२ वर्षांची असताना तिच्या वडिलांचे निधन झाले.

सुरुवातीला, साधनसामग्रीची कमतरता होती. तिच्याकडे धावण्याचे बूट विकत घेण्यासाठीसुद्धा पैसे नव्हते. दृढनिश्चयी सीमाने पायवाटांवर अनवाणी धावण्याचा सराव सुरू केला.सीमाने २०१७ मध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावर पदार्पण केले. तिने बँकॉक येथे झालेल्या २०१७–१८ आशियाई अंडर–१८ चॅम्पियनशिपमध्ये ३००० मीटर शर्यतीत १०:०५.२७ अशी वेळ नोंदवून कांस्य पदक जिंकले. यानंतर तिने नासाऊ कॉमनवेल्थ युथ गेम्समध्ये नववे स्थान, गिफू येथील आशियाई ज्युनियर चॅम्पियनशिपमध्ये पाचवे स्थान, तसेच ब्युनोस आयर्स युथ ऑलिम्पिक्समध्येही यश मिळवले.

# कबड्डीत भारत उपांत्य फेरीत; पुरुष व महिला संघांकडून प्रतिस्पर्ध्यांवर एकतर्फी मात

नागोया,ता.२४–

**आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताने कबड्डीच्या पुरुष व महिला या दोन्ही गटांत उपांत्य फेरीतील आपले स्थान निश्चित केले आहे. साखळी फेरीत दोन्ही संघांनी प्रतिस्पर्ध्यांवर एकतर्फी विजय मिळवले. 'अ' गटातील अखेरच्या सामन्यांमध्ये भारताने चायनीज तैपेई आणि जपानचा धुव्वा उडवला. भारतीय पुरुष संघाने चायनीज तैपेईचा ३७–२१ असा पराभव केला, तर भारतीय महिला संघाने यजमान जपानवर ५०–२५ अशी मात करत गटात अव्वल स्थान पटकावले.**

पुरुष संघाने साखळी फेरीतील सलग चौथा विजय नोंदवत उपांत्य फेरीसह किमान कांस्यपदक निश्चित केले आहे. याआधी भारताने दक्षिण कोरिया, जपान आणि बांगला देशचा पराभव केला होता. चायनीज तैपेईविरुद्ध भारताने सुरुवातीपासूनच नियंत्रण राखत मध्यंतरापर्यंत २३–११ अशी भक्कम आघाडी घेतली. दुसऱ्या सत्रातही १४–१० अशी आघाडी राखत भारताने विजयावर शिक्कामोर्तब केले. दुसरीकडे, महिला संघानेही साखळी फेरीत अपराजित राहण्याची परंपरा कायम ठेवली. सुरुवातीच्या सामन्यात बांगला देशचा पराभव केल्यानंतर भारताने दुसऱ्या सामन्यात इराणवर ३७–२३ अशी मात केली होती. जपानविरुद्धचा सामना भारतासाठी एकतर्फी ठरला. पहिल्या सत्रात ३२–१३ अशी आघाडी घेतल्यानंतर भारतीय महिलांनी दुसऱ्या सत्रात आणखी १८ गुणांची भर घातली. महिला संघाने ३७ आऊट गुण, सात बोनस गुण आणि लोणचे सहा गुण नोंदवले.

# जगातील सर्वात मोठ्या सायकलिंग स्पर्धेचे यजमानपद पुण्याला

पुणे,ता.२४–

**भारताला प्रथमच सायकलिंगमधील जागतिक प्रतिष्ठेची यूसीआय रोड वर्ल्ड चॅम्पियनशिप २०३२ आयोजित करण्याचा मान मिळाला असून, या स्पर्धेचे यजमानपद पुण्याला मिळाले आहे.**

भारताच्या क्रीडा क्षेत्रातील वाटचालीच्या दृष्टीनेही ही घोषणा महत्त्वपूर्ण आहे.पुण्याच्या उमेदवारीचे अंतिम सादरीकरण झाल्यानंतर कॅनडातील मॉन्ट्रियल येथे झालेल्या यूसीआय कॉंग्रेसमध्ये या निर्णयाची घोषणा करण्यात आली. उमेदवारीच्या प्रक्रियेत भारतातील पुणे आणि नेदरलँड्समधील ग्रोनिंगेन/ड्रेंथे यांच्यात अंतिम लढत झाली.

कोलंबिया आणि मेक्सिको हे स्पर्धेतून बाहेर पडल्यानंतर ही दोन शहरे अंतिम फेरीत पोहोचली.तीन सदस्यीय यूसीआय तपासणी पथकाने पुण्याला भेट देऊन बालेवाडी स्टेडियम,पुणे विद्यापीठ परिसरासह प्रस्तावित स्पर्धा मार्ग आणि पायाभूत सुविधांची पाहणी केली होती.यूसीआय रोड वर्ल्ड चॅम्पियनशिप ही आंतरराष्ट्रीय सायकलिंग दिनदर्शिकेतील सर्वाधिक प्रतिष्ठेच्या स्पर्धांपैकी एक असून, जगातील आघाडीचे सायकलपटू प्रतिष्ठेच्या रेनबो जर्सीसाठी या स्पर्धेत सहभागी होतात. २०२५ मध्ये रवांडाची राजधानी किगाली येथे झालेल्या स्पर्धेत ११३ देशांतील ७३४ सायकलपटूंनी सहभाग घेतला. या स्पर्धेला सुमारे २० लाख प्रेक्षक उपस्थित होते, तर जगभरातील दूरचित्रवाणी प्रेक्षकसंख्या सुमारे ३० कोटी होती.२०२६ च्या पुणे ग्रँड टूरने प्रत्यक्ष स्पर्धेच्या परिस्थितीत आयोजनाची क्षमता सिद्ध केली.४३७ किलोमीटरचे रस्ते रेससाठी सज्ज करण्यात आले. २०३२ मध्ये वर्ल्ड चॅम्पियनशिप होईपर्यंत पुण्याला सहा वर्षांचा ग्रँड टूरचा अनुभव मिळेल, असा उमेदवारीचा आराखडा आहे.

**पुण्याची निवड झाल्याने भारताचा समावेश रोड सायकलिंगच्या प्रतिष्ठेच्या जागतिक स्पर्धेचे यजमानपद भूषविणाऱ्या शहरांच्या यादीत झाला आहे. मागील पाच स्पर्धा वोलॉन्गॉंग, ऑस्ट्रेलिया (२०२२), ग्लासगो, स्कॉटलंड (२०२३), झ्युरिख, स्वित्झर्लंड (२०२४), किगाली, रवांडा (२०२५) आणि मॉन्ट्रियल, कॅनडा (२०२६) येथे झाल्या.**

# अफगाणिस्तान, मलेशिया विजयी ; भारतीय संघ थेट उपांत्यपूर्व फेरीत

नवी दिल्ली,ता.२४–

**श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखाली भारतीय संघ थेट उपांत्यपूर्व फेरीत खेळणार आहे.प्राथमिक फेरीच्या लढती सुरू झाल्या. दोन गटांत विभागलेल्या सहा संघातील चार संघ उपांत्यपूर्व फेरीसाठी पात्र ठरणार आहेत. गुरुवारी झालेल्या दोन सामन्यांत अफगाणिस्तान व मलेशिया यांनी विजयी सुरुवात केली.कोणता संघ टीम इंडियाला उपांत्यपूर्व फेरीत भिडेल, याची उत्सुकता आहे.**

अफगाणिस्तानने १२९ धावा करूनही बाजी मारली. जपानविरुद्धचा सामना त्यांनी ४८ धावांनी जिंकला. मोहम्मद अक्रम (३४), करीम जनत (२१), कर्णधार डारविश रसूली (२९) व मोहम्मद इशाक (नाबाद २५) यांच्या खेळीच्या जोरावर अफगाणिस्तान ६ बाद १२९ धावांपर्यंत पोहोचला. जपानच्या इब्राहिम तकाहाशी (२–१९) व शोमा सुगाया–स्लाटर (२–१८) यांनी चांगला मारा केला.जपानचा संपूर्ण संघ १९.३ षटकांत ८१ धावांवर तंबूत गेला. त्यांच्याकडून रेओ साकुरानो–थॉमसने सर्वाधिक २३ धावा केल्या. अफगाणिस्तानच्या अराब गुलने ४–२–८–४ अशी अप्रतिम गोलंदाजी केली. अब्दोल्लाह अहमदजाईने दोन, तर नानगेयालिया खानने ३ विकेटस घेतल्या.

दुसऱ्या सामन्यात मलेशियाने ८ विकेट्सने हाँगकाँगवर बाजी मारली. हाँगकाँगचे ९ बाद ८१ धावांचे आव्हान मलेशियाने १२ षटकांत २ बाद ८४ धावा करून पार केले. पवनवदीप सिंग (३–११) व मुहम्मद आमीर (३–१२) यांच्यासह विरनदीप सिंग (नाबाद ३२) व मुहम्मद सयाहादत (नाबाद ३६) हे मलेशियाच्या विजयात चमकले.

स्पर्धेच्या फॉरमॅटनुसार भारतीय संघाला थेट उपांत्यपूर्व फेरीत खेळायचे आहे. सध्या अ आणि ब गटात सहा संघ आहेत आणि त्यातील दोन संघ अंतिम ८ साठी पात्र ठरतील. भारताला उपांत्यपूर्व फेरीत ग्रुप ए मधील दुसऱ्या क्रमांकाच्या संघाविरुद्ध खेळावे लागणार आहे. हा सामना २८ सप्टेंबरला होणार आहे. ए गटात अफगाणिस्तान, जपान व नेपाळ हे संघ आहेत, तर ब गटात मलेशिया, हाँगकाँग व ओमान यांचा समावेश आहे.

महासत्ता रंगारंग
शुक्रवार,२५ सप्टेंबर २०२६


# खळीदार प्रीती झिंटा राजकारणात जाणार?



बंटवारा १९४७ ( १९४७) या सिनेमातून प्रीती झिंटाने मोठ्या पडद्यावर दमदार पुनरागमन केलं. भारताच्या फाळणीवर आधारीत या सिनेमाला चित्रपटगृहात फारसं यश मिळालं नाही. पण प्रीती झिंटाच्या अभिनयाची प्रचंड चर्चा झाली. दरम्यान, अभिनेत्री लवकरच वाइब या सिनेमातून सिल्व्हर स्क्रिनवर पुनरागमन करणार आहे. कुणाल खेमू दिग्दर्शित हा सिनेमा स्पाय - कॉमेडी - ड्रामा यावर आधारीत आहे. हा सिनेमा १८ सप्टेंबर रोजी सिनेमागृहात रिलीज होणार असल्याची माहिती आहे. दरम्यान, वाइब या सिनेमाच्या निमित्ताने अभिनेत्री एका वेगळ्याच कारणामुळे चर्चेत आली आहे. सिनेमा प्रदर्शनापूर्वी अभिनेत्रीने एक्स हँडलवर पीजेड चॅट नावाने आस्क मी सेशन ठेवलं होतं. या सेशनमध्ये अभिनेत्रीने विविध विषयांवर भाष्य केलं. तसेच राजकारणातील एन्ट्रीवरही तिने प्रतिक्रिया दिली. एका युझरने तिला या सेशनमध्ये राजकारणात येण्याच्या तिच्या भविष्यातील प्लानिंगबद्दल विचारले. या प्रश्नावर अभिनेत्रीने प्रतिक्रिया दिली. प्रीतीने यावर काय उत्तर दिलं? अभिनेत्रीची नेमकी प्रतिक्रिया काय? पाहूयात. आस्क मी सेशनदरम्यान, एका युझरने प्रीतीला राजकारणात एन्ट्री करणार का? असा प्रश्न विचारला. तुम्ही भविष्यात राजकारणात एन्ट्री करण्याचा विचार करत आहात का?, यावर तिने उत्तर देत म्हटलं की, सध्या मला राजकारणात रस नाही, असं प्रीती झिंटाने युझरच्या प्रश्नाला उत्तर दिलं. दरम्यान, तिचं उत्तर सध्या सोशल मीडियात व्हायरल होत आहे. आस्क मी सेशनच्या शेवटी प्रीती झिंटाने चाहत्यांचे आभार मानले. तिने आभार मानत पोस्टमध्ये म्हटलं की, मजेशीर पीजेड चॅटसाठी तुमचे खूप आभार. आजचे वाइब खूप मजेदार होते. मला आशा आहे की, तुम्हाला ही चॅट तितकीच आवडली असेल, जितकी मला आवडली आहे, असं प्रीतीने म्हटलं. प्रीती झिंटाचा वाइब हा सिनेमा लवकरच प्रेक्षकांच्या भेटीस येत आहे.

# हॉलिवूडमध्ये एलनाझ नोरौझीची दमदार एंट्री

'सेक्रेड गेम्स'मधून जागतिक स्तरावर ओळख मिळवलेली अभिनेत्री एलनाझ नोरौझी सध्या तिच्या हॉलिवूड पदार्पणामुळे चर्चेत आहे. 'द फिक्स' या हॉलिवूड चित्रपटात एलनाझ पहिल्यांदाच मुख्य भूमिकेत दिसत आहे. झॅकरी लेव्ही आणि लियाम नीसन यांच्या प्रमुख भूमिका असलेला आणि गाय मोशे यांनी दिग्दर्शित केलेला हा ॲक्शन थ्रिलर सध्या अमेरिकेतील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होत आहे.
विशेष म्हणजे, एलनाझच्या अभिनयाचं अमेरिकन चित्रपट समीक्षकांकडून कौतुक होत आहे. त्यामुळे तिच्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील हा टप्पा महत्त्वाचा मानला जात आहे.
इराणी-अमेरिकन महिलेची ही भूमिका एलनाझसाठी विशेष आहे, कारण तिचा जन्म इराणमध्ये झाला आहे. 'द हॉलीवूड रिपोर्टर'मधील आपल्या परीक्षणात ज्येष्ठ चित्रपट समीक्षक फ्रँक शेक यांनी एलनाझच्या अभिनयाचा विशेष उल्लेख केला आहे. त्यांनी तिच्या अभिनयाचं कौतुक करत तो ''खूप चांगला'' असल्याचं म्हटलं आहे. याशिवाय काही परीक्षणांमध्ये एलनाझ आणि झॅकरी लेव्ही यांच्यातील केमिस्ट्रीचंही कौतुक करण्यात आलं आहे. चित्रपटाच्या पुरुषप्रधान जगात झाराची स्वतंत्र भूमिका आणि तिची उपस्थितीही काही समीक्षकांनी लक्षात घेतली आहे.एलनाझ नोरौझीचा प्रवासही तितकाच वेगळा आहे. तिचा जन्म तेहरानमध्ये झाला आणि तिचं बालपण जर्मनीत गेलं. त्यानंतर तिने भारतात अभिनेत्री म्हणून आपली ओळख निर्माण केली. 'सेक्रेड गेम्स'मुळे तिला लोकप्रियता मिळाली.त्यानंतर तिने भारतासोबतच आंतरराष्ट्रीय प्रोजेक्ट्समध्येही काम केलं.





## विजय साळगावकरची कथा संपणार?

अजय देवगणच्या 'दृश्यम' फ्रँचायझीच्या तिसऱ्या भागाची प्रेक्षक आतुरतेने वाट पाहत आहेत.'दृश्यम-द कनक्ल्युजन'हा चित्रपट २ ऑक्टोबर २०२६ रोजी चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे. चित्रपटाचा ट्रेलर रिलीज झाला असून त्यानंतर चित्रपटाबद्दलची उत्सुकता आणखी वाढली आहे.'दृश्यम-द कनक्ल्युजन'या नावामुळेच हा चित्रपट विजय साळगावकरच्या कथेचा शेवट असल्याचं संकेत मिळतात. मात्र, 'दृश्यम ३'नंतर चौथा भाग येणार का, असा प्रश्न चाहत्यांच्या मनात आहे.
दिग्दर्शक अभिषेक पाठक यांनी मुलाखतीत याबाबत स्पष्ट उत्तर दिलं आहे. हिंदी 'दृश्यम ४' बनण्याची शक्यता काय, असं विचारण्यात आलं असता त्यांनी थेट ''शुन्य'' असं उत्तर दिलं. त्यांनी पुढे आपण 'दृश्यम ४' लिहिणार नसल्याचंही स्पष्ट केलं. अभिषेक पाठक यांच्या मते,'दृश्यम-द कनक्ल्युजन' हा विजय साळगावकरच्या कथेचा योग्य शेवट आहे. या चित्रपटासाठी त्यांनी आणि टीमने खूप मेहनत घेतली असून केवळ पैशांसाठी पुढचा भाग बनवण्याचा त्यांचा हेतू नसल्याचं त्यांनी सांगितलं.त्यामुळे सध्या तरी अजय देवगणच्या हिंदी 'दृश्यम' फ्रँचायझीचा प्रवास तिसऱ्या भागासोबतच संपणार असल्याचं स्पष्ट झालं आहे.




## राघव लॉरेन्स साकारणार कर्णाची भूमिका

महाभारतातील कथा आणि त्यातील व्यक्तिरेखा आजही प्रेक्षकांच्या मनात विशेष स्थान राखून आहेत. या महाकाव्यावर आधारित अनेक मालिका आणि चित्रपट यापूर्वी प्रेक्षकांच्या भेटीला आले आहेत. आता पुन्हा एकदा महाभारतातील एका महत्त्वाच्या व्यक्तिरेखेची कथा मोठ्या पडद्यावर पाहायला मिळणार आहे. दक्षिणेतील अभिनेता राघव लॉरेन्स लवकरच 'महावीर कर्ण' या चित्रपटातून कर्णाची भूमिका साकारताना दिसणार आहे.'महावीर कर्ण' हा चित्रपट महाभारतातील कर्णाच्या जीवनावर आधारित असल्याची माहिती समोर आली आहे. कर्णाच्या व्यक्तिरेखेतील शौर्य, निष्ठा, दानशूरपणा आणि त्यागाची कथा या चित्रपटातून पाहायला मिळणार आहे.या चित्रपटाची निर्मिती रमेश वर्मा करणार आहेत. राघव लॉरेन्स आणि रमेश वर्मा यांनी यापूर्वी 'काल भैरवा' या प्रोजेक्टसाठीही एकत्र काम केलं आहे. आता ही जोडी 'महावीर कर्ण'साठी पुन्हा एकत्र आली आहे.'महावीर कर्ण' हा चित्रपट हिंदी, तमिळ, तेलुगू, कन्नड आणि मल्याळम अशा पाच भाषांमध्ये प्रदर्शित होणार आहे. हा चित्रपट २०२७ मध्ये प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.याआधी चित्रपटाचा फर्स्ट लूकही प्रदर्शित करण्यात आला आहे. 'पेन मूव्हीज'ने सोशल मीडिया अकाउंटवर राघव लॉरेन्स यांच्या कर्णाच्या भूमिकेतील पहिली झलक शेअर केली होती.

# द पॅरडाईजचा बोलबाला

## नानी, सोनाली कुलकर्णी ,राघव जुयालसह तगडी स्टारकास्ट

'नॅचरल स्टार' नानी स्टारर 'द पॅराडाईज' चित्रपटाची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. चित्रपटाच्या टीझरसोबतच 'आया शेर' आणि 'येशानागुला' यांसारख्या गाण्यांना मिळालेल्या जबरदस्त प्रतिसादामुळे 'द पॅराडाईज'ने प्रेक्षकांसह संगीतप्रेमींचीही मने जिंकली आहेत.
'नॅचरल स्टार' नानी स्टार 'द पॅराडाईज' हा यंदाच्या बहुप्रतीक्षित चित्रपटांपैकी एक आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन श्रीकांत ओडेला यांनी केले असून, यापूर्वी या सुपरहिट अभिनेता-दिग्दर्शकाच्या जोडीने 'दसरा'सारखा ब्लॉकबस्टर चित्रपट दिला आहे. प्रेक्षकांचा उत्साह आणखी वाढवण्यासाठी निर्मात्यांनी टीझर आणि गाण्यांच्या माध्यमातून चित्रपटाच्या रिलीजसाठी आधीच वातावरण निर्मिती केली आहे. दमदार कथानकासोबतच नानीचा अनोखा लूक आणि त्यांची व्यक्तिरेखा यामुळेही हा चित्रपट प्रेक्षकांमध्ये चर्चेचा विषय ठरला आहे.
चित्रपटाच्या रिलीजची तारीख जसजशी जवळ येत आहे, तसतशी प्रेक्षकांमधील उत्सुकता वाढताना दिसत आहे.
चित्रपटाच्या दमदार कलाकारांच्या यादीत नॅचरल स्टार नानी, राघव जुयाल (खलनायक), सोनाली कुलकर्णी आणि कायडू लोहार यांचा समावेश आहे. हे सर्व कलाकार मुंबईत आयोजित करण्यात आलेल्या एका भव्य प्री-रिलीज प्रमोशनल इव्हेंटमध्ये सहभागी होण्यासाठी सज्ज झाले आहेत. या कलाकारांची एकत्रित उपस्थिती चित्रपटाच्या रिलीजपूर्वीचा उत्साह आणखी वाढवणार आहे.
आतापर्यंत रिलीज झालेल्या टीझरमध्ये नानी यांचा आतापर्यंतचा सर्वात इंटेन्स आणि बेधडक अवतार पाहायला मिळत आहे. झोपडपट्टीच्या पार्श्वभूमीवर आधारित या चित्रपटात नानी यांनी जदल ही व्यक्तिरेखा साकारली आहे, जो एका वेश्येचा मुलगा आहे. दमदार कथानकासह हा चित्रपट प्रेक्षकांसमोर नानी यांचा वेगळा अवतार सादरण्याबरोबरच रॉ इंटेन्सिटी, मास एनर्जी आणि हाय-ऑक्टेन ॲक्शनचा अनुभव देण्याचे आश्वासन देताना दिसत आहे. दुसरीकडे, 'द पॅराडाईज'मध्ये राघव जुयाल एका खतरनाक खलनायकाच्या भूमिकेत दिसणार असून, त्यांची व्यक्तिरेखा चित्रपटाच्या रंजक विश्वात आणखी एक थर जोडते.
याशिवाय, 'द पॅराडाईज'ची गाणी नवे मानदंड प्रस्थापित करत असतानाच विक्रमही मोडत आहेत. चित्रपटातील पहिले गाणे 'आया शेर'ने यूट्यूबवर २०० मिलियनहून अधिक व्ह्यूज आणि १.८ मिलियनहून अधिक लाइक्स मिळवले आहेत. तसेच हजारो इन्स्टाग्राम रील्सच्या माध्यमातून हे गाणे सोशल मीडियावरही लोकप्रिय ठरले आहे.
दुसरीकडे, 'येशानागुला' या दुसऱ्या गाण्यानेही यूट्यूबवर ११९ मिलियनहून अधिक व्ह्यूज आणि ७०० लाइक्सचा टप्पा पार केला आहे. ही दोन्ही गाणी विविध चार्ट्स आणि प्लॅटफॉर्म्सवर लोकप्रिय ठरत असून, प्रेक्षकांमध्ये चित्रपटाबद्दल असलेली उत्सुकता यावरून स्पष्ट होत आहे.
सिनेमाजच्या निर्मितीखाली तयार झालेला 'द पॅराडाईज' २४ सप्टेंबर २०२६ रोजी हिंदी, तेलुगू, तमिळ, इंग्रजी, स्पॅनिश, बंगाली, कन्नड आणि मल्याळम अशा आठ भाषांमध्ये मोठ्या स्तरावर चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित झाला आहे.
चित्रपटाची जागतिक पातळी लक्षात घेता, निर्मात्यांनी कथितरित्या हॉलिवूड स्टार रायन रेनॉल्ड्स यांच्याशी 'द पॅराडाईज'ला आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत सादर करण्यासाठी संपर्क साधला आहे.
दमदार दिग्दर्शक, प्रभावी स्टारकास्ट आणि ग्लोबल स्केलसह 'द पॅराडाईज' केवळ एक चित्रपट न राहता एका मोठ्या सांस्कृतिक पर्वाचे रूप घेताना दिसत आहे, ज्याची चाहते आतुरतेने वाट पाहत आहेत.






## इचलकरंजीची कन्या योगिता लाहोटी हिची अभिनय क्षेत्रात दमदार वाटचाल

मनात काहीतरी करण्याची इच्छा, त्यासाठी प्रामाणिकपणे कष्ट करण्याची तयारी, मेहनतीची जोड आणि आपल्या ध्येयाप्रती असलेली सचोटी या गुणांच्या जोरावर इचलकरंजीच्या योगिता लाहोटी हिने अभिनय क्षेत्रात आपली स्वतंत्र ओळख निर्माण करण्याच्या दिशेने दमदार वाटचाल सुरू केली आहे.लवकरच प्रदर्शित होत असलेल्या सायको रंगा या मराठी चित्रपटाद्वारे ती रुपेरी पडद्यावर झळकणार आहे.
इचलकरंजी येथील श्यामसुंदर बांगड व संगीता बांगड यांची कन्या असलेल्या योगिता लाहोटीने आपल्या अभिनय कारकिर्दीची सुरुवात कलर्स मराठी वाहिनीवरील 'आई तुळजाभवानी'या मालिकेतून केली. त्यानंतर तिने सन मराठीवरील 'जुळली गाठ' तसेच सन निओवरील हिंदी मालिका 'थोडी सी उम्मीद, थोडासा आसमान' यामध्येही आपल्या अभिनयाची छाप उमटवली.मालिकांबरोबरच योगिताने जाहिरात क्षेत्रातही आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. इचलकरंजीतील नामांकित पैठणी साडी, चौगुले स्वीट मार्ट यांसह विविध जाहिरातींमध्ये तिने भूमिका साकारल्या असून, इचलकरंजीसह कोल्हापूर परिसरातील जाहिरात प्रकल्पांमध्येही तिने काम केले आहे. अभिनयासोबतच नवनवीन कला आत्मसात करण्याची तिची जिद्द आणि प्रत्येक संधीमधून स्वतःला अधिक सक्षम करण्याचा तिचा प्रयत्न विशेष उल्लेखनीय आहे.योगिताच्या या प्रवासातील आणखी एक महत्त्वपूर्ण टप्पा म्हणजे 'जगू द्या ना मला'या सामाजिक आशयाच्या शॉर्ट फिल्मचे यश. १२ सप्टेंबर २०२५ रोजी पुणे येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, महाराष्ट्र प्रदेश चित्रपट व सांस्कृतिक विभागातर्फे आयोजित राज्यस्तरीय स्पर्धेत या शॉर्ट फिल्मने मराठवाडा विभागातून प्रथम क्रमांक पटकावला.
स्त्रीभ्रूणहत्येविरोधात आवाज उठवत 'लेक वाचवा'चा संवेदनशील आणि सामाजिक संदेश या चित्रपटातून प्रभावीपणे मांडण्यात आला आहे.अभिनय क्षेत्रातील हा प्रवास योगितासाठी केवळ प्रसिद्धी मिळवण्याचा नसून स्वतःची कला विकसित करण्याचा, नवनवीन अनुभव घेण्याचा आणि प्रत्येक वेळी स्वतःला सिद्ध करण्याचा प्रवास आहे. सुरुवातीपासूनच मिळालेल्या प्रत्येक संधीचा प्रामाणिकपणे स्वीकार करत, त्यासाठी आवश्यक मेहनत घेण्याची तिची तयारी आणि पुढे जाण्याचा संकल्प यामुळे तिच्या वाटचालीला वेगळी दिशा मिळत आहे. इच्छा असेल तर मार्ग सापडतो, कष्ट करण्याची तयारी असेल तर संधीचे सोने करता येते आणि मेहनतीसोबत सचोटी असेल तर यशाचा प्रवास अधिक अर्थपूर्ण होतो, हे योगिताच्या आजवरच्या प्रवासातून दिसून येते. अभिनयासोबतच नवनवीन कला, नवीन भूमिका आणि विविध माध्यमांमध्ये काम करण्याची तिची उत्सुकता तिच्या भविष्यातील वाटचालीबद्दल आशावादी चित्र निर्माण करते. इचलकरंजीच्या मातीतून सुरू झालेली योगिता लाहोटीची ही कलाक्षेत्रातील वाटचाल आगामी काळात अधिक व्यापक व्हावी, विविधांगी भूमिका साकारत तिने आपल्या कलेचा ठसा उमटवावा आणि इचलकरंजीचे नाव अभिनय क्षेत्रात उज्ज्वल करावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.






## यामी गौतमच्या शिरपेचात मानाचा तुरा

गुजरातमध्ये ७२ वा राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार सोहळा पार पडला. यावेळी अभिनेत्री यामी गौतमला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार प्रदान करण्यात आला. 'आर्टिकल ३७०' या चित्रपटातील तिच्या अभिनयासाठी तिला हा पुरस्कार मिळाला आहे. विशेष म्हणजे, यामीचा हा पहिलाच राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार आहे.आदित्य सुहास जांभळे दिग्दर्शित 'आर्टिकल ३७०'मध्ये यामी गौतमने गुप्तचर अधिकारी झुनी हक्सरची भूमिका साकारली होती. या भूमिकेतील अभिनयासाठी तिला सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार मिळाला.

## 'पहला प्यार दूसरी बार'चा ट्रेलर रिलीज

'पहला प्यार दूसरी बार'चा मजेशीर ट्रेलर रिलीज झाला असून, तो चित्रपटाच्या अनोख्या शीर्षकाचा अर्थ उलगडताना दिसत आहे. ट्रेलरमध्ये सर्व डेब्यूटंट कलाकार आपल्या दमदार अभिनयाने मन जिंकताना दिसत आहेत आणि त्यामुळे 'पहला प्यार दूसरी बार'बद्दलची उत्सुकता आणखी वाढली आहे. चित्रपटाचा ट्रेलर तरुणाईच्या नव्या रंगांनी भरलेला आहे. यात केवळ धमाल वन-लाइनर्सच नाहीत, तर रोमान्स, मैत्री, जुना क्रश आणि अचानक निर्माण होणाऱ्या गोंधळाचीही झलक पाहायला मिळते. क्रर्की जोक्स, मजेदार वन-लाइनर्स, मिश्कील शिव्या आणि सतत एकमेकांची खेचत राहण्याच्या मजेशीर अंदाजामुळे कथेत बेधडक हास्याचा तडका पाहायला मिळतो.





## रश्मिका मंदानाचा रफ-टफ अवतार

पॅन-इंडिया स्टार रश्मिका मंदाना हिच्या आगामी 'मायसा' या चित्रपटाची प्रेक्षक आतुरतेने वाट पाहत आहेत. या बहुप्रतीक्षित चित्रपटाचा दमदार टीझर आता रिलीज करण्यात आला आहे. टीझरमध्ये रश्मिका एका आक्रमक, रफ-टफ आणि संतप्त अवतारात दिसत असून, तिचा हा अंदाज याआधीच्या भूमिकांपेक्षा पूर्णपणे वेगळा आहे. 'मायसा' हा २७ नोव्हेंबर २०२६ रोजी सिनेमागृहात प्रदर्शित होणार आहे. रश्मिका मंदाना आपल्या अभिनयासोबतच दमदार स्क्रीन प्रेझेन्ससाठी ओळखली जाते. 'मायसा'मध्ये मात्र तिचा एक वेगळाच अवतार पाहायला मिळणार आहे. टीझरमध्ये ती आक्रमक आणि धाडसी अंदाजात दिसते.

## ट्रोलर्सना सलमानने झापलं

अभिनेता सलमान खानचं वय आणि त्याचं शरीर यामुळे त्याला गेल्या काही काळापासून ट्रोल करण्यात येत होतं, त्याच्यावर बरीच टीकाही झाली. मात्र 'बिग बॉस २०'च्या वीकेंड का वारमध्ये सलमानने टीकाकारांना चोख प्रत्युत्तर देत चांगलंच सुनावलं. तसेच अभिनेत्री कतरिना कैफच्या वाढलेल्या वजनामुळे तिला ट्रोल करणाऱ्या लोकांनाही सलमानने फटकारलं होतं. त्यानंतर आता प्रसिद्ध गायक मीका सिंग हा सलमान खानच्या सपोर्टमध्ये उतरला असून वय आणि शरीरावरून होणाऱ्या अपमानासंदर्भात घेतलेल्या भूमिकेचं त्याने समर्थन केलं आहे. अशा प्रकारच्या घटनांमध्ये माध्यमांनी आणि कलाकारांनीही संयम बाळगायला हवा, असं मीका सिंगने म्हटलं आहे.



# 'देवघर ऑन रेंट' चित्रपटातील 'अगं आई गं' गाणे प्रेक्षकांच्या भेटीला

मराठी सिनेसृष्टीत सध्या वेगवेगळ्या धाटणीच्या आणि नावीन्यपूर्ण विषयांवर आधारित चित्रपटांची नांदी पाहायला मिळत आहे. याच मालिकेत प्रेक्षकांच्या मनोरंजनासाठी सज्ज होत असलेला एक बहुचर्चित आणि अनोखा चित्रपट म्हणजे 'देवघर ऑन रेंट'. हा अध्यात्म, रहस्य, थरार आणि ॲक्शन यांचा संगम असलेला चित्रपट आहे. एका रहस्यमय देवघराभोवती घडणाऱ्या घटनांमधून पोलिसांचा पाठलाग, गुन्हेगारी आणि सूडाची कहाणी उलगडत जाते. या प्रवासात अध्यात्माची भावनिक किनारही कथेला वेगळे वळण देते. उत्कंठावर्धक कथानक असलेल्या या चित्रपटातील 'अगं आई गं' हे धमाकेदार गाणे प्रेक्षकांच्या भेटीला आले आहे. प्रदर्शित झाल्यापासून अल्पावधतीतच या गाण्याने नेटकऱ्यांचा कौल मिळवला आहे. 'देवघर ऑन रेंट' हा चित्रपट २५ सप्टेंबर २०२६ रोजी महाराष्ट्रासह बेळगाव, हैदराबाद, इंदोर आणि बडोदा येथे प्रदर्शित होणार आहे.




आनंदी पिक्चर्स अमरावती प्रस्तुत आणि राधाकृष्ण प्रोडक्शन निर्मित 'देवघर ऑन रेंट'ची निर्मिती सचिन रोडे पाटील आणि पूनम चौधरी पाटील यांनी केली आहे. दिग्दर्शनाची धुरा स्वरूप सावंत यांनी सांभाळली आहे. या चित्रपटाची संकल्पना पूनम चौधरी पाटील यांची असून कथा-पटकथा व संवादलेखन संजय नवगिरे यांनी केले आहे. नुकतेच या चित्रपटातील 'अगं आई गं' हे जल्लोषपूर्ण व ऊर्जावान गाणे संगीतप्रेमींच्या भेटीस आले आहे. हे गाणे अस्सल मराठमोळा ठेका आणि आधुनिक संगीत यांच्या सुवर्णमध्य साधणारे एक रंगतदार नृत्यगीत आहे. महाराष्ट्राची लाडकी नृत्यांगना गौतमी पाटील हिने या गाण्यावर आपल्या ठसकेबाज अदा, मनमोहक हावभाव आणि लयबद्ध ठेक्यांनी चारचांद लावले आहेत. तिचा हा दिलखेचक अंदाज, सोबत असणाऱ्या सहकलाकारांची धमाल आणि सळसळत्या उत्साहाने भारलेली रंगीबेरंगी वातावरणनिर्मिती यामुळे हे गाणे लक्षवेधी बनले आहे. लेखक-गीतकार संजय नवगिरे यांनी अत्यंत अर्थपूर्ण व श्रवणीय शब्दांत हे गाणे गुंफले असून, संगीतकार कबीर शाक्य यांच्या कर्णमधुर व ताल धरायला लावणाऱ्या संगीताने गाण्यात प्राण फुंकले आहेत. तर पार्श्वगायिका मुग्धा कऱ्हाडे यांनी आपल्या दमदार आणि नखरेल आवाजात हे गीत गाऊन रसिकांची मने जिंकली आहेत.

'देवघर ऑन रेंट'मध्ये निखिल चव्हाण, अंकित मोहन, भाऊ कदम, शशांक शेंडे, अश्विनी चवरे, वैभव चव्हाण, सुरेश विश्वकर्मा, अनिल नगरकर आणि सिद्धेश्वर झाडबुके यांच्या भूमिका असून 'केजीएफ'फेम गरुडा राम आणि श्रवण राघवेंद्र हे दाक्षिणात्य कलाकारही महत्वपूर्ण भूमिकांमध्ये दिसणार आहेत. संगीतकार एस. सागर आणि कबीर शाक्य यांनी या चित्रपटातील अर्थपूर्ण गीतांना सुमधूर स्वरसाज चढवला असून, कोरीओग्राफी किशोर दळवी यांनी केली आहे. डिओपी चैतन्य साळुंके यांनी सिनेमॅटोग्राफी केली असून, रोहित नागभीडे यांनी पार्श्वसंगीत केले आहे. चित्रपटातील ॲक्शन सीक्वेन्सची जबाबदारी राकेश पाटील आणि कार्तिक डंगरी यांनी घेतली आहे. कला दिग्दर्शनाचे काम दिलीप कंधारे यांनी पाहिले आहे. वेशभूषा अपेक्षा गांधी सोनी यांनी, तर रंगभूषा सुजीत सुरवसे यांनी केली आहे. या चित्रपटाचे कार्यकारी निर्माते अनुनेहा घोडके आणि निर्मिती व्यवस्थापक यश सणस आहेत. अक्षय लोणदे यांनी सिंक साऊंड, शर्मा यांच्या टिमने प्रकाश योजना आणि विजय म्हस्के यांनी प्रॉडक्शन हेड म्हणून काम पाहिले आहे.

# कलाकारांनी उत्साहात साजरा केला गणेश चतुर्थीचा उत्सव



सोनी सबचं पुष्पा इम्पॉसिबल आपल्या कलाकार आणि तांत्रिक टीमसोबत उत्सवाचा आनंद साजरा करत राहते, प्रत्येक प्रसंगाला एकत्र येण्याची संधी बनवते. सेटवर गणेश चतुर्थी साजरी करताना कलाकार आणि टीमने आनंद, सकारात्मकता आणि एकत्रतेची भावना कार्यस्थळी आणली.पुष्पा इम्पॉसिबलच्या सेटवर सगळ्यांनी मिळून सण साजरे करणं ही एक खास परंपरा झाली आहे. व्यस्त वेळापत्रकातून थोडा विराम घेऊन कलाकार आणि टीम एकत्र सजतात, उत्सवी क्षण शेअर करतात आणि एकमेकांसोबत वेळ घालवतात. आरतीसाठी एकत्र येणं, स्वादिष्ट प्रसादाचा आनंद घेणं अशा प्रसंगांमुळे टीममधील नातं अधिक घट्ट होतं आणि सेट खरंच कुटुंबासारखा वाटतो.

मुस्कान बामने, जी सोनी सबच्या पुष्पा इम्पॉसिबल मध्ये शनायाची भूमिका करते, यांनी सांगितले, ''मला वाटतं सेटवर सगळ्यांनी मिळून सण साजरा करणं नेहमीच खास असतं कारण सगळेच एकाच उत्सवी मूडमध्ये येतात. आम्ही सजतो, एकत्र वेळ घालवतो, जेवण शेअर करतो आणि एकमेकांच्या सोबतचा आनंद घेतो. आम्ही सगळे सण कुटुंबासारखेच साजरे करतो. दररोज इतके तास एकत्र घालवल्यानंतर या सेलिब्रेशन्समुळे कामाच्या पलीकडे एकत्र येण्याची संधी मिळते. हे सेटवर खूप आनंददायी आणि सकारात्मक ऊर्जा आणतं आणि सगळ्यांशी आणखी जवळीक वाटते. मी सगळ्यांसाठी घरचे मोदक घेऊन येणार आहे.''

नितीन बाबू, जो सोनी सबच्या यादें मध्ये चिरागची भूमिका करतो, यांनी सांगितले, ''ही माझी पहिली गणेश चतुर्थी पुष्पाच्या सेटवर असणार आहे, त्यामुळे मी खूप उत्साहित आहे. प्रत्येक सण आम्ही वेगळ्या आणि खास पद्धतीने साजरा करतो, त्यामुळे गणेश चतुर्थीसाठीही काहीतरी खास होणार याची खात्री आहे. सेटवर खूप सकारात्मक ऊर्जा असेल. गणेश चतुर्थीला ढोल-ताशावर नाचणं खूप मजेदार असतं आणि या कुटुंबासोबत ते अनुभवण्याची मला आतुरता आहे.''

दीक्षा जोशी, जी सोनी सबच्या यादें मध्ये दीप्तीची भूमिका करते, यांनी सांगितले, ''ही माझी पहिली गणेश चतुर्थी पुष्पाच्या सेटवर आहे आणि सगळ्यांसोबत ती साजरी करण्यासाठी मी खूप उत्सुक आहे. इथे आम्ही अनेक सण एकत्र साजरे केले आहेत, काही असेही जे घरी सहसा साजरे करत नाही, आणि त्यामुळे सेट खरंच कुटुंबासारखा वाटतो. मला महाराष्ट्रीयन पदार्थांसोबत गणेश चतुर्थी साजरी करण्याची खूप उत्सुकता आहे. तुलिका जीने मला मोदकांच्या इतक्या प्रकारांशी ओळख करून दिली आहे की ते सगळे चाखण्याची मला आतुरता आहे.''

# 'बाप्पा माझा' हे धमाकेदार गाणे प्रेक्षकांच्या भेटीस




गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर भक्तांसाठी एक नवा संगीतमय नजराणा घेऊन 'वीरता प्रॉडक्शन' पहिल्यांदाच सज्ज झालं आहे. गणेशोत्सवात गणेशभक्तांच्या मनावर राज्य करायला 'बाप्पा माझा' हे नवं कोरं गाणं भेटीस आलं आहे. प्रदर्शित झाल्यापासून अवघ्या चार दिवसांत या गाण्याने १ मिलियन व्ह्यूजचा टप्पा पार केला असून, प्रेक्षकांच्या पसंतीस हे गाणं उतरलं आहे.या गाण्याच्या माध्यमातून राजे यशोवर्धन याने पदार्पण केलं असून, त्याच्यासोबत रितेश कांबळे आणि अंकिता मेस्त्री प्रमुख भूमिकेत झळकत आहेत. गाण्याची कथा तीन गणेशोत्सवप्रेमी तरुणांभोवती फिरते. गणेशोत्सवाचे क्षण आपल्या ब्लॉगच्या माध्यमातून टिपण्यासाठी ते खेडेगावांत पोहोचतात. तिथे साधेपणाने आणि आपुलकीने साजरा होणारा गणेशोत्सव ते कॅमेऱ्यात कैद करतात. याचदरम्यान त्यांना गावातील एका शाळेची बिकट परिस्थिती आणि दुरुस्तीसाठी ठेवलेली दानपेटी दिसते. ही परिस्थिती पाहून ते शाळेच्या समस्यांचा व्हिडिओ शूट करून सोशल मीडियावर शेअर करतात. पुढे हा व्हिडिओ प्रचंड व्हायरल होतो आणि बाप्पाच्या कृपेने त्या शाळेच्या दुरुस्तीसाठी शासनाकडून निधी मंजूर होतो. त्यामुळे भक्ती, उत्सव आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून सकारात्मक बदल घडवण्याचा सुंदर संदेश या गाण्यातून देण्यात आला आहे.बॉलिवूड आणि मराठी सिनेसृष्टीतील सुप्रसिद्ध गायक दिव्या कुमार यांच्या दमदार आवाजात हे गाणे रेकॉर्ड करण्यात आले आहे. तर तरुणाईचे लाडके संगीतकार-गीतकार प्रशांत नाकती आणि करण सावंत यांनी या गाण्याचे संगीत व बोल रचले आहेत. खेड्यापाड्यात साधेपणाने साजरा होणाऱ्या गणेशोत्सवाची सुंदर झलक दाखवणारं हे गाणं रोहित जाधव दिग्दर्शित असून या गाण्याच्या निर्मितीची धुरा स्मिता वीरेंद्रसिंग यांनी सांभाळली आहे.

## राणी मुखर्जीला मातृशोक



बॉलिवूडची प्रसिद्ध अभिनेत्री राणी मुखर्जीवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. तिच्या आई कृष्णा मुखर्जी यांचे ७५ व्या वर्षी दुःखद निधन झाले. मंगळवारी (२२ सप्टेंबर) दुपारी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. दरम्यान, राणी मुखर्जींच्या आईचं निधन कशामुळे झालं, ते कारण अद्याप स्पष्ट करण्यात आलेलं नाही.

यशराज फिल्म्सच्या टीमने त्यांच्या निधनाची घोषणा केली. यशराज फिल्म्सने एक निवेदन प्रसिद्ध केलं. या निवेदनात म्हटलंय की, ''आम्ही अत्यंत दुःखी अंतःकरणाने कळवत आहोत की, राणी मुखर्जी यांच्या आई श्रीमती कृष्णा मुखर्जी (वय ७५ वर्षे) यांचे आज दुपारी निधन झाले आहे. या कठीण प्रसंगी सर्वांनी दाखवलेले प्रेम, पाठिंबा आणि प्रार्थनांबद्दल कुटुंबीय ऋणी आहेत. या दुःखाच्या काळात कुटुंबाच्या खाजगीपणाचा सर्वांनी आदर करावा, ही नम्र विनंती.''

कृष्णा मुखर्जी या एक पार्श्वगायिका होत्या. त्यांनी बंगाली चित्रपटसृष्टीत अनेक गाणी गायली आहेत. त्यांचे पती राम मुखर्जी हे हिंदी चित्रपटसृष्टीतील प्रख्यात निर्माते-दिग्दर्शक आणि फिल्मालय स्टुडिओचे सह-संस्थापक होते. राणीच्या अभिनयाच्या प्रवासात आणि तिच्या यशात तिच्या आईचा अत्यंत मोलाचा वाटा राहिला आहे. या दुःखाच्या प्रसंगी चित्रपटसृष्टीतील अनेक कलाकार आणि चाहत्यांनी मुखर्जी कुटुंबाप्रती संवेदना व्यक्त केल्या आहेत.

# 'सहल' चित्रपटाचं पोस्टर लाँच



मराठी चित्रपटसृष्टीतील गुणी अभिनेत्री देविका दफ्तरदार महत्त्वपूर्ण भूमिकेतून प्रेक्षकांच्या भेटीला येत आहेत. 'सहल' या आगामी मराठी चित्रपटात त्यांची भावस्पर्शी भूमिका पहायला मिळणार आहे. ९ ऑक्टोबरला 'सहल' चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटाचं पोस्टर लाँच करण्यात आलं आहे.

के. स्वामिनी फिल्म प्रॉडक्शनच्या बॅनरखाली निर्मित या चित्रपटाचे लेखन आणि दिग्दर्शन मुकुंद वसंत खुपेरकर यांनी केले आहे. चित्रपटाचे निर्माते प्रशांत केसरकर आणि विलास केसरकर असून, सहनिर्माते मुकुंद वसंत खुपेरकर आहेत. मूळ पटकथा मुकुंद वसंत खुपेरकर यांनी लिहिली आहे. 'सहल'मध्ये देविका दफ्तरदार यांच्यासोबत सिद्धेश मुकुंद खुपेरकर, कल्याणी अडसुळ, आदित्य खुपेरकर आणि सागर कोळी यांच्या प्रमुख भूमिका आहेत. कोल्हापूरच्या सिद्धेश मुकुंद खुपेरकर याचे या चित्रपटाच्या माध्यमातून मुख्य नायक म्हणून पदार्पण असून त्याने याआधी झी मराठीवरील प्रसिद्ध मालिका ''तुझ्यात जीव रंगला'' ह्यामध्ये लहान राणाच्या भावाची म्हणजेच सुरजची भुमिका साकारली होती, तसेच डॉ केशव हेगडेवार ह्यांची बाल भुमिका ही साकारली होती.चित्रपटाचे छायांकन अभिषेक शेटे यानी केले असून, संकलनाची जबाबदारी चंद्रशेखर गुरव यांनी सांभाळली आहे. सुहास मुंढे, समीर पठाण यांनी लिहिलेल्या गीतांना डॉ. जय भीम शिंदे यांचे संगीत दिग्दर्शन लाभले असून सुप्रसिद्ध गायक आदर्श शिंदे याच्या आवाजात चित्रपटातील गीत स्वरबद्ध करण्यात आले आहे. मुकुंद वसंत खुपेरकर यांनी कार्यकारी निर्माता, श्रेय चव्हाण यांनी वेशभूषा, आदित्य चव्हाण यांनी ध्वनिसंयोजन तर प्रशांत कुंभार यांनी कला दिग्दर्शन केले आहे.

देविका दफ्तरदार यांनी अनेक चित्रपटांतून अत्यंत संवेदनशील भूमिका साकारून त्यांच्यातील सक्षम अभिनेत्रीचं दर्शन घडवलं आहे. आता सहल या चित्रपटातील 'आई' या भूमिकेतून देविका दफ्तरदार नेमके कोणते भावविश्व उभे करतात आणि चित्रपटातील इतर व्यक्तिरेखांशी त्यांचे नाते कसे उलगडत जाते, याची उत्सुकता निर्माण झाली आहे. देविका दफ्तरदार यांच्या अभिनयाची ताकद आणि संवेदनशील व्यक्तिरेखा यामुळे 'सहल लक्षवेधी ठरत आहे. ९ ऑक्टोबरपासून 'सहल' प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.


# 'भूतम् भयम्'मधून भन्नाट पारलौकिक साहसाचा अनुभव

नेहमीच्या हॉरर चित्रपटांपेक्षा वेगळ्या अलौकिक साहसाचा अनुभव घेण्यासाठी सज्ज व्हा. 'भूतम् भयम् चा प्रीमियर २५ सप्टेंबर २०२६ रोजी केवळ मराठी झी५वर होणार आहे. या चित्रपटातून रामचंद्र गावकर दिग्दर्शनात पदार्पण करत आहेत. भय, विनोद, रहस्य आणि साहस यांचा अनोखा मिलाफ या चित्रपटात पाहायला मिळणार आहे. कोणतीही वस्तू सोन्यात बदलण्याची शक्ती असलेले एक प्राचीन नाणे या हटके कल्पनेभोवती चित्रपटाची कथा फिरते.झी स्टुडिओज मराठी प्रस्तुत आणि कायरा कुमार क्रिएशन्सच्या बॅनरखाली निर्मिती करण्यात आलेल्या 'भूतम्? भयम्'मध्ये छाया कदम, पुष्कराज चिरपुटकर, करण सोनावणे, नील साळेकर, सौरभ घाडगे आणि शुभम जाधव यांच्यासह नव्या पिढीतील अनेक गुणी कलाकारांच्या भूमिका आहेत.

सात बेरोजगार मित्रांना एक रहस्यमय नाणे सापडते आणि झटपट श्रीमंत होण्याचा मार्ग म्हणून ते या नाण्याकडे पाहू लागतात. मात्र, त्यातूनच ते 'राणीवाडा' या ओसाड हवेलीच्या भयावह आणि गूढ जगात ओढले जातात. या हवेलीत अनेक शतकांपूर्वीचा शाप दडलेला असतो. भयावह प्रसंग आणि विक्षिप्तपणातून निर्माण होणारा विनोद यांचा समतोल साधत 'भूतम्? भयम्'मधून हॉरर-कॉमेडीला वेगळे स्वरूप देण्यात आले आहे. अलौकिक घटनांमधील रहस्याला विनोद, साहस आणि उत्कंठेची जोड देतानाच मैत्री, लोभ, जगण्यासाठीची धडपड आणि सहज मिळणाऱ्या संपत्तीचे आकर्षण यांचाही वेध चित्रपटातून घेण्यात आला आहे. हटके मध्यवर्ती कल्पना, विविध व्यक्तिरेखांची धमाल टीम आणि पुढे काय घडणार याचा अंदाज बांधता न येणारी कथा यांच्या माध्यमातून नेहमीच्या वाटेने न जाणारा अलौकिक मनोरंजनाचा अनुभव या चित्रपटातून मिळणार आहे. भयासोबतच प्रेक्षकांना भरपूर हसवणारे प्रसंगही यात पाहायला मिळणार आहेत.

सात बेरोजगार मित्रांना एक प्राचीन आणि रहस्यमय नाणे सापडते. कोणतीही वस्तू सोन्यात बदलण्याची शक्ती या नाण्यात असल्याचे मानले जाते आणि इथूनच त्यांचा अनपेक्षित साहसी प्रवास सुरू होतो. श्रीमंत होण्याच्या लालसेपोटी हे मित्र 'राणीवाडा' नावाच्या एका ओसाड हवेलीत जातात. मात्र, त्या हवेलीच्या भिंतींआड दडलेल्या गडद रहस्यांची त्यांना कल्पनाही नसते. संपत्तीची लालसा वाढत असतानाच या नाण्यासोबत शतकानुशतके जुना शापही जोडलेला असल्याचे त्यांच्या लक्षात येते. त्यांचा मित्र गजा अचानक रहस्यमयरीत्या बेपत्ता होतो आणि परिस्थिती आणखी भयावह वळण घेते. त्यानंतर या मित्रांना आपल्या भोवती असलेल्या अलौकिक शक्तींचा सामना करावा लागतो. भयावह प्रसंग, विनोदातून निर्माण होणारा गोंधळ आणि अनपेक्षित वळणांनी भरलेल्या 'भूतम् भयम्'मध्ये मैत्री, लोभ आणि जगण्यासाठीची धडपड यांची कथा भय आणि विनोदाची सांगड घालत मांडण्यात आली आहे.

भूतम्? भयम्मध्ये भय, विनोद, रहस्य आणि साहस यांचा अनोखा मिलाफ पाहायला मिळतो. कोणतीही वस्तू सोन्यात बदलण्याची ताकद असलेल्या प्राचीन नाण्याभोवती फिरणारी हटके कथा प्रेक्षकांना वेगळ्या प्रकारचा अनुभव देण्याचा प्रयत्न करते.



राणीवाड्याच्या गूढ आणि भयावह जगात घेऊन जाणारी ही कथा सात मित्रांच्या साहसाभोवती फिरते. करण सोनावणे, नील साळेकर, सौरभ घाडगे, शुभम जाधव आणि छाया कदम यांच्यासह नव्या पिढीतील कलाकारांचा सहभाग हे या चित्रपटाचे आणखी एक वैशिष्ट्य आहे. मराठी झी५वर ही वेगळी कथा प्रेक्षकांना अनुभवता येणार असल्यामुळे मी खूप उत्सुक आहे.''

छाया कदम म्हणाल्या, ''भूतम् भयम्मध्ये काम करण्याचा अनुभव माझ्यासाठी खूप वेगळा होता. या चित्रपटात भय आणि विनोद यांचा अनोखा मिलाफ आहे. टीमने उभे केलेले या कथेचे विश्व गूढ वाटते आणि त्याच वेळी मनोरंजकही आहे. काही प्रसंग तुम्हाला हसवतील, तर काही प्रसंगांमध्ये पुढे काय होणार याची उत्सुकता कायम राहील. ही कथा प्रेक्षकांसमोर येण्यासाठी मी उत्सुक आहे. भूतम्? भयम् हा एक खास अनुभव करणारी धमाल गोंधळ, रहस्य आणि अलौकिक घटनांचा प्रेक्षकांनी मनमुराद आनंद घ्यावा, असे मला वाटते.''

पुष्कराज चिरपुटकर म्हणाले, ''भूतम् भयम्च्या कथेत पुढे काय घडेल याचा अंदाज बांधता येत नाही आणि हीच गोष्ट मला या चित्रपटाकडे सर्वाधिक आकर्षित करणारी होती. मैत्री, लोभ, विनोद आणि अलौकिक घटनांची या चित्रपटात अशा प्रकारे सांगड घालण्यात आली आहे की कथा सतत पुढे सरकत राहते. माझे पात्र अशा मित्रांच्या गटातील एक आहे, जे त्यांच्या कल्पनेपलीकडच्या परिस्थितीत अडकतात. रहस्य हळूहळू उलगडत असताना या मित्रांमधील समीकरणे कशी बदलतात, हा अनुभव खूपच रंजक होता. चित्रपटात विनोद आणि उत्कंठा यांचा उत्तम समतोल साधण्यात आला आहे. या भन्नाट प्रवासात आमच्यासोबत सहभागी होताना प्रेक्षकांनाही खूप मजा येईल, असे मला वाटते. मराठी झी५वरील डिजिटल प्रीमियरची मी आतुरतेने वाट पाहत आहे.''

# सेटवर आरती, प्रसाद आणि एकोप्याने गणेशोत्सव



सोनी सबवरील हस्तिनापुर के वीर पांडव आणि कौरवांच्या बालपणातील वर्षं जिवंत करतं, ज्यातून त्यांच्या आयुष्याला आकार देणाऱ्या मूल्यं आणि नात्यांचा प्रकाश टाकला जातो. कलाकार रोज सेटवर एकत्र वेळ घालवतात, पण उत्सवाच्या साजरीकरणामुळे त्यांना एक कुटुंब म्हणून एकत्र येण्याची संधी मिळते.

या गणेशोत्सवात संपूर्ण कलाकार आणि तांत्रिक टीमने सेटवर सुंदर सजावटीसह बाप्पाचं स्वागत केलं आणि उत्सव एकत्र साजरा केला. आरतीसाठी एकत्र येणं, भजनं गाणं आणि गोड पदार्थ शेअर करणं या सगळ्यामुळे सेटवर उबदार आणि सकारात्मक ऊर्जा निर्माण झाली आहे. मनीष वाधवा, विवाना सिंग आणि उर्वा सावालिया यांनी त्यांच्या साजरीकरणाचे काही क्षण शेअर केले.

भीष्म पितामहची भूमिका साकारणारे मनीष वाधवा यांनी सांगितले, ''मला खरंच प्रत्येक सणाने आणलेली एकत्रता खूप आवडते. या गणेशोत्सवात आमच्या सेटवरील सर्वजण एक कुटुंब म्हणून बाप्पासोबत साजरा करत आहेत. आम्ही आरतीत सहभागी होतो, आनंद वाटतो आणि एकत्र साजरा करतो. बाप्पाचे आशीर्वाद आमच्यासोबत असल्याने शक्ती, सकारात्मकता आणि श्रद्धेची भावना निर्माण होते आणि सेटवर हा अनुभव असणं खूप सुंदर आहे.''

गांधारीची भूमिका साकारणाऱ्या विवाना सिंग यांनी सांगितले, ''आम्ही सर्वजण आरतीसाठी एकत्र येतो आणि आरती एकत्र गातो, ज्यामुळे साजरा खूप खास वाटतो. आरतीनंतर आम्ही सर्वजण एकत्र बसतो आणि प्रसाद घेतो, आपली परंपरा शेअर करतो आणि उत्सवी वातावरणाचा आनंद घेतो. सेटवर इतकं सकारात्मक आणि शांत वातावरण आहे आणि बाप्पा आमच्यासोबत असल्याने संपूर्ण दिवस आणखी सुंदर होतो.''


अर्जुनची भूमिका साकारणाऱ्या उर्वा सावालिया यांनी सांगितले, ''सेटवर माझ्या मित्रांसोबत गणेशोत्सव साजरा करणं खरंच खूप छान वाटतं. आमच्यासोबत बाप्पा आहेत आणि आम्ही एकत्र आरती करतो. आमची गोड पार्टी होते जिथे आम्ही उकडीचे मोदक, बुंदी लाडू, मावा लाडू आणि अनेक मिठाया खातो. संपूर्ण सेट आनंदी वातावरणाने भरलेला आहे आणि सर्वांसोबत एकत्र साजरा करणं खूप सुंदर आहे.''

# कलाकारांचा पहिला पगार

पहिला पगार मिळण्याची उत्सुकता नेहमीच वेगळी असते. रकमेपलीकडे जाऊन, तो आपल्या मेहनतीने कमावल्याची भावना आणि त्यासोबतच्या आठवणींना जपतो. सोनी सब चे कलाकार मनीष वाधवा, मुकुल हरीश, इक़बाल खान, आभास मेहता आणि गुलकी जोशी यांनी त्यांच्या पहिल्या पगाराच्या आठवणींना आणि त्यासोबतच्या खास क्षणांना उजाळा दिला.कॉलेजमधील मित्रांना ट्री देण्यापासून ते आईसोबत पहिली कमाई शेअर करण्यापर्यंत, कलाकारांनी पहिला पगार मिळाल्याचा आनंद आणि उत्साह आठवला. अनेकांसाठी तो पहिला पगार स्वातंत्र्याची भावना घेऊन आला आणि मेहनतीचं खरं रूप दाखवून गेला.

मनीष वाधवा, जे सोनी सब च्या हस्तिनापुर के वीर मध्ये भीष्म पितामहची भूमिका साकारतात, यांनी सांगितले, ''मला माझा पहिला पगार १९९८ मध्ये एका टेलिव्हिजन मालिकेत केलेल्या भूमिकेसाठी मिळाला होता. मी संपूर्ण रक्कम आईला दिली होती. तो खूप साधा क्षण होता, पण आईला पहिली कमाई देताना खूप छान वाटलं. आजही माझ्या पहिल्या पगाराची आणि त्यासोबत मी काय केलं याची आठवण माझ्यासाठी खूप खास आहे.''

मुकुल हरीश, जे सोनी सब च्या पुष्पा इम्पॉसिबल मध्ये टायगरची भूमिका करतात,




यांनी सांगितले, ''माझा पहिला पगार फार मोठा नव्हता, पण तो मिळाल्याने मोठं टप्पं गाठल्यासारखं वाटलं. मी बॉम्बेमध्ये होतो आणि सेलिब्रेट करण्यासाठी खूप उत्सुक होतो, त्यामुळे स्वतःला ट्रीट देण्याचा निर्णय घेतला आणि जवळजवळ संपूर्ण पगार एकाच वेळी खर्च केला. त्या वयात स्वतः कमावून तो क्षण साजरा करणं खूप छान वाटलं. मागे वळून पाहताना वाटतं की थोडं वाचवायला हवं होतं, पण त्या पहिल्या पगाराने मला आजही आठवणारा धडा दिला टप्पा साजरा करा, पण उद्यासाठी थोडं वाचवा.''

इक़बाल खान, जे सोनी सब च्या यादें मध्ये डॉ. देव मेहता साकारतात, यांनी सांगितले, ''माझा पहिला पगार ₹३,५०० होता, कॉलेजमध्ये असताना एका पँट्स ब्रँडसाठी शूट केलं होतं. त्यांना फक्त पँट्सचे फोटो हवे होते, चेहरा नव्हता! त्या वेळी ती रक्कम खूप मोठी वाटली. मी ती भाडं आणि किराणा यासाठी वापरली, आणि निरुलाजमध्ये फास्ट फूड खाल्लं. ती साधी सुरुवात होती, पण पहिली कमाई मिळाल्याची भावना आजही लक्षात आहे.''

आभास मेहता, जे सोनी सब च्या हस्तिनापुर के वीर मध्ये जरासंधची भूमिका करतात, यांनी सांगितले, ''जेव्हा मला माझा पहिला पगार मिळाला, तेव्हा मला खूप आनंद झाला होता, हे मला आठवतं. मी सर्वात आधी तो माझ्या आईला दिला. माझी पहिली कमाई तिच्यासोबत वाटून घेता येणं आणि तिचा आनंद पाहणं, हा एक खूप खास अनुभव होता. ही एक अशी आठवण आहे जी मी नेहमी जपून ठेवीन..''

गुलकी जोशी, जे सोनी सब च्या यादें मध्ये डॉ. सृष्टि अग्रवालची भूमिका करतात, यांनी सांगितले, ''माझा पहिला पगार मला १९ व्या वर्षी, कॉलेजमध्ये असताना मिळाला. तो दूरदर्शनवरील एका शोसाठी होता आणि मला सुमारे ₹५,००० मिळाले. मी सर्व मित्रांना सँडविचेसची ट्रीट दिली. मागे वळून पाहताना ती रक्कम लहान होती, पण त्या वयात स्वतः कमावून मित्रांसोबत साजरी करणं खूप खास वाटलं.''

# विसर्जनापूर्वी गणरायाच्या कानात 'हे' म्हणा,सर्व इच्छा होतील पूर्ण

(पान४ वरून)

तो आपल्याला सोडून जाणार हा विचार आपल्या मनाला पटतच नाही. आज आपल्या घरातील आपल्या बाप्पाचा शेवटचा मुक्काम असतो, म्हणजे त्याचं वास्तव्य आपल्या घरात कायमच असणार परंतु मुर्तिरूपी बाप्पाच त्या दिवशी विसर्जन असते. लाडक्या बाप्पाला निरोप देताना अगदी भरून येत. तळणीचे मोदक, उकडीचे मोदक, लाडू, पेढा या पदार्थांचा सुगंध प्रत्येक घरात दरवळत असतो.



घराघरात विसर्जनाची तयारी केलेली आपल्याला दिसून येते. गणरायाची स्थापना झाल्यापासून आपण अनेक विधी करत असतो. विसर्जनाच्या दिवशी महत्त्वाची गोष्ट करायला विसरतो सांगायचं झालं तर, काही लोकांनी त्यांच्या पारंपरिक आणि कौटुंबिक रितीरिवाजानुसार मूर्तीचं विसर्जनही सुरू केलं आहे. मात्र, गणपतीच्या विसर्जनासोबत तुम्ही हे छोटेसे कृत्य केल्यास तुमच्या अपूर्ण इच्छाही पूर्ण होतील. तर त्यासाठी काय केलं पाहिजे हे सर्वात आधी जाणून घ्या.


प्रत्येक गावात आणि शहरात गणेशोत्सव हा एक वेगळ्याच प्रकारचा उत्सव असतो. दररोज सकाळी आणि संध्याकाळी पूजा, नृत्य आणि गाण्यांचा जल्लोष असतो. लहान मुलांपासून ते वृद्धांपर्यंत सर्वजण मोठ्या आनंदाने गणेशोत्सवात सहभागी होतात.मात्र, काही ठिकाणी विसर्जन आधीच सुरू झालं आहे.

मात्र,विसर्जनाच्या वेळी तुम्ही काही महत्त्वाचे शब्द गणपतीच्या कानात सांगितल्यास, तुमच्या इच्छा पूर्ण होतील.तर तुम्हाला देखील प्रश्न पडला असेल की,ते शब्द नेमके कोणते आहेत.सर्वात महत्त्वाचं म्हणजे,मूर्ती विसर्जनासाठी नेण्यापूर्वी, तुम्ही तुमची इच्छा गणपतीच्या डाव्या कानात सांगा आणि तुमच्या उजव्या हाताने तुमचं तोंड झाका आणि तुमच्या मनात जे आहे ते गणपतीला सांगा.

त्याशिवाय, तुमची इच्छा सांगितल्यानंतर तुम्ही गणरायाच्या कानात सांगा,''हे प्रभू, माझी इच्छा पूर्ण कर, माझ्या सन्मानाचं रक्षण कर, माझे भले होवो हे प्रभू, मला सुख, नोकरीत व घरात धनसंपत्ती आणि सर्वांना उत्तम आरोग्याचा आशीर्वाद दे.''पंडितांच्या मते, असं म्हटल्याने तुमची इच्छा पूर्ण होतं.

पण विद्वानांच्या मते यामागे एक कारण आहे. त्याचा अर्थ काय? हे देखील जाणून घ्या. विसर्जन म्हणजे भगवान गणेश पृथ्वी सोडून कैलास पर्वतावर पोहोचतात.विसर्जनानंतर, भगवान गणेश थेट कैलास पर्वतावर पोहोचतात आणि आपल्या आई-वडिलांना भेटून त्यांचं आशीर्वाद घेतात. त्यामुळे, असा विश्वास आहे की त्यावेळी तुम्ही व्यक्त केलेलं स्वप्न ते शिव आणि पार्वतीपर्यंत पोहोचवतील. म्हणूनच, असं म्हटलं जातं की विसर्जनाच्या दिवशी, तुम्ही तुमची इच्छा कोणालाही न ऐकता भगवान गणेशाच्या कानात सांगितली पाहिजे.

# सत्यशोधक समाजाची स्थापना : महात्मा फुले यांच्या सामाजिक क्रांतीचे ऐतिहासिक पाऊल



**महात्मा** ज्योतिराव फुले यांच्या द्वि जन्म शताब्दी वर्षाच्या निमित्ताने त्यांच्या जीवनकार्याचा आणि विचारांचा मागोवा घेणे म्हणजे केवळ एका महान समाजसुधारकाचे स्मरण करणे नव्हे, तर त्यांनी समाजासमोर ठेवलेल्या समता, शिक्षण, विवेक आणि सामाजिक न्यायाच्या विचारांचा पुनर्विचार करणे होय, या महान कार्यातील एक अत्यंत महत्त्वाची घटना म्हणजे २४ सप्टेंबर १८७३ रोजी पुणे येथे झालेली सत्यशोधक समाजाची स्थापना.

एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रातील सामाजिक परिस्थिती विषमतेने ग्रासलेली होती. जन्मावर आधारित उच्च-नीचता, जातिभेद, अस्पृश्यता, अंधश्रद्धा, कर्मकांड आणि धार्मिक मध्यस्थी यामुळे समाजातील मोठा वर्ग सामाजिक व शैक्षणिक अधिकारांपासून वंचित होता. शूद्र-अतिशूद्र समाजाला ज्ञानापासून दूर ठेवले जात होते, तर स्त्रियांची स्थितीही अत्यंत दयनीय होती. महात्मा ज्योतिराव फुले यांनी या परिस्थिती विरुद्ध प्रत्यक्ष काम सुरू केले. सावित्रीबाई फुले यांच्या सहकार्याने त्यांनी मुलींच्या शिक्षणासाठी शाळा सुरू केली. वंचित समाजातील मुलांना शिक्षणाची संधी दिली. विधवा, स्त्रिया आणि शोषित घटकांच्या प्रश्नांकडे त्यांनी समाजाचे लक्ष वेधले. जवळपास २५ वर्षांहून अधिक काळ समाज सेवेत व्यतीत केल्यानंतर समाजातील अन्यायाची मुळे खोलवर असल्याची त्यांना जाणीव झाली. केवळ एखादी प्रथा बदलून समाजपरिवर्तन होणार नाही; त्यासाठी समाजातील बहुजनांना शिक्षण, विचार, आत्मभान आणि संघटनेची शक्ती मिळणे आवश्यक आहे असे फुले यांना वाटत होते. याच विचारातून एका संघटित सामाजिक चळवळीची गरज निर्माण झाली.

सामाजिक विषमतेविरुद्ध संघटितपणे कार्य करण्याचा विचार ज्योतिरावांच्या मनात दृढ झाला. त्यांनी पुणे, मुंबई आणि इतर ठिकाणच्या सुशिक्षित व समविचारी मंडळींना आवाहन केले आणि पुण्यात एक सभा बोलावली.

या आवाहनाला प्रतिसाद देत सुमारे ५० ते ६० समविचारी व्यक्ती सभेस उपस्थित राहिले. २४ सप्टेंबर १८७३ हा दिवस महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासातील महत्त्वाचा दिवस ठरला.

ज्योतीरावांच्या हातून राष्ट्रात अखंड लांबवर प्रकाश पाडणारी दिव्य ज्योत उत्पन्न झाली, ती म्हणजे ज्योतिराव फुले आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी एकत्र येऊन 'सत्यशोधक समाज' या संघटनेची स्थापना केली.

समाजातील विषमता दूर करणे, शूद्र-अतिशूद्रांना त्यांच्या अधिकारांची जाणीव करून देणे आणि शिक्षण व सदुपदेशाच्या माध्यमातून सामाजिक जागृती घडवून आणणे हा या संस्थेच्या कार्याचा केंद्रबिंदू होता. 'सत्यशोधक' म्हणजे सत्याचा शोध घेणारा. समाजाने कोणत्याही रूढीचा किंवा परंपरेचा केवळ परंपरा म्हणून स्वीकार न करता तिच्याकडे विवेकाने पाहावे, हा या चळवळीचा मूलभूत विचार होता. सत्यशोधक समाजाने जातिभेद, कर्मकांड, अंधश्रद्धा आणि सामाजिक विषमतेला विरोध केला. माणूस हा जन्मामुळे मोठा किंवा लहान नसतो; सर्व मानव समान आहेत, हा विचार समाजाच्या केंद्रस्थानी होता.

सत्यशोधक समाजाच्या सुरुवातीच्या काळात सभासदांना सामाजिक तसेच आर्थिक दबावाला सामोरे जावे लागले. ज्योतिराव फुले यांचे आप्त ज्ञानबा मल्हारजी झगडे यांनी सत्यशोधक विचारांचा स्वीकार केल्यामुळे त्यांना मिस्त्रीच्या कामावरून काढून टाकण्यात आले. नारायणराव कडलक जे सरकारी नोकरीत असून सत्यशोधक समाजाचे कार्यवाह होते, यांची पुण्याहून महाबळेश्वरला बदली करण्यात आली, सत्यशोधक समाजाचे सभासद होऊ नयेत म्हणून धाक दाखवणे, सामाजिक बहिष्कार घालणे तसेच नोकरी-व्यवसायाच्या माध्यमातून दबाव आणणे, अशा प्रकारचा विरोध त्या काळात केला जात होता. त्यामुळे सत्यशोधक समाजाची सुरुवातीची वाटचाल ही केवळ वैचारिक संघर्षाची नव्हे, तर नोकरी, व्यवसाय, आर्थिक सुरक्षितता आणि सामाजिक प्रतिष्ठा धोक्यात घालून केलेल्या सामाजिक परिवर्तनाच्या संघर्षाची होती.

सत्यशोधक समाजाने केवळ विचार मांडले नाहीत, तर त्या विचारांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यास सुरुवात केली. त्या काळात विवाहासाठी पुरोहित, धार्मिक कर्मकांड आणि मोठा खर्च अपरिहार्य मानला जात होता. या प्रथेला पर्याय म्हणून सत्यशोधक समाजाने पुरोहिताशिवाय, साध्या पद्धतीने आणि वधू-वरांच्या समानतेवर आधारित विवाह पद्धती पुढे आणली. स्थापनेनंतर अवघ्या काही महिन्यांतच २५ डिसेंबर १८७३ रोजी पहिला सत्यशोधक विवाह झाला.

हा विवाह सत्यशोधक कार्यकर्ते सीताराम जवाजी आल्हाट आणि राधाबाई यांचा झाला. राधाबाई या सावित्रीबाईंच्या मैत्रीण बजूबाई ज्ञानोबा निंबणकर यांच्या कन्या होत. हा विवाह सावित्रीबाईंनी स्वखर्चाने घडवून आणल्याचे इतिहास तज्ञ सांगतात.

या विवाहाचे वैशिष्ट्य म्हणजे पुरोहिताशिवाय विवाह विधी पार पडला. वधू-वरांनी एकमेकांशी निष्ठेने वागण्याची शपथ घेतली आणि विवाह सोहळा साधेपणाने पार पडला. या विवाहामुळे समाजासमोर एक नवा आदर्श निर्माण झाला. विवाहासाठी मध्यस्थाची आवश्यकता नाही आणि विवाह हा दोन व्यक्तींच्या समान संमतीवर व जबाबदारीवर आधारित सामाजिक संस्कार असू शकतो. पुढे ज्ञानोबा ससाणे आणि काशीबाई शिंदे यांचाही विवाह सत्यशोधक पद्धतीने झाला. अशा विवाहांमुळे सत्यशोधक समाजाच्या विचारांना प्रत्यक्ष सामाजिक व्यवहारात स्थान मिळू लागले.

सत्यशोधक समाजाची खरी ताकद याच ठिकाणी दिसून येते. फुले यांनी केवळ व्याख्याने देऊन किंवा लेखन करून सामाजिक परिवर्तनाची अपेक्षा केली नाही. त्यांनी शिक्षण, संघटन आणि प्रत्यक्ष कृती या तिन्ही माध्यमांचा वापर केला. स्त्रीशिक्षणासाठी सावित्रीबाईंचे कार्य, वंचितांसाठी शिक्षणाची दारे खुली करणे, सामाजिक रूढींना प्रश्न विचारणे आणि पुरोहिताशिवाय सत्यशोधक विवाह घडवून आणणे या सर्व कृती एकाच सामाजिक तत्त्वज्ञानातून निर्माण झाल्या होत्या. महात्मा फुले यांच्या द्विजन्मशताब्दी वर्षात सत्यशोधक समाजाच्या स्थापनेकडे केवळ इतिहासातील घटना म्हणून पाहणे पुरेसे नाही. फुले यांनी उपस्थित केलेले प्रश्न आजही सामाजिक जीवनात विविध स्वरूपात आपल्यासमोर येतात. शिक्षण, समता, स्त्री-पुरुष समानता, सामाजिक न्याय, विवेक आणि मानवी प्रतिष्ठा ही मूल्ये आजही समाजाच्या प्रगतीसाठी महत्त्वाची आहेत.

२४ सप्टेंबर १८७३ रोजी झालेली सत्यशोधक समाजाची स्थापना ही महात्मा ज्योतिराव फुले यांच्या सामाजिक क्रांतीतील निर्णायक घटना होती. एका सभेत मांडलेला विचार पुढे एका व्यापक सामाजिक चळवळीत रूपांतरित झाला. आणि त्या विचारांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यासाठी सीताराम जवाजी आल्हाट आणि राधाबाई यांचा पहिला सत्यशोधक विवाह हा ऐतिहासिक प्रयोग ठरला.

महात्मा फुले यांच्या द्विजन्मशताब्दी वर्षात त्यांचे स्मरण करताना त्यांच्या कार्याचा गौरव करण्याबरोबरच त्यांनी दिलेला मूलभूत संदेश आत्मसात करणे आवश्यक आहे. शिक्षणातून जागृती, सत्याच्या शोधातून विवेक, संघटनेतून शक्ती आणि समतेतून माणुसकी. हाच सत्यशोधक समाजाचा आणि महात्मा फुले यांच्या सामाजिक क्रांतीचा खरा वारसा आहे.

-राजू बसाप्पा बिद्रेवाडी


# भगवान महावीर वैज्ञानिकांचे महावैज्ञानिक

**पहाटे** सूर्योदय झाल्यावर कमल फूल उमलते.आपल्या शरीराच्या भागाना कमल उपमेने विभुषित केले आहे.जसे मुखकमल, हृदयकमल, नेत्रकमल,हस्तकमल आदी कमलाप्रमाणेच आपल्या अंगात सूर्योदयानंतर आकुंचन विस्तार होतो.मनुष्याला आपले मुख्य कमल सूर्योदयानंतर खोलले पाहिजे.सूर्यास्तानंतर मुख्यकमल बंद केले पाहिजे.अर्थात रात्री भोजन त्याग केला पाहिजे.भगवान महावीर वैज्ञानिकांचे महावैज्ञानिक आहेत.

भगवान महावीरानी २५०० वर्षापूर्वी सांगितले आहे की, रात्री भोजन त्याग केले पाहिजे. सूर्यास्तानंतर रात्री सूर्यप्रकाश नसल्याने अनंत सुक्ष्म जीवांची उत्पत्ती होते.ते सुक्ष्म जीव आपल्या रात्री भोजनात सामील होतात.आज डॉक्टर सांगतात की, झोपण्यापूर्वी ३-४ तास अगोदर जेवण करा. त्यामुळे आपले शरीर स्वास्थ्य चांगले होते. पचनक्रिया चांगली होऊन आराम झोप लागते.निद्रा विकार होत नाहीत.

भगवान महावीर सांगतात पाणी जल गाळून प्या.एक थेंब पाण्यात ३६४५० सुक्ष्मजीव असतात.पाणी गाळून प्याल्याने सुक्ष्म जीवाची हिंसा न होता रक्षा होते.डॉक्टर सांगतात पाणी फिल्टर करून प्या. पाण्यातील बॅक्टेरिया,किटाणू आपल्या पोटात विकार करतात.पोट खराब करतात. भगवान महावीरानी २५०० वर्षापूर्वी हा उपदेश दिला आहे. भगवान महावीर सांगतात अष्टमी चतुदर्शीला उपवास व्रत केले पाहिजे.त्यामुळे मन वचन काया वर संयम प्राप्त होईल आणि आपला आत्मा शुध्द होईल.डॉक्टर सांगतात आठवड्यातून एकदा लघंन करा.त्यामुळे पोटरूपी मशीनला विश्रांती मिळून पोटाची क्रिया चांगली राहील.भगवान महावीर बाणीला विना तर्क श्रध्दापूर्वक मानले पाहिजे.आज मनुष्याची श्रध्दा आणि डॉक्टरप्रति आहे. औषध न बघता डॉक्टरांच्या सांगण्यावर खातो मानवाची श्रध्दा न्हावीवर आहे.हातात सुरी आहे.मान वाकवितो. विश्वास आहे तो केसच कापणार मान कापणार नाही. तशी श्रध्दा आपली देव शास्त्र गुरूवर पाहिजे.आपला संसार सुखमयच होणार.

जीवनात परिवार सुखी करण्यासाठी एक उपाय आहे. आपण जे काम करतो त्याचे श्रेय दुसऱ्यांना द्या.आपणाला देवू नका.जर आपण मी करतो माझ्यामुळेच होते.(मी-मीपणा) यामुळे आपापसात इर्षा, क्रोध, द्वेष, भावना निर्माण होतो. दुसऱ्यांना कामाचे श्रेय दिल्यास आपापसात प्रेम, दया, करूणा, भाव वाढतात.सर्वजण आनंदी प्रसन्न रहातात.आपला मान अहंकार कमी होतो.कुणाची प्रशंसा करणे त्यांना फुल देण्यासारखे आहे तर कुणाचीही निंदा करणे.दुसऱ्याला काटा चोचल्यासारखे वाईट आहे. जीवनात दोन शब्द मंत्राचे काम करतील.बहुत अच्छा व बहुत बढिया कुणाचेही वाईट करू नका व प्रशंसा नको. त्याला हसून बहुत अच्छा म्हणा तो प्रसन्न होईल.आपली वाणीच आम्हाला चांगला व वाईट बनविते.आपणच जीवनात मोठे आहो आपल्या कारण व लहान छोटे आहोत. आपल्याकारणाने पाण्याचा थेंब उसात जावून गोड होतो. कडूनिंबात जावून कडू होतो. सर्व मुखात जावून जहर होतो. शिंपल्यात जावून मोती आणि भगवान प्रभू डोक्यावर जावून पवित्र गंधोदक होतो.मानव जशा संगतीत राहील तसा त्याच्यात बदल होतो. जुआरी संगतीने शराबी संगतीने शराबी होतो. त्यागी संत संगती त्याग, भावना निर्माण करते.आपणास चांगला मानव बनायचे असेल तर ज्यादा प्रयास न करता चांगल्या श्रेष्ठ व्यक्तीच्या सहवासात रहा. आपल्यात चांगले गुण स्वयंमेव येतील मरणानंतर कोणी मित्र नाही तर कोणी शत्रू नाही हा डोळ्यांचा खेळ आहे.स्वप्न आहे. जीवनात मृत्यू कला शिका. सारे जग आर्ट ऑफ लिविंग जगण्याची कला शिकविते.भगवान महावीर जगण्याबरोबर मृत्यूची कला शिकवितात. मृत्यू,समाधी व निर्वाण या तीन प्रकाराने आत्मा शरीर सोडतो.जी व्यक्ती मरताना आप्त परिवारांची आठवण काढते.व दुसऱ्यांचे वाईट चिंतीते ती व्यक्ती मिथ्या दृष्टीची मृत्यू आहे.परमात्म्याचे स्मरण करत जी व्यक्ती शरीर सोडते ते समाधि



मरण आहे. समाधीस्त ५ किंवा ७-८ भवात मोक्ष प्राप्त करतो.निर्वाण अंतिम मृत्यू आहे.त्यानंतर आत्मा शरीर धारण करत नाही. त्याचे जन्म जरा मरण होत नाही.निर्वाण मोक्ष प्राप्ती होते. भगवान वीतरागी आहेत. अर्थात ज्यांच्यात राग(ममत्व) नाही ते वितरागी.ते द्वेषी बनत नाहीत.जेथे राग आहे तेथे द्वेष आहे.जितके कष्ट राग देतो तेवढे कष्ट द्वेष देत नाही.द्वेषात मानव वस्तू व्यक्तीला सोडू इच्छितो पण रागात वस्तू किंवा व्यक्तीला सोडू शकत नाही. रागाच्या चिंतामध्ये तो स्वत:लाच विसरतो. राग ज्यादा कष्टकारी आहे. क्रोध, मान, माया,लोभ हे विकार व रागद्वेष सोडतात ते खरे वीतरागी होत. जसे आपण फालतू खर्च करत नाही तसे आपण आपला श्वास क्रोध, मान,माया,लोभ व पापात खर्च करू नका.हर श्वासाचा सदुपयोग करा.सांसे श्वास धनापेक्षा श्रेष्ठ आहे.मौत बचपन जवानी बुढापा पहात नाही.जेथे जन्म आहे तेथे मृत्यू आहे.

मंत्र पठण करण्यापूर्वी त्या मंत्राप्रती अती श्रध्दा आवश्यक आहे.कोणताही मंत्र जोपर्यंत प्राणपणाने जपत नाही तोपर्यंत त्यात प्राणशक्ती येत नाही.मन व आत्म्यापासून केलेला जप आपल्या साधनेत सहाय्यक होतो. महामंत्र णमोकार जपताना भाव भक्तीरूप झाले पाहिजे. णमोकार मंत्र साधनेसाठी आहे.मंत्राचा जाप मानव स्वार्थ लालच व भयामध्ये करतो. मानव देवदेवतांच्याकडे मागून धनसंपत्तीची इच्छा करतो.अशी श्रध्दा मुर्खपणा आहे.देव देवता संपत्ती देत असने तर अमेरिका कंगाल झाला असती,आज अमेरिका सगळ्यात धनवान आहे.अमेरिकेत कोणत्याही देवदेवताची पूजा होत नाही.धर्म धनप्राप्तीसाठी नाही तर आध्यात्मिक शांती व नैतिक आचरणासाठी आहे.आज लोकांनी धर्माला पारिवारीक सुख आणि धन प्राप्तीचे साधन मानले आहे. णमोकार मंत्र जप हा सफेद, लाल, पिवळा,हिरवा व निळा अशा पाच रंगात केला जातो.प्रत्येक पदाला या रंगात स्थापित करून णमोकार मंत्र जाप ध्यान केला पाहिजे.सफेद रंगात णमो अरिहंताणं ध्यान केला पाहिजे.सफेद रक्तकणाची पूर्ती होवून मनात स्थिरता येते. लाल रंगावर सिध्द भगवान ध्यान केल्याने शरीरात हिमोग्लोबीनची पूर्ती होते.

श्रावक श्राविका म्हणतात मुनी माताजी आपण जाप ध्यानपूर्वक करण्यास सांगतात. पण आम्हाला मरणाची फुरसत नाही.जैन धर्मात सारी व्यवस्था आहे.अर्थात प्रभू भगवान महावीर सांगतात की, ज्याना आज आत्महितार्थ समय नाही. त्यांना पुढे असा पर्याय मिळेल की,मरणाची फुरसत मिळणार नाही. ते निगोदात जातील.जेथे एका श्वासात अठरावेळा जन्म मरण होईल. ज्ञानाचे डोळे उघडून पहा. संसारात ग्रहण करणे योग्य काय आहे व सोडणे योग्य काय आहे. भगवान महावीर वाणीद्वारा प्राप्त शास्त्रांचे अध्ययन आवश्यक आहे. तेव्हाच आपण धर्माला खऱ्या अर्थाने जाणू व त्याचा अंगीकार करू.

मंदिरात प्रभू दर्शन करण्यास जावून त्यांच्या ध्यानस्त शरीराची भाषा शिक्षा घेतली पाहिजे. त्यांच्या जीवनांचे आदर्श आणि त्यांच्या गुणांना आपल्या खऱ्या जीवनात उतरविले पाहिजे.सम्यक दर्शन-ज्ञान,चारित्र्य यांची प्राप्तीसाठी मंदिराभोवती तीन प्रदक्षिणा घालतो. प्रदक्षिणाने त्यांच्या आभा मंडलाची पवित्रता आमच्यात प्राप्त होते. आम्ही प्रभू चरणी तांदूळ चढवितो. कारण तांदूळ जमिनीत पेरल्यावर उगवत नाहीत.तसेच हे भगवान माझा जन्म मरण न हो या भावनेने (अक्षय सुख प्राप्ती मोक्ष)मी तांदूळ चढवितो. दिपकाप्रमाणे माझे जीवन प्रकाशमान हो अशी भावना भक्त आरती करताना करतो.दिपक स्वयंप्रकाशी आहे आणि दुसऱ्यांना प्रकाशीत करतो.मी स्वत: प्रकाशीत होऊ व जगाला ज्ञानाचा (केवलज्ञान) प्रकाश देत राहो. केवलज्ञान प्रकाशकाय दिपम निरूपामी स्वाहा.

आपल्या घरात एक झाड लावा त्याला पाणी देत चला. खात्री आहे की, त्याचे फल आपणास मिळतील.झाडे दगड मारले तरी फळच देतात.वृक्ष छाया, फल,आणि आपणास प्राणवायू देतात.पूर्वी प्रत्येक घरात एक गाय व वृक्ष असत.गाय आपणास दूध, गोमूत्र,शेण व खत देवून परोपकार करणे शिकविते.आपण गायब झाड वृक्षाप्रमाणे परोपकारी बना. भगवान महावीरांनी पाच स्थावर सांगितले आहेत. १)पृथ्वी २) जल ३)अग्नि ४)वायू ५) वनस्पती या पाचामध्ये एकेंद्रिय जीव असतात.जीव जीवाची रक्षा करणे, पृथ्वीला आम्हीच व्यर्थ खोडू नये.पानीचे तेवढेच उपयोग करा जेवढे आपणास आवश्यक आहे.एक बूंद पाण्यात जलात ३६४५० जीव असतात. पाणी गाळून पाण्यातील जीव पाण्यात सोडून थोड्या पाण्यात कार्याची पूर्ती करा. पंखा, एसी,कुलर हे आम्ही तेवढेच चालविले पाहिजेत.जेवढे आवश्यक आहे. वायुकायीक जीव हिसा होते.अग्नि सुध्दा जेवढी आवश्यक आहे तेवढीच जाळा.वनस्पतीमध्ये अनंत जीव असतात म्हणून भगवान महावीर फुल,फल,पान तोडण्यास मना करतात. फुल वृक्षाचे अंग आहे. गुलाब आदीर फुलात छोटे छोटे जंतू जीव असतात.तोडल्यावर जीव जंतू हानी होते.मृत्यू होतो. फूल,फल,पान,नही तोडने चाहिये. वे स्वयं एक समय बाद वृक्ष को छोडे देते है।

भगवान महावीर मात्र मानवाबरोबर सर्व प्राणीमात्राबरोबर प्रेम करता सर्व प्राण्यांना जगण्याचा अधिकार आहे.तुम्ही स्वत: जगा आणि दुसऱ्या प्राण्यांना जगू द्या. अहिंसा परमो धर्म: व जगा आणि जगू द्या.हे दोन संदेश महावीराचे आहेत.धर्मो रक्षति धार्मिकम् आज देशाला पहरेदाराशी नाहीतर गद्दारापासून खतरा आहे.आज धर्माला नास्तिकापासून नाही तर आस्तिकापासून खतरा आहे.ज्या धरतीवर भगवान आदिनाथ, महावीर,बुध्दराम,हनुमान व विवेकानंद अशा पुरूषांनी जन्म घेतला.त्यांचे आदर्श आपणाला अभिभूत करत आहेत. अशा धरतीवर जन्म महापुण्याईने होतो. आम्हाला गर्व आहे.आमचा जन्म भारतात झाला.परत मोक्ष मिळेपर्यंत भारतीय भूमीवर जन्म घेत भगवान महावीर म्हणतात स्व यानी आत्मा तंत्र यांनी शासन अर्थातआत्माचे शासनही स्वतंत्रता. अष्ठ कर्मापासून मुक्ती मिळवा. आमसे अच्छा कोई फल नही होता। गुलाबसे अच्छा कोई फुल नही होता.सारी दुनियामें जाकर देख लेना की भारत देशसे अच्छा कोई देश नही होता.

सुरेश जोलापुरे, हलकर्णी
मो.नं.८२७५१०८८५१

# अनंत चतुर्दशीचे व्रत का करतात ?



**अनंत चतुर्दशी** हे भाद्रपद शुक्ल चतुर्दशीला येणारे श्री विष्णूच्या 'अनंत' (शेषशायी, अंत नसलेल्या) रूपाचे व्रत आहे. या दिवशी चौदा गाठींचा अनंत सूत्र (दोरा) पूजून हातावर बांधला जातो... रक्षक सूत्र मानले जाणारे. यंदा (२०२६) हा दिवस शुक्रवार, २५ सप्टेंबर असून, त्याच दिवशी महाराष्ट्रात गणेशोत्सवाची सांगता... सार्वजनिक गणपतींचे विसर्जनही होते.

अनंत म्हणजे ज्याला अंत नाही... काळ, अवकाश व सृष्टीच्या पलीकडचे विष्णूचे शाश्वत रूप. सृष्टीपूर्वी शेष–सर्पावर शयन करणारा नारायण हेच या व्रताचे आराध्य रूप मानले जाते. दक्षिण भारतात याच व्रताला 'अनंत पद्मनाभ व्रत' असे म्हणतात. अनंताचे प्रतीक: काळ, अवकाश व सृष्टीच्या पलीकडचे विष्णूचे शाश्वत रूप... त्यामुळेच त्यांना 'अनंत' म्हटले जाते.

काम्य व्रत: गमावलेली समृद्धी, सुख–शांती परत मिळावी व दुःख–संकटे दूर व्हावीत यासाठी हे व्रत केले जाते. श्रीकृष्णाने वनवासातील पांडवांना हे व्रत सांगितले, अशी कथा आहे.

अनंत सूत्राचा प्रतीक–अर्थ: याबाबत परंपरांत भेद आहे... काही परंपरांत चौदा गाठींचा अर्थ चौदा लोक असा सांगितला जातो, तर काहींत तो चौदा वर्षांच्या व्रत–संकल्पाशी जोडला जातो; एका मांडणीत दोऱ्यात आरंभी विष्णु, मध्ये बारा देवता व अंती अनंत (शेष) यांचे पूजन मानले जाते.

महाराष्ट्रातील संदर्भ: याच दिवशी दहा दिवसांच्या गणेशोत्सवाची सांगता होते ... सार्वजनिक गणपतींचे विसर्जन (गणेश चौदस). विसर्जनाचा तपशील गणेश चतुर्थी पानावर आहे. अनंत चतुर्दशीची कथा परंपरेने महाभारत व पुराणांत सांगितली जाते.

द्यूतात राज्य गमावून पांडव बारा वर्षे वनवास व एक वर्ष अज्ञातवास भोगत असताना, श्रीकृष्णाने युधिष्ठिराला अनंत चतुर्दशीचे व्रत करण्यास सांगितले. या व्रताचे माहात्म्य सांगण्यासाठी कृष्णाने कौंडिण्य ऋषी व त्यांची पत्नी सुशीला यांची कथा सांगितली. सुमंत नावाच्या ऋषींची सद्गुणी कन्या सुशीला. आईच्या निधनानंतर सावत्र आई कठोरपणे वागत असे, आणि सुशीलेचा पती कौंडिण्य ऋषींना हुंड्यात अगदी क्षुल्लक वस्तूच मिळाली. आश्रमाकडे जाताना वाटेत नदीकाठी सुशीलेला व्रत करणाऱ्या स्त्रिया भेटल्या; त्यांच्याकडून अनंत व्रताचे महत्त्व शिकून सुशीलेने तिथेच व्रत केले आणि चौदा गाठींचे सूत्र हातात बांधले.

घरी परतल्यावर कौंडिण्याला ते सूत्र दिसले. ''आपले वैभव या व्रतामुळेच'' असे ऐकून त्याने अभिमानाने ते सूत्र अग्नीत टाकले ...अनंताचा हा अपमान मानला गेला. यानंतर त्यांच्यावर दारिद्र्य, अवहेलना व विध्वंस ओढवला. पश्चात्तापदग्ध कौंडिण्य अरण्यात अनंताचा शोध घेऊ लागला. अखेर अनंत (काही आवृत्तींत वृद्ध ब्राह्मणाच्या रूपात) प्रकट झाले आणि ''तू माझा तिरस्कार केलास'' असे सांगितले; पण त्याचा पश्चात्ताप स्वीकारून त्याला चौदा वर्षे हे व्रत करण्यास सांगितले. व्रत पूर्ण होताच सर्व दुःख संपून वैभव परत आले.

या कथेचा बोध असा... भक्ती व श्रद्धेचा अपमान केल्यास अवनती होते, आणि सातत्यपूर्ण अनंत–उपासनेने रक्षण व समृद्धीची पुनर्प्राप्ती होते.

विष्णुभक्त... विशेषतः गमावलेले वैभव किंवा शांती परत मिळवू इच्छिणारे, संकट–निवारणासाठी संकल्प करणारे ... हे व्रत करतात. काम्य व्रत असल्याने ते विशिष्ट हेतूने घेतले जाते. अनेक ठिकाणी पती–पत्नी मिळून व घरातील गृहिणी हे व्रत करतात; पुरुष व स्त्रिया दोघेही अनंत सूत्र धारण करतात.

दक्षिण भारतात (केरळ, आंध्र, तमिळनाडू, कर्नाटक) 'अनंत व्रतम्?/अनंत पद्मनाभ व्रत' म्हणून हे घरोघरी व मंदिरांत अधिक ठळकपणे पाळले जाते. महाराष्ट्रात मात्र ते तुलनेने गणेशोत्सवाच्या सावलीत असते, कारण त्याच दिवशी विसर्जन असते.

पूजाविधी

खालील क्रम सर्वसाधारण आहे; घराण्याच्या व परंपरेनुसार तपशील बदलू शकतो.

प्रातःस्नानानंतर व्रताचा संकल्प करावा; कलशावर शेष–शय्येवर शयन करणाऱ्या विष्णूची मूर्ती किंवा चित्र स्थापित करावे.

चौदा गाठी असलेले हळदीने रंगवलेले अनंत सूत्र (दोरा) समोर ठेवावे; काही परंपरांत ते काकडीभोवती गुंडाळून पंचामृतात फिरवले जाते.''ॐ अनन्ताय नमः'' या मंत्राने विष्णू व अनंत सूत्राची षोडशोपचार पूजा करावी; विष्णुसहस्रनाम किंवा स्तोत्र म्हणावे.

पूजन झाल्यावर मंत्र म्हणत पुरुषांनी उजव्या दंडावर, स्त्रियांनी डाव्या हातावर अनंत सूत्र बांधावे.

अनंत व्रतकथेचे वाचन किंवा श्रवण करून गोड नैवेद्य अर्पण करावा.

परंपरेने हे व्रत सलग चौदा वर्षे करून नंतर उद्यापन केले जाते असे सांगितले जाते; मात्र नेमकी उद्यापन–विधी कोणत्याही तपासलेल्या स्रोतात तपशीलवार दिलेली नाही.

पूजा साहित्य

शेषशायी विष्णूची मूर्ती किंवा चित्र, कलश–सुपारी, चौदा गाठींचे अनंत सूत्र (दोरा), हळद–कुंकू, गंध/अष्टगंध, अक्षता, फुले (तुळशीपत्रासह), धूप–दीप–निरांजन, पंचामृत, (परंपरेनुसार) काकडी, नैवेद्यासाठी गोड पदार्थ, विड्याची पाने–सुपारी–दक्षिणा, फळे., कलश, सुपारी, चौदा गाठींचा अनंत दोरा,हळद–कुंक,/गंध, अष्टगंध. अक्षता, फुले, तुळशीपत्र, धूप, दीप, निरांजन, पंचामृत, नैवेद्यासाठी गोड पदार्थ,दक्षिणा,फळे

उपवास / आहार नियम

अनेक भाविक अनंत चतुर्दशीला उपवास करतात व पूजा–कथाश्रवणानंतर फलाहार–नैवेद्य घेऊन सोडतात; काही सात्त्विक किंवा एकभुक्त आहार पाळतात. कडक उपवास सर्वांना बंधनकारक नाही... घरच्या व स्थानिक परंपरेनुसार बदलते.

मंत्र,मूलमंत्र ''ॐ अनन्ताय नमः'' हा अनंताला केलेला नमस्कार असून, अनंत सूत्र–पूजन व धारणाचा मुख्य मंत्र आहे. सूत्र–धारण करताना पारंपरिक धारण–श्लोकही म्हटला जातो ...त्याची ओळख–ओळ ''अनन्तसंसारमहासमुद्रे'' अशी दिली जाते. या व्रतात विष्णुसहस्रनाम किंवा विष्णुस्तुतीचेही पठण केले जाते.

प्रादेशिक रीती

दक्षिण भारत: केरळ (तिरुवनंतपुरम–संदर्भ), आंध्र–तेलंगण, कर्नाटक (उडुपी कृष्ण मंदिरादी) व तमिळनाडूतील विष्णुमंदिरांत हे व्रत प्रमुख विष्णु–व्रत म्हणून ठळक असते; माध्व–वैष्णव परंपरेत विशेष महत्त्व आहे.

महाराष्ट्र: येथे अनंत चतुर्दशी प्रामुख्याने गणेशोत्सवाच्या सांगतेचा (विसर्जनाचा) दिवस म्हणून ओळखली जाते; अनंत–व्रत घरगुती पातळीवर कमी–अधिक प्रमाणात, तर विष्णुभक्त व काही घराण्यांत सूत्र–धारणासह पाळले जाते.

पुढच्या वर्षी नवे सूत्र बांधताना जुने सूत्र विसर्जित करण्याची प्रथा भागानुसार बदलते.

आज लक्षात ठेवा

तारीख गल्लत टाळा: अनंत चतुर्दशी (विष्णु व्रत) व गणेश चतुर्थी या दोन वेगळ्या तिथी असल्या तरी एकाच पक्षात येतात अनंत चतुर्दशी हा गणेशोत्सवाचा शेवटचा दिवस.

व्रताचा हेतू: काम्य व्रत असल्याने ते विशिष्ट संकल्पाने घेतले जाते; चौदा वर्षे सातत्य ही पारंपरिक अपेक्षा आहे, पण सर्वांना बंधनकारक नाही.

विसर्जन–दिवशी गर्दी: महाराष्ट्रात याच दिवशी सार्वजनिक विसर्जन मिरवणुका असतात...गर्दी व पाण्याजवळ काळजी घ्यावी, स्थानिक प्रशासनाच्या सूचना पाळाव्यात.

## अनंत चतुर्दशीला बांधलेला 'अनंत धागा' उघडण्यासाठी योग्य वेळ आणि दिवस कोणता ?

**हिंदू धर्मात** अनंत चतुर्दशी हा सण गणपती विसर्जन म्हणूनही साजरा केला जातो. असे म्हटले जाते की गणेश चतुर्थीच्या दिवशी गणपतीची स्थापना केल्यानंतर, चतुर्दशी तिथीच्या दिवशी त्याचे विसर्जन केले जाते. इतकेच नाही तर, गणपती विसर्जनाव्यतिरिक्त, या दिवसाचे विशेष महत्त्व आहे. या विशेष दिवशी भगवान विष्णूची पूजा केली जाते आणि लोक त्यांच्या खांद्यावर १४ गाठी असलेला 'अनंत सूत्र' किंवा 'अनंत धागा' म्हणतात. काही ठिकाणी तो अनंत या नावानेही ओळखला जातो. हा धागा सहसा भगवा, लाल किंवा पिवळ्या रंगाचा असतो. या धाग्यातील १४ गाठी विष्णूजींच्या १४ रूपांचे आणि १४ लोकांचे प्रतीक मानल्या जातात. जर हा धागा पुरुषांना बांधला असेल तर तो उजव्या हातात बांधला जातो, तर विवाहित महिलांनी डाव्या हातात हा धागा बांधणे शुभ मानले जाते. असे म्हटले जाते की हा धागा धारण केल्याने व्यक्तीच्या आयुष्यात नकारात्मक ऊर्जा राहत नाही आणि घरात आणि कुटुंबात समृद्धी राहते.



अनंत धागा कोणत्या दिवशी उघडणे शुभ आहे?

अनंत धागा बांधल्यानंतर बरेच लोक तो उघडण्यास विसरतात. असे करणे योग्य नाही. जर आपण शास्त्रांच्या नियमांबद्दल बोललो तर हा धागा किमान १४ दिवस बांधला पाहिजे. तुम्ही हा धागा १४ दिवस, १४ महिने किंवा १४ वर्षे बांधून ठेवू शकता. तथापि, जर तुम्ही तो जास्त दिवस बांधू शकत नसाल, तर अनंत चतुर्दशीच्या अनंत धागा बांधतात. भाद्रपद शुक्ल पक्षाच्या चतुर्दशीला अनंत चतुर्दशीचा सण साजरा केला जातो. पंचांगानुसार, यावर्षी अनंत चतुर्दशीचा सण ६ सप्टेंबर रोजी साजरा केला जाईल. असे म्हटले जाते की अनंत धाग्याच्या १४ गाठी भगवान विष्णूच्या १४ नावांचे प्रतिनिधित्व करतात आणि त्यांच्या वेगवेगळ्या रूपांबद्दल सांगतात. हा धागा अनंत चतुर्दशीच्या दिवशी बांधला जातो आणि तो विष्णूजींच्या शक्तींचे प्रतीक आहे, परंतु एक प्रश्न मनात येतो की हा धागा कोणत्या दिवशी उघडावा आणि अनंत चतुर्दशीच्या किती दिवसांनी तो उघडणे शुभ आहे.

अनंत चतुर्दशीच्या दिवशी अनंत धागा कसा बांधला जातो?

अनंत चतुर्दशीच्या दिवशी सकाळी लवकर उठून स्नान केल्यानंतर भगवान विष्णूच्या अनंत रूपाची पूजा केली जाते आणि त्यांच्या मूर्ती किंवा चित्रासमोर १४ गाठी असलेला धागा ठेवला जातो. रेशमी धाग्याने १४ गाठी बांधून हा धागा बनवला जातो. घरातील ज्येष्ठ सदस्य कुटुंबातील इतर सदस्यांच्या हातावर हा धागा बांधतो, हा धागा हाताच्या अशा भागावर बांधला जातो जिथे बाहेरील कोणीही तो पाहू शकत नाही. या कारणास्तव, हा धागा हातावर बांधणे चांगले आहे.

अनंत धागा हातात बांधण्याचे महत्त्व

अनंत चतुर्दशीला हातात बांधलेल्या धाग्याला

दिवशी पूजा केल्यानंतर हा धागा उघडा. जर तुम्ही दरवर्षी हा धागा बांधत असाल, तर लक्षात ठेवा की तुम्ही तो अनंत चतुर्दशीच्या दिवशी उघडता आणि पुन्हा नवीन अनंत धागा बांधता.

शास्त्र आणि परंपरेनुसार, काही खास दिवसांमध्ये अनंत धागा उघडण्यास सांगितले आहे, ज्यामध्ये पुढील अनंत चतुर्दशीचा दिवस सर्वात खास असतो.

पुढील अनंत चतुर्दशीला, तो उघडला जातो आणि त्याऐवजी नवीन धागा बांधला जातो. असे केल्याने, जुन्या धाग्याचा संकल्प देखील पूर्ण होतो आणि नवीन धागा नवीन सकारात्मक ऊर्जा आणतो. मंगळवार आणि शनिवारी हा धागा न उघडण्याचा प्रयत्न करावा.

धागा उघडताना काय करावे?

अनंत धागा उघडताना, फक्त तो काढणे पुरेसे नाही, तर यासाठी काही नियमांचे पालन करणे देखील आवश्यक आहे.

विष्णूजींसमोर बसून तुम्ही नेहमीच अनंत धागा उघडला पाहिजे. धागा उघडा आणि स्वच्छ जागी ठेवा. हा धागा कधीही कचऱ्यात टाकू नका.अनंत धागा उघडल्यानंतर, तुम्ही तो पवित्र नदीत वाहू शकता किंवा बागेच्या मातीत पुरू शकता. जर तुम्ही तो नदीत वाहू शकत नसाल तर तुम्ही तो पिंपळ किंवा तुळशीच्या झाडाखाली ठेवू शकता.

## कोणाही जीवाचा न घडो मत्सर।



**एकदा** मनात वैरत्व बीजे रुजली की व्यक्तीचा माणूसपणापासून दूरचा प्रवास सुरू होतो. म्हणून मानवी मनाच्या भावावस्थेत निर्विकार, निरपेक्ष, निर्व्याज प्रेमभाव वाढीस लावायचा असेल तर मनातील अंतरीच्या 'वैरत्व' भाववास्थेकडून 'निरवैरत्व'भावावस्थेपर्यंतचा प्रवास आत्मिक सुखासाठी अधिक गरजेचा ठरतो.

'निरवैरत्व'भावावस्थेची पूर्वअट मनाची नितळता होय. बाह्य सामाजिक प्रदूषकांनी माणसाच्या मनात इतका गढूळ गाळ साचत जातो की त्याची नैसर्गिक शुद्धता आपोआप लोपते. ती लोपू द्यायची नसेल तर मनावर विवेक,विचार,संयम व अधिराज्य हवे;तेव्हा सम्यक दृष्टीचे मन षड्रिपूंना झिडकारते.मात्र द्वेष,मत्सर,मोह,माया, अहंकाराचा वारा मनात शिरला की त्याठायी पुन: सात्विक भाव निर्माण होणे कठीण.

कोणाही जीवाचा न घडो मत्सर। वर्म सर्वेश्वर पूजनाचे।।हे संतांचे प्रमाणभूत तत्त्व जीवनामध्ये आत्मसात करावे लागते. वैरत्वाचे दमन तेव्हाच होते जेव्हा व्यक्ती प्रेम, ममत्व, स्नेह, आपुलकी, मित्रत्व या चिरंतन व शाश्वत मूल्यांची कास धरते. मनुष्यास हेच हितकारक असून याने मनाचे आयुरारोग्य उत्तम राहते. संतांनी हाच उपाय योजिला.

सामान्य माणसाचे 'निरवैरत्व' अवस्थेकडे जाणे म्हणजे संतत्वाकडे जाणे होय.कोणत्याही बाबतीत इतरांचा द्वेष, मत्सर आणि कुणाप्रती वैरत्व नसेल तेव्हा मनुष्य किती सुखात असेल; ही अवस्था किती प्रियोत्तम! दया, करुणा, क्षमा, शांती, निरवैरत्व, अहंकारविहीन शुद्धता, सात्विक भावावस्था साधुत्वाकडे घेवून जाते.

मळ नाही चित्ता। तेथे देवाचीच सत्ता ।।

निर्मळ, निरपेक्ष, नितळ मनात देवत्व वसते. तेव्हा मनातला 'मळ' समूळ नष्ट करून सर्वांभूती प्रेमभाव वाढीस लावण्यासाठी मनाची 'निरवैरत्व' अवस्था अतिशय उपयुक्त आहे; गरज आहे त्याच्या प्रचितीची!

## देवाचा रंग

**सगळे** रंग देवाचे. सगळा प्रकाश त्याचाच. सगळे ओले रंग एकमेकांत मिसळा. शेवटी उरेल तो रंग विठूचा. न्यूटनची तबकडी त्याची. काचेचा लोलक त्याचा. प्रकाश म्हणजे ईश्वर. त्यातून सगळ्या रंगांचं अपस्करण होतं. आपण खरंतर देवाच्या रंगात मिसळायला पाहिजे. आपण देवाला सोयीचा रंग देण्याची व्यर्थ धडपड करतो. ही धडपड आपला अहंकार प्रकट करते. आपली सत्तालालसा प्रकट करते. वर्चस्वाची हाव प्रकट करते. आपलं क्षुद्रत्व प्रकट करते. आपण असे करंटे की आपण देवावर सत्ता गाजवायला निघतो. सत्तेचा मद केवळ हिंसा घडवू शकतो.



तुकोबांची तंद्री मोडण्याचं हीन कृत्य करतो. सगळ्या समाजाला नैतिक आधार देणाऱ्या कवितेच्या वह्या बुडवायला भाग पाडतो. ज्ञानोबाला त्रास. तुकोबाला त्रास. चोखोबाला त्रास. सत्तेच्या सिंहासनावर रक्ताचे डाग असतात. देव तर भक्ताच्या झोपडीतल्या घोंगडीवर आनंदाने बसतो. चोखोबांची गुरे राखतो. सोयराबाईंच्या झोपडीत जेवायला जातो. तेही सहन होत नाही. मारहाण करतात संत चोखोबांना. देव असा कनवाळू ,की व्रण उमटतात त्याच्या देहावर. घाव चोखोबाला वळ विठोबाला. भक्तीतील तादात्म्यता समजून घ्यायला हवी. दोघांमधली तादात्म्यताच अशी, की अवघा रंग एक होऊन जातो. मंदिरात प्रवेश द्या... न द्या. त्याच्या आणि सोयराबाईंच्या भेटीला कुणी अडवू शकत नाही. यातला संदेश फार सोपा, पण मोलाचा आहे.

संसारात असूनही विदेहीपण अनुभवता येतं. संत सोयराबाईंचा केवढा अधिकार. मनाची निर्मळता अशी की तो आपल्यातच सामावला आहे याची त्यांना प्रचिती येते. अवघा रंग एक झाल्याची अनुभूती येते. एकरूपतेचा साक्षात्कार होतो.

एक सामान्य गृहिणी, चोखोबांची पत्नी, त्यांचीच शिष्या होते. विठू माउलीवर अतुट निष्ठा ठेवते. उपेक्षित, अपमानित आयुष्याच्या होरपळीत हे प्रेम, ही निष्ठा, ही भक्ती अधिकच झळाळून निघते. कटूता नाही. द्वेष नाही. मत्सर नाही. अंतर्मनात वाहणारा केवळ विशुद्ध भाव. सोयराबाई संतत्वाला पोहोचल्या त्याविठू माउलींवर केलेल्या निरपेक्ष भक्तीने. म्हणून विठूच्या रंगात मिसळून जाणं सोयरा माउलींकडून शिकावं.

## विसर्जनापूर्वी गणरायाच्या कानात 'हे' म्हणा,सर्व इच्छा होतील पूर्ण

**वक्रतुण्ड महाकाय**
**सूर्यकोटि समप्रभ ।**
**निर्विघ्नं कुरु मे देव**
**सर्वकार्येषु सर्वदा ।।**

प्रत्येक शुभ कार्यात वरील श्लोक वरील श्लोक आवश्यक म्हटला जातो. श्लोक संस्कृत असला तरी खुप अर्थपूर्ण आहे. श्लोकाचा अर्थ म्हणजेच ''वाईट मार्गाचे आचरण करणाऱ्यांना सरळ मार्गावर आणणाऱ्या, विशाल शरीर असलेल्या, कोटी सूर्यांची प्रभा लाभलेल्या हे देवा श्रीगणेशा माझी सर्व कार्ये नेहमी निर्विघ्नपणे पार पडू दे.''

दहा दिवसांचा पाहुणचार घेऊन आपल्या सर्वांचे बाप्पा आता आपला निरोप घेण्यासाठी सज्ज झाले. गणपती विसर्जाच्या आधी आपल्या बाप्पाची थोडीशी पार्श्वभूमी सांगावी वाटते. भाद्रपद शुद्ध चतुर्थी या तृतीयेला आपल्या लाडक्या गणरायाचे घरोघरी आगमन होत असते. चराचरात चैतन्य निर्माण झालेले असते. सकल कलांचा अधिपती आपला लाडका गणपती बाप्पा आपल्या सर्वांच्या भेटीसाठी येतो. थोरामोठ्यांपासून सगळेच त्याची आतुरतेने वाट बघत असतात. त्याचे आगमन झाल्यावर काय करावं काय नको असं होत असतं. लाडक्या गणरायाचे विसर्जन म्हणलं तरी डोळ्यात टचकन पाणी येतं. गावागावात वेगवेगळ्या प्रकारे गणपतीचं विसर्जन करण्याची पद्धत असल्याचे आपल्याला दिसून येते. कुणी ढोल ताशांच्या गजरात मिरवणूक काढतात. कोणाचे लेझीम पथक असतात. कुणी डीजे वाजवत बाप्पाला निरोप देतात. मला तर वाटतं निरोप म्हणाल्यावर आपण हरी भजनाच्या गजरात आपल्या लाडक्या बाप्पाला निरोप घ्यायला हवा. ते कर्णकर्कश आवाज, ती रंगांची उधळण हे सगळ कशासाठी हो? टाळ मृदुंगाच्या गजरात किंवा साधी घंटी वाजवून जरी आपण त्याला निरोप दिला ना तर तो त्याला जास्त आवडेल. आपण आपल्याला आवडतं ते करतो, पण आपल्या बाप्पाला काय वाटत असेल, त्याला आपल्या अशा वागण्याचा किती त्रास होत असेल याचा विचार कधीच कुणी करत नाहीत. वर्षभर आपण गणेश उत्सवाची वाट बघतो. फक्त दहाच दिवस तो आपल्या घरी राहतो. पाहुणचार घेऊन आपला निरोप घेतो. तो विसर्जनाचा दिवस उगवला की अंगावर काटा उभा राहतो.



(पान ३ वर)